# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/ २०१४** **दिनांक ०५.०६.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दिनांक २३.०५.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ८८६/ २०१४, दिनांक २१ मे, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दि.२३.०५.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली होती. या सभेमध्ये वेळेअभावी अजेंडा (विषयसूची) वरील अ.नं. ०१ ते ४९ विषयांवर चर्चा होऊन निर्णय झाले होते. उर्वरित विषयांवर पुढील सभेमध्ये चर्चा केली जाईल व त्यावेळेस उपरोक्त संदर्भीय अजेंडा (विषयसूची) राहील, असे समितीने ठरविले होते.

त्यानुसार उपरोक्त संदर्भीय अजेंडा (विषयसूची) वरील उर्वरित विषय नं.५० पासून पुढील विषयांवर चर्चा करणेसाठी श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक ०५.०६.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ११०७/ २०१४, दिनांक ०३ जुन, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक ०५.०६.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.५०** **श्री विवेकानंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी येथील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी श्री साईनाथ रुग्णालयात प्रशिक्षणासाठी (Internship) पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात सध्या दैनंदिन अंदाजे १००० ते १२०० बाहय रुग्ण तपासले जातात. तसेच येथे एकूण ३०० ऑपरेशनल बेड आहेत. दररोज ४० ते ५० शस्त्रक्रिया केल्या जातात. रुग्णालयाचे काम अलीकडील ३ ते ४ वर्षात खुपच वाढले असून त्या प्रमाणात डॉक्टरांची संख्या मात्र पुर्वी पेक्षाही कमी झालेली आहे. नविन डॉक्टर भरती करतांना तांत्रीक अडचणी उद्‌भवत आहे. त्याचा परिणाम रुग्णांच्या दैनंदिन सेवेवर होत आहे. सध्या साईनाथ रुग्णालयात विरार येथील होमीओपॅथीक कॉलेजचे ०८ प्रशिक्षणार्थी विद्यार्थी डॉक्टर नियमित येत असतात. त्यामुळे रुग्णालयातील रुग्ण सेवा सुरळीत चालणेसाठी नक्कीच हातभार लागत आहे. परंतू त्यांची संख्या अपूरी आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाकडून २५ इंटर्नस् डॉक्टरांची मंजूरी आहे. परंतू तिकडून केवळ ३ ते ४ इंटर्नस् पाठविले जातात. रुग्णालयाचे सध्याचे वाढलेले कामकाज बघता सध्याची उपलब्ध होणारी इंटर्नस् संख्या अपुरीच आहे. त्यातच वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होण्यास येणाऱ्या अडचणींमुळे रुग्णसेवा प्रभावीत झाली आहे.

आता, राहुरी येथील विवेकानंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, यांनी साईनाथ रुग्णालयात प्रशिक्षणार्थी विद्यार्थी डॉक्टर पाठविणे बाबत विनंती अर्ज दिलेला आहे. सदर महाविद्यालय भारतीय चिकीत्सक केंद्रीय परिषद, नवी दिल्ली येथील कौन्सीलकडे मान्यता प्राप्त असून त्या महाविद्यालयात दरवर्षी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. त्या महाविद्यालयातून दरवर्षी मे/ जुन व डिसेंबर/ जानेवारी या महिन्यांमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी बाहेर पडतात. या महिन्यांमध्ये अंदाजे प्रत्येकी १७ विद्यार्थी रोटेशन प्रमाणे ६ महिन्यांसाठी साईनाथ रुग्णालयात प्रशिक्षणासाठी पाठविणे बाबत महाविद्यालयाने विनंती केलेली आहे.

साईनाथ रुग्णालयातर्फे दैनंदिन रुग्णालयीन सेवांव्यतिरिक्त प्रथमोपचार केंद्र, फिरते वैद्यकीय पथक, वृध्दाश्रमातील रुग्णांना भेटी, उत्सव काळात पालखी मार्गावर मोबाईल सेवा, साईआश्रम येथे प्रथमोपचार सेवा इ. वैद्यकीय सेवाही नियमितपणे द्याव्या लागतात. उपरोक्तप्रमाणे प्रशिक्षणार्थी डॉक्टरर्स् यांना संस्थान रुग्णालयामध्ये परवानगी दिल्यास त्यांचा निश्चितच रुग्णसेवा सुरळीत राखणेसाठी मदत होईल. या प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना संस्थानतर्फे कुठल्याही प्रकारचे मानधन अथवा विद्यावेतन द्यावे लागणार नाही. त्यांना विरार येथील डॉक्टरांप्रमाणेच शेअरींग बेसीसवर निवासव्यवस्था व संस्थानतर्फे मोफत भोजनाची व्यवस्था करावी लागेल.

तरी संदर्भिय विनंती अर्जानुसार डॉक्टरांना संस्थानच्या दोनही रुग्णालयाकरीता आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त १७ इतक्या प्रशिक्षणार्थी बी. ए. एम. एस. डॉक्टरांना इंटर्नशिपसाठी परवानगी द्यावी, असे मत आहे. सदर विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विवेकानंद मेडीकल अॅण्ड एज्युकेशनल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी यांच्या विनंती अर्जानुसार, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त १७, बी.ए.एम.एस. प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना इंटर्नशिपसाठी विनावेतन परवानगी देणेत यावी. मात्र, तत्पुर्वी त्यांना विनावेतन परवानगी देत आहोत, या आशयाचे लेखी पत्र देणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दोन कार्डीओलॉजीस्टची ११ महिने कालावधीसाठी जाहिरातीद्वारे तात्पुरती नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे. तसेच अटी-शर्ती क्र.६ समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पदे भरती करता येणार नाही. अटी-शर्ती क्र. ८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टची दोन स्थायी पदे मंजूर असून सदरचे पदांवर डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा कार्यरत आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु असल्याने ह्दयविकाराचे जास्त रुग्ण येतात. यामुळे सध्या कार्यरत असलेल्या दोन कार्डिओलॉजीस्ट यांचेवर कामाचा जादा भार पडत आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आणखी दोन कार्डिओलॉजीस्टची नेमणूक केल्यास रुग्णांवर चांगल्या दर्जाचे उपचार करता येतील व सध्या कार्यरत असलेल्या कार्डिओलॉजीस्टवर कामाचा जादा भार पडणार नाही. अशा प्र. वैद्यकिय संचालक यांना मा. अध्यक्ष यांनी सुचना केल्या आहेत.

सन २००८-०९ ते सन २०१३-१४ या कालावधीतील ह्दयविकार विभागात उपचार घेतलेल्या रुग्णांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| Period | 2008-2009 | 2009-2010 | 2010-2011 | 2011-2012 | 2012-2013 | 2013-Feb 2014 | Monthly Avarage | Daily Avarage |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **OPD** | 8905 | 10466 | 17989 | 27849 | 35816 | 39006 | 1945 | 75 |
| **Cathlab Produre (CAGE, PTCA, BMV etc)** | 4647 | 4921 | 5481 | 7332 | 9254 | 9050 | 565 | 22 |

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये कार्डिओलॉजीस्टचे पद मंजूर नाही. श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये कार्डिओलॉजीस्टची पदे मजूर असून त्याचा गोषवारा थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | प्रस्तावित शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे (कायम) | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| Interventional Cardiologist ह्दयविकार तज्ञ | 1) Age not more than 45 years; 2) DM or DNB from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०२ | ०० | डॉ. राहुल पाटील यांची व्हिजीटींग कार्डिओलॉजीस्ट म्हणून नेमणूक केली आहे. |

आकृतीबंधानुसार इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट या पदाच्या दोन जागा मंजूर असून दोन्ही जागेवर वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहे. त्यामुळे सदर पदाची जागा रिक्त नाही. डॉ. राहुल पाटील यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमण्यात आलेले आहे.

वैद्यकिय संचालक यांचे मागणीनुसार इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट या पदाच्या दोन जागा भरावयाच्या असल्यास सदरच्या दोन पदांचा श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये समावेश करावा लागेल व यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल. सदरचे मंजुरीस विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सध्या कामाची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाचे मंजूरीचे अधिन राहून दोन इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्टची जाहिरातीव्दारे निवड करुन ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देता येईल, असे मत आहे.

तरी, दोन इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्टचे पदांसाठी मंजुरी घेणेकरीता शासनास प्रस्ताव सादर करणेकरीता व सदर मंजुरीस अधिन राहून दोन इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट जाहिरातीव्दारे तात्पुरती ११ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधन व प्रोत्साहनपर भत्ता (इन्सेन्टीव्ह) देऊन नेमणूक करणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग Nephrologist (मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ) नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. सचीन सत्यनारायण सोनी, औरंगाबाद यांनी दि. १७/१०/२०१३ रोजीचे अर्जान्वये व्हिजीटींग नेफ्रॉलॉजीस्ट म्हणून काम करण्याची संधी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यांचे सदर अर्जावर HRM, put note for visiting Nephrologist. Thrusday preferable day. असा अभिप्राय प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी दिलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये Nephrologist (मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ) या पदाच्या मंजूर जागा, शैक्षणिक पात्रता, अनुभव इ. बाबत माहिती खालीलप्रमाणे-

| शैक्षणिक पात्रता | वेतनबॅन्ड | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1) Age not more than 45 years.<br>2) MD/DM/DNB from any govt. recognized University<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | Pay band- 15600-39100 Grade pay- 6600 | ०२ | ०० | ०२ | डॉ. वाघुळदे, नाशिक हे व्हिजीटींग नेफ्रॉलॉजीस्ट म्हणून श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दर बुधवारी येत असतात. |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये Nephrologist (मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ) या पदाच्या दोन जागा मंजूर असून संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यापदांसहीत आणखी आवश्यक वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरणेकामी द्यावयाच्या जाहिरातीमध्ये Nephrologist (मुत्रपिंड विकार उपचार तज्ञ) या पदाचा समावेश करण्यात आलेला नाही.

मंजूरआकृतीबंधात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता डॉ. सोनी यांचेकडे आहे. त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९६ प्रमाणे मानधनावर (कन्सलटेशन चार्जेस ५०% डॉ. शेअर) प्रथम ११ महिने कालावधीसाठी व्हिजीटींग नेफ्रॉलॉजीस्ट पदावर नेमता येईल.

तरी, डॉ. सचीन सत्यनारायण सोनी, औरंगाबाद यांचे व्हिजीटींग नेफ्रॉलॉजीस्ट म्हणून काम करण्याची संधी मिळणेच्या दि. १७/१०/२०१३ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडे व्हिजीटींग पेडियाट्रीक सर्जन (बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ) नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. अमित मोहन राऊत, सोलापूर यांनी ०७/०१/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. Myself Dr. Amit Raut, Paediatric Surgeon wish to join your esteemed Shri Saibaba Sansthan Trust Hospital, as consultant. I would like

to work as Visiting Consultant/ part time/ full time depending on the demand for paediatric Surgical patient. If appointed as Visiting Consultant I am ready currently to come once a week for OPD and OT, ie. 4 times in month currently. Am shifting to Nashik after two months then I can come twice or thrice a week or even as on call for any emergiencies if any.

Incentives may be 50% for OPD and 40 % for operative work (ie. 40 % of total bill) or as per rule for this Hospital, If givin opportunity, with good paediatrician then can establish a proper Paed-surgery and paediatrics Department. My wife Dr. Rupali is a paediatrician can also be considered here for job post in paedatrics. So it is my sincere request to consider my application.

डॉ. राऊत यांचे उपरोक्त अर्जावर प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी अभिप्राय दिला आहे की, रुग्णालयात पेडियाट्रीक सर्जन ची आवश्यकता असल्याने डॉ. राऊत यांची व्हिजीटींग पेडियाट्रीक सर्जन म्हणून नेमणूक करुन त्यांना आठवड्यातून एक व्हिजीट देणेस परवानगी देऊन संस्थान नियमाप्रमाणे इंन्सेंटीव्ह देता येईल.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये बालरोग विभाग सुरु आहे. परंतु श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये पेडियाट्रीक सर्जन या पदाची जागा मंजूर नाही. श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये या पदाची एक जागा मंजूर असून शैक्षणिक व इतर पात्रता 1) Age not more than 45 years; 2) MCH/ DNB in Paedatric Surgery from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity.अशी आहे.

मंजूरआकृतीबंधात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता डॉ. अमित मोहन राऊत यांचेकडे आहे. त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९६ प्रमाणे मानधनावर (कन्सलटेशन चार्जेस ५०% डॉ.शेअर) प्रथम ११ महिने कालावधीसाठी व्हिजीटींग पेडियाट्रीक सर्जन पदावर नेमता येईल.

सबब डॉ.अमित मोहन राऊत, सोलापूर याचे दि.०७/०१/२०१४ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५४** **डॉ.सुहास गोपीचंद पाटील, व्हिजीटींग न्युरोलॉजीस्ट यांचे दि.२८.११.२०१३ रोजीचे ई-मेलबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.सुहास गोपीचंद पाटील, नाशिक यांनी दि. २८/११/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे की, मी गेल्या दोन वर्षापासून श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग न्यूरोलॉजीस्ट म्हणून काम करत आहे. परंतु सध्या मिळत असलेले मानधन अल्प आहे. तरी मला प्रतिमाह ५०,०००/- फिक्स मानधन व EEG व ॲडमिट पेशंटमागे योग्य शेअर्स देण्यात यावा. तसेच माझेकडून तपासले जाणारे जुने व नवे पेशंटचे केसपेपरसाठी रु. २००/- आकारुन ते माझे शेअरमध्ये जमा करावे व संस्थान कर्मचाऱ्यांचे लाल व पिवळे केस पेपर बंद करावे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७५ नुसार जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२८५७/२०११ दि. १३/०९/२०११ अन्वये डॉ. सुहास गोपीचंद पाटील यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग मानद न्यूरोलॉजीस्ट म्हणून नेमणूक करुन त्यांना नियमाप्रमाणे डॉक्टर शेअर / इन्सेंटीव्ह देण्यात येत आहे.

डॉ. पाटील यांनी माहे जानेवारी, २०१३ ते डिसेंबर, २०१३ या बारा महिन्यांचे कालावधीत श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दिलेल्या व्हिजीटच्या वेळी एकूण १५४७ रुग्ण तपासलेले असून सदरचे कालावधीमध्ये त्यांना एकूण १,०२,४२०/- इतका इन्सेंटीव्ह अदा केलेला आहे. म्हणजेच प्रति महिना सरासरी रु. ८,५००/- इन्सेंटीव्ह अदा केलेला आहे. त्यांना सरासरी प्रति व्हिजीट रु. २०००+ EEG वर मिळणारा इन्सेंटीव्ह देण्यात आलेला आहे.

डॉ. पाटील यांचेशी प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी चर्चा केली असून त्यात असे ठरले की, डॉ. पाटील हे महिन्यातील पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी व्हिजीट देण्यास तयार असून त्यांनी प्रति व्हिजीट रु. १०,०००/-+ EEG वर मिळणाऱ्या इन्सेंटीव्हची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये न्यूरोलॉजीस्टची दोन स्थायी पदे मंजूर आहेत. त्यापैकी एक पद भरणेकामी जाहिरात देण्यात आलेली असून, त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

सबब, डॉ. सुहास गोपिचंद पाटील यांचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.सुहास गोपीचंद पाटील, व्हिजीटींग न्युरोलॉजीस्ट यांनी दि.२८.११.२०१३ रोजीचे ई-मेल पत्रामधून संस्थानकडे अवास्तव मागणी केलेली आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५ हृदय शस्त्रक्रिया विभागातील कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांच्या इन्सेन्टीव्हमध्ये कपात करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील अप्लीकेशन नं.२७९७/२०१४ दि.१९/०४/२०१४ अन्वये जीवनावश्यक वैद्यकिय सेवांशी निगडीत तातडीने आवश्यकता असलेल्या कार्डीयालॉजी विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात कार्डीयालॉजीस्ट भरण्यास मान्यता देण्यात आली होती त्यास अनुसरुन विहीत कार्यपध्दतीने कार्डीयालॉजीस्ट यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये काही डॉक्टर्स् मासीक फिक्स पगारात तर काही व्हिजीटिंग कार्डीयालॉजीस्ट यांनी एन्जिओग्राफिसाठी रु.३०० व एन्जिओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसीजर्स् साठी रु.३,०००/- इतक्या इन्सेन्टीव्हवर तयार होऊन त्यांना व्हिजीटींग डॉक्टर्स् म्हणुन नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. सध्या इन्सेन्टीव्हचे दर रु.१,०००/- व रु.८,०००/- ते १०,०००/- असे आहेत.

सुरुवातीला शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासअनुसरुन मासिक वेतनाव्यतिरीक्त जास्त प्रमाणात इन्सेन्टीव्हचे दर ठरवीण्यात आले होते. सध्या व्हिजीटींग डॉक्टर्स् रु.३००/- व रु.३,०००/- इन्सेन्टीव्हवर रुजु झाल्याने संगणक प्रणालीमध्ये असलेल्या इन्सेन्टीव्हच्या दरात सुधारणा करणे आवश्यक आहे. इन्सेन्टीव्हचे प्रमाण कमी जास्त करण्याचे अधिकार प्रशासनाला असल्याने वेळोवेळी मा.व्य.स चे सभेत मांडुन त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्यास अनुसरुन संगणक प्रणालीमध्ये बदल करुन डॉक्टर्स् मागणी करत असलेले एन्जिओग्राफिसाठी रु.३००/- व एन्जिओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसीजर्स् साठी रु.३,०००/- असेदर दि.०१.०४.२०१४ पासुन लागु करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६ सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इर्न्सेटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्हि.टी.एस. विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत मागणी केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकिय सेवा देणेबाबत व शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणाऱ्या बिलातील विशिष्ट रक्कम देणेबाबत मा.व्य.स.सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. गरीब व गरजु रुग्णांना कमीत कमी दरात ह्दयशस्त्रक्रिया वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन इतर रुग्णालयांच्या तुलनेत दर कमी ठेवुन त्याप्रमाणे डॉक्टरांनाही इन्सेंटीव्ह ठरविण्यात आला होता. मे २००६ पासून ते आजपर्यंत बायपास सर्जरीसाठी दर आकारणीमध्ये झालेली वाढ व सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ, इंटेन्सिव्हिस्ट डॉक्टर व परफ्युजनिस्ट यांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह थोडक्यात खालील प्रमाणे :-

| निर्णय क्रं.५५०/ दि.१९.०८.२००६ | | निर्णय क्रं.७७०/ दि.२२.०९.२००७ | | निर्णय क्रं.१९६/ दि.८.०३.२००९ | | निर्णय क्रं.८२०/ दि.०८.१०.२०१२ (JD & RGJAY) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **६५,०००** | **१४,०००** | **७५,०००** | **१५,०००** | **८३,०००** | **१५,०००** | **१,२५,०००** | **१५,०००** |

निर्णय क्र.५५०/दि.१९.०८.२००६ या सुरुवातीपासुन सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टरांची रक्कम तीच असुन त्यानंतर पुढील पाच वर्षात दर आकारणी रु.६५,०००/- वरुन रु.८३,०००/- व सध्या राजीव गांधी व जीवनदायी योजनेअंतर्गत दर १,२५,०००/- करण्यात येऊन डॉक्टरांना देण्यात येणाऱ्या रकमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. डॉक्टरांनी सदर रकमेत वाढ करणेबाबत मागणी केली होती तथापि, प्रत्यक्ष दर अंमलबजवणी चे वेळी विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यामध्ये अद्याप वाढ करण्यात आलेली नाही. कॉर्डीयाक सर्जन यांनी सदर बाबत प्राधान्याने विचार करण्यात यावा असे दि.१९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये लेखी विनंती केली आहे. ह्दयशस्त्रक्रिया विभागातील शस्त्रक्रियांचे सध्याचे दर व डॉक्टरांची मागणी व वाढीव रक्कम मिळत असले प्रमाणे साधारणतः प्रस्तावित केलेले दर विवरण निर्णयार्थ सोबत जोडले आहे.

यावर विचार विनिमय होऊन ह्दय शस्त्रक्रिया विभागातील दर वाढीस अनुसरुन संबंधित सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टर, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफ्युजनिस्ट यांचे मोबदल्यात वाढ होणेबाबत निर्णय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५७ डॉ.तुषार दादासाहेब गलांडे यांना त्यांचे मनोगत जाणून घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांनी यापूर्वी दि.०३/१२/२०१२ रोजी अर्ज सादर करुन श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेदीक पंचकर्म व क्षारसुत्र चिकित्सा विना मोबदला करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली होती. त्यानुसार डॉ. तुषार गलांडे यांना श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेदीक क्षारसुत्र व पंचकर्म रुग्ण विनामुल्य तपासणी करणेसाठी वेळ देणेबाबत वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचा अभिप्राय घेऊन डॉ. तुषार गलांडे यांचा दि. ०३/१२/२०१२ रोजीचा अर्ज निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/०१/२०१३ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४१ नुसार डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांना त्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे योग्यवेळी सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे. त्यास अनुसरुन डॉ. तुषार गलांडे यांना जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/८३/२०१३ दि. ०३/०४/२०१३ अन्वये त्यांचे मनोगत जाणून घेणेसाठी त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे योग्यवेळी सभेपुढे समक्ष बोलविण्यात येईल, असे कळविण्यात आले होते.

त्यानंतर डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांनी दि. ०६/०६/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे नमूद केले होते की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आयुर्वेदीक पंचकर्म व क्षारसुत्र चिकित्सा विना मोबदला करु इच्छित आहे, त्यासाठी मी आपणाकडे विनंती अर्ज केले आहेत. माझे अर्जावर त्रिसदस्यीय समितीसमोर चर्चा होऊन मनोगत जाणून घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीने योग्य वेळी समक्ष बोलविण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. तरी कृपया मला मनोगतासाठी लवकरात लवकर बोलवावे, ही विनंती. आपल्या हॉस्पीटलमध्ये मुळव्याध, भगंदर या गुदगत रोगांसाठी उपचार करण्यासाठी क्षारसुत्र पध्दत उपलब्ध नाही. या पध्दतीव्दारे उपचार केल्यामुळे अशक्य व बरे न होणारे हजारो पेशंट क्षारसुत्राव्दारे बरे होणारे आहेत. तरी कृपया विनामोबदला काम करण्याची संधी द्यावी. अशी विनंती केली आहे.

डॉ. तुषार गलांडे यांचे दि.०३/१२/२०१२ रोजीचे अर्जाबाबत वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचे दि. ११/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

१) श्री साईनाथ रुग्णालय आकृतीबंधात आयुर्वेदीक विभागाकडे आयुर्वेदीक तज्ञांची ०२ पदे दर्शविणेत आलेली असून त्यापैकी एक पद रिक्त आहे.

२) प्रामुख्याने आयुर्वेदात क्षारसुत्र ही चिकित्सा अर्श (Piles) भगंदर (Fistulla) ह्या आजारात केली जाते. साधारणतः प्राथमिक अवस्थेतील रुग्णांना औषधी चिकित्सा व पंचकर्म ह्या उपचाराने चांगला आराम मिळतो.

क्षारसुत्र व पंचकर्म आजारावर सहा महिन्यांत घेतलेल्या उपचाराचा मासिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना | क्षारसुत्र उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या | पंचकर्म उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | जून, २०१२ | ०९ | ११५ |
| २ | जुलै, २०१२ | ०६ | ९० |
| ३ | ऑगस्ट, २०१२ | ०४ | १०० |
| ४ | सप्टेंबर, २०१२ | ०७ | १०४ |
| ५ | ऑक्टोबर, २०१२ | ०३ | ११० |
| ६ | नोव्हेंबर, २०१२ | ०८ | ८० |

३) डॉ. रामदास आव्हाड, दर गुरुवारी सरासरी २० रुग्णांवर पंचकर्म उपचार करतात. इतर दिवशी दररोज सरासरी ०१ या प्रमाणे पंचकर्म चिकित्सा केली जाते.

४) सध्या आयुर्वेदीक विभागात डॉ. संदीप ज्ञानेश्वर शेळके, वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) हे काम पाहत आहे. तसेच सन २००१ पासून दर गुरुवारी डॉ. रामदास आव्हाड, कोपरगाव हे मानद वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद व पंचकर्मतज्ञ) म्हणून मोफत सेवा देत आहेत.

५) आयुर्वेद विभागातील दररोज बाह्यरुग्ण संख्या सरासरी ४३ इतकी असून सदर ओपीडी रुग्णांमध्ये डॉ. रामदास आव्हाड यांचे दर गुरुवारची ओपीडी वगळता इतर दिवशीची दररोजची बाह्यरुग्ण संख्या सरासरी २० इतकी आहे. सदर विभागातून अतिरिक्त वैद्यकिय अधिकारी मिळणेबाबत मागणी आलेली नाही.

तसेच वैद्यकिय संचालक यांनी दि. १४/१२/२०१२ रोजीचे टिपणीवर सध्या आपल्याकडे या पदाचे कामकाजासाठी एक पूर्णवेळ व एक व्हिजीटींग असे दोन वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहे. आयुर्वेदीक विभागाचे ओ.पी.डी. आकडेवारीवरुन असे दिसते की, सध्या या विभागासाठी नव्याने व्हिजीटींग वैद्यकिय अधिकारी नेमण्याची आवश्यकता नाही, असा अभिप्राय दिलेला होता.

दि. १६/१०/२०१३ रोजी मा. अध्यक्ष सो. यांचे स्विय सहाय्यक श्री पी.पी. पुरकर यांनी इकडील विभागास कळविले होते की, डॉ. तुषार गलांडे यांचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये पुन्हा

सादर करावा. त्याप्रमाणे डॉ. गलांडे यांचेबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १३/१२/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र. ९६२ अन्वये डॉ. तुषार दादासाहेब गलांडे यांनी दि. ०६/०६/२०१३ रोजीचे अर्जाव्दारे केलेली विनंती अमान्य करण्यात आली आहे. विनंती अमान्य करण्यात आली असल्याचे डॉ. तुषार गलांडे यांना जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/७१००/२०१४ दि.०६/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, डॉ.तुषार गलांडे यांचे विनंतीनुसार व मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/०१/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१ अन्वये फेर विचार करुन त्यांचे मनोगत जाणून घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.तुषार दादासाहेब गलांडे यांची विनंती अमान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५८ डॉ.मयुर विलास म्हात्रे, न्युरो सर्जन- श्री साईबाबा हॉस्पिटल व डॉ.राम शंकर महाजन, सोनोलॉजिस्ट- श्री साईनाथ रुग्णालय यांचे मानधनात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. ०२/१२/२०१३ रोजी सायं. ५.०० वाजता लेंडीबागेतील सभागृहामध्ये मा. कार्यकारी अधिकारी साो., यांचे अध्यक्षतेखाली संस्थानच्या दोन्ही रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेणेसाठी प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक यांचे समवेत सभा घेण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्तामधील अ.नं. १६- डॉ. महाजन, सोनोलॉजिस्ट यांना रु. ३५,०००/- मानधन देण्यात येत आहे. त्याऐवजी त्यांचा Last Pay Protect होईल अशा पध्दतीने मानधन देण्याचा प्रस्ताव सादर करावा. तसेच डॉ. म्हात्रे Neuro Surgeon यांचे वेतनाबाबतचा प्रस्तावही सादर करण्यात यावा, असे ठरले आहे.

**१)** डॉ. राम शंकर महाजन हे श्री साईनाथ रुग्णालयात दि. १०/०८/१९९३ पासून सोनोलॉजिस्टचे स्थायी पदावर कार्यरत होते. त्यांचे वयास दि. ३१/०८/२०१२ रोजी ६० वर्षे पूर्ण झाल्याने ते दि. ३१/०८/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त झालेले आहे. सेवा निवृत्तीच्या वेळी त्यांना मासिक रु. ५४,२३६/- वेतन मिळत होते.

श्री साईनाथ रुग्णालयात सोनोलॉजिस्टची आवश्यकता असल्याने डॉ. महाजन यांची वेळोवेळी सदरचे पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे. सध्या जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२८३३/२०१३ दि. ०३/०९/२०१३ अन्वये त्यांची दि. ०१/०९/२०१३ रोजी पासून श्री साईनाथ रुग्णालयाकडे मेडिकल ऑफिसर (सोनोलॉजीस्ट) या पदावर नविन नेमणूक होईपर्यंत किंवा ११ महिने कालावधी यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीसाठी रु. ३५,०००/- एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे.

डॉ. महाजन यांनी सेवा निवृत्तीच्या वेळी रु. ५४,२३६/- मासिक वेतन मिळत असल्याने त्याप्रमाणे आता त्यांना मासिक एकत्रित रु.५४,०००/- मानधन देता येईल. श्री साईनाथ रुग्णालयात इन्सेंटीव्ह देण्यात येत नाही.

**२)** श्री साईबाबा हॉस्पीटलमधील न्यूरो सर्जन पदाच्या दोन्ही जागा रिक्त असल्याने व रुग्ण सेवेसाठी न्यूरो सर्जनची आवश्यकता असल्याने जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/८८५/२०१३ दि. १७/०५/२०१३ अन्वये डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. २४,०००/- एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आली असून त्यांना ओ.पी.डी., ऑपरेशन चार्जेसवर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह देण्यात येत आहे.

यापूर्वी संस्थानचे रुग्णालयांमध्ये सिनिअर कन्सल्टंट या पदावर एक वर्ष कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करतांना सिनिअर कन्सल्टंट यांना मासिक रु. ३५,०००/- एकत्रित वेतन देण्यात येत होते. याप्रमाणे डॉ. म्हात्रे यांना एकत्रित मासिक रु. ३५,०००/- मानधन + ओ.पी.डी., ऑपरेशन चार्जेसवर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह देता येईल.

सबब, डॉ.राम शंकर महाजन, सोनोलॉजिस्ट (११ महिने कालावधीसाठी) यांचे व डॉ.मयुर विलास म्हात्रे, न्यूरो सर्जन (११ महिने कालावधीसाठी) यांचे मासिक मानधनात वरीलप्रमाणे प्रस्तावीत वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांमधील इतरही तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांची वेतनवाढीची मागणी असल्यास त्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव, डॉ.राम शंकर महाजन- सोनोलॉजिस्ट व डॉ.मयुर विलास म्हात्रे- न्यूरो सर्जन यांच्यासह सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५९ आर.एम.ओ. (वर्धा) यांचे वेतनवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयात रूरल प्लेसमेंट योजनेतंर्गत सेवाग्राम जि.वर्धा येथील महात्मा गांधी इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स यांचेकडील ०४ आर.एम.ओ.घेणेस दिनांक १५/१२/२००० रोजीचे मंजुरी अन्वये व मा.व्यवस्थापन मंडळ सभा निर्णय क्र.१३ (१३) अन्वये मान्यता आहे. त्यानूसार सदर आर.एम.ओ. यांची सन २००० पासून दर वर्षी एक वर्षासाठी पोस्टींग कॉलेजचे मर्जीनुरूप होत होती व त्यांना संस्थान मार्फत एकत्रित वेतन रू.९,०००/- आणि संस्थान नियमाप्रमाणे रजा/सुट्टया तसेच राहणेची व जेवणाची सोय संस्थानमार्फत मोफत केली जात होती.

त्यानंतर महात्मा गांधी इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, सेवाग्राम जि.वर्धा यांनी त्यांचेकडील आरएमओ यांना वेतन वाढ मिळणेबाबत जा.क्र.सी./आरपीएस/८१९७, दिनांक २६/०३/२००८ चे पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरून मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.९७९ अन्वये रू.९,०००/- च्या वेतनात सुधारणा करून ते रू.२०,०००/- देणेबाबत तसेच संस्थान नियमाप्रमाणे रजा/सुट्टया देणेस मान्यता देणेत आली आहे.

सध्या संस्थान रूग्णालयामध्ये संस्थान मार्फत फिक्स-पे वर व मानधन तत्वावर नेमणूक करण्यात येणाऱ्या आर.एम.ओ.यांना रूपये २७,०००/- इतके मानधन व फिक्स-पे दिला जात आहे.

श्री साईनाथ रूग्णालयात सध्या आर.एम.ओ.यांचा तुटवडा आहे. रूग्णालयात दिवसेंदिवस वाढत असलेल्या रूग्णसंख्येमुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता जाणवते व त्याचा परीणाम रूग्णसेवेवर होतो. रूग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची भासत असलेली गरज लक्षात घेता महात्मा गांधी इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, सेवाग्राम जि.वर्धा येथील आर.एम.ओ. यांना सध्या संस्थान मार्फत फिक्स-पे वर व मानधन तत्वावर नेमणूक करण्यात येणाऱ्या आर.एम.ओ.यांचे समकक्ष वेतन रूपये २७,०००/- व संस्थान नियमाप्रमाणे रजा/सुट्टया देऊन त्यांची फक्त निवासाची व्यवस्था संस्थान मार्फत करता येईल. तद्नंतर भविष्यात संस्थान रूग्णालयातील इतर आर.एम.ओ.डॉक्टरांच्या वेतनामध्ये वाढ झ ाल्यास अथवा वेतन पध्दतीमध्ये बदल झाल्यास महात्मा गांधी इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, सेवाग्राम जि.वर्धा येथील आर.एम.ओ. यांचे वेतनातही त्याप्रमाणात वाढ करून त्यांचे वेतन संस्थान रूग्णालयातील इतर आर.एम.ओ. यांचे समकक्ष ठेवता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे समकक्ष वेतनवाढ रुपये २७,०००/- व भविष्यात होणारे वेळोवेळी वेतनवाढीचे बदलानुसार, वेतनवाढ मंजुरीचे प्रस्तावास, तसेच याबाबतची पुढील कार्यवाही एच.आर.विभाग श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे मार्फत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयामधील इतरही निवासी वैद्यकिय अधिकारी यांची वेतनवाढीची मागणी असल्यास, आर.एम.ओ. (वर्धा) यांचेसह एकत्रित प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**तसेच, संस्थान रुग्णालयासाठी इतर वैद्यकिय महाविद्यालयांकडून निवासी वैद्यकिय अधिकाऱ्यांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६० डॉ.अभिमन्यू शंकरराव कडू, आर.एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि.१७.०२.२०१४ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.अभिमन्यू शंकरराव कडू यांची जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ३३१७/ २०११ दि.०१/१०/२०११ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आर. एम.ओ. या पदावर नेमणूक करण्यात आली असून ते दि. ०१/१०/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत. जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ८९३/२०१२ दि. २४/११/२०१२ रोजीचे आदेशान्वये त्यांना दि. ३०/११/२०१२ पासून वेतनबँड रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु. ५४०० मध्ये मूळ वेतन रु. १५६००+ ग्रेड वेतन रु. ५४०० व अनुज्ञेय भत्ते लागू करुन त्यांची संस्थान सेवा पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

डॉ. अभिमन्यू शंकरराव कडू यांनी दि. ०६/०१/२०१४ रोजीचे अर्जान्वये एफसीपीएस मेडिसीनचे उच्च शिक्षणासाठी ३ वर्षे कालावधीची रजा मिळावी, अशी विनंती केली होती.

डॉ. अभिमन्यू कडू यांची सेवा पाच वर्षे झालेली नसून दोन वर्षे तीन महिने झालेली आहे. डॉ. कडू यांनी एकूण तीन वर्षे उच्च शिक्षणासाठी रजेची मागणी केलेली आहे. नियमानुसार संपूर्ण सेवेच्या कालावधीत दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अध्ययन रजा देय नाही.

सबब, महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ चे प्रकरण सात ८० (५) (ए), ८१ (१) (ए) (बी) तसेच संस्थान सेवा नियमातील रजेचे नियम विचारात घेता डॉ. कडू यांची दीर्घकालीन (३ वर्षे) रजा मंजूर करता येत नाही असे व संस्थान सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास नेमणूक आदेशातील अट क्र. ५ नुसार पुर्तता करणेबाबत डॉ. कडू यांना जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ९३०/२०१४ दि. २०/०१/२०१४ रोजीचे पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर डॉ.अभिमन्यू कडू यांचा राजीनामा विषयक अर्ज आवक क्र.५४८५ दि. १२/०२/२०१४ रोजी इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्यांनी दि. १७/०२/२०१४ पासून राजीनामा मंजूर करणेस विनंती केली आहे. आता पुन्हा डॉ. कडू यांनी दि. १७/०२/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, माझा राजीनामा विषयक अर्ज रद्द करुन मला उच्च शिक्षणासाठी रजा मंजूर करावी.

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील फिजिशियन डॉ. गगन सुरिंद्रकुमार शर्मा यांनी दि. १०/१२/२०१३ व दि. १७/१२/२०१३ रोजीचे अर्जान्वये डी.एम. कार्डिओलॉजीचे उच्च शिक्षणासाठी तीन वर्षे कालावधीचे रजेची मागणी केली होती. तथापि, त्यांची सेवा पाच वर्षे झालेली नसल्याने व एका वेळी दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अध्ययन रजा देय नसल्याने त्यांची रजा नामंजूर करण्यात आली आहे.

तसेच डॉ.अमोल डॅनिअल भालेराव, आर एम ओ- श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.२७/०७/२०१३ रोजीचे अर्जान्वये एम.डी. अॅनेस्थेसिया या उच्च शिक्षणासाठी तीन वर्षे कालावधीसाठी असाधारण (विनावेतन) रजेची मागणी केली होती. परंतु, एका वेळी दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अध्ययन रजा देय नसल्याने व श्री साईनाथ रुग्णालयात आर.एम.ओं. ची संख्या कमी असल्याने त्यांची रजा नामंजूर करण्यात आली आहे.

तरी, डॉ.अभिमन्यू शंकरराव कडू, आर. एम. ओ.- श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि.१७/०२/२०१४ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.अभिमन्यू शंकरराव कडू, निवासी वैद्यकिय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा दि.१७.०२.२०१४ रोजीचा अर्ज अमान्य करणेत आला.**

**तसेच, भविष्यात अशा प्रकारचे विषय सभेसमोर ठेवण्यात येऊ नये, या विषयांवर संस्थान प्रशासनाने योग्य तो निर्णय घेत जावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६१** **दिवंगत डॉ.संजय जयवंत तांबे, आर.एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल यांच्या पत्नी नामे श्रीमती सुजाता संजय तांबे यांचा संस्थानमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेच्या दि.२६.१२.२०१३ रोजीच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती सुजाता संजय तांबे, रा. चिंचपूर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर (हल्ली मु. व्दारा सौ. अरुणा गहिनीनाथ कोल्हे, साई विद्यानगर पिंपळस, ता. राहाता यांनी त्यांचे पती डॉ. संजय जयवंत तांबे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने श्री साईबाबा हॉस्पीटल (सुपरस्पेशालीटी) शिर्डी मध्ये अनुकंपा तत्वावर वर्ग-३ पदावर तातडीने नोकरी मिळणेबाबत दि.२६/१२/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. त्यांनी विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला नाही.

श्रीमती तांबे यांनी अर्जासोबत शैक्षणिक व कागदपत्रे सादर केलेली नसल्याने ती सादर करणेकामी त्यांना जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/७२३१/२०१४ दि.१२/०२/०१४ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत डॉ. संजय जयवंत तांबे यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) श्रीमती सुजाता संजय तांबे यांचा शाळा सोडल्याचा दाखला असून सदर दाखल्यानुसार जन्मतारीख ०१/०१/१९७० अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय ४४ वर्षे ०२ महिने आहे.

३) श्रीमती सुजाता संजय तांबे यांचे शिक्षण एम.ए. झालेले आहेत.

४) डॉ. संजय जयवंत तांबे हे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आर.एम.ओ. या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.०२/११/२०१३ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :- | डॉ. संजय जयवंत तांबे |
| ०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग | :- | आर.एम.ओ., श्री साईबाबा हॉस्पीटल |
| ०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- | दि. ०६/०३/२००७ ते दि.०१/११/२०१३ (एकूण सेवा ०६ वर्षे ७ महिने) |
| ०४) मृत्यु दिनांक | :- | ०२/११/२०१३. |

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे वारसाचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (1) of Rule 6- "Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत संजय तांबे हे हयात असतांना त्यांचे ग्रॅच्यूएटी अॅक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि. २३/०२/२००८ रोजीचे नॉमीनेशन पत्रात श्रीमती सुजाता संजय तांबे यांचे नाव आहेत. नॉमीनेशन पत्रातील श्रीमती सुजाता संजय तांबे व त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रांवरील नाव जयश्री त्रिंबक कडू या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे असे श्रीमती तांबे यांनी मे. कार्यकारी दंडाधिकारी साहेब, राहाता यांचे समोरील दि. ०६/०१/२०१४ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार दिवंगत संजय तांबे यांच्या पत्नी नामे श्रीमती सुजाता संजय तांबे ह्या उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. श्रीमती तांबे यांनी त्यांचे अर्जात वर्ग-३ चे पदावर नोकरी द्यावी असे नमुद केले आहे. परंतु, श्री साईबाबा संस्थानमध्ये अनुकंपा कारणास्तव नोकरीस घेतांना प्रथम वर्ग -४ चे पदावर घेण्यात येते. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य:स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १२७९ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ४० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

तसेच दि. ०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय- विश्वस्तांच्या सुचनांबाबत निर्णय क्र. ८०-(३) शासन नियमानुसार संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मावनतेच्या दृष्टीकोणातून अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेतले जाते. सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग -०४ ची पदे रिक्त नाहीत, त्यामुळे संस्थान सेवेत मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांस तुर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनावर संस्थानमध्ये कामास घेतले जाते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, मयत कर्मचाऱ्याने संस्थानची खोली घेतलेली असल्यास त्याचा नातेवाईक कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामावर घेतल्यास सदर खोली खाली करुन संस्थानचे ताब्यात देत नाही व त्यामुळे गरजवंत कर्मचाऱ्यास संस्थानची खोली मिळत नाही.

यापुढे संस्थानची खोली खाली करुन दिल्यानंतरच मयत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर कॉन्ट्रक्टरमार्फत कामावर घेण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

श्रीमती सुजाता तांबे यांनी संस्थानचे विहित नमुन्यात अर्ज सादर न करता दि.२६/१२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये वर्ग-३ च्या पदावर नोकरीस घेणेबाबत विनंती केली आहे. तथापि, यापूर्वीच्या मयत कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांस लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने मदतनीस म्हणून कामावर घेण्यात आलेले आहे.

तरी, उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत डॉ. संजय जयवंत तांबे यांच्या पत्नी नामे श्रीमती सुजाता संजय तांबे यांचे दि. २६/१२/२०१३ रोजीच्या अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग-०४ ची पदे रिक्त नाहीत व ज्या वेळेस वर्ग-०४ ची पदे रिक्त होतील त्यावेळेस श्रीमती सुजाता संजय तांबे यांना वर्ग-०४ या पदावर त्यांचे पतीचे बदली अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत सामावून घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६२ त्वचा रोग तज्ञ म्हणून काम करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. के. थ्यागराजन, चेन्नई यांनी दि. १४/०२/२०१४ रोजी विनंती अर्ज सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, मला संस्थानचे रुग्णालयामध्ये स्किन स्पेशालिस्ट म्हणून काम करण्याची परवानगी द्यावी.

**डॉ. के. थ्यागराजन यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| **नाव व पत्ता:-** | : | डॉ. के.थ्यागराजन कंदाप्पन<br>टी ४, वसंत अपार्टमेंट,<br>४, डॉ. गुरुस्वामी रोड, चेतपेट,<br>चेन्नई-६०० ०३१. |
| **जन्मतारीख व वय** | : | दि. २६/०८/१९५२. वय- ६२ वर्षे ०६ महिने |
| **शिक्षण** | : | M.B.B.S.-१९८० (Madras)<br>Diploma in Dermatalogy-१९८२. (Madras) |

त्वचा रोग विभाग श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सुरु असून आकृतीबंधामध्ये त्वचा रोग तज्ञाचे एक स्थायी पद मंजूर आहे. सदरचे स्थायी पदावर डॉ. डी.एल. कांबळे कार्यरत आहेत.

डॉ. के. थ्यागराजन यांचे दि. १४/०२/२०१४ रोजीचे अर्जाचा विचार करता येईल किंवा कसे? याबाबत प्र.वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचेकडून जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ ९६९/२०१४ दि. २०/०२/२०१४ अन्वये अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार प्र.वैद्यकिय अधिक्षक यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. साईनाथ रुग्णालयात सध्या एक त्वचा रोग तज्ञ आहे. आकृतीबंधानुसार एक पद मंजूर आहे. डॉ.के. थ्यागराजन यांनी रुग्ण सेवेच्या दृष्टीकोणातून परवानगी मागितली आहे. राहण्याचा, येण्या-जाण्याचा खर्च ते स्वत: करणार आहेत. तथापि ते रुग्ण सेवा मोफत करणार किवा कसे यांचा त्यांचे पत्रात उल्लेख नाही. ते मोफत सेवा देणार असल्यास परवानगी देणेस हरकत नाही.

रुग्णांना मोफत सेवा देणेबाबत डॉ. थ्यागराजन यांचेशी संपर्क साधला असता, त्यांनी रुग्णांना मोफत सेवा देणार असल्याचे त्यांनी दि.२६/०२/२०१४ रोजीचे पत्राव्दारे कळविले आहे. त्यानुसार त्यांना श्री साईनाथ रुग्णालयात त्वचा रोग तज्ञ म्हणून मोफत रुग्ण सेवा करणेस परवानगी देता येईल. तथापि सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर निर्णयार्थ सादर करावा लागेल.

तरी डॉ.के.थ्यागराजन यांना श्री साईनाथ रुग्णालयात त्वचा रोग तज्ञ म्हणून मोफत रुग्ण सेवा करणेस परवानगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सस्थान रुग्णालयातील सर्व रिक्त पदांचा आढावा घेण्यात येऊन, ती पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर अर्ज सादर करणेत यावा. मा.खंडपीठाच्या निर्णयानंतर जाहिरात प्रसिध्द करुन पदे भरणेबाबतची कार्यवाही करणेत यावी. डॉ. के.थ्यागराजन कंदाप्पन, चेन्नई यांना त्यावेळी भरती प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल, असे कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६३** **तज्ञ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, सी.एम.ओ./ आर.एम.ओ. यांच्या ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूक करणे व त्यांचे वेतन ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे. तसेच अटी-शर्ती क्र. ८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता देतेवेळी शासनाकडून च समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे सुचविण्यात आलेले आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी एकूण २९ पदासाठी वर्तमान पत्रांत व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीस अनुसरुन विविध पदांसाठी प्राप्त पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय निवड समिती समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

मा. निवड समितीचा अहवाल निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. याबाबतची पुढील कार्यवाही चालू असून अंतिम निर्णय होणे बाकी आहे. यास काहीसा कालावधी लागणार असल्याने व सध्या रुग्णालयांमध्ये तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी व सी एम ओ/ आर एम ओ या पदांचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने रुग्णांना वैद्यकिय सुविधा पुरविणेत अडचणी येत आहे. सदर अडचणी सोडविणेकामी संबंधीत

पदांवर तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी काम करणेस तयार असलेल्या उमेदवारांच्या नेमणूका करावयात, अशी सुचना मा. अध्यक्ष साो., यांनी दिली आहे.

तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, सी.एम.ओ./ आर. एम. ओ. यांना वेतनबॅन्ड नुसार मिळणारे वेतन व फिक्स पे / मानधन यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहेत.

| तपशील | मंजूर वेतनबॅन्ड व ग्रेड पे | वेतनबॅन्ड नुसार मासिक मिळणारे एकूण वेतन | मा. व्य. समितीचे निर्णयानुसार देण्यात येणारे एकत्रित वेतन | फरक |
|---|---|---|---|---|
| तज्ञ वैद्यकिय अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये मुळ वेतन रु. १८७५०+ ६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते | ५७,०३८/- | ३५,०००/- | २२,०३८/- |
| कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० मध्ये मुळ वेतन रु. १५६००+ ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते | ४७,२५०/- | ३२,०००/- | १५,२५०/- |
| आर एम ओ /सी एम ओ | १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० मध्ये मुळ वेतन रु. १५६००+ ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते | ४७,२५०/- | २७,०००/- | २०,२५०/- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलकडील तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी व सी एम ओ/आर एम ओ या पदांवर कायम केलेनंतर वेतनबॅन्डनुसार दिले जाणारे वेतन व या पदांवर तात्पुरती नेमणूक केलेनंतर दिले जाणारे मानधन यामध्ये बराच फरक आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूक केलेल्या तज्ञ व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना प्रोत्साहानपर भत्ता (इंन्सेंटीव्ह) दिला जातो. उपरोक्त पदांवर वैद्यकिय अधिकारी मिळत नाही व मिळालेच तर ते मध्येच सेवा सोडून जातात असा अनुभव आहे.

**अ)** श्री साईबाबा हॉस्पीटलकडे तात्पुरते नेमण्यात येणाऱ्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये नमूद केलेप्रमाणे मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहनपर भत्ता (इंन्सेंटीव्ह) देता येईल. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडे नेमण्यात येणाऱ्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी व दोन्ही हॉस्पीटलकडे नेमण्यात येणाऱ्या सी एम ओ/ आर एम ओ यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये नमूद केलेप्रमाणे फक्त मानधन देता येईल. जेणेकरुन सदरचे वैद्यकिय अधिकारी मिळण्यास अडचण येणार नाही व मध्येच सेवा सोडून जाण्याचे प्रमाण कमी होईल, असे प्र. वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

| अ.नं. | तपशील | शैक्षणिक पात्रता | वेतनबॅन्ड नुसार देय वेतन रु. | द्यावयाचे मानधन रु. |
|---|---|---|---|---|
| १ | तज्ञ वैद्यकिय अधिकारी | एम.डी. / एम.एस. | ५७,०३८/- | ५०,०००/- |
| २ | कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी | डिप्लोमाधारक | ४७,२५०/- | ४५,०००/- |
| ३ | आर एम ओ / सी एम ओ | एम.बी.बी.एस. | ४७,२५०/- | ४०,०००/- |

तसेच येथूनपुढे हॉस्पीटलकडे वेळोवेळी आलेल्या अर्जामधून आवश्यकतेनुसार तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, सी एम ओ / आर एम ओ यांच्या मुलाखती घेणेसाठी १) मा. कार्यकारी अधिकारी साो., २) मा. उप कार्यकारी अधिकारी साो. ३) वैद्यकिय संचालक ४) वैद्यकिय अधिक्षक ५) संबधीत विषयाचे तज्ञ डॉक्टर यांची एक समिती स्थापन करुन पात्र उमेदवारांपैकी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूक करावयाच्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे मानधन व संस्थान नियमाप्रमाणे इंन्सेंटीव्ह देऊन ११ महिने कालावधीकरीता नेमणूका देता येतील. तसेच श्री साईनाथ रुग्णालयांकडे नेमणूक करावयाच्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी व सी एम ओ/ आर एम ओ यांच्या उपरोक्त स्तंभ क्र. ५ मध्ये नमूद केलेप्रमाणे मानधनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूका देऊन कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करता येईल.

**ब)** सध्या आर एम ओ या पदावर ११ महिने कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेल्या खालील उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत. या उमेदवारांच्या प्र.वैद्यकिय सचांलक, रुग्णालये यांनी दि.२५/०२/२०१४ रोजी मुलाखती घेतलेल्या आहेत.

| अ. नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | डॉ. प्रविण रामदास गायकवाड | एमबीबीएस-२०११ | श्री साईनाथ रुग्णालय. |
| २ | डॉ. गणेश विठ्ठल मोहळकर | एमबीबीएस-२०११ | श्री साईबाबा हॉस्पीटल |

उपरोक्त डॉ. प्रविण रामदास गायकवाड यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे व डॉ. गणेश विठ्ठल मोहळकर यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी आर एम ओ या

पदावर मासिक रु.४०,०००/- मानधनावर नेमणूक देण्यात यावी अशी मागणी प्र.वैद्यकिय संचालक यांनी केली आहे.

तरी उपरोक्त **अ** व **ब** बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.६४** **डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांचा न्युरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेच्या दि.०५.०३.२०१४ रोजीच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्या व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे. तसेच अटी-शर्ती क्र.८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नविन आकृतीबंधास मान्यता देतेवेळी शासनाकडून च समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे सुचविण्यात आलेले आहे.

डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांनी दि. ०५/०३/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, मी सस्थानचे जाहिरातीनुसार न्यूरो सर्जन या पदासाठी मुलाखत दिलेली आहे. परंतु, त्याबाबत अद्यापर्यंत कोणतीही ऑर्डर मला मिळाली नाही. तरी माझी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करावी.

**डॉ. केंद्रे यांची माहिती खालीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| **संपूर्ण नाव व पत्ता** | :- | डॉ. भास्कर मधुकर केंद्रे, २६९,मधुसुधन ग्रामपंचायत रोड, चाकूर, जि. लातूर- ४१३ ५१३. |
| **जन्मतारीख** | :- | २९/११/१९८१ |
| **शिक्षण** | :- | एमबीबीएस-२००४.<br>एम.एस.(जनरल सर्जरी)-२००९.<br>एम.सी.एच.(न्यूरो सर्जरी)-२०१३. |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये न्यूरो सर्जन या पदाच्या दोन जागा मंजूर असून शैक्षणिक व इतर पात्रता पुढीलप्रमाणे आहेत. 1) Age not more than 45 years; 2) MCH/ DNB from any Government recognized University, 3) Experience minimum 2 years in similar capacity.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी एकूण २९ पदासाठी वर्तमान पत्रांत व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीमध्ये न्यूरो सर्जन या पदाच्या दोन जागांचा समावेश आहे. जाहिरातीस अनुसरुन विविध पदांसाठी प्राप्त पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय निवड समिती समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्यात डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांची न्यूरो सर्जन या पदासाठी मुलाखत घेण्यात आलेली आहे. मुलाखतीचा अहवाल निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. याबाबतची पुढील कार्यवाही चालू असून अंतिम निर्णय होणे बाकी आहे.

सध्या रुग्णालयांमध्ये तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी व सी एम ओ / आर एम ओ या पदांचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने रुग्णांना वैद्यकिय सुविधा पुरविणेत अडचणी येत आहे. सदर अडचणी सोडविणेकामी संबंधीत पदांवर तात्पुरते स्वरुपात ११ महिने

कालावधीसाठी काम करणेस तयार असलेल्या उमेदवारांच्या नेमणूका कराव्यात, अशी सुचना मा. अध्यक्ष सो., यांनी दिली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत असलेले रुग्ण येतात. श्री साईबाबा हॉस्पीटल हे नगर-मनमाड हायवेवर असून या हायवेवर अपघात होत असतात. अपघात झालेले बरेच रुग्ण श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दाखल होतात. अशा वेळी या रुग्णांवर उपचार करणेकामी ट्रॉमा युनिटमध्ये न्यूरो सर्जन या पदाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची आवश्यकता असते. सध्या डॉ. मयुर विलास म्हात्रे हे एकच न्यूरो सर्जन ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असून त्यांना मासिक रु. २४,०००/- मानधन + संस्थान नियमाप्रमाणे इंन्सेंटीव्ह देण्यात येत आहेत. जाहिरातीनुसार सदरचे पदावर वैद्यकिय अधिकारी नेमणेस काहीसा कालावधी लागणार असल्याने डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन म्हणून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करता येईल.

तथापि, या पदाकरीता मंजूर वेतनबॅन्ड नुसार मासिक वेतन रु. ५७,०३८/- देय होत आहे. ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करावयाच्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना मा. व्य. समितीचे निर्णयांनुसार मासिक एकत्रित रु. ३५,०००/-+ संस्थान नियमाप्रमाणे इन्सेंटीव्ह (फक्त श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी) दिला जातो. या पदांवर कायम केलेनंतर वेतनबॅन्डनुसार दिले जाणारे वेतन व याच पदांवर तात्पुरती नेमणूक केलेनंतर दिले जाणारे मानधन यामध्ये बराच फरक असल्याने उपरोक्त पदांवर उमेदवार मिळत नाही व मिळालेच तर ते मध्येच सेवा सोडून जातात. असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

त्याकरीता श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या व येणाऱ्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना मासिक एकत्रित मानधन रु. ५०,०००/- + संस्थान नियमाप्रमाणे इंन्सेंटीव्ह व श्री साईनाथ रुग्णालयाकडे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या व येणाऱ्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांना मासिक एकत्रित मानधन रु. ५०,०००/- देण्यात यावे. जेणेकरुन रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांवर तातडीने उपचार करणेकामी तज्ञ वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होतील. असे वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे. याबाबत स्वतंत्र प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

तरी डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. ५०,०००/- + संस्थान नियमाप्रमाणे इन्सेंटीव्ह देऊन नेमणूक करणेबाबत तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलकडे सध्या ११ महिने कालावधीसाठी न्यूरो सर्जन या पदावर कार्यरत असलेले डॉ. मयुर विलास म्हात्रे यांना मासिक एकत्रित मानधन रु. २४,०००/- + इंन्सेंटीव्ह ऐवजी मासिक मानधन रु. ५०,०००/- + संस्थान नियमाप्रमाणे इंन्सेंटीव्ह देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सस्थान रुग्णालयातील सर्व रिक्त पदांचा आढावा घेण्यात येऊन, ती पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर अर्ज सादर करणेत यावा. मा.खंडपीठाच्या निर्णयानंतर जाहिरात प्रसिध्द करुन पदे भरणेबाबतची कार्यवाही करणेत यावी. डॉ.भास्कर मधुकर केंद्रे, लातुर यांना त्यावेळी भरती प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल, असे कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६५** **डॉ.महेंद्र विलास तांबे, सी.एम.ओ. श्री साईनाथ रुग्णालय व डॉ.दिपक भाऊसाहेब कांदळकर, आर.एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा पदनामात बदल करणेच्या दि.०६.०३.२०१४ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. महेंद्र विलास तांबे, सी एम ओ- श्री साईनाथ रुग्णालय व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर, आर एम ओ- श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि. ०६/०३/२०१४ रोजी अर्ज सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, आम्ही सन २००६ पासून अनुक्रमे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे सी एम ओ / आर एम ओ या पदावर कार्यरत आहोत. आम्ही संस्थान परवानगीने डी.ए. (Diploma in Anaesthesia) ही पदवी २०१३ मध्ये पूर्ण केली आहे. संस्थानचे जाहिरातीनुसार दि. ०१/०२/२०१४ रोजी आम्ही मुलाखती दिल्या आहेत. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्याचा निकाल लागला नाही. तरी दि. ०४/०३/२०१४ रोजीचे बैठकीत ठरलेप्रमाणे डॉ. महेद्र विलास तांबे यांचे पदनाम कनिष्ठ भूलतज्ञ व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांचे पदनाम कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ असे पदनाम बदलून मिळावे. जेणेकरुन आम्हाला रुग्ण सेवा आणखी चांगल्याप्रकारे करण्यासाठी मदत होईल.

डॉ. महेंद्र विलास तांबे यांची जा.नं. एसएसएस/वशी-०१/११४९१/२००६ दि. २५/०८/२००६ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाकडे आर एम ओ या पदावर नेमणूक करण्यात आली असून त्यानुसार ते दि. ११/०९/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत. जा.नं. एसएसएस/वशी-०१/७६/२०१० दि. ०९/०१/२०१० अन्वये त्यांचे पदनामात आर एम ओ ऐवजी सी. एम. ओ. असा बदल करण्यात आलेला आहे. तसेच त्यांना दि. ०१/०१/२००९ पासून वेतनश्रेणी लागू केलेली असून त्यांना सुधारित वेतबॅन्ड

१५६००-३९१०० व ग्रेड पे ५४०० मध्ये सध्याचे मुळ बेसिक रु. १६८८० + ग्रेड वेतन रु. ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून एकुण रु. ५०,१३०/- वेतन मिळत आहे.

डॉ. महेंद्र विलास तांबे यांना त्यांचे मागणीप्रमाणे व नियमाप्रमाणे दि. ०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१३ अखेर डी.ए. (भूलतज्ञ) या उच्च शिक्षणाकरीता रजा मंजूर करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी सदरचे कालावधीमध्ये डी.ए. (भूलतज्ञ) चे उच्च शिक्षण पूर्ण केलेले आहे.

जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/७२४/२०१३ दि. २३/०८/२०१३ रोजीचे आदेशान्वये डॉ. तांबे यांनी घेतलेल्या कनिष्ठ भूलतज्ञ या शिक्षणाचा श्री साईनाथ रुग्णालयात आवश्यकतेनुसार अंतर्गत वापर करुन घ्यावा असा आदेश पारीत करण्यात आला आहे व त्यानुसार ते आवश्यकतेप्रमाणे काम करत आहे.

जा.नं. एसएसएस/वशी-०१/११४८५/२००६ दि. २५/०८/२००६ नुसार डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आर. एम.ओ. या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०७/०९/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहे. जा. नं. एससएसएस/वशी-०१/२५०/२००८ दि. २५/०१/२००८ अन्वये त्यांना वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून सध्या त्यांना सुधारित वेतबॅन्ड १५,६००-३९,१०० व ग्रेड पे ५,४०० मध्ये सध्याचे मुळ बेसिक रु. १८,२४०+ ग्रेड वेतन रु. ५,४०० व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून मासिक रु.५३,१९०/- इतके वेतन मिळत आहे.

त्याचे मागणीनुसार त्यांना जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ५८०/ २०११ दि.१४/०९/२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०१/०८/२०११ ते दि. ३१/०१/२०१३ अखेर १८ महिने कालावधीसाठी डी. ए. या उच्च शिक्षणाकरीता सोडणेत आलेले असून सदरचे प्रशिक्षण पूर्ण करुन ते दि.०१/०२/२०१३ रोजी कामावर हजर झाले आहेत.

**रुग्णालयांचे आकृतीबंधात कनिष्ठ भूलतज्ञ व कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ या पदाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

| अ. | पद , पे -बँड व ग्रेड -पे | शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | | भरलेली पदे | | रिक्त पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ६ | ७ |
| १ | Junior Intensivist<br>कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ<br>8000-13500<br>Pay Band 15600-39100<br>GP 5400 | 1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD (Anes / medi)/ DA from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०६ | ०० | ०१ | ०० | ०५ | ०० |
| २ | Junior Anesthesiologists<br>कनिष्ठ भुलतज्ञ<br>8000-13500<br>Pay Band 15600-39100<br>GP 5400 | 1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD / DNB / DA from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०९ | ०३ | ०१ | ०२ | ०८ | ०१ |

मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयांनुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता वैद्यकीय संचालक, निवासी उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी व इतर पदे भरणेकामी दि. २६/१०/२०१३, दि. २६/११/२०१३ व दि. २८/११/२०१३ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये कनिष्ठ भूलतज्ञ या पदाचे ०१ जागेचा व कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ या पदांचा ०२ जागांचा समावेश करण्यात आला होता. जाहिरातीनुसार पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या असून त्यात डॉ. महेंद्र विलास तांबे यांची कनिष्ठ भूलतज्ञ व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांची कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ या पदाकरीता मुलाखत घेण्यात आलेली आहे. याबाबतची पुढील कार्यवाही चालू असून अंतिम निर्णय होणे बाकी आहे.

दि. ०६/०३/२०१४ रोजीचे अर्जान्वये डॉ. महेंद्र विलास तांबे यांनी सी एम ओ ऐवजी कनिष्ठ भूलतज्ञ असे पदनाम व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांनी आर एम ओ ऐवजी कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ पदनाम मिळावे, अशी विनंती केली आहे.

संस्थान कनिष्ठ भूलतज्ञ, कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ व आर.एम.ओ./ सी एम ओ या पदांसाठी वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु. ५४००/- या प्रमाणे वेतन देण्यात येत आहे. डॉ. महेंद्र तांबे यांना या वेतनबॅन्ड नुसार सध्या मुळ बेसिक रु. १६,८८०+ ग्रेड वेतन रु. ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून मासिक रु.५०,१३०/- वेतन मिळत आहे. तसेच डॉ. दिपक कांदळकर यांना सदरचे वेतनबॅन्ड नुसार सध्या मुळ बेसिक रु. १८२४०+ ग्रेड वेतन रु. ५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते मिळून मासिक रु.५३,१९०/- वेतन मिळत आहे.

डॉ. महेंद्र विलास तांबे यांची कनिष्ठ भूलतज्ञ या पदासाठी व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांची कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ या पदासाठी दि. ०१/०२/२०१४ मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटमध्ये कनिष्ठ भूलतज्ञ व कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ यांची कमतरता असल्याने डॉ. महेंद्र विलास तांबे यांचे पदनाम सी एम ओ ऐवजी कनिष्ठ भूलतज्ञ असे करुन त्यांना या पदाचे काम व सध्या मिळत असलेले मासिक वेतन देता येईल. तसेच डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांचे पदनाम आर एम ओ ऐवजी कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ असा बदल करुन त्यांना या पदाचे काम व सध्या मिळत असलेले मासिक वेतन देता येईल. यामुळे संस्थानवर जादा आर्थिक भार पडणार नाही.

तरी, डॉ. महेंद्र विलास तांबे यांचे पदनामात सी एम ओ ऐवजी कनिष्ठ भूलतज्ञ व डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर यांचे पदनामात आर एम ओ ऐवजी कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ असा बदल करुन त्यांना सध्याचे मिळणारे वेतन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.६६ डॉ.गगन सुरिन्द्रकुमार शर्मा, फिजिशियन- श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा डी.एम. कार्डिओलॉजीचे उच्च शिक्षणासाठी रजा मिळणेच्या दि.२६.०२.२०१४ व दि.०१.०३.२०१४ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३७२९/२०११ दि. २०/१०/२०११ अन्वये डॉ. गगन सुरिन्द्रकुमार शर्मा यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे फिजिशियन या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.२६/१०/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहे. जा.नं. एसएसएस/एसएसीबीएच /एचआर / ८७५/ २०१२ दि.१७/११/२०१२ अन्वये त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात आलेली आहे.

डॉ.गगन शर्मा यांनी दि. ११/१०/२०१३ व दि.१०/१२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये डी.एम. कार्डिओलॉजीचे उच्च शिक्षणासाठी विनावेतन रजा/ अध्ययन रजा / विशेष रजेची मागणी केलेली होती.

शासकीय सेवेत असतांना उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यास त्याकामी महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ रजा संदर्भात मार्गदर्शक तत्वे दिलेली आहे. त्यातील अध्ययन रजे संदर्भात प्रकरण सात ८० (५ अे) प्रमाणे ज्या कर्मचाऱ्याची सेवा पाच वर्षापेक्षा कमी झाली असेल अशा शासकीय कर्मचाऱ्यास रजा मंजूर केली जाणार नाही, असे नमुद केले आहे. तसेच प्रकरण ८१ (१ अे) नुसार कोणत्याही एका वेळी सर्व साधारणपणे १२ महिनेच्या कालावधीसाठी अध्ययन रजेवर सोडता येईल, असे नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण तीन मार्गदर्शक तत्वे अ.नं. १२- रजा मंजूरीमुळे संवर्गातील कर्मचारी संख्या कमी होता कामा नयेः एखाद्या सेवेतील किंवा विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या कामासाठी आवश्यक असलेल्या किमान संख्येहून कमी होत असल्यास रजा मंजूर करण्यात येऊ नये, असे नमूद आहे.

डॉ.गगन सुरिन्द्रकुमार शर्मा हे दि. २६/१०/२०११ पासून कामावर हजर झालेले आहेत. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये त्यांची सेवा पाच वर्षे झालेली नसून दोन वर्षे झालेली आहे. डॉ. गगन शर्मा यांनी एकूण तीन वर्षे उच्च शिक्षणासाठी विनावेतन रजा/ अध्ययन रजा/ विशेष रजेची मागणी केलेली आहे. नियमानुसार संपूर्ण सेवेच्या कालावधीत दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अध्ययन रजा देय नाही. तसेच रुग्णालयात फिजीशियनची आवश्यकता असल्याने रजेवर सोडता येणार नाही, असे जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/८५०/२०१३ दि. २८/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये डॉ. गगन शर्मा यांना कळविण्यात आलेले होते.

डॉ. शर्मा यांनी पुनःश्च दि. १७/१२/२०१३ रोजीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जावर तपासून सादर करा असा मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचा आदेश असल्याने त्यास अनुसरुन दि.१७/१२/२०१३ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीनुसार जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ६१८९/२०१३ दि. ०३/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये डॉ. शर्मा यांना कळविण्यात आले होते की, महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१, संस्थान सेवा नियमातील रजेचे नियम, रुग्णालयात फिजीशियनच्या सेवेची गरज विचारात घेता तुमची दीर्घकालीन (३ वर्षे) राजा मंजूर करता येत नाही. तुमची रजेची मागणी अमान्य करण्यात आली आहे.

डॉ.शर्मा हे दि. ११/१०/२०१३ ते दि. १७/१०/२०१३ अखेर आजारी रजा त्यानंतर १८/१०/२०१३ ते २१/११/२०१३ अखेर अर्जीत रजेवर व दि.२२/११/२०१३ ते दि.०५/१२/२०१३ पर्यंत विनापरवानगी गैरहजर

राहून दि.०६/१२/२०१३ रोजी कामावर हजर झाले आहेत. त्यानंतर ते पुन्हा दि.१८/१२/२०१३ पासून सतत विनापरवानगी गैरहजर आहेत.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडे फिजिशियनची ०३ स्थायी पदे मंजूर असून तीनही पदे भरलेली आहेत. त्यापैकी डॉ. शर्मा यांनी दि. २६/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ रोजी अर्ज सादर करुन ३ वर्षासाठी डी.एम. कॉर्डिओलॉजीचे उच्च शिक्षणासाठी विनावेतन रजा/अध्ययन रजा/विशेष रजेची मागणी केलेली आहे.

परंतु, खालील बाबींचा विचार करता डॉ. शर्मा यांची रजा नामंजूर करावी, असे प्र. वैद्यकिय संचालक यांनी मागणी केली आहे.

१. डॉ. शर्मा यांना रजा मंजूर केल्यास सदरचे पदाचे कामाचे नियोजन किंवा आपापसात कामाची व्यवस्था होणार नाही.

२. त्यांचे रजेच्या कालावधीत नविन फिजिशियनची नेमणूक ही डॉ. शर्मा यांचे शैक्षणिक रजा कालावधीपूरती तात्पूरती असल्याने नवीन फिजिशियन अशी तात्पुरती नेमणूक स्विकारेल याची शक्यता कमी आहे.

३. डॉ. शर्मा डी. एम. कॉर्डीओलॉजिस्ट ही पदवी घेऊन आलेनंतर फिजिशियन या पदावर काम करतील याची शाश्वती नाही.

४. मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार दि.२३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेऊन ०६ महिन्याकरीता एक कंत्राटी इंटरव्हेंशनल कॉर्डीओलॉजिस्ट व पांच व्हीजिटींग कॉडिओलॉजिस्टची नेमणूक देण्यात आलेली आहे.त्यामुळे सध्या कॉर्डीओलॉजिस्टची आवश्यकता नाही.

तरी, डॉ. गगन सुरिंद्रकुमार शर्मा, फिजिशियन - श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि. २६/०२/२०१४ व दि. ०१/०३/२०१४ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.गगन सुरिन्द्रकुमार शर्मा, फिजिशियन यांचा उपरोक्त नमुद अर्ज अमान्य करणेत आला.**

**तसेच, भविष्यात अशा प्रकारचे विषय सभेसमोर ठेवण्यात येऊ नये, या विषयांवर संस्थान प्रशासनाने योग्य तो निर्णय घेत जावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६७ डॉ.मयुर विलास म्हात्रे, कंत्राटी पध्दतीने न्युरो सर्जन- श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांची ११ महिने कालावधीची नेमणूक संपुष्टात येत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे. तसेच अटी-शर्ती क्र. ८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे सुचविण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन, मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २७/०४/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१९ नुसार जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/८८५/२०१३ दि. १७/०५/२०१३ अन्वये डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. २४,०००/- मानधन व ओ पी डी, ऑपरेशन चार्जेसवर सध्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इन्सेंटीव्ह व निवासस्थान देऊन नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार डॉ.म्हात्रे दि. ०३/०६/२०१३ रोजी कामावर हजर झाले आहेत. त्यांची ११ महिने कालावधीचे नेमणूकीची मुदत दि. ०२/०५/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॅास्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी एकूण २९ पदासाठी वर्तमान पत्रांत व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीमध्ये न्यूरो सर्जन या पदाच्या दोन जागांचा समावेश करण्यात आलेला होता.

जाहिरातीस अनुसरुन विविध पदांसाठी प्राप्त पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय निवड समिती समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. मुलाखतीचा अहवाल निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजीचे सभेमधील निर्णय क्र. १०८ नुसार सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत असलेले रुग्ण येतात. श्री साईबाबा हॉस्पीटल हे नगर-मनमाड हायवेवर असून या हायवेवर अपघात होत असतात. अपघात झालेले बरेच रुग्ण श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दाखल होतात. अशा वेळी या रुग्णांवर उपचार करणेकामी ट्रॉमा युनिटमध्ये न्यूरो सर्जन या पदाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची आवश्यकता असते.

डॉ.भास्कर मधुकर केंद्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन म्हणून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करणेच्या निर्णयास्तव प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेकरीता सभा कामकाज विभागाकडे देण्यात आलेला असून सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीसमोर चर्चेसाठी आलेला नाही.

सध्या डॉ. मयुर विलास म्हात्रे हे एकच न्यूरो सर्जन ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असून त्यांचे नेमणूकीची मुदत दि. ०२/०५/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे. जाहिरातीनुसार सदरचे पदावर वैद्यकिय अधिकारी नेमणेस काहीसा कालावधी लागणार आहे.

त्यामुळे डॉ. म्हात्रे यांना पुढील नेमणूक देणेकामी प्र. वैद्यकिय संचालक यांनी पुढीलप्रमाणे गोपनीय अहवाल दिलेला आहे. ११ महिने कालावधीमध्ये डॉ. म्हात्रे यांचे काम समाधानकारक आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावितही नाहीत. श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जनची आवश्यकता असल्याने डॉ. म्हात्रे यांना कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देऊन प्रतिमहा रु. ५०,०००/- मानधन व पूर्वीप्रमाणेच प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा.

प्र. वैद्यकिय संचालक यांचे उपरोक्त गोपनीय अहवाल व मागणीनुसार डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे न्यूरो सर्जन या पदावर ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. ५०,०००/- + संस्थान नियमाप्रमाणे इन्सेंटीव्ह देऊन नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.६८ आर.एम.ओ.या पदावर ११ महिने कालावधीसाठी देण्यात आलेल्या नेमणूकांस कार्योतर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव- अ)** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकडे तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, सी एम ओ/ आर एम ओ यांच्या ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका करणे व त्यांचे वेतन ठरविणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीसमोर प्रस्ताव सादर करणेच्या मान्यतेस्तव दि.०४/०३/२०१४ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी असा शेरा दिला आहे की, प्रथम जाहिरात देऊन ॲप्लीकेशन मागवा.

तसेच दि.०४/०३/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये असा निर्णय झाला आहे की, प्रत्येक महिन्यामध्ये २-३ वेळेस आर एम ओ पदासाठी Walk in Interview ची जाहिरात देऊन Interview घ्यावेत. सदर मुलाखतीबाबत जवळच्या सर्व मेडीकल कॉलेजला कळविण्यात यावे. यातून उमेदवार निवडण्यात यावेत व उमेदवारांना लगेचच ११ महिन्याची - नेमणूक ऑर्डर द्यावी. या सर्व प्रक्रियेस मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घ्यावी. याबाबतचा प्रस्ताव ७ दिवसांत सादर करावा.

त्यास अनुसरुन दि. १९/०३/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये आर एम ओ / सी एम ओ व भूलतज्ञ या पदांवर ११ महिने कालावधीसाठी काम करणेस तयार असलेल्या उमेदवारांच्या प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी मुलाखतीचे नियोजन करण्यात आले असून तशी जाहिरात दि. २२/०४/२०१४ रोजीचे दै. सार्वमत या वर्तमान पत्रामध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये आर.एम.ओ. या पदाच्या १६ जागा मंजूर असून त्यापैकी ०७ जागा भरलेल्या आहेत व ९ जागा रिक्त आहेत. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये आर. एम.ओ. या पदाच्या ४० जागा मंजूर असून २६ जागा भरलेल्या आहेत व १४ जागा रिक्त आहेत.

सदर जाहिरातीस अनुसरुन खालील उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. त्यांच्या मुलाखती दि.२३/०४/२०१४ रोजी वैद्यकिय प्रशासक, प्र. वैद्यकिय अधिक्षक व प्र. वैद्यकिय संचालक यांचे समितीने घेतलेल्या आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ. नं. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | मुलाखतीमध्ये मिळालेले गुण | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | डॉ. सुधा अनिल कांबळे | एम.बी.बी.एस.-१९८४ | ०८ | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| २ | डॉ. जयश्री सुदाम ठाकरके | एम.बी.बी.एस.-२००९<br>डी.ए. २०१२ | ०८ | श्री साईनाथ रुग्णालय |
| ३ | डॉ. सचीन देविदास बागडे | एम.बी.बी.एस.-२००२<br>एम.पी.एच.-२००६ | ०७ | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| ४ | डॉ. सुनिल सर्जेराव बोडखे | एम.बी.बी.एस.-२००१<br>डी आर्थो-२००८ | ०७ | श्री साईनाथ रुग्णालय |
| ५ | डॉ. कृष्णा संपतराव घावटे | एम.बी.बी.एस.-२००८ | ०७ | श्री साईनाथ रुग्णालय |
| ६ | डॉ. वसुंधरा सुरेशराव दरेकर | एम.बी.बी.एस.-२०१२ | ०६ | श्री साईनाथ रुग्णालय |
| ७ | डॉ. सुप्रिया गोरक्ष सुंब | एम.बी.बी.एस.-२००८ | ०६ | श्री साईबाबा हॉस्पीटल |

उपरोक्त तक्त्यातील उमेदवारांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या हॉस्पीटलकडे मासिक एकत्रित रु. २७,०००/- मानधनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५६ (अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**
**मात्र, याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**ब)** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये आर एम ओ/ सी एम ओ व भूलतज्ञ या पदांवर ११ महिने कालावधीसाठी वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मुलाखतीव्दारे नेमणूका करणेकामी जाहिरात दि. २२/०४/२०१४ रोजीचे दै. सार्वमत या वर्तमान पत्रामध्ये व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीनुसार अर्जदार उमेदवारांच्या प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या बुधवारी मुलाखती घेण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये आर.एम.ओ. या पदाच्या १६ जागा मंजूर असून त्यापैकी ०७ जागा भरलेल्या आहेत व ९ जागा रिक्त आहेत. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये आर. एम.ओ. या पदाच्या ४० जागा मंजूर असून २६ जागा भरलेल्या आहेत व १४ जागा रिक्त आहेत.

दि. २२/०४/२०१४ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन आर एम ओ या पदासाठी प्राप्त झालेल्या ०७ अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती दि. २३/०४/२०१४ रोजी वैद्यकिय प्रशासक, प्र. वैद्यकिय अधिक्षक व प्र.वैद्यकिय संचालक यांचे समितीने घेतलेल्या असून त्यापैकी ०४ उमेदवारांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे व ०३ उमेदवारांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापपर्यंत सदरचे उमेदवार हजर झालेले नाही.

आता जाहिरातीस अनुसरुन खालील उमेदवारांनी अर्ज सादर केले असून त्यांच्या मुलाखती बुधवार दि.१४/०५/२०१४ रोजी वैद्यकिय प्रशासक, प्र. वैद्यकिय अधिक्षक व प्र. वैद्यकिय संचालक यांचे समितीने घेतलेल्या आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | उमेदवाराचे नाव व पत्ता | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | डॉ. ज्योती कारभारी मुठाळ | एम.बी.बी.एस.<br>डी.सी.एच.-२०११ | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक एकत्रित रु. २७,०००/- मानधनावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक. |
| २ | डॉ. कौशिक धनंजय मेलावणे | एम.बी.बी.एस.(एम.डी. फिजिशियन-रशिया)-२००९<br>डी.ए. | श्री साईबाबा हॉस्पीटलकडे मासिक एकत्रित रु. २७,०००/- मानधनावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक. |

उपरोक्त तक्त्यातील उमेदवारांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या हॉस्पीटलकडे मासिक एकत्रित रु. २७,०००/- मानधनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५६ (ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**मात्र, याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.६९ श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वॉर्डबॉयचे कामकाजाकरिता जादा अकुशल कंत्राटी कर्मचारी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये वॉर्डबॉयची स्थायी १३ व कंत्राटी ७२ असे एकूण ८५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी स्थायी पदावर १७ व कंत्राटी पध्दतीने ६९ असे एकूण ८६ वॉर्डबॉय कार्यरत आहेत. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वॉर्डबॉयचे ९१ पॉईंट असून दैनंदिन कामकाज व रजा सुट्या सोडविणे याकामी एकूण १०५ वॉर्डबॉय कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

वॉर्डबॉयची संख्या कमी असल्याने तसेच हॉस्पीटलमध्ये बाह्यरुण व आंतररुग्ण यांची संख्या वाढली असल्याने वॉर्डमधील दैनंदिन कामकाज विस्कळीत होत असून त्याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे. आकृतीबंध मंजूर करतेवेळी न्यूरो ओ.टी., सी आर यु-३, सी.व्ही.टी.एस. नं.-२, दर्शन लाईन प्रथमोपचार केंद्र, कार्डियाक ॲम्बुलन्स हेलीपॅड हे अंतर्गत विभाग कार्यान्वीत नव्हते. आता सदरचे विभाग कार्यान्वीत आहेत. तसेच नव्याने न्यूरो आयसीसीयू सुरु करणेत येत आहे. सदरचे विभागांत वॉर्डबॉयचे कामकाजासाठी खालील तपशीलाप्रमाणे अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| १ | न्यूरो ओ.टी | ०४ |
| २ | सी आर यु-३ | ०४ |
| ३ | सी.व्ही.टी.एस. नं.-२ | ०४ |
| ४ | दर्शन लाईन प्रथमोपचार केंद्र, | ०१ |
| ५ | कार्डियाक ॲम्बुलन्स हेलीपॅड | ०२ |
| ६ | न्यूरो आयसीसीयू | ०४ |
| | **एकूण-** | **१९** |

सध्या उपरोक्त तक्त्यात नमुद विभागांतील वॉर्डबॉयचे कामकाज हे सध्या उपलब्ध असलेल्या अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत असल्याने रुग्णालयाचे दैनंदिन कामकाजात अडथळे येत आहेत. रुग्ण सेवा सुरळीत सुरु राहणेकामी वॉर्डबॉयचे कामकाजासाठी एकूण १९ अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून ते ठेकेदारामार्फत घेता येतील.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वॉर्डबॉयचे कामकाजासाठी आणखी १९ अकुशल कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७० डॉ.मनोहर विश्वासराव शिंदे, यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील अप्लीकेशन नं. २७९७/२०१४ दि. १९/०३/२०१४ वरील आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने तात्पुरती नेमणूक करणेकरीता मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मा. न्यायालयाचे आदेशान्वये स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर दि. २३/०३/२०१४ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहे.

यामध्ये डॉ. मनोहर विश्वासराव शिंदे यांची मुलाखत घेण्यात आली असून सदर मुलाखतीच्या वेळी त्यांनी पूर्ण वेळ कार्डीओलॉजीस्टचे नेमणूकीकरीता मासिक रु. ४,००,०००/- एकत्रित मानधनाची मागणी केली आहे. त्यांना सर्वसमावेशक मासिक रु. ३,००,०००/- एकत्रित मानधन देता येईल. असे समितीने त्यांना सांगितले व याबाबतचा आपला निर्णय कळवावा. जेणेकरुन त्यांचे नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करता येईल. डॉ. शिंदे यांनी याबाबत कळविलेनंतर त्यांचे नेमणूकीचा विचार करता येईल, असे ठरले.

डॉ. शिंदे यांनी सर्व समावेशक रु. ३,००,०००/- एकत्रित मासिक मानधनावर काम करणेस तयार असलेबाबत त्यांचेकडील दि. २८/०४/२०१४ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे.

त्यास अनुसरुन, जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ६२४/ २०१४ दि. ३०/०४/२०१४ अन्वये डॉ.मनोहर विश्वासराव शिंदे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे पूर्णवेळ इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर सर्वसमावेशक रु. ३,००,०००/- (अक्षरी रु. तीन लाख मात्र) एकत्रित मासिक मानधनावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे.

तरी, सदर नेमणूकीस कार्योत्तर मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७१ संस्थानचे संपर्क व्यवस्थेसाठी असलेल्या ग्रुपमोबाईल सेवेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१/०६/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७९ नुसार मोबाईल क्षेत्रात कार्यरत असलेल्या Idea Cellular Limited या कंपनीकडुन संस्थान अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी Post Paid ग्रुप मोबाईल सेवा सुरु करणेचा व रुपये १७५/- चा प्लॅन घेणेचा निर्णय घेणेत आलेला होता. त्यानुसार, Idea कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा घेण्यात आलेली आहे. दिनांक ११/११/२०१० पासून आयडीया कंपनीने संस्थानला दिलेला रुपये १७५/- चा प्लॅनच्या सेवा सुविधा तशाच ठेवून सदर प्लॅन रुपये १४९/- मध्ये दिलेला आहे.सदर आजमितीस सेवेत सध्या एकुण ५५ ग्रुपमोबाईल सुरु आहेत.

मा. कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे ग्रुप मोबाईल क्रमांकाचे संपुर्ण बील संस्थानमार्फत आदा करण्यात येत आहे. तसेच प्रशासकिय अधिकारी साहेब, विभाग प्रमुख व इतर अधिकारी यांचे ग्रुप मोबाईल क्रमांकाचे येणारे एकूण बीलापैकी फक्त रुपये ३००/- मात्र संस्थानने आदा करुन उर्वरीत जादा बीलाची रक्कम ही संबधीत अधिकारी व कर्मचारी यांचे मासिक वेतनातून वसूल करण्यात येत आहे. तसेच सुरक्षा पर्यवेक्षक व ड्रायव्हर (शिरडी व मुंबई कार्यालय) यांचे एकुण मासिक बीलांपैकी फक्त मासिक भाडे + टॅक्स (रु.१६४/- मात्र) संस्थानमार्फत आदा करुन बीलाची उर्वरीत सर्व रक्कम ही संबधीतांचे मासिक वेतनातून वसूल करण्यात येत आहे.

**(अ)** भारती एअरटेल लिमिटेड, नाशिक यांनी त्यांचे दि.०१/०८/२०१३ चे प्रस्तावाव्दारे एअरटेल ग्रुप मोबाईल सेवेबाबत नविन रु.१००/- चा प्लॅन सादर केलेला होता.सदरच्या प्लॅनमुळे संस्थानची दरमहा रु.२७५०/- ची मासीक भाडयाची बचत होणार असुन इतरही सेवा व चार्जेस मध्येही बचत होत आहे. या प्रस्तावाबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी चर्चा केली असता त्यांनी फक्त एकटया एअरटेलच्या प्रस्तावावर निर्णय घेणे शक्य होणार नाही व आयडीया, एअरटेल, वोडाफोन या तिनही कंपन्यांना पत्र पाठवून त्यांचेकडुन माहीती मागविण्यास सांगीतले त्या नुसार आयडीया, एअरटेल, वोडाफोन या तिनही कंपन्यांना एक पत्र पाठवून त्यांचेकडुन माहीती मागविण्यात आलेली आहे.

सदरच्या माहीतीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Particulars | IDEA | | AIRTEL | VODAFONE |
|---|---|---|---|---|
| | Old Plan | New Plan | New Plan | New Plan |
| Monthly Rental | 149/- | **99/-** | 100/- | 125/- |
| CUG Charges | Free | **Free** | Free | Free |
| Mobile to Mobile Call | 0.30 | **0.30** | 0.30 | 0.30 |
| Mobile to Other Mobile Call | 0.30 | **0.30** | 0.30 | 0.40 |
| Mobile to Landline | 0.50 | **0.50** | 0.50 | 0.40 |
| Local Free Call | 300 Min. | **300 Min.** | 300 Min. | 200 loc + 300 V to V |
| Free Local SMS | 150 SMS | **150 SMS** | 300 SMS | 200 SMS |
| STD Calls | 1.50 | **1.50** | 1.50 | 1.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे आयडीया किंवा एअरटेल कंपनीचा नविन ग्रुपमोबाईल प्लॅन संस्थान करीता घेतल्यास निश्चितपणे संस्थानची आर्थिक बचत होण्यास मदत होणार आहे.

**(ब)** सध्या संस्थानकडे एकुण ५५ ग्रुप मोबाईलचे सीमकार्ड असुन अजुन ४५ ग्रुप मोबाईल सीमकार्डची आश्यकता आहे.त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | आपणाकडे असलेले व दिलेले सीमकार्ड | सीमकार्ड नविन मागणी | एकुण सीमकार्ड संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मा. अध्यक्ष साहेब व मा. उपाध्यक्ष साहेब | | **२** | २ |
| २ | मा. कार्यकारी अधिकारी साहेब | १ | | १ |
| ३ | मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब | १ | | १ |
| ४ | मा. प्रशासकिय अधिकारी साहेब | ५ | | ५ |
| ५ | मा. विभाग प्रमुख | २५ | **१०** | ३५ |
| ६ | स्विय सहाय्यक (अध्यक्ष, उपाध्यक्ष, का.अ. व उप का.अ.) | २ | **२** | ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | विभाग प्रमुखा नंतरचे वरीष्ठ अधिकरी (पर्यवेक्षक) | ८ | **२७** | ३५ |
| ८ | वरीष्ठ लिपीक व वाहन चालक, तांत्रिक सहाय्यक व इतर | ९ | | ९ |
| ९ | ऑपरेटर FCT/आयटी SMS/ कनकुरी तळे | ४ | | ४ |
| १० | अत्यावश्यक सेवेकरीता राखीव | | ४ | ४ |
| | **एकुण सीमकार्ड संख्या -** | **५५** | **४५** | **१००** |

उपरोक्त प्रमाणे सध्या संस्थानकडे ५५ ग्रुपमोबाईल सीमकार्ड असुन अजुन नव्याने दयावयाचे सीमकार्डची संख्या ४५ असुन असे एकुण १०० सीमकार्डची आवश्यकता आहे तरी नव्याने मंजूर होणारे कंपनीचे १०० नविन सीरीजचे सलग क्रमांकाचे सीमकार्ड खरेदी केल्यास ज्या विभागप्रमुखांना ग्रुप मोबाईल सीमकार्ड दिलेले नाहीत तसेच विभागप्रमुख यांचे नंतरचे वरीष्ठ कर्मचारी यांना विभागप्रमुख यांचे मान्यतेने व मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मंजुरीनुसार अशा वरीष्ठ कर्मचारी यांना वरील प्रमाणे ४५ सीमकार्ड खरेदी केल्यास देता येणे शक्य होणार आहे.व ग्रुप मोबाईलची मागणी पुर्ण करता येणे शक्य होईल.

तसेच खालील प्रमाणे संस्थान अधिकारी, विभाग प्रमुख व इतर कर्मचारी यांचे ग्रुप मोबाईलचे बील संस्थानमार्फत आदा करुन उर्वरीत बीलाची सर्व रक्कम ही संबधित अधिकारी व कर्मचारी यांचे मासीक पगारातून पगारबील विभागामार्फत वसूली करणेत येईल.

| | |
|---|---|
| १) मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष साहेब | सर्व बील सवलत |
| २) मा.कार्यकारी अधिकारी साहेब | सर्व बील सवलत |
| ३) मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब | सर्व बील सवलत |
| ४) प्रशासकिय अधिकारी, डॉक्टर्स व विभागप्रमुख, | रु.३००/- पर्यंत सवलत |
| ५) पर्यवेक्षक | रु.२५०/- पर्यंत सवलत |
| ६) तांत्रिक सहाय्यक, वरीष्ठ लिपीक | रु.२००/- पर्यंत सवलत |
| ७) वाहन चालक व सुरक्षा पर्यवेक्षक | रु.१५०/- पर्यंत सवलत |

तरी नव्याने मंजूर होणारे कंपनीचे १०० नविन सीरीजचे सीमकार्ड खरेदी करणेस व वरील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांना सवलत देणेस मान्यता असावी.

**(क)** मा.व्यवस्थापन समिती मंजुर करतील त्या नविन प्रस्तावित कंपनीच्या ग्रुप मोबाईल सेवेत संस्थानचे ग्रुपमोबाईल धारक सोडुन इतर सर्व इच्छुक असणारे अधिकारी, डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक समाविष्ट करुन घेतल्यास त्यांना व संस्थानला प्रत्येकाला एकमेकांशी संभाषण हे मोफत होणार आहे.त्यामुळे संस्थानचे दूरध्वनी यंत्रणेवर मोबाईलचा पडणारा ताण हा कमी होणार आहे. सध्या ऑपरेटर कंसोलवर दिवसाला १० ते १२ हजार कॉल येतात व जवळपास १००० हजार कॉल आऊटगोईंग होतात. शिवाय दूरध्वनीचे येणारे मासिक बीलात बचत होण्यास मदत होणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांची आर्थिक बचत होणार आहे. शिवाय ते संस्थानचे अधिकाऱ्यांशी व आपापल्या विभागप्रमुखांशी संपर्कात राहू शकतील.जे कर्मचारी खाजगी वापरासाठी संस्थानचे ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ट होणार आहेत त्यांचे मोबाईल वापराचे संपुर्ण बील व मोबाईल कंपनीस आवश्यक असणारे कागदपत्रे त्यांनी कंपनीस सादर करावयाचे आहे.

उपरोक्त संदर्भ **(अ)** प्रमाणे आयडीया, एअरटेल व वोडाफोन या कंपन्यांनी सादर केलेल्या प्लॅन बाबत मा.व्यवस्थापन समितीसमोर संबधित कंपनीच्या प्रतिनिधींना बोलावुन त्यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेस, संदर्भ **(ब)** प्रमाणे नव्याने मंजूर होणारे कंपनीचे १०० नविन सीरीजचे सीमकार्ड खरेदी करुन अधिकारी व कर्मचारी यांना सवलत देणेस त्याचप्रमाणे संदर्भ **(क)** नुसार इच्छुक असणारे संस्थानचे अधिकारी, डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांचा संस्थानचे ग्रुपमोबाईल मध्ये वैयक्तिक समाविष्ट करुन घेणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या आयडीया, एअरटेल व वोडाफोन या कंपन्यांनी सादर केलेल्या प्लॅनच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, आयडीया कंपनीचा नवीन प्लॅन स्विकारणेत येऊन, त्यांचेकडून १०० नग सिमकार्ड घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७२ श्री साई प्रसादालय मालवाहू लिफ्टचे Landing गेटस बदली करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.ओटीस इलेव्हेटर कं.(इंडिया) लि., पुणे यांचमार्फत श्री साई प्रसादालयाकडे ०१ नग प्रवासी लिफ्ट व ०१ नग मालवाहु लिफ्ट अशा दोन लिफ्ट सन २००८ मध्ये बसवून चालू करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरील लिफ्ट दैनंदिन वापरामुळे विना अपघात तांत्रिक बिघाड न होता सुरक्षितरित्या चालाव्यात म्हणून

मे.ओटीस इलेव्हेटर कं.(इंडिया) लि., पुणे यांना सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. कंपनीचे इंजिनिअर दरमहा शिर्डी येथे येऊन दोन्ही लिफ्टची सर्व्हिसिंग करुन देत असतात.

श्री साई प्रसादालयाकडील एका मालवाहु लिफ्टकरीता एकुण ०३ नग Landing गेटस आहेत. सदरील लिफ्टचा सकाळी ७.०० वाजेपासून रात्री ११.०० वाजेपर्यंत वापर केला जातो. त्यामुळे लिफ्टचे तीनही Landing गेटस दिवसभर अनेक वेळा उघडझाप केले जात असल्याने सततच्या वापराने तसेच चपाती ट्रॉलीच्या वहातुकीच्या धडकेने Landing गेटस नादुरुस्त झाले आहेत. नादुरुस्त झालेले गेट तात्पुरते दुरुस्त करुन चालू करुन देण्यात आलेले आहेत. परंतू सदरील तीनही कोलॅप्सीबल गेट सुरक्षिततेच्या दृष्टीने नविन बसवून देणे अत्यंत गरजेचे आहे.

मे.ओटीस इलेव्हेटर कं. (इंडिया) लि., पुणे यांनी जुने Landing गेटस काढून नविन बसविणेचे कामाचे कोटेशन सादर केले असून ०३ नग Landing Gates बसविणेकरीता रक्कम रुपये १,०१,५९७/- इतका खर्च येणार असल्याचे कळविले आहे.

मे.ओटीस इलेव्हेटर कं. (इंडिया) लि., पुणे यांचेकडून श्री साई प्रसादालयाकडील नविन ०३ नग Landing गेटस बसवून घेणे व याकामी येणा-या रक्कम रुपये १,०१,५९७/- इतक्या खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू लिफ्टचे ०३ नग Landing गेटस बदली करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,०१,५९७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७३** **शिर्डी बसस्थानकाचे विद्युतीकरण कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/ १२ मध्ये अद्यावत सेवा सुविधायुक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासचे बांधकाम चालू आहे. सदरील बसस्थानकच्या इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.पाटील कंस्ट्रक्शन, पुणे यांना देण्यात आलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ चे सभेतील विषय क्र.१२ निर्णय क्र.५०३ अन्वये मे.आदिति इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना बसस्थानकाच्या विद्युतीकरण कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरील कार्यादेशामध्ये विद्युतीकरण कामाची मुदत सहा महिने अथवा सिव्हिल वर्क १००% पुर्ण झाल्यानंतर दोन महिने अशी देण्यात आली होती.

विद्युतीकरण कामामध्ये पुर्ण बसस्थानक इमारतीचे वायरींग काम करणे, इमारतीमध्ये फॅन व लाईट फिटींग बसविणे, बसस्थानक परिसरामध्ये पथदिव्यांची उभारणी करणे, पॅनेल बोर्ड बसविणे, ट्रान्सफॉर्मर बसविणे, केबल अंडरग्राऊंड टाकणे, जनरेटरसेट बसविणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घेणे ही कामे करावयाची आहेत.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८-१०-२०१३ चे सभेतील विषय क्र. ३५ निर्णय क्र. ७३७ अन्वये दि. ३१-०३-२०१४ पर्यंत सदर कामासाठी मुदतवाढ घेण्यात आलेली आहे.

बसस्थानक इमारतीचे स्लॅबचे काम चालू असतांना त्यात वायरींग कामाचे पाईप टाकणे तसेच भिंती बांधून झाल्यानंतर भिंतीवर झरी मारुन पाईप टाकणे ही कामे करावी लागतात. म्हणजे सिव्हील काम पूर्ण झाल्यानंतर इलेक्ट्रीकल काम करावे लागते. बसस्थानकाचे बांधकाम अतिशय संथ गतीने चालू असल्यामुळे विद्युत ठेकेदार यांना विद्युतीकरणाचे फक्त ३५% काम पुर्ण करता आलेले आहे.

तरी शिर्डी बसस्थानकाचे विद्युतीकरणाचे काम करणारे ठेकेदार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना दि. ३०-०९-२०१४ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानकाचे विद्युतीकरणाचे काम करणारे ठेकेदार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना सिव्हील काम पूर्ण झाल्यानंतर इलेक्ट्रीकल काम करावे लागते, त्यामुळे त्यांना शिर्डी बसस्थानकाचे विद्युतीकरणाचे काम करणेसाठी दि.३०-०९-२०१४ अखेर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७४** **मंदिर परिसरातील स्टेनलेस स्टील रेलींग दुरुस्ती व वॉकर रेलींग तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिराच्या उत्तर बाजुस गुरुस्थान मंदिरापासून ३ नंबर गेट पर्यंत मंदिराचे सुरक्षिततेच्या दृष्टीने स्टेनलेस स्टील रेलींग बसवून देण्यात आलेले आहे. तसेच व्हीआयपी दर्शन व आरती पासेस धारकांना हॉलमध्ये सोडण्याकरीता श्री शनि मंदिरासमोर स्टेनलेस स्टील रेलींग बसविण्यात आलेले आहेत. सडपातळ देहयष्टीचे साईभक्त व लहान मुले ही सदरील दोन्ही ठिकाणांच्या रेलींगमधून आतमध्ये अनाधीकृतपणे प्रवेश करतात. त्यामुळे सदरील सर्व रेलींगमध्ये दुरुस्ती करुन आणखी एक पाईप वेल्डींग करुन दयावा लागणार आहे व काही ठिकाणी रेलींगची उंची वाढवून दयावी लागणार आहे. संरक्षण

विभागाने सदरची कामे करुन मिळणेविषयी मागणी केलेली आहे. तसेच दि. २५-०१-२०१४ रोजी सदरील कामांविषयी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी चर्चा झालेली आहे. मंदिर परीसरातील स्टेनलेस स्टील रेलींग दुरुस्त करुन देण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून निविदा मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

**अ). गुरुस्थान मंदिर ते गेट नं.०३ पर्यंत स्टेनलेस स्टील रेलींग दुरुस्त करणे.**

| अ.नं | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- ४० x ४० एम.एम. x १६ गेज | ४० फूट | रु. ३००/-<br>(प्रति फूट) | रु. ०,१२,०००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- १८ एम.एम. x १६ गेज | ३००० फूट | रु. १२५/-<br>(प्रति फूट) | रु. ३,७५,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ३,८७,०००.००** |

**ब). गेट नं.०३ समोर In, Out साठी वॉकर टाईप स्टेनलेस रेलींग तयार करुन बसविणे.**

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- ४० x ४० एम.एम. x १६ गेज | ८०० फूट | रु. ३००/-<br>(प्रति फूट) | रु. २,४०,०००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- १८ एम.एम. x १६ गेज | १२०० फूट | रु. १२५/-<br>(प्रति फूट) | रु. १,५०,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील सी आकाराची<br>साईज :- ७५ x ३ एम.एम. | ५० फूट | रु. २४०/-<br>(प्रति फूट) | रु. ०,१२,०००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील नट बोल्ट,<br>साईज :- १५० x ८ एम.एम. | १०० नग | रु. १२०/-<br>(प्रति नग) | रु. ०,१२,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४,१४,०००.००** |

उपरोक्त अ). प्रमाणे गुरुस्थान मंदिर ते गेट नं.०३ पर्यंत स्टेनलेस स्टील रेलींग दुरुस्त करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ३,८७,०००/- मात्र तसेच ब). प्रमाणे गेट नं.०३ समोर In, Out साठी वॉकर टाईप स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकरीता अंदाजे रक्कम रुपये ४,१४,०००/- मात्र असे मिळून एकुण रक्कम रुपये ८,०१,०००/- अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ व ब प्रमाणे मंदिर परिसरातील स्टेनलेस स्टील रेलींग दुरुस्ती करणेस तसेच वॉकर रेलींग तयार करुन बसविणेचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.८,०१,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७५** **पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईनकरीता वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत वर्षभरात तीन उत्सव साजरे केले जातात. या काळात शिर्डीमध्ये भक्त मोठया प्रमाणात श्रीं चे दर्शनासाठी येतात. तसेच नाताळ सुट्टया व शनिवार, रविवार या दिवशी जोडून येणा-या सुट्टयांच्या दिवशीही शिर्डीमध्ये मोठया प्रमाणात गर्दी होते. अशा वेळेस दर्शनलाईन पिंपळवाडी रोडने हॉटेल MTDC पर्यंत जाते याकरीता गर्दीच्या कालावधीमध्ये दर्शनलाईनचे नियोजनाकरीता साई कॉम्प्लेक्स समोरील पिंपळवाडी रोडवर वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकरीता संरक्षण विभागाने मागणी केलेली आहे. सदरील ठिकाणी लागणारे एकुण ३० नग वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन देण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून निविदा मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

पिंपळवाडी रोडवरील दर्शनलाईनकरीता वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज:- ४०x४० एम.एम. x १६ गेज | ३८०० फूट | रु. ३००/- (प्रति फूट) | रु. ११,४०,०००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- १८ एम.एम. x १६ गेज | ५१०० फूट | रु. १२५/- (प्रति फूट) | रु. ०६,३७,५००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील फ्लॅट पट्टी,<br>साईज :- ७५ x ५ एम.एम. | २६० फूट | रु.३२०/-(प्रति र.फूट) | रु. ००,८३,२००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील नट बोल्ट,<br>साईज :- १५० x ८ एम.एम. | ३०० फूट | रु. १००/- (प्रति फूट) | रु. ००,३०,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. १८,९०,७००.००** |

उपरोक्तप्रमाणे पिंपळवाडी रोडवरील दर्शनलाईनकरीता वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये १८,९०,७००/- मात्र येणे अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७६** **श्री साईबाबा हॉस्पिटल, मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस जाळया व गेट बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी मधील मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस १३ नग खिडक्यांना जाळया बसविणेसाठी व मोकळया जागेत जाळया व गेट तयार करुन बसवून देणेकामी मागणी केलेली आहे. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल, मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस जाळया व गेट तयार करुन बसविणेकरीता लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.न | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :-२५ x ५ एम.एम. | ९० किलो. | रु. ७५/-<br>(प्रति किलो) | रु. ०६,७५०.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील मच्छर जाळी,<br>साईज :- ३` उंचीची. | ७०<br>रनिंग फूट | रु. १२०/-<br>(प्रति रनिंग फूट) | रु. ०८,४००.०० |
| ०३) | बुगडी बोल्ट,<br>साईज :- ३/४`` (वॉशरसह) | ५३० नग | रु. २/-<br>(प्रति नग) | रु. ०१,०६०.०० |
| ०४) | एम.एस.अँगल,<br>साईज :-४० x ४० x५ एम.एम. | २९७ किलो | रु. ७५/-<br>(प्रति किलो) | रु. २२,२७५.०० |
| ०५) | एम.एस.स्क्वेअर बार,<br>साईज :- १० एम.एम. | २४५ किलो | रु. ७५/-<br>(प्रति किलो) | रु. १८,३७५.०० |
| ०६) | एम.एस.बट बिजागरी,<br>साईज :- ६`` हेवी. | ३ नग | रु. १००/-<br>(प्रति नग) | रु. ००,३००.०० |
| ०७) | काळा कलर, एशियन मेक. | ५ लिटर्स | रु. ३००/-<br>(प्रति लिटर्स) | रु. ०१,५००.०० |
| ०८) | स्टेनलेस स्टील ऑल्ड्रॉप,<br>साईज :- १२`` हेवी. | १ नग | रु. ३००/- (प्रति नग) | रु. ००,३००.०० |
| | | **एकुण रक्कम :-** | | **रु. ५८,९६०/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल, मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस जाळया व गेट तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५८,९६०/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मेडिकल स्टोअरच्या मागील बाजूस जाळया व गेट तयार करुन बसविणेचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु ५८,९६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७७** **पालखी प्रवेशद्वारापासून वॉल कंपाऊंडच्या समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.१९-०३-२०१४ रोजी प्रशासकीय अधिकारी / प्र.प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख यांचे समवेत दर्शन रांगेला भेट दिली असता पालखी प्रवेशव्दारापासून वॉल कंपाऊंडच्या समोर दोन भक्त चालतील एवढया आकाराचे स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत निर्देश दिलेले आहे. सदर ठिकाणी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

पालखी प्रवेशव्दारापासून वॉल कंपाऊंडच्या समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेसाठी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईजः- ४० x २ एम.एम. | १२०० फूट | रु. ३००/-<br>(प्रति फूट) | रु. ३,६०,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप,<br>साईजः- २० x २ एम.एम. | २१४० फूट | रु. १५०/-<br>(प्रति फूट) | रु. ३,२१,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील फ्लॅट पट्टी,<br>साईजः- १०५ x ३ एम.एम. | २०० फूट | रु. ३४०/-<br>(प्रति फूट) | रु. ०,६८,०००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील नटबोल्ट,<br>साईजः- १५० x ८ एम.एम.<br>(२ नग वॉशरसह) | १०० नग | रु. १२५/-<br>(प्रति नग) | रु. ०,१२,५००.०० |
| | | | **एकुण रक्कम** | **रु. ७,६१,५००.००** |

उपरोक्तप्रमाणे पालखी प्रवेशव्दारापासून वॉल कंपाऊंडच्या समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ७,६१,५००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, पालखी प्रवेशद्वारापासून वॉल कंपाऊंडच्या समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेचे कामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशनची मागणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,६१,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७८ श्री साईबाबा संस्थानच्या कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरिता सोलर सिस्टीम संयंत्र आस्थापित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयंत्र आस्थापित करणेचे तसेच सदर सयंत्राचे कोटेशन सादर करणेबाबत संस्थानमार्फत मे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुसार मे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांनी श्री साईबाबा संस्थानच्या कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयंत्राचे कोटेशन सादर केलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | इमारतीचे नाव | एकुण रुम | एकुण क्षमता (लि. प्रतीदिन) | संयंत्राची एकुण किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१) | साईस्मरण | | | |
| | ए-०१ | ०६ | १००० | १,७५,०००/- |
| | ए-०२ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| | ए-०३ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| ०२) | साईचिंतन | | | |
| | बी-०१ | १२ | १७५० | ३,०६,२५०/- |
| | बी-०२ | १२ | १७५० | ३,०६,२५०/ |
| | बी-०३ | १२ | १७५० | ३,०६,२५०/ |
| | बी-०४ | १२ | १७५० | ३,०६,२५०/ |
| ०३) | साई सहवास | | | |
| | ०१ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| | ०२ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| | ०३ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| | ०४ | ०६ | १००० | १,७५,०००/ |
| ०४) | नविन क्वार्टर | | | |
| | ए | १२ | २००० | ३,५०,०००/- |
| | बी | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | सी | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | डि | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | इ | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | एफ़ | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | जी | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | एच | १२ | २००० | ३,५०,०००/ |
| | **एकुण :-** | **१८६** | **३००००** | **५२,५०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानच्या कर्मचारी व अधिकारी निवासस्थानाकरीता सोलर सिस्टीम संयंत्र आस्थापित करणेकरीता मे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे रक्कम रुपये ५२,५०,०००/- खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडुन निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ई - निविदेची जाहीरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी तसेच मे.महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे त्यांची ३ टक्के सल्लागार फ़ी अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७९ मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे चेंज ओव्हर स्विचचे बील आदा होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनगर स्टाफ क्वॅार्टर इमारतींना व परीसराकरीता वीजपुरवठयाकामी साईनगर येथील सबस्टेशनमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे पर्यायी वीजपुरवठयाकरीता ५०० केव्हीए व १०१० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर जनरेटरसेट चालू करुन जनरेटरसेटचा सप्लाय जोडून घ्यावा लागतो. याकरीता मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलवरील चेंजओव्हर स्विच फिरवून जनरेटर सेटचा सप्लाय जोडून घेतला जातो. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा पुर्ववत चालू झाल्यानंतर चेंज ओव्हर स्विच फिरवून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा जोडून घेतला जातो व जनरेटरसेट बंद केला जातो. सततच्या वापरामुळे चेंजओव्हर स्विच वारंवार ऑनऑफ केला जात असल्यामुळे कालांतराने चेंजओव्हर स्विच खराब होतात. चेंजओव्हर स्विच खराब झाल्यास त्याव्दारे असलेला पुढील संपूर्ण इमारतीचा व परीसराचा वीजपुरवठा बंद पडतो. अशावेळेस नविन चेंजओव्हर स्विच बसवून सप्लाय चालू करुन द्यावा लागतो.

साईनगर सबस्टेशन मधील मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल नं.२ वरील ८०० ॲम्पीअरचा चेंजओव्हर स्विच नोव्हेंबर-२०१३ मध्ये खराब झालेला होता. त्यामुळे पॅनेल नं.२ चा सप्लाय चालू ठेवणेकरीता पॅनेल नं.१ वरील एमसीसीबी मधून केबल जोडून तात्पुरता सप्लाय चालू करुन देण्यात आलेला होता. पॅनेल नं.१ वर दोन्ही पॅनेलचा लोड आल्यामुळे पॅनेल नं.१ वरील एमसीसीबी ओव्हर लोडमुळे ट्रिप होऊन पॅनेल वारंवार बंद होऊ लागल्यामुळे सदरील चेंजओव्हर स्विच बदलून पॅनेल नं.२ स्वतंत्र चालू करुन देणे आवश्यक होते. कारण श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये अत्यंत अवघड स्वरुपाच्या तातडीच्या शस्त्रक्रिया चालू असतात. वीजपुरवठा जास्त वेळ बंद राहिल्यास रुग्णांचे जिवितास धोका होऊ शकतो. याकरीता चेंजओव्हर स्विच तात्काळ बदली करणे आवश्यक होते.

नगर व नाशिक येथील दुकानदारांशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधून चेंजओव्हर स्विच तात्काळ क्रेडीटवर पुरविणे बाबत चौकशी केली असता कोणीही क्रेडीटवर चेंजओव्हर देण्यास तयार नव्हते. म्हणून एस.टी.स्टॅंडचे सध्याचे इलेक्ट्रीकलचे काम करणारे विद्युत ठेकेदार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना सदरील चेंजओव्हर स्विच क्रेडीटवर देणे विषयी विनंती केली असता त्यांनी ८०० ॲम्पीअर, चेंजओव्हर स्विच आणून बसवून देण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार त्यांनी दि.०८-०३-२०१४ रोजी ८०० ॲम्पीअरचा चेंजओव्हर स्विच आणून बसवून चालू करुन दिलेला आहे.

मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी पुरविलेल्या चेंजओव्हर स्विचच्या बीलाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| ०१) | On Load Change Over Switch , Company: L & T ,Type : FGC 800, Cat No : ST 26580 | ०१ नग | रु. ६७,९५१/- | रु. ६७,९५१/- |
| | | **एकुण रक्कम :-** | | **रु. ६७,९५१/-** |

उपरोक्तप्रमाणे चेंजओव्हर स्विचची रक्कम रुपये ६७,९५१/- मात्र मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांना आदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८० श्री साईनाथ हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ व ०२ चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे सोयीकरीता तळमाळयावरुन वरील माळयांवर ये-जा करणेकरीता मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून हायड्रॉलिक लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. त्या नेहमी

सुस्थितीत चालू राहणेसाठी त्यांचे नियमित सर्व्हिसिंग करावे लागते. मागील वर्षी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते.

सदरील लिफ्ट सतत कार्यान्वित असतात. सततच्या वापरामुळे लिफ्टच्या यंत्रणेत प्रसंगी बिघाड निर्माण होऊ शकतो. अशा वेळेस सर्व्हिसिंग करुन खराब झालेले स्पेअर्स बदलून लिफ्ट लगेच चालू करुन द्यावी लागते. लिफ्ट दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर्स आपणाकडे उपलब्ध नसतात. शिवाय लिफ्ट दुरुस्तीचा तंत्रज्ञ कर्मचारी संस्थानकडे नसल्याने लिफ्ट दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होऊ नये म्हणून मागील वर्षी लिफ्ट क्र.०१ चे दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ अखेर व लिफ्ट क्र.०२ चे दिनांक ०१-०५-२०१३ ते दिनांक ३०-०४-२०१४ अखेर लिफ्ट कंपनीचे उत्पादक मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते.

मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत संपत आल्याने त्यांनी लिफ्ट क्र.०१ चे दिनांक ०१-०४-२०१४ ते दिनांक ३१-०३-२०१५ अखेर व लिफ्ट क्र.०२ चे दिनांक ०१-०५-२०१४ ते दिनांक ३०-०४-२०१५ अखेर ऑपरेशन-मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी (AMC) लागणा-या खर्चाचे कोटेशन पाठविले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | लिफ्ट संख्या | दर (प्रत्येकी) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साईनाथ हॉस्पीटल-लिफ्ट क्र.०१ [दि.०१-०४-२०१४ ते दि.३१-०३-२०१५] | ०१ नग | रु. ८०,०००.०० | रु. ८०,०००.०० |
| | | | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | रु. ०९,८८८.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ८९,८८८.००** |
| ०२) | श्री साईनाथ हॉस्पीटल-लिफ्ट क्र.०२ [दि.०१-०५-२०१४ ते दि.३०-०४-२०१५] | ०१ नग | रु. ८०,०००.०० | रु. ८०,०००.०० |
| | | | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | रु. ०९,८८८.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ८९,८८८.००** |
| | **लिफ्ट क्र. ०१ + लिफ्ट क्र. ०२ मिळून एकुण रक्कम :-** | | | **रु. १,७९,७७६.००** |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय क्र.३८६ अन्वये (सोबत-ठराव प्रत जोडली आहे) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा.प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनरी, ए.सी.वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिक्स प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरींच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे असे ठरले.

तरी उपरोक्त ठराव विचारात घेऊन लिफ्टची उत्पादक कंपनी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे यापुढे दरवर्षी किंवा ठराविक मुदतीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी व यावर्षी लिफ्ट क्र.०१ ची वार्षिक कॉन्ट्रॅक्ट (AMC) दिनांक ०१-०४-२०१४ ते दिनांक ३१-०३-२०१५ या कालावधीसाठी त्यांनी कळविलेले रक्कम रु.८९,८८८/- मात्र व लिफ्ट क्र.०२ ची दिनांक ०१-०५-२०१४ ते दिनांक ३०-०४-२०१५ या कालावधीसाठी रक्कम रु.८९,८८८/- मिळून रक्कम रुपये १,७९,७७६/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख एकोणऐंशी हजार सातशे शहात्तर मात्र) इतकी ॲडव्हान्स रक्कम मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना आदा करणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८१ भक्तनिवास व शांतीनिवास हॉलमधील दर्शन लाईनच्या खिडक्यांकरीता वापरण्यात आलेले रेड आग्रा स्टोन ऐवजी लोखंडी ग्रील बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.१९-०३-२०१४ रोजी प्रशासकीय अधिकारी / प्र.प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख यांचे समवेत दर्शन रांगेला भेट दिली असता दर्शनलाईनमध्ये रेड आग्रा स्टोन जाळीमुळे हॉलमध्ये पुरेशा प्रमाणात हवा येत नसल्याचे सुरक्षा कर्मचा-यांमार्फत सांगण्यात आले. त्यावेळी मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रेड आग्रा स्टोन काढून त्याजागी लोखंडी ग्रील बसविणेबाबत निर्देश दिलेले आहे. सदर ठिकाणी लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

भक्तनिवास व शांतीनिवास हॉलमधील दर्शन लाईनच्या खिडक्यांकरीता वापरण्यात आलेले रेड आग्रा स्टोन ऐवजी लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेसाठी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल, साईजः- ३५ x ३५ x ५ एम.एम. | १४२६ किलो | रु. ८०/- (प्रति किलो) | रु. १,१४,०८०.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर बार, साईज :- १० एम.एम. | २५३३ किलो | रु. ८०/- (प्रति किलो) | रु. २,०२,६४०.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईजः- २५ x ५ एम.एम. | १०५८ किलो | रु. ८०/- (प्रति किलो) | रु. ०,८४,६४०.०० |
| ०४) | प्लंबींग खिळे, साईज :- २`` | २० किलो | रु. १४०/- (प्रति किलो) | रु. ०,०२,८००.०० |
| ०५) | एशियन मेक, काळा कलर | ४० लिटर्स | रु. ३००/- (प्रति लिटर) | रु. ०,१२,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४,१६,१६०.००** |

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवास व शांतीनिवास हॉलमधील दर्शन लाईनच्या खिडक्यांकरीता वापरण्यात आलेले रेड आग्रा स्टोन ऐवजी लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,१६,१६०/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवास व शांतीनिवास हॉलमधील दर्शन लाईनच्या खिडक्यांकरीता वापरण्यात आलेले रेड आग्रा स्टोन ऐवजी लोखंडी ग्रील बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,१६,१६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८२ व्दारावती इमारतीचे खोल्यांमधील बाथरुम/ टॉयलेटचे बाजूस असलेल्या डगच्या जाळया बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती इमारतीमध्ये ए.सी.व नॉन ए.सी.एकुण ३१६ खोल्या भक्तांचे निवासासाठी उपलब्ध आहेत. सर्व खोल्यांमधील बाथरुम/ टॉयलेटचे बाजूस असलेल्या डगच्या जाळया पुर्णपणे खराब होऊन तुटलेल्या आहेत. सदर जाळयांमधून भक्तांचे उपयोगी व महत्त्वाचे सामान डग मधून खाली पडते. तसेच डगमधून घुशी, उंदीर व इतर किटक यांचा त्रास भक्तांना होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत. त्यासाठी डगच्या जाळया तयार करुन बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

व्दारावती इमारतीचे खोल्यांमधील बाथरुम/ टॉयलेटचे बाजूस असलेल्या डगच्या जाळया तयार करुन बसविणेसाठी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईजः- २५ x ५ एम.एम. | १०६२ किलो | रु. ८०/- (प्रति किलो) | रु. ०,८४,९६०.०० |
| ०२) | जी.आय.परफोरेटेड शीट, साईज :- ८` x ४` x १६ गेज | १६२० किलो | रु. २१०/- (प्रति किलो) | रु. ३,४०,२००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४,२५,१६०.००** |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती इमारतीचे खोल्यांमधील बाथरुम/ टॉयलेटचे बाजूस असलेल्या डगच्या जाळया तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,२५,१६०/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७० यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीचे खोल्यांमधील बाथरुम/ टॉयलेटचे बाजूस असलेल्या डगच्या जाळया तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ४,२५,१६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८३ द्वारावती निवासस्थान समोरील बागेच्या पश्चिम बाजूला लोखंडी जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती निवासस्थान समोरील असलेल्या बागेतून रिंग रोड गेल्याने या बागेचे विभाजन होऊन दोन भाग तयार झालेले आहेत. श्री साईनाथ रुग्णालयाचे बाजूस ०१ छोटासा भाग तयार झाला आहे. या भागात रुग्णालयातील रुग्णांचे नातेवाईक, स्थानिक लोक बसतात. त्यामुळे याठिकाणी कचरा होतो. त्यासाठी त्या बागेला तारेचे किंवा उपलब्ध असलेल्या जाळयांपासून कंपाऊंड तयार करुन मिळणेकामी बगीचा

विभागाने कळविले आहे. परंतू विद्युत विभागाकडे मटेरीअल उपलब्ध नसल्याने हे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

व्दारावती निवासस्थान समोरील बागेच्या पश्चिम बाजूला लोखंडी जाळी तयार करुन बसविणेसाठी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज:- ३५ x ३५ x ५ एम.एम. | ७१५ किलो | रु. ८०/-<br>(प्रति किलो) | रु. ०,५७,२००.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर बार,<br>साईज :- १० एम.एम. | १६७० किलो | रु. ७५/-<br>(प्रति किलो) | रु. १,२५,२५०.०० |
| ०३) | एम.एस.राऊंड पाईप,<br>साईज:- ५० x ३ एम.एम. | ४०० फूट | रु. ११०/-<br>(प्रति फूट) | रु. ०,४४,०००.०० |
| ०४) | एम.एस.राऊंड टिकली,<br>साईज :- ५० x ३ एम.एम. | ५ किलो | रु. १३०/-<br>(प्रति किलो) | रु. ०,००,६५०.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,२७,१००.००** |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती निवासस्थान समोरील बागेच्या पश्चिम बाजूला लोखंडी जाळी तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,२७,१००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती निवासस्थान समोरील बागेच्या पश्चिम बाजूला लोखंडी जाळी तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,२७,१००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८४** **व्दारावती इमारतीमधील पुर्व व पश्चिम बाजूस असलेल्या जिन्याचे पडदीला आकर्षक लोखंडी जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती इमारतीमधील पुर्व व पश्चिम बाजूस असलेल्या जिन्याचे समोर बसविण्यात आलेल्या लोखंडी ग्रीलची जाळीचे व्यतिरिक्त जिन्यालगत असलेल्या पडदीची उंची कमी असल्याने त्या पडदीचा आधार घेऊन कोणीही अज्ञात इसम त्यावरुन वरच्या मजल्यावर जाऊ शकते. त्यासाठी तेथे जिन्याच्या पडदीला आकर्षक लोखंडी जाळी बसवून मिळणेकामी व्दारावती भक्तनिवास विभागाने मागणी केलेली आहे. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

व्दारावती इमारतीमधील पुर्व व पश्चिम बाजूस असलेल्या जिन्याचे पडदीला आकर्षक लोखंडी जाळी तयार करुन बसविणेसाठी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज:- ४० x ४० x ५ एम.एम. | ८०० किलो | रु. ८०/-<br>(प्रति किलो) | रु. ०,६४,०००.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर बार,<br>साईज :- १० एम.एम. | ११५२ किलो | रु. ७५/-<br>(प्रति किलो) | रु. ०,८६,४००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. १,५०,४००.००** |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती इमारतीमधील पुर्व व पश्चिम बाजूस असलेल्या जिन्याचे पडदीला आकर्षक लोखंडी जाळी तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,५०,४००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीमधील पुर्व व पश्चिम बाजूस असलेल्या जिन्याचे पडदीला आकर्षक लोखंडी जाळी तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,५०,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८५** **साईधर्मशाळा करीता लोखंडी ग्रील व गेट तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८-०७-२०१३ पासून सुरु करण्यात आलेला आहे. याठिकाणी पालखीधारक पदयात्री, सहली, साईभक्त यांची निवासव्यवस्था करण्यात येते. सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येक इमारतीच्या मधल्या बाजूस, मागील बाजूस ग्रील व पुढील बाजुस गेट, सर्व इमारतीचे प्रवेशव्दाराचे बाजुस

दुभाजक बसवून देणेसाठी साईधर्मशाळा विभागाने मागणी केलेली आहे. लोखंडी ग्रील व गेट तयार करुन बसवून देण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. साईधर्मशाळा करीता लोखंडी ग्रील व गेट तयार करणेकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | कोलॅप्सीबल गेट | ४५० स्क्वेअर फूट | रु. २६०/- (प्रति स्क्वेअर फूट) | रु. १,१७,०००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल, साईजः- ३५ x ३५ x ५ एम.एम. | ४१० किलो | रु. ७५/- (प्रति किलो) | रु. ०,३०,७५०.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईज :- ३५ x ५ एम.एम. | ९५ किलो | रु. ७५/- (प्रति किलो) | रु. ०,०७,१२५.०० |
| ०४) | एम.एस.स्क्वेअर जाळी, साईजः- ५० x ५० x ५ एम.एम. (४` उंचीची) | २०० रनिंग फूट | रु. २२०/- (प्रति रनिंग फूट) | रु. ०,४४,०००.०० |
| ०५) | एम.एस.भाले, साईज :- ५`` | ३०० नग | रु. ६०/- (प्रति नग) | रु. ०,१८,०००.०० |
| ०६) | एम.एस.सी चॅनेल साईज :- १२५ x ६५ एम.एम. | ५३० किलो | रु. ७५/- (प्रति किलो) | रु. ०,३९,७५०.०० |
| ०७) | एम.एस.राऊंड पाईप, साईज :- ५० x ३ एम.एम. | २०० फूट | रु. ११०/- (प्रति फूट) | रु. ०,२२,०००.०० |
| ०८) | एम.एस.गोल टिकली, साईज :- ५० x ३ एम.एम. | ३ किलो | रु. १२०/- (प्रति किलो) | रु. ०,००,३६०.०० |
| ०९) | एशियन मेक, काळा कलर | १० लिटर्स | रु. ३००/- (प्रति लिटर) | रु. ०,०३,०००.०० |
| १०) | एशियन मेक, स्मोग्रे कलर | १० लिटर्स | रु. ३००/- (प्रति लिटर) | रु. ०,०३,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,८४,९८५.००** |

उपरोक्तप्रमाणे साईधर्मशाळा करीता लोखंडी ग्रील व गेट तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,८४,९८५/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा करीता लोखंडी ग्रील व गेट तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,८४,९८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८६** **श्री साई प्रसादालयाकडील मालवाहू लिफ्ट व पॅसेंजर लिफ्टचें वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांना नविन श्री साई प्रसादालयात मालवाहतूकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट पुरविणे व बसविणेकामी एसएसएस/ विद्युत/ ९२३७/ २००७ दिनांकः-१३-०६-२००७ अन्वये रुपये ३०,४१,०००.०० इतक्या कार्यादेश देण्यात आला होता.

मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांनी नविन श्री साई प्रसादालयामध्ये मालवाहतूकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट बसवून अशा दोन लिफ्ट चालू करून दिल्या होत्या. लिफ्ट चालू झाल्यानंतर मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि. यांनी टेंडरमधील व कार्यादेशातील अटीनुसार प्रथम वर्षी फ्री सर्व्हिस दिली आहे.

मागील वर्षी श्री साई प्रसादालयामधील दोन्ही लिफ्टसाठी सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०४-२०१३ ते दिनांक ३१-०३-२०१४ या कालावधीसाठी रु. १,७६,१७०/- (सर्व टॅक्सेस समाविष्ट) इतक्या रकमेस देण्यात आले होते. त्याची मुदत दि. ३१-०३-२०१४ रोजी संपलेली आहे.

आता त्यांनी दिनांक ०१-०४-२०१४ ते दिनांक ३१-०३-२०१५ या आर्थिक वर्षाकरीता ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट) मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी लागणाऱ्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

जर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) केलेले नसेल आणि मशिनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशिनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते. शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध होतील याची शाश्वती नसते.

या रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिक येऊन मशिनरीची साफसफाई करून क्लिनींग करून सेटींग करून देत असतो. जेणेकरून लिफ्ट सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे. सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) पिरिअडमध्ये मशिनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या (मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

| Unit Number | Maintenance Charges for the Period | | Basic Amount (Rs.) | Tax Amount (Rs.) | Total Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| | From | To | | | |
| M9667 | 01 April 2014 | 31 March 2015 | 1,00,608.00 | 15,007.00 | 1,15,615.00 |
| M9668 | 01 April 2014 | 31 March 2015 | 71,862.00 | 10,719.00 | 0,82,581.00 |
| | | Total :- | 1,72,470.00 | 25,726.00 | **1,98,196.00** |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय नं.३८६ अन्वये (ठरावाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे.) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनरस्, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त ठराव विचारात घेऊन लिफ्टची उत्पादक कंपनी मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साईप्रसादालय कडील दोन्ही लिफ्टचे यापुढे दरवर्षी किंवा ठराविक मुदतीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी व यावर्षी मालवाहू लिफ्टची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दिनांक ०१-०४-२०१४ ते दिनांक ३१-०३-२०१५ या कालावधीसाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु.१,१५,६१५.०० मात्र व पॅसेंजर लिफ्टची दि. ०१-०४-२०१४ ते दि.३१-०३-२०१५ या कालावधीसाठी रक्कम रु. ८२,५८१.०० मिळून रक्कम रु.१,९८,१९६/- (अक्षरी रक्कम रू. एक लाख अठ्ठयान्नव हजार एकशे शहान्नव मात्र) इतकी अॅडव्हान्स रक्कम मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना आदा करणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८७ संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकामी ए.सी. खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २७-०१-२०१४ पासून ई.डी.पी.विभाग स्वतंत्र करण्यात आलेला आहे. सदर विभागाकडे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे संगणक प्रणाली बाबतचे सॉप्टवेअर व हार्डवेअर संबंधीत कामकाज देण्यात आलेले आहे. संगणकीय प्रणाली सुरक्षेच्या दृष्टीने ई.डी.पी.विभागातील मॅनेजर केबीन व सी.सी.टि.व्ही.केबीनकरीता विद्युत विभागाकडून ए.सी.बसवून मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदर ठिकाणी ०२ नग स्प्लिट ए.सी.बसविणे आवश्यक आहे. तसेच मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.१५-०४-२०१४ रोजी पीआरओ मिटींग हॉलजवळील व्हीआयपी क्र.०१ व ०२ मध्ये तसेच श्री साई प्रसादालयाचे व्हीआयपी भोजनकक्षामध्ये त्वरीत ए.सी. बसविण्याची सुचना केलेली आहे. उपरोक्तप्रमाणे आवश्यक असणारे ए.सी. विद्युत विभागाकडे शिल्लक नसल्याने नविन खरेदी करावे लागणार आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी.विभाग, सी.सी.टि.व्ही.केबीन | स्प्लिट टाईप ए.सी. वॉल माऊंटेड , व्होल्टास / ब्लू स्टार मेक, क्षमता :- २ टन. | ०२ नग | रु.४५,०००/- | रु. ०,९०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२) | PRO मिटींग हॉलजवळील व्हीआयपी क्र.०१ | स्प्लिट टाईप ए.सी. वॉल माऊंटेड , व्होल्टास / ब्लू स्टार मेक, क्षमता :- २ टन. | ०१ नग | रु.४५,०००/- | रु. ०,४५,०००/- |
| ०३) | PRO मिटींग हॉलजवळील व्हीआयपी क्र.०२ | स्प्लिट टाईप ए.सी. वॉल माऊंटेड , व्होल्टास / ब्लू स्टार मेक, क्षमता :- १.५ टन. | ०१ नग | रु.४०,०००/- | रु. ०,४०,०००/- |
| ०४) | श्री साई प्रसादालय व्हीआयपी भोजन कक्ष | टॉवर टाईप, स्प्लिट ए.सी. व्होल्टास / ब्लू स्टार मेक, क्षमता :- २ टन. | ०६ नग | रु.५०,०००/- | रु. ३,००,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम :-** | **रु.४,७५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणी बसविणेकामी ए.सी. कोटेशन मागवून खरेदी करावे लागणार आहे. त्याकामी अंदाजे रक्कम रुपये ४,७५,०००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन पुरवठाधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले ठिकाणी १० नग ए.सी. बसविणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८८ दर्शनलाईनमध्ये बसविणेकामी एअर कुलर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिनांक १९-०३-२०१४ रोजी सकाळी ११.३० चे दरम्यान प्रशासकिय अधिकारी / प्र.प्रशासकिय अधिकारी व काही विभागप्रमुख यांचे समवेत दर्शन रांगेची नियोजन व्यवस्था पाहणेकामी दर्शनरांगेमध्ये शांतीनिवास व भक्तनिवास याठिकाणी जाऊन पाहणी केली. सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने व भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात असल्यामुळे दर्शन हॉलमध्ये उष्णता जाणवते. सध्या लावण्यात आलेले एअर कुलर एअर सर्क्युलेशनच्या दृष्टीने अपुरे पडत असून दर्शन हॉल क्रमांक २ येथे उत्तर दिशेला जुन्या पिंपळवाडी रोडच्या बाजूने व इतर ठिकाणी एअर कुलरची संख्या वाढविणेबाबत सुचना/ निर्देश दिलेले आहेत.

विद्युत विभागाकडे सध्या एअर कुलर शिल्लक नसल्याने ते खरेदी करावे लागणार आहेत. खरेदी कराव्या लागणा-या एअरकुलरचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | कॅपसन मेक, अँटार्टिका एअरकुलर | १० नग. | रु. ४९,०००.०० | रु. ४,९०,०००/- |
| | | | एकुण रक्कम :- | रु. ४,९०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे एअर कुलर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,९०,०००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन एअर कुलर खरेदी करणेकामी कोटेशन बोलविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शनलाईनमधील साईभक्तांचे उष्णतेपासून रक्षण होणेकरीता १० नग एअर कुलर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.८९ चहा वाहतुक लोखंडी गाडया तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** चहा कॉन्टीन विभागाकडील भक्तनिवास चहा कॅन्टीनमधून साईआश्रमचे ठिकठिकाणी असलेल्या चहा काऊंटरवर चहाची वेळोवेळी वाहतुक करुन घेणेसाठी व श्री साईनाथ रुग्णालयात व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांना वाटप करणेसाठी चहाचे गाडयांची तातडीची आवश्यकता असल्याने ०६ नग लोखंडी गाडया तयार करुन मिळणेकामी कॅन्टीन विभागाने मागणी केलेली आहे. चहा वहातुक लोखंडी गाडया तयार करुन देण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

चहा वाहतुक लोखंडी गाडया तयार करणेकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.आयताकृती पाईप,<br>साईजः- ७५ x ४० x ३ एम.एम. | ७२ फूट | रु. ९५/-<br>(प्रति फूट) | रु. ०६,८४०.०० |
| ०२) | एम.एस.राऊंड पाईप,<br>साईजः- २०x ३ एम.एम. | १६० फूट | रु. ६०/-<br>(प्रति फूट) | रु. ०९,६००.०० |
| ०३) | एम.एस.शीट,<br>साईज :- ८` x ४` x १६ गेज | ७६ किलो | रु. १२०/-<br>(प्रति किलो) | रु. ०९,१२०.०० |
| ०४) | मुव्हींग व्हील (ब्रॅकेटसहित)<br>कॅस्टर / रेक्सोलो मेक,<br>१६० x४० एम.एम. | १२ नग | रु. १,२५०/-<br>(प्रति नग) | रु. १५,०००.०० |
| ०५) | फिक्स व्हील (ब्रॅकेटसहित)<br>कॅस्टर / रेक्सोलो मेक,<br>१६० x४० एम.एम. | १२ नग | रु. १,१००/-<br>(प्रति नग) | रु. १३,२००.०० |
| ०६) | स्मोग्रे कलर, एशियन मेक | ६ लिटर | रु. ३२०/-<br>(प्रति लिटर) | रु. ०१,९२०.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ५५,६८०.००** |

उपरोक्तप्रमाणे चहा वाहतुक लोखंडी गाडया तयार करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५५,६८०/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, चहा वाहतुक करणेसाठी लोखंडी गाडया तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५५,६८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९० साईआश्रम भक्तनिवास येथे सुरु केलेल्या स्वयंसेवी भोजन व्यवस्थेतील दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष साहेबांनी केलेल्या सुचनेनुसार साईआश्रम-१ येथे प्रायोगिक तत्त्वावर स्वयंसेवी भोजनव्यवस्था दिनांक २३-०७-२०१३ पासून सुरु करण्यात आलेली आहे. दिवसेंदिवस प्रसादभोजनासाठी साईभक्तांची संख्या वाढत आहे. तेथे दैनंदिन कामकाजात अडचण येऊ नये म्हणून स्वयंसेवी कक्षात गेट, भिंतीवर/ कठडयावर भक्त ताटे ठेऊन जेवतात तेथे जाळया लावाव्या लागणार आहेत. तसेच भांडी धुण्यासाठी स्टूल बनविणे गरजेचे आहे.

तसेच तेथील बुकींग काऊंटर हे उघडयावर आहे. साईभक्त प्रसादभोजन कुपन घेणेसाठी आलेनंतर लाईन लावणेकरीता रेलींग नसल्यामुळे सर्व भक्त काऊंटर भोवती गोळा होतात. त्यामुळे तेथे गोंधळ होतो. तेथे गोंधळ होऊ नये म्हणून बुकींग काऊंटर समोर रेलींग तयार बसवून मिळणेकामी श्री साई प्रसादालयाने मागणी केलेली आहे. सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे.

**अ) गेट, जाळया तसेच भांडी धुण्यासाठी स्टूल तयार करणेकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | कॉलेप्सीबल गेट, | ४९०<br>स्क्वे. फूट | रु. २८०/-<br>(प्रति स्क्वेअर फूट) | रु. १,३७,२००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल, साईजः- ३० x ३० x ३ एम.एम. | ९५ किलो | रु. ८०/-<br>(प्रति किलो) | रु. ०,०७,६००.०० |
| ०३) | एम.एस.स्क्वेअर जाळी,<br>साईजः- २५ x २५ x ४ एम.एम. (४` उंचीची) | २५<br>रनिंग फूट | रु. २२०/-<br>(प्रति र.फूट) | रु. ०,०५,५००.०० |
| ०४) | एम.एस.स्क्वेअर पाईप, साईजः-२५ x २५ x३ एम.एम. | ८० फूट | रु. ७५/-<br>(प्रति फूट) | रु. ०,०६,०००.०० |
| ०५) | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईज :- २५ x ३ एम.एम. | ०५ किलो | रु. ८०/-<br>(प्रति किलो) | रु. ०,००,४००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६) | काळा कलर, एशियन मेक. | १५ लिटर्स | रु. ३००/- (प्रति लि.) | रु. ०,०४,५००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. १,६१,२००.००** |

**(ब) बुकींग काऊंटर समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणेकामी लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

| अ. नं. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप, साईज :- ४० x २ एम.एम. | १८० फूट | रु. ३००/- (प्रति फूट) | रु. ०,५४,०००.०० |
| ०२) | टेनलेस स्टील राऊंड पाईप, साईज :- २० x २ एम.एम. | ३६० फूट | रु. २००/- (प्रति फूट) | रु. ०,७२,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील फ्लॅट पट्टी, साईज :- १०५ x ३ एम.एम. | ४० फूट | रु. ३४०/- (प्रति फूट) | रु. ०,१३,६००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील नट बोल्ट, साईज:- १०५x८ एम.एम. (०२ नग वॉशरसह) | १६ नग | रु. १२५/- (प्रति नग) | रु. ०,०२,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु.१,४१,६००.००** |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम-१ येथे सुरु केलेल्या स्वयंसेवी भोजन व्यवस्थेतील दुरुस्तीकामी (अ) प्रमाणे गेट, जाळया तसेच भांडी धुण्यासाठी स्टूल तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,६१,२००/- मात्र तसेच (ब) प्रमाणे बुकींग काऊंटर समोर स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,४१,६००/- मात्र खर्च असे मिळून रक्कम रुपये ३,०२,८००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित अ व ब प्रमाणे कार्यवाही करणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,०२,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९१ फुड सर्व्हिस ट्रॉलीचे मोव्हेबल ब्रॅकेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्तावना:-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन वाढणेसाठी स्टे. स्टील सर्व्हिस ट्रालीचा वापर करणेत येतो. प्रसाद भोजन पदार्थ, चपाती, पाणी, ग्लास व जेवनाचे ताटांचे वाटप करणेसाठी वेगवेगळया ट्रॉलीचा वापर करण्यात येत आहे. त्यानुसार ट्रॉलीची संख्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | | | ट्रॉलीज संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | ताटे वाहणेची ट्रॉलीज | ६ इंच व्हिल | | - ३० नग |
| २. | भाजी, दाळ व भात वाढणेची ट्रॉलीज | ६ इंच व्हिल | | - २० नग |
| ३. | पाणी व ग्लास ट्रॉलीज | ६ इंच व्हिल | | - २० नग |
| | | | एकुण | - ७० नग |
| ४. | पाणी व ग्लास ट्रॉलीज | ४ इंच व्हिल | | - १५ नग |
| ५. | चपाती / पुरी वाढणेच्या ट्रॉलीज | ४ इंच व्हिल | | - ३० नग |
| | | | एकुण | - ४५ नग |
| ६. | भाताची चाळण | ८ इंच व्हिल | | - ४ नग |

दैनंदिन वापराने सदर ट्रॉलीजचे मोव्हेबल व्हिल ब्रॅकेट खराब झालेले आहेत. व्हिल ब्रॅाकेट खराब झालेमुळे ट्रॉलीजचा वापर करताना अडचन येते. ट्रॉली व्यवस्थीत वळविणे व ढकलणेसाठी अडचण येत आहे. भक्तांना प्रसाद भोजन वाढणे व जेवनाची ताटांची ने-आण करणेकामी अडचण येत आहे. सर्व्हिस ट्रॉली ओढणेस कर्मचाऱ्यांना त्रास होत आहे. सर्व्हिस ट्रॉली व्यवस्थीत चालु राहणेसाठी प्रती ट्रॉलीकरीता दोन मुव्हेबल ब्रॅकेट खरेदी करावे लागतील.

**मागणी:-** उत्सव व गर्दीचे कालावधीमध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या ८० हजार पर्यंत असते. त्यामुळे सर्व ट्रॉलीज कार्यरत राहणे आवश्यक आहेत. त्याकामी खरेदी करावयाच्या मोव्हेबल बॅकेटची संख्या व अंदाजे किमत खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बॅकेटचा तपशिल | ट्रॉलीजची संख्या | मोव्हेबल बॅकेट संख्या | अंदाजे किमंत | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६ इंच व्हिल | ७० ट्रालीज | १४० ब्रॅकेट | ४५०.०० | ६३०००.०० |
| २ | ४ इंच व्हिल | ४५ ट्रॉलीज | ९० ब्रॅकेट | ३००.०० | २७०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ इंच व्हिल | ४ ट्रॉलीज | १६ बॅकेट | ६२५.०० | १००००.०० |
| | एकुण | ११९ टॉलीज | **२४६** बॅकेट | एकुण रक्कम | **१,००,०००.००** |

व्हील व ब्रॉकेट उत्पादन करणाऱ्या पायोनियर अग्रगण्य कंपनी व त्यांचे अधिकृत डिलर यांचेकडून विहीत पद्धतीने दरपत्रक मागावून ब्रॅकेट खरेदी करता येतील. याकामी अंदाजे उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत**:- तरी श्रीप्रसादालयातील फुड सर्व्हिस ट्रॉलीकरीता २४६ नग मोव्हेबल ब्रॅकेट विहित पद्धतीने दरपत्रक मागावून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील फुड सर्व्हिस ट्रॉलीकरीता २४६ नग मोव्हेबल ब्रॅकेट विहित पद्धतीने दरपत्रक मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९२ श्री साईप्रसादालयातील मेंटेनन्साठी वार्षीक स्पेअरपार्ट खरेदीकरणेबाबत.**

**प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्तविक:-** श्री साईप्रसादालयातमध्ये वेगवेगळया मशिनरी कार्यान्वित आहेत. सदर मशिनरी कार्यान्वित राहणेसाठी मशिनरी दुरुस्ती व देखभाल कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी सर्व्हिसींग करावे लागतात. त्यासाठी नेहमी लागणारे किरकोळ स्पेअरपार्ट स्टॉकमध्ये ठेवावे लागतात. बरेचसे स्पेअरपार्ट स्थानिक मार्केटमध्ये उपलब्ध नसतात. त्यामुळे दैनंदिन कामामध्ये अडचण निर्माण होते. प्रसादालयातील आवश्यकतेनुसार वेळोवेळी स्पेअरपार्ट उपलब्ध व्हावेत यासाठी सोबतच्या यादीप्रमाणे स्पेअरपार्ट वार्षिक खरेदी करणे आवश्यक आहे. स्पेअरपार्टचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| अ. नं. | स्पेअरपार्टचे नाव | साईज | कंपनी | मागणी संख्या | अंदाजे नग किमंत | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बॉल बेअरींग | ६२०२ | SKF | २४ | ९०.०० | २१६०.०० |
| | | ६२०४ | SKF | १०० | १९०.०० | १९०००.०० |
| | | ६२०५ | SKF | २४ | २४०.०० | ५७६०.०० |
| | | ६२०६ | SKF | १२ | २९०.०० | ३४८०.०० |
| | | ६२०८ | SKF | ०६ | ३५०.०० | २१००.०० |
| | | ६२०९ | SKF | ०६ | ४५०.०० | २७००.०० |
| | | ६३०१ | SKF | १२ | २६०.०० | ३१२०.०० |
| | | ६३०२ | SKF | १२ | २८०.०० | ३३६०.०० |
| | | ६३०४ | SKF | २४ | ३१०.०० | ७४४०.०० |
| | | ६३०५ | SKF | २४ | ३५०.०० | ८४००.०० |
| | | ६३०७ | SKF | ६ | ६००.०० | ३६००.०० |
| | | ६३१० | SKF | ६ | ९००.०० | ५४००.०० |
| | | २३०९ ETN9 | SKF | २ | ४०००.०० | ८०००.०० |
| | | ६००४ | SKF | ०६ | ६००.०० | ३६००.०० |
| | | RLS १३ | SKF | ०६ | ६००.०० | ३६००.०० |
| २ | पेडस्टल बेअरींग | P-२०४ | | १२ | ७००.०० | ८४००.०० |
| | | P-२०५ | | ०६ | ७३०.०० | ४३८०.०० |
| | | P-२०७ | | १२ | ११००.०० | १३२००.०० |
| | | P-२०९ | | ०६ | १३००.०० | ७८००.०० |
| | | P-५०७ | | ०४ | १०००.०० | ४०००.०० |
| ३. | सॅलॅक कंपाऊड | ५० gm | | २० | ३५.०० | ७००.०० |
| ४ | एम सील | ५० gm | | १२ | ३०.०० | ३६०.०० |
| ५ | एमरी क्लॉथ रफ | १२"x १२" | | ३६ | १५.०० | ५४०.०० |
| ७ | चॅम्पीयन मेक पॅकींग शिट | ३ mm | Champion | १० kg | २५०.०० | २५००.०० |
| ८ | व्हॉल्व ग्राईंडींग पेस्ट | २०० ml | Emerton/ other | ३ | १००.०० | ३००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | स्टे. स्टील वेल्डींग रॉड | ३.१५x३५०mm | Advani | २५ kg | १०००.०० | २५०००.०० |
| १० | एम.एस.वेल्डींग रॉड | ३.२०x४५०mm | Advani | १०० kg | २५०.०० | २५०००.०० |
| ११ | कास्टींग वेल्डींग रॉड | ३.२०x३००mm | Advani | ५ kg | ५००.०० | २५००.०० |
| १२ | ऑईल सील | ६०-११०-१३ | | ०६ | २००.०० | १२००.०० |
| | | ३०-५२-७ | | ०६ | १२०.०० | ७२०.०० |
| | | ३०-५२-१० | | ०६ | १६०.०० | ९६०.०० |
| १३ | स्टार रबर कपलींग (स्पायडर) | ९५ नं. | | २४ | ६०.०० | १४४०.०० |
| १४ | ग्राईडींग व्हिल | ४” | | २४ | ८०.०० | १९२०.०० |
| १५ | ग्राईडीग कटींग व्हिल | ४” | | २४ | ४०.०० | ९६०.०० |
| १६ | ग्राईडीग कटींग व्हिल | १२” | | १२ | १२०.०० | १४४०.०० |
| १७ | स्टे. स्टील स्क्वेअर पाईप SS ३०४ | २’x २’ | | २४ मी. | १०००.०० | २४०००.०० |
| १८ | रबरी होज पाईप | १’ | फेनर/डनलफ | १०० मी. | १५०.०० | १५०००.०० |
| १९ | व्हि बेल्ट | B- ४४ | फेनर/डनलफ | १२ | १२०.०० | १४४०.०० |
| | | B- ३६ | फेनर/डनलफ | १२ | १००.०० | १२००.०० |
| | | | | | **A एकुण रक्कम** | **२,२६,६८०.००** |
| | **B एल. पी. गॅस भट्टी स्पेअरपार्ट** | | | | | |
| १ | कॉपर पिगटेल ५ फुट | ३/८’ x ३/८’ | | ३६ | ४५०.०० | १६२००.०० |
| २ | फेल्झीबल सुरक्षा पाईप ५ फुट | ३/८’ x ३/८’ | | १८ | ५५०.०० | ९९००.०० |
| ३ | कॉपर पिगटेल १.५ फुट | ३/८’ x ३/८’ | | १८ | ३००.०० | ५४००.०० |
| ४ | निडल कंट्रोल व्हॉल्व | ३/८’ x ३/८’ | | ३६ | ४००.०० | १४४००.०० |
| ५ | निडल कंट्रोल व्हॉल्व | १/२’ x ३/८’ | | १२ | ५५०.०० | ६६००.०० |
| ६ | गॅस बर्नर M-७८ | | | २४ | १७००.०० | ४०८००.०० |
| ७ | टेफलॉन टेप | १०mm x२ mtr | | २०० | ४०.०० | ८०००.०० |
| ८ | रेग्युलेटर O रिंग | | | १०० | २.०० | २००.०० |
| ९ | निडल कंट्रोल व्हॉल्व O रिंग | | | २०० | २.०० | ४००.०० |
| | | | | | **B एकुण रक्कम रु.** | **१,०१,९००.००** |
| | **C ऑईल व ग्रीस** | | | | | |
| १ | इंजिन ऑईल | ४० नं. | कॅस्ट्रोल | १० लि. | ३००.०० | ३०००.०० |
| २ | गिअर ऑईल | ९० नं. | कॅस्ट्रोल | १५ लि. | २५०.०० | ३७५०.०० |
| ३ | हायड्रो कॅस्ट्रोल | ४६ नं. | कॅस्ट्रोल | १५ लि. | २१०.०० | ३१५०.०० |
| ४ | बेअरींग ग्रिस | लिथिअम | कॅस्ट्रोल | ३० किलो | २८०.०० | ८४००.०० |
| | | | | | | **१८,३००.००** |
| | | | | | **A + B + C एकुण रक्कम रु.** | **३,४६,८८०.००** |

**मागणी**:- श्री साईप्रसादालयात ऑन लाईन चक्की युनिट, आटा मळणी यंत्र, डिश वॉशिंग मशिन, स्टीम बॉयलर, थर्मिक फ्ल्युड हिटर, सोलर स्टीम कुकींग सिस्टीम्स, धान्य निवडणेचे मशिन, ग्राईडर, पोटॅटो पिलर मशिन, भाजी कटींग मशिन, रवि मशिन, राईस वॉशर मशिन, टिल्टींग वेट ग्राईडर, मिक्सर मशिन, गार्लियक पिलर मशिन, व्हेजेटेबल प्रोसेसर मशिन, आर. ओ. प्लॅन्ट, गॅस भट्ट्या, गॅस प्लॅन्ट, चपाती मशिन्स, चपाती भट्ट्या, स्टीम कुकर्स, हॅड्रोलिक पॅलेट ट्रक, फुड सर्व्हिस १२० नग ट्रॉलीज व इतर उपकरणे प्रसादालयातील प्रसाद भोजन तयार करणेसाठी अत्यंत उपयोगी व महत्वाचे आहे.

प्रसाद भोजन विनाविलंब बनविणेकामी सर्व मशिन कार्यान्वित असणे आवश्यक आहे. त्याकरीता दैनंदिन व ब्रेकडाऊन मेन्टेनंन्स कामाकरीता काही स्पेअरपार्ट व ल्युब्रीकंटची स्टॉकमध्ये असणे आवश्यक असते. उपरोक्त स्पेअरपार्ट खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी रक्कम रु. ३,४६,८८०/- + टॅक्स पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- श्री साईप्रसादालयातील मशिनरी दुरुस्ती व देखभाल साठी उपरोक्तप्रमाणे आवश्यक स्पेअरपार्ट विहीत पद्धतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी

येणाऱ्या रक्कम रु. ३,४६,८८०/- + टॅक्स पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील मशिनरींच्या दुरुस्ती व देखभालीसाठी प्रस्तावात नमुद केलेले आवश्यक स्पेअरपार्ट विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,४६,८८०/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९३** **आर.ओ. प्लँटकरिता मेंबरन्स व फिल्टर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** श्री साईप्रसादालयात भक्तांना प्रसाद भोजन घेतांना पिण्यासाठी शुद्ध पाणी (आर.ओ.) देण्यात येत आहे. त्यासाठी तासी २००० लि. क्षमतेचे दोन आर. ओ. प्लॅन्ट कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. प्लॅन्टस दररोज साधारणतः १२ तास अविरत चालु असतात. त्यापैकी एक प्लॅन्ट राजू वेगसना फाउंडेशन, हैद्राबाद यांनी देणगी दिलेला असून मेन्टेनंन्स साठी आवश्यक स्पेअरपार्टचा खर्च देणगीदार राजू वेगसना फाउंडेशन कंपनीच करत आहे. दुसरा प्लॅन्ट संस्थानने खरेदी केलेला असून ION EXCHANG कंपनीचा आहे.

संस्थानने खरेदी केलेला आर. ओ. प्लॅन्ट साठी CPA२-८०४० साईजचे पाच मेंबरन्स, ५" फिल्टर- २४ नग व इतर स्पेअरपार्टस लागतात. सध्या वापरात असलेले मेंबरन्स पासून पाण्याची गुणवत्ता खालावत आहे. यापुर्वी दिनांक ७.६.२०१३ रोजी बसविणेत आलेले होते. सध्या उन्हाळा सुरु असून साईभक्तांना पिण्यासाठी शुद्ध पाणी देणे आवश्यक आहे.

**मागणी :-** आर. ओ. प्लॅन्टची पाण्याची गुणवत्ता टिकविणेकामी नविन मेबरन्स व फिल्टर खरेदी करणे आवश्यक आहे. मेबरन्स अभावी आर. ओ. प्लॅन्ट बंद राहू नये याकरीता मेंबरन्स व इतर स्पेअरपार्टसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **नग** | **अंदाजे दर** | **एकुण किमंत.** |
|---|---|---|---|---|
| १. | CPA२-८०४० मेंबरन्स | ५ नग | ४२,०००/- | २,१०,०००.०० |
| २. | ५छ मायक्रोन कॉटन फिल्टर | २० नग | ७५०.०० | १५,०००.०० |
| ३. | अन्टीस्केलंट | ५० लि. | ३००/- | १५,०००.०० |
| ४. | सायट्रीक ॲसिड | २५ किलो | १६०/- | ४,०००.०० |
| ५. | कास्टीक सोडा | २५ किलो | २००/- | ५,०००.०० |
| ६. | रबरी रींग मेबरन्स आऊटर | ४ नग | १००/- | ४००.०० |
| ७. | ॲक्टीव्हेटेड कार्बन | १०० किलो | ९०/- | ९०००.०० |
| **एकुण रक्कम** | | | | **२,५८,४००.००** |

उपरोक्त प्रमाणे मेंबरन्स व स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. २,५८,४००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. याकामी श्री साईप्रसादालयातील सन २०१४-१५ अंदाजपत्रकात मशिनरी देखभाल करीता रक्कम रु.२५,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः-** तरी श्री साईप्रसादालयातील आर ओ. प्लन्टकरीता उपरोक्त मेंबरन्स व स्पेअरपार्ट विहित पद्धतीने दरपत्रक मागावून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २,५८,४००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील आर.ओ. प्लॅन्टकरीता प्रस्तावात नमुद केलेले मेंबरन्स व स्पेअरपार्ट विहित पद्धतीने दरपत्रक मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,५८,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९४** **श्री साईप्रसादालयात प्रसादभोजन घेणाऱ्या साईभक्तांना पिणेसाठी थंड पाणी मिळणेकरीता तसेच VVIP व विशेष भोजन कक्ष डायनिंग हॉल वातानुकुलीकरण करणेकरीता VAM सिस्टीम्स चिलींग प्लॅन्ट बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग- ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्तावना**:- श्रीसाईप्रसादालयात दररोज ४०,००० साईभक्त प्रसाद भोजन घेतात. श्री साईप्रसादालयास साईभक्तांना देण्यात येणाऱ्या प्रसादभोजन सेवेत सातत्य, गुणवत्ता व गतीमानता येणेसाठी ISO ९००१:२२००० हे गुणवत्ता मानांकन घेणेत आलेले आहे. प्रसाद भोजनामध्ये भक्तांना दोन भाजी, दाळ भात, चपाती/पुरी, बर्फी देणेत येते. प्रसाद भोजनाबरोबर पिण्यासाठी शुद्ध पाणी देणेकरीता ताशी २००० लिटर क्षमतेचे दोन आर. ओ. प्लॅन्ट बसविणेत आलेले आहे. साईभक्तांनी उन्हाळयात देणेत येत असलेले शुद्ध पाणी थंड देणेसाठी मोठया प्रमाणात वेळोवेळी सुचना केलेल्या आहेत. प्रसाद भोजनासोबत भक्तांना आर. ओ. चे थंड पाणी दिले तर भक्तांचे मोठया प्रमाणात समाधान होईल. भक्तांप्रमाणे प्रसादालयात दोन्ही शिफ्टमध्ये दैनंदिन कायम व कंत्राटी १००० कर्मचारी किचन मध्ये व डायनिंग हॉलमध्ये प्रसाद भोजन वाढणेचे काम करत असतात. त्यामुळे त्यांनाही थंड पाण्याची आवश्यकता असते. कर्मचारी संख्या जास्त असल्याने त्यांचे करीता बसविणेत आलेले वॉटर कुलरचे कमी क्षमतेमुळे पुरेशा प्रमाणात थंड पाणी मिळत नाही. त्याकरीता आर. ओ. वॉटर पाईप लाईनला स्टिम ऑपरेटेड चिलींग प्लॅन्ट बसविता येईल व त्याद्वारे उन्हाळयात सर्वांना पिण्यासाठी थंड पाणी देता येईल.

तसेच श्री साईप्रसादालयातील व्हि. व्हि. आय. पी. कक्षामध्ये अति महत्वाचे उदा. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यपाल, केंद्रीय व राज्यमंत्री, शासकिय उच्च अधिकारी व देश विदेशातील साईभक्त प्रसाद भोजन घेणेसाठी येतात. व्हि.व्हि. आय.पी डायानिंग हॉल व प्रतिक्षा कक्ष वातानुकुलित नसलेमुळे उन्हाळयात त्रास होतो. तसेच विशेष भोजन दोन्ही कक्षामध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या साईभक्तांना उष्णतेचा त्रास होत असल्याकारणाने तेथेही एअर कंडीशनींग यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भिय अन्वये श्रीसाईप्रसादालयातील VVIP. डायनिंग हॉल व प्रतिक्षा कक्षामध्ये एअर कडींशनींग करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार स्टिम ऑपरेटेड व्हॅम स्टिस्टीमद्वारे तिन्ही कक्ष व प्रतिक्षा कक्ष वातानुकुलित करता येतील.

**मागणी** :- उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईप्रसादालयामध्ये -

१) भक्तं व कर्मचाऱ्यांना उन्हाळयात थंड पाणी पिणेसाठी आर. ओ. वॉटर पाईप लाईनला चिलींग प्लॅन्ट बसविणे.

२) व त्याच चिलींग प्लॅन्टद्वारे व्हि.व्हि.आय.पी. डायनिंग कक्ष व प्रतिक्षा कक्ष तसेस विशेष भोजनाचे दोन्ही कक्ष वातानुकुलित करणे.

उपरोक्त दोन्ही गरजा स्टीम ऑपरेटेड व्हॅम सिस्टीम बसवून पुर्ण करता येतील. श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजन तयार करणेसाठी इंधन खर्चात बचत होणेसाठी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा बसविणेत आलेली आहे. सदर यंत्रणेमध्ये उन्हाळयात जास्त होणाऱ्या स्टीमचा उपरोक्त दोन्ही यंत्रणेसाठी वापर करता येईल. सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची स्टिम कमी पडल्यास बॉयलरद्वारे स्टिम पुरविता येईल. त्यामुळे नामांकित कंपनीची १४८ TR क्षमते दोन स्टिम ऑपरेटेड चिलींग यंत्रणा VAM (Vapour Absorbent Machine) विहीत पद्धतीने खरेदी करता येईल.

याकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख मात्र) पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती व हायकोर्ट, औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदरच्या खर्चास मान्यता मिळालेनंतर वृत्तपत्रात जाहीरात देऊन विहित ई-टेंडर पद्धतीने विक्री करुन प्रस्ताव मागविता येतील. याकामी श्री साईप्रसादालयातील सन २०१४-१५ या अंदाजपत्रकात मशिनरी खरेदीकामी रक्कम रु. १,५०,००,०००/- ची तरतुद करणेत आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत** :- श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन घेणाऱ्या साईभक्तांना व कर्मचाऱ्यांना उन्हाळयात थंड पाणी पिणेसाठी तसेच व्हि.व्हि.आय.पी. डायनिंग, विशेष भोजन दोन कक्ष व प्रतिक्षा कक्ष वातानुकुलित करणेकामी वृत्तपत्रात जाहीरात देऊन विहित ई-टेंडर पद्धतीने नामांकित कंपनीचे स्टिम ऑपरेटेड चिलींग प्लॅन्ट बसविणे तसेच याकामी मा. व्यवस्थापन समिती दिनांक १९.९.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७३१(१३) अन्वये प्रसादालयातील डायनिंग हॉल एअरकडींशनींग यंत्रणा उभारणेकामी सल्लागार म्हणून नियुक्त करणेत आलेले मा. डॉ. एम. जी. ताकवले (माजी कुलगुरु, कोल्हापूर विद्यापीठ) यांचे मार्गदर्शनाने प्रकल्प उभारणी पुर्ण करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्तावाबाबत समिती अध्यक्ष व सदस्य श्री साईप्रसादालयामध्ये भेट देऊन पहाणी करतील व त्यानंतर निर्णय घेतील, तोपर्यंत विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९५** **साईभक्तांचे इच्छेनुसार एका दिवसाचा एकत्रित आकार घेऊन प्रसादालयामध्ये सुरु करणेत आलेल्या मोफत भोजन योजनेमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधी तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१(१-घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं :- १)** मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६५२

**२)** मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१६१

**प्रस्ताविक:-** मा.व्यवस्थापन समिती दि.३१/०३/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२४९(४) नुसार साईभक्तांचे इच्छेनुसार स्वतःचे अथवा नातेवाईकांचे वाढदिवस, किंवा पुर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव एका दिवसाचा एकत्रित आकार भरुन प्रसादालयामध्ये भोजन घेणाऱ्या भक्तांना मोफत प्रसाद देणेकामी योजना सुरु केलेली आहे. दररोज सरासरी २०,००० भक्त प्रसादभोजन लाभ घेतील असे गृहित धरुन रक्कम रु.१,००,०००/- अगाऊ भरुन घेणेत यावी असे ठरलेले होते

जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा येथे साईभक्तांची प्रसादभोजनाची व्यवस्था केलेली होती .नविन श्री साई प्रसादालयामध्ये सुमारे ५००० व्यक्तीची बैठक व्यवस्था केलेली असल्यामुळे भविष्यात सुमारे ४०,००० पेक्षा जास्त भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतील असे गृहीत धरुन मोफत भोजन योजनेकामी स्विकारणेची रक्कम ठरविलेली आहे.

समिती दि.०६/०९/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.६८८ ने उपरोक्त संभाव्य गर्दीचे कालावधीनुसार दररोजच्या प्रसादभोजनासाठी देणगीदार भक्तांकडून खालीलप्रमाणे रक्कम स्विकारणेबाबत ठरलेले आहे.

१) फेब्रुवारी, मार्च, ऑगष्ट, सप्टेबर रु.२,००,०००/-
२) जानेवारी, जुलै, ऑक्टोबर, नोव्हेंबर रु.२,५०,०००/-
३) एप्रिल, मे, जुन, डिसेबर रु,३,००,०००/-

उपरोक्त मोफत प्रसाद भोजन योजनेची साईभक्तांना माहीती मिळावी म्हणून संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी फलक लावलेले आहेत.तथापि मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचनाफलकावरील मजकूर वाचल्यानंतर सदर योजनेमध्ये उत्सवाचे कालावधीकरीता प्रतिदिनी रु.३,००,०००/- व इतर कालावधीसाठी प्रतिदिनी रु.२,००,०००/- घेणेत यावे व त्यानुसार सुचना फलकावर मजकूर नमूद करावा असे सुचविलेले आहे.

दि.१९/०७/२००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.६५२ नुसार मोफत भोजन योजनेबाबत माहीती फलक लावल्यापासून असा अनुभव आलेला आहे की,बरेच साईभक्त सदर योजनेकरीता रु.२५,०००/ ते रु.५०,०००/- रक्कम स्विकारणेबाबत व त्याच दिवशी कुपन्स वाटप करण्याचा आग्रह धरतात.यासाठी रु.५०,०००/ पेक्षा अधिकची रक्कम मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये स्विकारणेत यावी मात्र हा मजकूर माहीतीफलकावर नमूद करु नये याबाबतच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता घेण्यात आलेली आहे. व याबाबत विविध ठिकाणी खालीलप्रमाणे फलक लावणेत आलेले आहेत.

**साईभक्तांसाठी नम्र आवाहन**

**मोफत भोजन योजना**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत सर्व साईभक्तांचे सहर्ष स्वागत.

श्री साई प्रसादालय, शिर्डी येथे साईभक्त स्वतः अथवा नातेवाईकांचा वाढदिवस किंवा पुर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव संस्थान विश्वस्तव्यवस्थेने ठरविलेली रक्कम जमा करुन श्री साईबाबांना नैवेद्य अर्पण करुन साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देण्याची व्यवस्था करणेत येत आहे. मोफत प्रसादभोजन कुपन्स रांगेतून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांना वाटप करणेत येईल.

मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे देणगी स्विकारण्यात येईल.

श्री रामनवमी,श्री गुरुपोर्णिमा,श्री पुण्यतिथी उत्सव कालावधीतील एक दिवस रु. ३,००,०००/-

वर्षातील वरील उत्सवाव्यतिरिक्त कालावधीतील एक दिवस रु.२,००,०००/-

सदर देणगी एकाच भक्ताकडून अथवा त्यापेक्षा अधिक साईभक्त मिळून एकत्रितपणे स्विकारली जाईल. दानशुर देणगीदार भक्तांची नांवे प्रसादभोजनाचे दिवशी प्रसादालयामध्ये व दर्शन रांगेमध्ये प्रसिध्द करणेत येतील. ज्या दानशुर साईभक्तांना मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा साईभक्तांनी संस्थानचे श्री साई प्रसादालय कार्यालयामध्ये संपर्क साधावा ही विनंती.

दि.१५/०२/२०१४ चे त्री-सदस्यीय समितीचीचे सभेत निर्णय क्र.१६१ अन्वये श्री रामनवमी, गरुपोर्णिमा, पुण्यतिथी या उत्सवकालावधीमध्ये संस्थान मार्फत मोफत भोजन देणार आहे. परंतू बरेच

साईभक्त उत्सव कालावधीमध्ये देणगी देण्याचा आग्रह धरतात लावलेल्या फलकात साईभक्त रु.३,००,०००/- व रु.२,००,०००/ - एका दिवसाचे मोफत भोजन म्हणून मोफत भोजन योजनेअतर्गत देणगी जमा करतात.परंतू प्रसादालया मध्ये उत्सव कालावधीमध्ये ८५००० व दैनंदिन सरासरी ४०,००० हजार साईभक्त प्रसादभोजन घेत असल्यामुळे साईभक्तांनी मोफत भोजन योजनेअंतर्गत जमा केलेली देणगी रक्कम एका दिवसासाठी अपुरी पडते.त्यामुळे मोफत भोजन योजनेत सुधारणा करणे आवश्यक वाटते.

**मागणी:-**

१) श्री रामनवमी,श्री गुरुपोर्णिमा,श्री पुण्यतिथी उत्सव कालावधीमध्ये साईभक्तांचा देणगी देण्याचा आग्रह असल्यामुळे एक किंवा अनेक भक्तांकडून एक दिवसासाठी अंदाजे.रु.८,००,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता असावी.

२) उत्सव कालावधीत साईभक्तांना मोफत भोजन योजनेअंतर्गत मोफत भोजन देणेकामी देणगी अपुरी पडल्यास अथवा देणगी जमा नसल्यास साईभक्तांची प्रसादभोजन व्यवस्था संस्थान मोफत करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्रं.१६१ नुसार करणेत यावी.

३) उत्सवाव्यतिरिक्त वर्षातील कालावधीतील एक दिवसासाठी एक किंवा अनेक भक्तांकडून किमान रु.५०,०००/-अंदाजे रु.४,००,०००/- मोफत भोजन योजनअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता असावी.

४) सुधारीत मोफत प्रसादभोजन योजनेची साईभक्तांना माहीती मिळावी म्हणून म्हणून संस्थानचे विविध ठिकाणी फलक लावणेस व वेबसाईटवर प्रसिध्द करणेस मान्यता असावी

५) श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये आराधना विधीची निमित्त सर्व गावकरी व मान्यवर यांची शाही भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी.हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये संस्थान मार्फत मोफत करण्यात येणार असल्यामुळे त्या दिवशी विशेष बैठक प्रसादभोजन कुपन्स काऊंटर आवश्यकता भासल्यास बंद ठेवणेस मान्यता असावी ही विनंती

**विभागाचा अभिप्राय/स्वष्ट मत :-**

**(१)** श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव कालावधीमध्ये साईभक्तांचा देणगी देण्याचा आग्रह असल्यामुळे एक किंवा अनेक भक्तांकडून एक दिवसासाठी अंदाजे.रु.८,००,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता असावी.

**(२)** उत्सव कालावधीत साईभक्तांना मोफत भोजन योजनेअंतर्गत मोफत भोजन देणेकामी देणगी अपुरी पडल्यास अथवा देणगी जमा नसल्यास साईभक्तांची प्रसादभोजन व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्रं.१६१ नुसार करणेत यावी.

**(३)** उत्सवाव्यतिरिक्त वर्षातील कालावधीतील एक दिवसासाठी एक किंवा अनेक भक्तांकडून किमान रु.५०,०००/- अंदाजे रु.४,००,०००/- मोफत भोजन योजनअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता असावी. सुधारीत मोफत प्रसादभोजन योजनेची साईभक्तांना माहीती मिळावी म्हणून संस्थानचे विविध ठिकाणी फलक लावणेस व वेबसाईटवर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

**(४)** श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये आराधना विधी निमित्त सर्व गावकरी व मान्यवर यांची शाही भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी. हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये संस्थान मार्फत मोफत करण्यात येणार असल्यामुळे त्या दिवशी विशेष बैठक प्रसादभोजन कुपन्स काऊंटर आवश्यकता भासल्यास बंद ठेवणेस मान्यता असावी ही विनंती.

तरी साईभक्तांचे इच्छेनुसार एका दिवसाचा एकत्रित आकार घेऊन प्रसादालयामध्ये सुरु करणेत आलेल्या मोफत भोजन योजनेमध्ये सुधारणा करणेबाबतच्या विषयांची टिपणी मा.व्यवस्थापन त्रिसमितीपुढे चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाच्या अभिप्रायामध्ये नमुद केलेल्या अ.नं.०१ ते ०४ मुद्दयांस मान्यता देण्यात आली. मात्र मोफत भोजन योजनेमध्ये साईभक्ताने किती देणगी द्यावी, यावर मर्यादा ठेवू नये, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९६** **जुन्या एल.पी. गॅस प्लॅन्ट करीता कॉम्प्रेसर व लोडींग/ अनलोडींग होज पाईप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** जुन्या गॅस टॅंकमध्ये एल. पी. गॅस अनलोड करणेकरीता दोन बी. ई. मेक ७.५ एचपी मल्टीस्टेज डिकॅटींग पंपाचा वापर करणेत येत होता. त्यापैकी एक पंप २०११ मध्ये सततच्या वापराने बॉडी व सिल मधुन लिकेज होत असल्याने रुसो अग्रो इंजिनिअरींग वर्क्स, पुणे यांचेकडून दुरुस्त करणेत आला होता. त्यानंतर नोव्हेबर २०१२ मध्ये पंप पुन्हा लिकेज झाला. गॅस टॅंकर मधून गॅस टॅंकमध्ये सुरक्षित अनलोडींग करणेकामी दोन्ही पंप कार्यान्वित असणे आवश्यक असल्याने नविन पंप खरेदी करणेस

रक्कम रु. ९०,०००/- पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ७.२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७६ नुसार मान्यता घेणेत आलेली होती. परंतु संस्थान एल. पी. गॅस सल्लागार श्री तपन सरकार यांनी इमेलद्वारे एल.पी. गॅस पंपाऐवजी एल.पी. जी. कॉम्प्रेसर खरेदी करणेची शिफारस केलेली आहे. पंपा पेक्षा कॉम्प्रेसर फायदेशीर कसे याबाबत सविस्तर माहीती इमेल मध्ये दिलेली आहे.

**मागणी :-** सध्या स्टॅन्ड बाय पंप खरेदी करुन २० वर्ष कालावधी झालेला असल्याने तसेच अनेकवेळा दुरुस्तीमुळे सदरचा पंप केव्हाही बंद होण्याची शक्यता आहे. सदरचा पंप बंद झालेस गॅस टँकर अनलोडींग करणेस अडचण येईल. यासाठी एल. पी. गॅसचे तज्ञ सल्लागार श्री तपन सरकार यांनी सुचविलेले प्रमाणे कॉप्रेसर खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच नविन व जुन्या गॅस प्लॅन्टचे एल.पी. गॅस टँकरमधून अनलोडींग करणेकामी वापरण्यात येणारे होज पाईप खराब झालेले आहे. प्रस्तुत होज पाईप दर तीन वर्षानी नविन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही गॅस प्लॅन्टकरीता दोन सेट पाईप खरेदी करणे आवश्यक आहे. प्रती सेटकरीता अंदाजे रक्कम रु. ५०,०००/- याप्रमाणे दोन सेट करीता रक्कम रु. १,००,०००/- व कॉम्प्रेसर करीता अंदाजे रक्कम रु. ७,५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. कॉप्रेसर व गॅस होज पाईपासाठी एकुण रक्कम रु. ८,५०,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख पन्नास हजार मात्र) पर्यंत खर्च अपेक्षित आहे. एल. पी. जी. क्रॉम्पेसर व गॅस अनलोडींग होज पाईपचे पुरवठादार यांचेकडुन दरपत्रक मागावून विहीत पद्धतीने कॉम्प्रेसर व होज पाईप मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत**:- तरी एल. पी. जी. अनलोडींग होज पाईप व कॉम्प्रेसर खरेदी करणेकामी जाहीरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणेस व येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८,५०,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख पन्नास हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्य) समीतीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या एल. पी. जी. अनलोडींग होज पाईप व कॉम्प्रेसर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.९७ स्टीम कुकर्स खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविक:-** श्री साईप्रसादालयात प्रतिदिन सरासरी ४० हजार साईभक्तांचे प्रसाद भोजन बनविणेत येते. प्रसाद भोजन वेळेवर बनविणेसाठी किचनमध्ये अनेक स्वरुपाचे ऑटोमायझेशन केलेले आहे. भात, दाळ शिजविणे, भाजीकरीता गरम पाणी व बटाटे उकडणे यासाठी १५० लिटर क्षमतेच्या स्टे. स्टील जॅकेटेड १० नग स्टीम कुकर्सचा वापर करणेत येतो. सदरचे कुकर्स मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांचेकडून सन २००८ मध्ये खरेदी केलेले होते. दैनंदिन वापराने व सततचे उष्णतेमुळे सदरचे स्टीम कुकर्सचे स्टे.स्टील शॉफ्ट बेन्ड व लिकेज होतात. त्युनसार जुन २०१३ मध्ये ४ नग स्टीम कुकर्स पुरवठादार व उत्पादक मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांचेकडून दुरुस्त करुन आणलेले आहे. सदरचे कुकर्सच्या दुरुस्तीसाठी प्रति नगास ८५०००/- + टॅक्स असा खर्च आलेला आहे. कुकर्स स्ट्रक्चर, फांउडेशन जुने झालेले असल्यामुळे कुकर्सचा वापर करताना व्हायब्रेशन होते.

**मागणी:-** श्री साईप्रसादालयातील स्टीम कुकर्स दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेचे कामात अत्यंत महत्वाचे आहे. सदरच्या कुकर्सचा वापर जास्त असल्याने व नेहमी उष्णता असलेमुळे सध्या कार्यान्वित असलेले सर्व कुकर्सचा मेन्टेनंन्स वाढतच आहे. तसेच सदर कुकर्स टिल्टींग मेकॅनिझम बदलणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,५३,०००/- खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु टिल्टींग मेकॅनिझममध्ये बदल करणेपक्षा कुकर्स नविन खरेदी करणे योग्य राहील. नविन अत्याधुनीक मेकॅनिझम असलेले १५० लि. क्षमतेचे नविन दहा कुकर्स खरेदी करता येतील. त्याकरीता एका कुकर्स साठी अंदाजे ३,००,०००/- या प्रमाणे १० कुकर्ससाठी रु. ३० लाख खर्च अपेक्षित आहे. प्रस्तुत खर्चास मा. व्यवस्थापन समिती व हायकोर्ट (औरंगाबाद, खंडपीठ) यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदरच्या खर्चास मान्यता मिळालेनंतर नामवंत वृत्तपत्रात जाहीरात देऊन तसेच विहित ई-टेंडर पद्धतीने दरपत्रक मागविता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- तरी साईप्रसादालयाकरीता १० नग स्टीम कुकर्स विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्य) समीतीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.९८ जादा टोन्ड गाय दुध खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०६.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार सन २०१३-१४ करीता (जुन २०१३ ते मार्च २०१४ अखेर) संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी दररोज प्रत्येकी दररोज अंदाजे २०५५ लिटर दुध पुरविणेकामी मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह दुध उत्पा.संघ लि.कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना प्रति लिटर रु.२४.९० मात्रप्रमाणे वरील संदर्भीय क्र.१ नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडील निर्णय क्र.एमएलके २०१३/प्र.क्र.९८/पदुम ८ दि.२१ नोव्हेंबर, २०१३ नुसार दि.२५.११.२०१३ रोजीपासून प्रति लिटर रु.२.०० मात्र दरवाढ झालेली आहे, त्यानुसार मा.व्य.समितीचे दि.१५.०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५५ नुसार मंजुर दर रु.२४.९० प्रति लिटर मध्ये दि.२५.११.२०१३ पासून प्रति लिटर रु.२.०० मात्र दरवाढ देण्यात आलेली आहे, त्यानुसार सध्या दोन्ही पुरवठाधारकांकडून प्रति लिटर रु.२६.९० मात्र प्रमाणे दुधाचा पुरवठा नियमितपणे चालु आहे.

मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव प्रवरा यांनी दि.१३.०३.२०१४ रोजीच्या पत्रान्वये आम्ही आपणास राजहंस दुध व राजहंस ॲक्वाचा पुरवठा करत आहोत. तरी देखील या टेंडरची मुदत दि.३१.०३.२०१४ अखेर संपत आहे. तरी देखील आपण नवीन टेंडरची निविदा लवकरात लवकर काढावी. कारण दुधाच्या व ॲक्वाच्या दरात फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तरी आम्ही आपणास या टेंडरच्या तारखेनुसार आपणास दि.३१.०३.२०१४ पर्यंतच मालाचा पुरवठा करु शकतो. आम्ही आपणास दि.०१.०४.२०१४ पासून पुढे आहे त्या दराने राजहंस दुधाचा व राजहंस ॲक्वाचा पुरवठा करु शकणार नाही. तरी देखील आपण २०१४-१५ चे टेंडर दि.३१.०३.२०१४ पर्यंत काढावे, अशी विनंती केलेली आहे.

तसेच मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा.ता.सह.दुध उत्पा.संघ मर्या., कोपरगांव यांनी त्यांचेकडील दि.१५.०३.२०१४ रोजीचे पत्रान्वये संघाने आपले समवेत दि.३१.०३.२०१४ अखेर दुध देण्याचा करार केलेला आहे, परंतू सध्या दूध उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूधाचा अतिशय मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झालेला असून, त्यामुळे या व्यवसायात स्पर्धाही खुप वाढली आहे. त्यामुळे सध्याचा दूध विक्रीचा दर हा रु.३८.०० प्रति लिटर झालेला आहे. गेल्या ३-४ महिन्यापासून दूध उत्पादकांचे खरेदी दरात वाढ झालेली आहे. तसेच वरचेवर झालेली डिझेल, पेट्रोल इंधनाची दरवाढीने वाढलेला वाहतूक खर्च, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे दूधास द्यावा लागणाऱ्या खरेदी दरातील वाढ, जनावरांचे चारा, पशुखाद्य, औषधे व तद्अनुषंगिक बाबींच्या किंमतीत झालेली दरवाढ, शिवाय दूध प्रोसेसिंगसाठी येणारा खर्च, पॉलिथीन पॅकिंगचा वाढलेला खर्च, इ.बाबींचा विचार करता बाजारपेठेत सर्वच ठिकाणी दूध दरवाढ झालेली आहे व होत आहे.

यापुर्वी आपणांकडे दूध दरवाढ द्यावी म्हणून संघाने अनेक वेळेस पत्रव्यवहार केला आहे. मात्र दूध दरवाढ केलेली नाही. संस्थानकडून दूध रु.२४.९० पैसे प्रति लिटर अदा दर आहे. यात जवळजवळ १४ ते १५ रुपये दूध दरवाढ झालेली आहे. संघ तोटा सहन करुन आपणांस दूध पुरवठा करीत आहे. तरी संघास रु.३८.०० प्रतिलिटर प्रमाणे दूधाचा दर मिळावा व त्याप्रमाणे या महिना अखेर पर्यंत दूध पुरवठा बिलाची रक्कम मिळावी. त्यानंतर दि.०१.०४.२०१४ पासून आम्हांस रु.३८.०० प्रति लिटर प्रमाणे दूध दर असल्यासच संघ आपणांस दूध पुरवठा करील, अन्यथा दूध पुरवठा बंद करण्यात येईल. कृपया सहकार्य करावे अशी विनंती केलेली आहे.

उपरोक्त दोन्ही पुरवठाधारकांनी दि.३१.०३.१४ नंतर मान्य दरामध्ये दुधाचा पुरवठा करण्यास स्पष्ट नकार दिलेला होता. त्यामुळे दोन्ही पुरवठाधारकांना दिनांक २२.०३.२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षामध्ये सकाळी ११.०० वा. चर्चेसाठी बोलावण्यात आलेले होते. त्यानुसार दि.२२.०३.२०१४ रोजी श्री गाढवे, व्यवस्थापक, गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव व श्री नालकर, श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगाव हे चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांचेशी दिनांक ०१.०४.२०१४ नंतर माहे एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर प्रसादालय किराणामाल खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे दरानेच (रु.२६.९० पैसे) दुध पुरवठा करणेबाबत मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष चर्चा झालेली आहे. सदर चर्चेत दोन्हीही पुरवठाधारकांनी दिनांक ०१.०४.२०१४ नंतर माहे एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर प्रसादालय किराणामाल खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे मंजुर दरानेच (रु.२६.९० पैसे) दुध पुरवठा करणेस तयारी दर्शविलेली आहे.

दिनांक २२.०३.२०१४ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात झालेल्या चर्चेनुसार दिनांक ०१.०४.२०१४ नंतर माहे एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर खरेदी करावयाच्या किराणामाल खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत दि.०१.०४.२०१४ दि.१८.०४.२०१४ अखेर मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगाव यांचेकडून मागील मंजुर दरानेच (रु.२६.९० पैसे) दुध खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च सन २०१४-१५ चे किराणा माल खरेदीचे अंदाजपत्रकातून केलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | खरेदी केलेले दुध लिटरमध्ये | दर प्रती लिटर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा.ता.सह.दुध उत्पा. संघ मर्या., कोपरगाव | ३१,८६४ लिटर | रु.२६.९० | रु.८,५७,१४२/- |
| ०२. | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगाव | ३६,०४१ लिटर | | रु.९,६९,५०३/- |
| | **एकुण-** | **६७,९०५ लिटर** | | **रु.१८,२६,६४५/-** |

तरी माहे एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ अखेर खरेदी करावयाच्या किराणामाल खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत दि.०१.०४.२०१४ दि.१८.०४.२०१४ अखेर मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगाव यांचेकडून सध्याचे मंजुर दरानेच (रु.२६.९० पैसे) खरेदी केलेल्या एकुण ६७,९०५ लिटर दुध खरेदीस व त्याकामी झालेल्या एकुण रु.१८,२६,६४५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.९९ माहे मे, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **मे,२०१४**अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | विजया बँक, शिर्डी | ०३/०५/२०१४ | २९,५८,५४,७५६/- |
| २) | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १३/५/२०१४ | ९,८४,३५,२३९/- |
| ३) | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १४/५/२०१४ | ९,८४,३५,२३९/- |
| ४) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १४/५/२०१४ | १८,५९,१५,०४८/- |
| ५) | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १४/५/२०१४ | ९,८४,३५,२३९/- |
| ६) | इंडियन बँक, शिर्डी | १६/५/२०१४ | ७,६५,६०,७४१/४६ |
| ७) | कॅनरा बँक, शिर्डी | २४/५/२०१४ | १८,५८,२४,१६४/- |
| ८) | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | २९/५/२०१४ | १२,०२,३९,१६५/- |
| ९) | कॅनरा बँक, शिर्डी | ३०/५/२०१४ | १२,०२,३९,१६५/- |
| १०) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मे २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम-** | **१३७,९९,३८,७५६/४६** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. १३७.९९ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपद्धतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिंग सेवा देतात. वेधानिक लेखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरून बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी

६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१३७.९९ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक, राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१३७.९९ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१०० सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन मे.कोचर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांची महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागामार्फत जा.क्र.सासंवि-२०१२/ प्र.क्र.७९/ १२ का.सोळा.दि.२८ मार्च,२०१३.अन्वये नियुक्ती करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केलेले असून, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल दि.१६/०९/२०१३ रोजी संस्थानकडे सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुद १७(२) क आणि २९(२) अनुसार सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना दि.२४ सप्टेंबर,२०१३ रोजी पाठविण्यात आली आहे. तसेच सदर अहवाल माहे डिसेंबर २०१३ मध्ये नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सुध्दा सादर झालेला आहे.

सदर अहवालात नमुद केलेले आक्षेप/त्रुटी यांचा दोष दुरुस्ती अहवाल मा. प्रधान सचिव न्याय व विधी विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठवावा लागतो, त्या अनुषंगाने दोष दुरूस्ती अहवाल तयार करण्यासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठीचे संस्थान व रुग्णालयाचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, मे.एस.एल.कुलकर्णी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, व पुर्व लेखापरिक्षक मे.अभय शास्त्री ॲण्ड असो. चार्टर्ड अकौटंट, मे.व्ही.व्ही. कोठारी, चार्टर्ड अकौटंट यांना अहवालाच्या प्रती पाठविण्यात आल्या होत्या.

उपरोक्त चारही लेखापरिक्षण संस्थाच्या मार्गदर्शनानुसार सदर दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्यात आलेला असुन, मा.प्रधान सचिव न्याय व विधी विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करता येईल. तरी त्यास अनुसरुन सदरचा दोषदुरुस्ती अहवाल मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेण्यात आली व सदर दोष दुरुस्ती अहवाल मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१०१ सिकंदराबाद येथील माहिती केंद्रावर एक जादा कुशल कंत्राटी कामगार नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम १७ (२) (ठ) नुसार श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे, कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करीलछ अशी तरतूद आहे.

वरील तरतूदीनुसार श्रींचे शिकवणूकीचा प्रसार-प्रचार व्हावा, भक्तांना संस्थान प्रकाशित पुस्तके त्वरीत उपलब्ध व्हावीत, आरती/दर्शन, निवास सेवांचे ऑनलाईन आरक्षण करणे, देणगी रक्कम देणे

सोईस्कर व्हावे या उद्देशाने संस्थानद्वारा सन २०१० मध्ये सिकंदराबाद शहरात माहिती केंद्र सुरु करण्यात आले आहे.

या माहिती केंद्रावर कार्यालय सहाय्यक म्हणून श्री चंद्रकांत माणिकचंद सुराणा यांची जा.नं.एसएसएस/ ९९७७/१७.१०.२०१० अन्वये प्रतिमहा रु.५०००/- इतक्या एकत्रित मानधनावर एका वर्षासाठी नेमणूक करण्यात आली असून, वेळोवेळी त्यांना मुदतवाढ व पगारवाढ देणेत येत असून, त्यांना सध्याचे वेतन रु.१०,०००/- प्रतिमहा आहे.त्यांचा सेवाकाळ दि.२३.०८.२०१४ अखेर आहे.

सिकंदराबाद माहिती केंद्रावर २०१२-१३ या वर्षाचा जमा-खर्च खालील प्रमाणे.

| **जमा झालेली रक्कम** | | | **खर्च झालेली रक्कम** | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | तपशिल | जमा रक्कम | अ.नं. | तपशिल | जमा रक्कम |
| ०१ | पुस्तके | ४१३१४०.०० | ०१ | नोकर पगार खर्च | १०३७४७.०० |
| ०२ | फोटो | ३५३५.०० | ०२ | ऑफिस खर्च (विद्युत, टेलीफोन, स्टेशनरी आणि इतर) | ४०९७६.०० |
| ०३ | सीडी/ डीव्हीडी | ७३९०.०० | ०३ | इमारत भाडे | ३०२४६.०० |
| ०४ | दैनंदिन | १२५९५०.०० | ०४ | सर्व्हीस चार्ज | ५०१०.०० |
| ०५ | दिनदर्शीका | ३९०००.०० | | **एकुण रुपये-** | **१,७९,९७९.००** |
| ०६ | आरती / दर्शन | ९८८४००.०० | | | |
| ०७ | देणगी | ४११३५.०० | | | |
| ०८ | रुम बुकींग | २९४२४८.०० | | | |
| | **एकुण रुपये-** | **१९,१२,७९८.००** | | | |

जमा-खर्च तपशिलाचा आढावा घेता केंद्रावर अंदाजे रु २० ते २२ लाखाची आर्थिक उलाढाल होते. दिवसात जमा होणारी रक्कम त्याच दिवसी बँकेच्या वेळेपूर्वी बॅन्केत जमा करावी लागते. याकामी १ किंवा १.३० तासाचा कालावधी लागतो. तेवढया वेळेत, तसेच सेवकाचा लंच टाईम १ तास, असे एकूण २.३० तास, एकच कर्मचारी असल्याने काऊंटर बंद ठेवावे लागते. तसेच सेवक रजेवर गेल्यावर ऑफीस पूर्णपणे बंद ठेवावे लागते. परिणामी भक्तांना सेवा मिळत नाही. गैरसोय झाल्याने भक्त तक्रार करतात.

याबाबींचा विचार करता सदर माहिती केंद्रावर एक कुशल कंत्राटी कर्मचारी नेमल्यास भक्तांची गैरसोय टाळता येईल. याकामी दरमहा रु.२८४/-x२६ या किमान वेतन दराने रु.७३८४/- वेतनासाठीचा खर्च येईल. म्हणजेच वार्षिक सरासरी १,००,०००/- आर्थिक खर्च वाढेल. तथापि सेवा काऊंटर पूर्णवेळ चालू ठेवल्याने उत्पन्नात ही त्याचप्रमाणत वाढ अपेक्षित आहे. संस्थानचे सेवानियमाप्रमाणे शैक्षणिक पात्रता असलेला तसेच स्थानिक प्रतिष्ठित भक्तांचे शिफारस पत्र असलेला व रुपये दोन लाख रकमेची बॅन्क गॅरंटी देणारा कुशल कर्मचारी लावता येईल.

सबब सिकंदराबाद माहिती केंद्रावर एक कुशल कंत्राटी कर्मचारी नेमणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१०२** **सन- २०१४ च्या दैनंदिनी/ दिनदर्शिकांचा शिल्लक साठा जास्त असल्याने विनामुल्य वितरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रतिवर्षाप्रमाणे संस्थान प्रकाशित सन २०१४ च्या दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाई करुन माफक किंमतीत भक्तांना विक्रीस उपलब्ध आहेत. छपाई संख्या, येणे संख्या, प्राप्त संख्या, विक्रीसाठा, शिल्लक साठा यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | आदेशीत छपाई संख्या | येणे छपाई संख्या | प्राप्त छपाई संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा दि.१०.०४.१४ अखेर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दैनंदिनी | २८०००० | ५०३३६ | २२९६६४ | २१५६६४ | १४००० | विक्रीचा प्रतिसाद लक्षात घेऊन येणे छपाई साठ्याचा पुरवठा न करणे बाबत कळविले आहे. |
| ०२ | रु.२०/- दिनदर्शिका | ३००००० | - | ३००००० | २५४७६६ | ४५२३४ | |
| ०३ | रु.१५/- दिनदर्शिका | ३००००० | - | ३००००० | १७३१५९ | १२६८४१ | |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडून छपाई खर्चास व विहीत पद्धतीने छपाई करुन घेणेस मान्यता मिळणेस विलंब झाल्याने छपाईची कार्यवाही उशीरा सुरु झाली. परीणामी छपाई उशीराने होऊन प्रकाशने २३.१२.२०१३ रोजी प्राप्त झाली. दरवर्षी ऑक्टोबर चे शेवटचे आठवड्यात विक्री सुरु केली जाते. दिवाळी सुटीचे गर्दीचे काळात प्रकाशने उपलब्ध नसल्याने विक्रीवर परीणाम होऊन अ.नं.१,२,३ यांचा साठा मोठ्या प्रमाणात शिल्लक राहीला. सन २०१४ चे चार महिने संपत आल्याने उक्त शिल्लक साठ्याची पूर्णपणे विक्री होणे अपेक्षीत नाही. शिल्लक साठ्याची अनुक्रमे खालीलप्रमाणे विल्हेवाट लावता येईल.

०१) कामगार दिनानिमित्त सर्व संस्थान कर्मचा-यांना (स्थायी आणि कंत्राटी कर्मचारी अंदाजे ५०००) प्रत्येकी एक दैनंदिनी सप्रेम भेट देता येईल, व उर्वरीत दैनंदिनी देणगी काऊंटरवर जे भक्त रोखीने अथवा वस्तुरुपाने रु.५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी जमा करतील त्यांना प्रत्येकी एक दैनंदिनी सप्रेम भेट देता येईल, अथवा सर्व शिल्लक दैनंदिनी देणगीदारांना सप्रेम भेट देता येतील.

सर्व दैनंदिनी सप्रेम भेट दिल्यावर एकूण रक्कम प्रकाशने खर्च (PUBLICATION EXPENSES) खाते नांवे टाकता येईल.

०२) देणगी काऊंटरवर जे भक्त रोखीने अथवा वस्तुरुपाने रु.२०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी जमा करतील त्यांना प्रत्येकी एक रु.२०/- दराची दिनदर्शिका सप्रेम भेट देता येईल सर्व दिनदर्शिका वाटप झाल्यावर एकूण रक्कम प्रकाशने खर्च (PUBLICATION EXPENSES) खाते नांवे टाकता येईल.

०३) देणगी काऊंटरवर जे भक्त रोखीने अथवा वस्तुरुपाने रु.१००० किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी जमा करतील त्यांना प्रत्येकी एक रु.१५/- दराची दिनदर्शिका सप्रेम भेट देता येईल. सर्व दिनदर्शिका वाटप झाल्यावर एकूण रक्कम प्रकाशने खर्च (PUBLICATION EXPENSES) खाते नांवे टाक ता येईल.

देणगीदार भक्तांना विनामूल्य दैनंदिनी/दिनदर्शिका मिळाल्याने समाधान वाटेल मागील वर्षीही जादा शिल्लक साठा असलेल्या दिनदर्शिकांचे मा.व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेने देणगीदार भक्तांना विनामूल्य वितरण केले होते व त्याकामी झालेला खर्च प्रकाशने (PUBLICATION EXPENSES) खाते नांवे टाकण्यात आला होता.

सबब जादा शिल्लक साठ्याची विल्हेवाट लावणेकामी प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारा खर्च प्रकाशने खर्च (PUBLICATION EXPENSES) खाते नांवे टाकणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यता आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०३** **संस्थानव्दारा श्री साईबाबांच्या मूर्ती व फोटो फ्रेम विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** भक्तांना श्री साईबाबांचे जीवन चरित्र, आरत्या, स्तोत्रे इत्यादि संस्थान प्रकाशने माफक दरात व सुलभपणे उपलब्ध व्हावे म्हणून संस्थानद्वारा ४ ठिकाणी विक्री स्टॉल सुरु करण्यात आले आहेत. त्याप्रमाणेच भक्तांना चांगल्या प्रतीच्या मूर्ती व फोटोफ्रेम सहजसुलभ व माफक किंमतीत उपलब्ध व्हावे म्हणून श्रीसाईकॉम्प्लेक्स मध्ये असलेल्या गाळयात भक्तांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर श्री साईबाबांचे पाच प्रकारचे फोटो व पाच प्रकारच्या मूर्ती विक्रीसाठी ठेवणेत याव्यात. संस्थानमार्फत साईबाबांची मूर्ती उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव प्रकाशने विभागामार्फत मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे निर्देश संदर्भीय बैठकीत देणेत आले आहेत.

जगभरातून प्रतिवर्षी लाखो भक्त श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिरडीत येत असतात त्यातील बरेचसे भक्त पूजा/अर्चेसाठी श्रींची मूर्ती अथवा फोटोफ्रेम खरेदी करतात. शिरडी शहरात श्रींचे मूर्ती व फोटोफ्रेम विक्रीची अनेक दुकाने असून त्यात विविध आकारातील मार्बल पावडर, मार्बल, पितळी व पंचधातूच्या (ब्रॉंन्झ) मूर्ती व वेगवेगळ्या डिझायन्स असलेल्या फोटोफ्रेम विक्रीस उपलब्ध आहेत. मूर्तीमध्ये मार्बलच्या प्रकारानुसार व फोटोफ्रेम मध्ये डिझायन्स चे प्रकारानुसार विविध जास्त-कमी दराने साहित्याची विक्री होते.

शिरडी शहरातील दुकानात मिळणा-या मार्बल मूर्त्या ह्या ओरीजीनल मार्बलच्या नसून मार्बल पावडरच्या असतात. ओरीजीनल मार्बलच्या मूर्त्या जयपूर येथे उपलब्ध होतात व त्यांची किंमतही खूप जास्त असते. संस्थानने मूर्ती विक्रीचे ठरविलेस ओरीजीनल मार्बलच्याच मूर्ती विक्रीस ठेवाव्या लागतील. बाजारातील मूर्तीचे दर व संस्थानचे मूर्तीचे दर यात खूपच तफावत दिसेल, शिवाय मार्बल मूर्ती हाताळतांना मूर्तीचा एखादा अवयव तुटला तर ती मूर्ती टाकून द्यावी लागते त्यामुळे आर्थीक नुकसान होते. खाजगी दुकानदार अतिरिक्त जादा किंमत आकारुन असा तोटा भरुन काढतात. म्हणून मार्बल

मूर्तीऐवजी पितळी मूर्ती व ब्रॉन्झ (पंचधातू) मूर्ती विक्रीस ठेवाव्यात असे वाटते. त्यामुळे मूर्ती हाताळण्यात होणारे आर्थीक नुकसान टाळता येईल. तसेच खाजगी दुकानदारांचे किंमतीचे तुलनेने माफक दरात मूर्तीची विक्री करता येईल.

संस्थानचे बुकस्टॉलवर खालील आकारातील फोटोफ्रेम विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.नं. | तपशिल | साईज | विक्री किंमत | शिल्लक साठा | दरमहा सरासरी विक्री नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मूर्ती फोटो रंगीत | १३"x१३" | ५३०/- | ४११ | १०० |
| ०२ | श्री साईबाबा मूर्ती फोटो रंगीत | १२"x१७" | ४००/- | ३८८२ | २०० |
| ०३ | श्री साईबाबा मूर्ती फोटो रंगीत | ८"x११" | २८५/- | ४५१५ | ४० |
| ०४ | श्री साईबाबा मूर्ती फोटो रंगीत (स्टॅन्डी) | ५"x७" | १७५/- | ४८६४ | २०० |
| ०५ | श्री साईबाबा मूर्ती फोटो रंगीत (स्टॅन्डी) | २"x३" | ४०/- | ३२८३ | ५०० |

खाजगी दुकानात विविध आकर्षक फ्रेम व साईज तसेच श्री साईबाबांचे अनेक प्रकारचे फोटोफ्रेम उपलब्ध असल्याने संस्थानचे बुकस्टॉलवर फोटो विक्रीस विशेष प्रतिसाद नसतो.

वरील सर्व बार्बीचा विचार करुन प्रायोगिक तत्वावर मार्बल मूर्ती ऐवजी पितळी व पंचधातूच्या (ब्रॉन्झ) मूर्ती विक्रीस ठेवणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०४ श्रींचे आरतीचे वेळी साईभक्त उभे राहणेचे व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरामध्ये दैनंदिन श्रींचे आरतीसाठी काही महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्तींना श्रींचे समाधी चौथऱ्याचे समोर खांबांजवळ पुढील मोकळया जागेत उभे करण्यात येते. तसेच त्यामध्ये गावकऱ्यांचा समावेश असतो. विशेषतः गुरुवारी गावकऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात असते. साईभक्तांचा समाधीचे जास्तीत जास्त जवळ उभे राहण्याचा कल असतो. पुजारी श्रींचे समाधी व मुर्तीचे समोर उभे राहुन आरती ओवाळत असतात. समाधी व मुर्तीस आरती ओवाळतात म्हणजेच आरती ओवाळण्यासाठी समोर उभे असलेले पुजारी यांचे समांतर रेषेतच आरती ओवाळण्यात येते.समांतररेषेच्या पुढील भक्तास, गावकऱ्यास, V.I.P., V.V.I.P. पासधारकास श्री साईबाबांचे समवेत ओवाळण्यात येते असे आहे.त्या समांतर रेषेच्या पुढील भागात म्हणजे श्रींच्या पादुकांचे दक्षिण बाजूचे मोकळया जागेत तसेच श्रींचे समाधीचे उत्तरेकडील मोकळया जागेत उभे असणाऱ्या साईभक्तांना सुद्धा पुजारी आरती ओवाळतात, पुजाऱ्यांचे समांतर रेषेच्या पुढे भक्त, गावकरी, V.I.P., V.V.I.P. पासधारक उभे राहिल्यास ते श्रींच्या बरोबरीचे असल्याचे जाणवते. करीता आरती ओवाळणारे पुजारी यांचे समांतर रेषेच्या पश्चिमेस, दक्षिण व उत्तर बाजुकडील मोकळया जागेत दोन्ही बाजुकडून श्री साईभक्त V.I.P., V.V.I.P. पासधारक, गावकरी असतील त्यांना पुजारी उभे असतात त्यांचे समांतर रेषेच्या पुढे उभे न करता त्यांना चांदीचे दोन्हीही खांब व त्यापाठीमागील मोकळया जागेत, जादा प्रमाणात मोकळी ठेवून त्या जागेत V.I.P., V.V.I.P. पासधारक, गावकरी जे आरतीसाठी उभे राहतील त्यांना ओवाळणाऱ्या पुजाऱ्याचे समांतर रेषेच्या पुढे जाता येणार नाही असे उभे करता येईल तसे करण्यास मान्यता मिळणेस विनंती आहे. त्याप्रमाणे संरक्षण विभागामार्फत कार्यवाही करणेत येईल. तरी उपरोक्त विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे आरतीचे वेळी साईभक्त उभे राहणेचे व्यवस्थेबाबत त्रिसदस्य समितीचे मा.अध्यक्ष व मा.सदस्य हे समक्ष पहाणी करुन निर्णय घेतील. तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.१०५ श्री साईबाबा संस्थानचे तिन्ही उत्सवाचे कालावधीत श्रींचे मूती व समाधीचे वस्त्र स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रत्येक दिवशी श्रींचे मुर्ती व समाधीस काकड आरती, मध्यान्ह आरती, तसेच धुपारतीचे अगोदर देणगी दाखल नवीन वस्त्र वापरण्यात येते. ज्या साईभक्तांची साईबाबांना वस्त्र अर्पण करण्याची इच्छा असते, असे साईभक्त त्यांना वस्त्र द्यावयाची तारीख मंदिर विभागामार्फत निश्चित करुन सदरचे वस्त्र देणगी काऊंटरला देगणी पावती करुन जमा करतात व त्याबाबतची कल्पना मंदिर विभागास देतात. त्यानुसार देणगी काऊंटरवरुन सदरचे वस्त्र मंदिर विभागात आणले जाते. सदर वस्त्रांची नोंद मंदिर विभागाकडील कापड नोंद रजिष्टरमध्ये घेऊन भक्तांचे नोंद केलेल्या तारखेच्या आरतीस ते वस्त्र परिधान केले जाते. त्यानंतर पुन्हा ते वस्त्र लेखाशाखेचे कापड कोठी विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी जमा करण्यात येते व त्याबाबतची नोंद कापड नोंद रजिस्टरला घेण्यात येते.

मंदिरातील तारखेच्या उपलब्धतेनुसार श्रींना दैनंदिन प्रत्येक आरतीला वस्त्र अर्पण करणारे भक्तांना वस्त्र अर्पण करण्याची संधी मिळते. परंतु, संस्थानचे श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी

उत्सवाचे कालावधीत बऱ्याच साईभक्तांना श्रींना वस्त्र परिधान करण्यासाठी इच्छा असते. त्यांना संधी न मिळाल्याने ते नाराज होतात. त्यामुळे नेमके कोणत्या साईभक्तांना उत्सव कालावधीत श्रींना परिधान करणेसाठी वस्त्र देणगी देण्याची संधी द्यावी याबाबत प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे उत्सवाचे कालावधीत तिनही दिवस अध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी अधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता वस्त्र देणगी देणेकरीता राखीव ठेवण्यात येते गेले ३/४ वर्षापासून असे करीत आहे. हे आत्तापर्यंत मंदिर अधिक्षक यांचेकडून ही कार्यवाही केली जात होती. परंतु, आता त्यास ठरावान्वये मान्यता असल्यास मंदिर व्यवस्थेकरिता सुकर होईल. करिता प्रत्येक उत्सवाचे तीन अथवा चार दिवसाचा उत्सव असल्यास चार दिवस संस्थानचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, स्थानिक खासदार, स्थानिक आमदार यांचेकरिता राखीव ठेवणेत यावेत. वरीलप्रमाणे राखीवमध्ये पदाधिकारी व अधिकारी यांचे शिवाय राखीवमध्ये जागा शिल्लक असल्यास साईभक्तांचा कपडा (वापरण्यात) घालण्यात येईल. याप्रमाणे मंजूरी मिळणेस विनंती आहे. तरी याबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच ज्या साईभक्तांना श्रींना वस्त्रे अर्पन करावयाची आहेत, त्यांचा दिवस व वेळ संगणकावर सॉफ्टवेअरद्वारे नोंदणी करुन घेण्यात यावी. उत्सव वगळता इतर दिवशी साईभक्तांनी श्रींना अर्पण केलेली वस्त्रे ज्या दिवशी घालणेत येतील, त्या दिवशी त्या साईभक्तास भ्रमणध्वनीवर संदेश दिला जाईल, अशा प्रकारचे सॉफ्टवेअर प्रायोगित तत्वावर साईटेक प्रकल्पांतर्गत तयार करुन घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०६** **श्रींचे आराधना विधीचे ठरावमधील दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे निर्वाणानंतर पासून ते आज तागायत श्रीसाईबाबांचा आराधना विधी दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी समाधी मंदिरावरील पहिल्या माळयावर करण्यात येत आहे.त्यासंबंधी मा.त्रिसस्यीय समितीचे दि.१५.०२.२०१४ रोजीचे सभेतील विषय न.१०, ठराव क्र.१६१ अन्वये खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

श्री साईबाबांचे निर्वाणानंतर पुर्वीपासून श्रींचा आराधना विधी समाधी मंदिराचे १ ल्या मजल्यावर फक्त यजमान (संस्थानचे सन्मा.अध्यक्ष, कार्यकारी अधिकारी) व ब्रम्हवृंद यांचे मर्यादित उपस्थीतीत करण्याची प्रथा आहे व होती. सदर विधी सार्वजनिक होऊ नये. याकरीता खालीलप्रमाणे ठरावामध्ये दुरुस्ती होणेस विनंती आहे.

| मा.त्रिसस्यीय समितीचे दि.१५.०२.२०१४ रोजीचे सभेतील विषय न.१०, नुसार झालेला ठराव क्र.१६१ | सदर विधी सार्वजनिक होऊ नये या करीता, झालेल्या ठरावामध्ये करावयाचे आवश्यक दुरुस्तीचा तपशिल |
|---|---|
| आराधना विधीचा लाभ जास्तीतजास्त भक्तांना व गावकऱ्यांना घेता यावा यासाठी आराधना विधी समाधी मंदिराच्या उत्तर दिशेला असलेल्या सभाकुंड येथे करण्यात यावा, सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast) करणेत यावे, यामुळे भक्तांची संख्या जास्त असली तरी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपूर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. आराधना विधीकरीता जे यजमान, ब्राह्मण व सुवासिनी बोलविले जातात त्यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था जुना सत्यनारायण पुजा हॉल येथे करणेत यावी. इतर सर्व गावकरी व मान्यवर यांची शाही भोजनाची व्यवस्था श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी. हॉलच्या भाजूला असलेल्या दोन हॉल्समध्ये करणेत यावी. या दिवशी साईभक्त व गावकऱ्यांसाठी श्रीसाई प्रसादालयामध्ये मोफत प्रसाद भोजन संस्थानतर्फे देण्यात यावे.<br>तसेच, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत वर्षातून केवळ तीन सण रामनवमी, गुरुपौर्णिमा व विजयादशमी हे उत्सव म्हणून साजरे केले जातात. या तीनही सणांत साईभक्तांचा व सर्व गावकऱ्यांचा समावेश असतो म्हणून त्रिसस्यीय | आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे त्याच ठिकाणी करण्यात यावा, सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast) टिव्हीवर व इतर माध्यमांना करणेत यावे, यामुळे मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपूर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदिर (बुटी वाडयास १०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली आहे त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत यावे आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) असतात ते व मंदिरातील ब्राह्मण व सुवासिनी (त्यांच्या पत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था समाधी मंदिराचे पहिल्या माळयावरील हॉल येथे करणेत यावी. त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदिर हॉलवर प्रवेश नसावा. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनींना दिले जाते तेच शाही भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी. हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे-व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावकऱ्यांसाठी श्रीसाई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे मोफत देण्यात यावे.<br>तसेच, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, |

| | |
|---|---|
| समितीची अशी ईच्छा आहे की, या तिनही सणांना गावकरी व साईबाबांच्या सर्व भक्तांना संस्थानमार्फत मोफत प्रसाद भोजन देण्यात यावे. या उत्सव कालावधीमध्ये गावकरी व भक्तांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, प्रसाद भोजन सुसुटीतपणे व चांगल्या पद्धतीने देता यावे याकरिता कोणत्या विशिष्ट प्रकारचे पदार्थ भोजनामध्ये देण्यात येतील चांगल्या पद्धतीने देता यावे याकरिता कोणत्या विशिष्ट प्रकारचे पदार्थ भोजनामध्ये देण्यात येतील, हे ठरविण्याकरीता मंदिरातील जेष्ठ प्रमुख ब्राह्मण, प्रसादालय प्रमुख व संस्थानचे संबंधीत अधिकारी तसेच गावकऱ्यांतर्फे प्रथम नगराध्यक्ष अथवा त्यांनी सुचविलेले कुठलेही नगरपंचायत सदस्य यांची एकत्रित बैठक आयोजित करुन, त्यात मोफत प्रसादभोजनाच्या पदार्थांची यादी (menu) ठरविण्यात यावा व ही मोफत प्रसादभोजन व्यवस्था रामनवमी-२०१४ या उत्सवापासून सुरु करण्यात यावी, असे ठरले. | शिर्डी मार्फत वर्षातून तीन सण रामनवमी, गुरुपौर्णिमा व विजयादशमी हे उत्सव म्हणून साजरे केले जातात. या तीनही उत्सवात साईभक्तांचा समावेश असतो म्हणून त्रिसस्यीय समितीची अशी ईच्छा आहे की, या तिनही उत्सवांना गावकरी व साईबाबांच्या सर्व भक्तांना संस्थानमार्फत मोफत प्रसाद भोजन देण्यात यावे. या उत्सव कालावधीमध्ये गावकरी व भक्तांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, प्रसाद भोजन सुसुटीतपणे व चांगल्या पद्धतीने देता यावे याकरिता कोणत्या विशिष्ट प्रकारचे पदार्थ भोजनामध्ये चांगल्या पद्धतीने देता येतील, हे ठरविण्याकरीता मा.कार्यकारी अधिकारी, प्रसादालयाचे संबंधीत प्रशासकीय अधिकारी, प्रसादालय विभाग प्रमुख तसेच गावकऱ्यांतर्फे नगराध्यक्ष किंवा त्यांचे ऐवजी त्यांनी सुचविलेली एकच व्यक्ती, (उपनगराध्यक्ष अथवा नगरपंचायत सदस्य एक व्यक्ती) यांची एकत्रित बैठक आयोजित करुन, त्यात मोफत प्रसादभोजनाच्या पदार्थांची यादी (menu) ठरविण्यात यावा व तो मेनु तीनही उत्सवात (पुण्यतिथी, रामनवमी व गुरुपौर्णिमा) देण्यात यावेत. ही मोफत प्रसादभोजन व्यवस्था रामनवमी-२०१४ या उत्सवापासून सुरु करण्यात यावी, असे ठरले. |

तरी सदर ठरावामध्ये उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे विषय नं.१०, निर्णय क्र.१६१ मध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती होणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.१०७ शिर्डी संस्थानचा पाणी पुरवठा योजनेत समावेश होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान व्यवस्थापनाने सन १९९५ मध्ये राज्य शासनाच्या सहकार्याने स्वतंत्र व परिपुर्ण अशी ३३२ MLD क्षमतेची शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केलेली आहे. या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मौजे कनकुरी, ता.राहाता शिवारात ०३ साठवण तलाव असून त्यांची साठवण क्षमता ९० MLD, २२७ MLD व १५ MLD अशी आहे. सदर योजनेच्या पाणी शुध्दीकरण केंद्राची क्षमता (WTP) ६.६ MLD (१६ तासांसाठी) आहे. सध्या या योजनेची देखभाल संस्थानतर्फे करण्यात येत आहे. सन १९९५ मध्ये साधारणत: ५० ते ७५ हजार साईभक्त उत्सवकाळात येत होते. तत्कालीन भक्तांची संख्या विचारात घेवून सदर योजनेसाठी ६० दिवस पाणी पुरेल इतकी साठवण तलावाची क्षमता ठरविण्यात आलेली होती. सध्या साईभक्तांचे वाढलेल्या गर्दीमुळे त्याची क्षमता ३० दिवसावर आलेली आहे. तसेच पाणी वापर वाढल्याने पाणी शुध्दीकरण केंद्राची क्षमता कमी पडत आहे.

संस्थानची सध्याची पाण्याची वाढती गरज व सद्य:स्थितीतील पाण्याची टंचाई लक्षात घेता संस्थानची वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणे बाबत संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३.०२.२०११ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानला वाढीव पाणीपुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा.मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजूर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे.

तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणांतून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले."

तसेच याबाबत इकडील दि.२९.०८.२०११ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त पाणी पुरवठा योजनेसाठी शासनाचे अनुदान मंजुर व्हावे व योजना लवकरात लवकर कार्यान्वित करणेबाबत विनंती करणेत आलेली आहे. तसेच त्यांचे मागणीनुसार रु. १० लक्ष, दि.२३.११.२०११ रोजी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, संगमनेर यांना आदा करणेत आलेला आहे.

सदरचे योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष मुंबई यांचे जा.क्रं.मजीप्रा/मनिसंवस कक्ष/ना-३६५/५८/२०१४, दि.१३/०१/२०१४ चे पत्र माहीतीसाठी संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरच्या पत्राप्रमाणे वाढीव

शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेची ढोबळ किंमत रु. २१५.९७ कोटी मात्र इतकी नमूद करण्यात येवून सदरचे योजनेची अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकिय मान्यता मिळणेसाठी शिफारशीसह मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भान्वये सदरचे योजनेत समावेश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी , ग्रामपंचायत, डोऱ्हाळे व ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव (को.) यांचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रान्वये त्यांनी संस्थानकरीता नव्याने होत असलेल्या योजनेत समावेश होणेसाठी विनंती केलेली आहे. सदरचे पत्रांची प्रत सोबत जोडलेली आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडुन मा.अध्यक्ष, मा.जिल्हाधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नांवे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यावर मा.अध्यक्ष साहेबांनी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवावे असे निर्देश दिलेले आहे.

तरी सदरचे पत्रांवर योग्य तो निर्णय होणेसाठी सविनय सादर

**निर्णय क्र.३९५** **या चर्चेच्या वेळी संस्थानची पाणी पुरवठा योजना शासन मान्यतेसाठी अंतीम टप्प्यात आहे, अशी माहिती सभेस देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या पाणी पुरवठा योजनेत समावेश होणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, ग्रामपंचायत- डोऱ्हाळे व ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव (को.) यांनी विनंती केलेली आहे. परंतु शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी निळवंडे धरणामध्ये पाण्याचे आरक्षण आहे काय? संस्थानचे योजनेत समावेश केल्या नंतर पाणी आणणेसाठी वापरल्या जाणाऱ्या पाईपलाईनची क्षमता किती आहे, तसेच पाणी वाटप, पाणी शुध्दीकरण, दुरुस्ती देखभाल या सर्व बाबींचा तांत्रिक दृष्टया तपशीलवार सविस्तर अहवाल मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचेकडून घेऊन, सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०८** **वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) मध्ये खालील तरतुदी आहेत.

"(क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन (घ) भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे.

(झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

(ञ) भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे."

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांकः-**

**१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७, आयत्या वेळचा विषय नं.३२**:- साठवण तलावावरील नविन फिल्टर प्लँट व पाणी पुरवठयाच्या नविन वितरकाबाबत.

**निर्णय क्रं. ६२७:-** सदरचे कामांकरीता रु. ३,२६,५६,१८७/- मात्रचे खर्चास तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मागणी केलेली २% रक्कम रुपये ६,५६,१२२/- मात्र त्यांचेकडे भरणा करणेस मान्यता देण्यात आली.

**२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०३/२००८, विषय नं. ४३**:- साठवण तलावावरील नविन फिल्टर प्लँट उभारणी व नवीन वितरकाबाबत जीवन प्राधिकरण यांनी दिलेले इस्टिमेटला मंजुरीबाबत.

**निर्णय क्रं. २५२:-** यावर सविस्तर चर्चा होवून, उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तथापि याकामी संस्थानमार्फत कन्सल्टंटची नियुक्ती करुन सदरहू काम करणेबाबत यथावकाश पुढील निर्णय घेणेत यावा, असे ठरले.

**३) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०१/२००९, विषय नं. १४**:- फिल्टर प्लँट उभारणीकामी आलेल्या निविदा सादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.

**निर्णय क्रं. १४ :-** यावर सविस्तर चर्चा होवून, मे.किर्लोस्कर कन्सल्टंटन्स् लिमिटेड पुणे यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येवून, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

**४) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०६/०३/२०१०, विषय नं. १८**:- संस्थानचे नविन पाणी पुरवठा योजनेकरीता नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.

**निर्णय क्रं. २९१ :-** यावर सविस्तर चर्चा होवून, सध्याचे निविदा रद्द करुन किर्लोस्कर कन्सल्टंट लि. पुणे यांनी नेमणूक रद्द करण्यात यावी. तसेच बारामती व शिरपुर येथील पाणी पुरवठा योजनेचे काम इन्फ्रा प्लॅन

इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे या संस्थेची संस्थानचे नविन पाणी पुरवठा योजनेकरीता नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक उभारणे, नविन जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात यावी आणि त्यांचेकडुन प्रकल्पाचे डिझाईन व निविदा तयार करुन घ्याव्यात व त्युसार नव्याने निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

**५) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/०९/२०१०, विषय नं. ४०**:- संस्थानचे पाणी पुरवठा योजनेकरीता जलशुध्दीकरण केंद्र, ओव्हर हेड टँक (ESR), जलवाहिन्या, पंपींग मशिनरी इत्यादींचे कामांबाबत.

**निर्णय क्रं.७१५ :-** आजचे सभेपुढे इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी श्री आशिष जोशी व श्री दहीवाळ यांनी विषयांकित प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण केले तसेच सर्व सदस्यांना प्रकल्पाच्या सविस्तर माहीतीबाबत तयार केलेली पुस्तीका दिली. त्यावर सविस्तर चर्चा होवून संस्थानचे पाणी पुरवठा योजनेकरीता नविन जलशुध्दीकरण केंद्र, ओव्हर हेड टँक (ESR), जलवाहिन्या, पंपींग मशिनरी इत्यादींचे कामांसाठी येणारी एकुण रु. २८.१६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात याव्यात. त्याचप्रमाणे साठवण तलावाची क्षमता आवश्यक त्या प्रमाणात वाढविणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत सविस्तर प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा, त्याचबरोबर सध्याचा कार्यान्वित असलेला प्रोजेक्ट पुरक ठेवावा, असे ठरले.

**तसेच,** इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांना सदरहू प्रकल्पासाठी सल्लासेवा पुरविणेकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% (तीन टक्के) अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी आदा करण्यात यावी, असे ठरले.

**६) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १३/०२/२०११, विषय नं. ०४**:- वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता नविन स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक (ESR), जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्रं.०४**:- यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानला वाढीव पाणीपुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा.मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजूर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे.

**तसेच** यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणांतून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.

**७) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०९/२०११, आयत्या वेळचा विषय नं. ०३**:- संस्थानकरीता पाणी पुरवठा योजनेचे सर्व्हेक्षण सुरु करणेकामी आवश्यक निधी मिळणेविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीबाबत.

**निर्णय क्रं.**७४५:- यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानकरीता पाणी पुरवठा योजनेचे सर्व्हेक्षण सुरु करणेकामी आवश्यक निधी मिळणेविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार सर्वेक्षण करण्यासाठी तूर्त सध्या रु. १० लाख मात्र इतकी रक्कम अदा करण्यात यावी असे ठरले.

**८) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२०१३, आयत्या वेळचा विषय नं. ११**:- सस्थान वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव साठवण तलाव तयार करणे, नविन स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक (ESR) जलवाहिन्या टाकणे इ. कामांबाबत.

**निर्णय क्रं. ८५१ :-** आजचे सभेत मे. इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी श्री आशिष दोषी हे उपस्थित होते. त्यांनी उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाचे सभेपुढे सादरीकरण केले.

**यावर सविस्तर चर्चा होवून,** संस्थानसाठी वाढीव पाणी पुरवठा योजना करणेकामी थेट निळवंडे धरणांतून पाणी आणण्याचे नियोजन आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, असे ठरले.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र मौजे कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे. साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र इ.ची कामे १९९२ साली पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरहु योजना ही मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची संयुक्त योजना आहे. सदरहु योजनेव्दारे मंदिर परिसर, संस्थान भक्तनिवासस्थाने, स्टाफ क्वॉर्टर्स, श्री साईप्रसादालय, मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी येथे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**सध्याचे अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करणेत आली. | सन १९९२ |

| | | |
|---|---|---|
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी. | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते. (सर्वसाधारण गर्दीचे काळात) | ४० ते ४५ दिवस. |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे सरासरी किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

कनकुरी येथे संस्थानचे तीन साठवण तलाव आहेत. सदरहु तलावांची एकुण क्षमता ही ३३२ एम.एल. इतकी आहे. सर्वसाधारण गर्दीचे काळात व पावसाळा तसेच हिवाळयात सदरहु साठवण तालावातील पाणी हे साधारणतः ४० ते ४५ दिवस पुरते. गर्दीचे काळात, उत्सव कालावधीत व उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी हे ३० ते ३५ दिवस पुरते. संस्थान साठवण तलावाचे लगतचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरी व बोअरवेलची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे साठवण तलावातील पाण्याचे गळतीचे प्रमाणही मोठया प्रमाणात वाढलेले आहे.

संस्थानचा दैनंदिन पाणी वापर मोठया प्रमाणावर वाढलेला आहे. मात्र फिल्टर प्लँट क्षमता पुर्वीचीच असल्याने शुध्द केलेल्या पाण्याचा पुरवठा कमी पडत आहे. आजची व भविष्यातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेता नविन वाढीव फिल्टर प्लँटची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे मार्गदर्शन मागितले असता, त्यांचे प्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यानुसार सन २००७-२००८ मध्ये स्केलेटन प्रोजेक्ट तयार केला. त्या योजनेचे अंदाजे रु. ३,२६,५६,१८७/- मात्रचे इस्टिमेट दिलेले होते. त्याप्रमाणे सदरचे खर्चावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मागणी केलेली २% रक्कम रु.६,५३,१२२/- मात्रची रक्कम त्यांचेकडे भरणा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ३२, निर्णय क्रमांक ६२७ नुसार मान्यता घेण्यात येवून रु.६,५३,१२२/- मात्रची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे भरणा करण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सर्व्हेनुसार व त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ चे सभेतील निर्णय क्रं. २५२ नुसार एकुण रु. ७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास तत्वतःमान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार संस्थानमार्फत कंन्सलटंटची नियुक्ती करुन काम करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत दि. ०३.०१.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करण्यात येवून किर्लोस्कर कंन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तद्नंतर दि. ०६.०३.२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत किर्लोस्कर कंन्सलटंट यांची सेवा समाप्त करुन इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांची कन्सलटंट म्हणून नेमणून करण्यात आली, तसेच तसेच उपरोक्त कामांसाठी सर्व निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविणेचे ठरले.

दि. ०५.०९.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी येणारे रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांना सल्ला सेवा पुरविण्याकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी आदा करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार दि.११/१०/२०१० रोजीचे वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे कोऱ्या निविदा विक्री करणेसाठी दि.११/१०/२०१० ते दि.३०/१०/२०१० अखेर कालावधी ठेवण्यात आला होता. सदरहू मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur.
२. Pratibha Industries Ltd; Mumbai.
३. IVRCL Infrastructure & Projects Ltd; Pune.
४. Kirloskar Brothers Ltd; Pune.
५. K J Infrastructure Projects (I) Pvt. Ltd; Pune.
६. Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ०३ ठेकेदारांनी विहित मुदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या होत्या.

| Sr. no. | Name of Contractor |
|---|---|
| 01 | Megha Engineering &Infrastructure Ltd; Hyderabad. |
| 02 | Pratibha Industries Ltd; Mumbai. |
| 03 | Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd;Kolhapur. |

उपरोक्त तीन (०३) निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर चर्चा तथा वाटाघाटीने निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेपुढे याबाबत विषय सादर करणेत आलेला होता.

यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा. मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणांतून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.

त्यानंतर मा.ना.प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांची मा.श्री. जयंतराव ससाने, अध्यक्ष व मा.श्री. शंकरराव कोल्हे, उपाध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी भेट घेवून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना करणेबाबत चर्चा केली. चर्चेत मा.मंत्री महोदय यांनी संबंधीत अधिका-यांना याबाबत सत्वर कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या. प्रधान सचिव, पाणी पुरवठा यांनी याकामी लगतच्या ग्रामपंचायत व शिर्डी संस्थान यांनी १० % वर्गणीचा ठराव जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडे द्यावा अशा सुचना दिल्या. मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दि. १३/०२/२०११ रोजी विषय नं.०४ निर्णय क्रं.०४ अन्वये सदर योजनेवर होणा-या एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% इतकी रक्कम लोकवर्गणीचे स्वरुपात शासनाकडे भरणेस मान्यता देण्यात देण्यात आली.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्‌भव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी त्यांना एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या २% इतके Preparation Charges भरावे लागणार असल्याने दि. २४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ७४५ नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार सर्व्हेक्षण करणेसाठी तूर्त सध्या रु. १० लाख मात्र रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार सदरची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आदा करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे सभेत संस्थान करीता नव्याने वाढीव पाणी पुरवठा योजना प्रकल्प हाती घेण्यास व त्यासाठी येणारे रुपये १३४.२४ कोटी मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजे खर्चास तत्वतः मान्यता मिळणेसाठी तसेच सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्लॅन इस्टीमेंटसह, डि.पी.आर. (Detailed Project Report) तयार करणेसह सर्व समावेशक प्रकल्प व्यवस्थापन सल्लासेवा (Project Management Consultancy Services) पुरविणेसाठी में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची ३% (तीन टक्के) अधिक सर्व्हीस टॅक्स यापूर्वीचेच मंजुर फी व अटी शर्तीवर नेमणूक करणेस प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदरचे सभेत मे. इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी श्री आशिष दोषी हे उपस्थित होते. त्यांनी उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाचे सभेपुढे सादरीकरण केले.

यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानसाठी वाढीव पाणी पुरवठा योजना करणेकामी थेट निळवंडे धरणांतून पाणी आणण्याचे नियोजन आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, असे ठरले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई जा.क्रं./मजीप्रा/मनिसंवस कक्ष/ना-३६५/५८/२०१४, दिनांक १३/०१/२०१४ चे पत्रानुसार मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांना वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकिय मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात आलेले आहेत. सदरच्या पत्रात वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेची निव्वळ किंमत रु. १९८१४.०५ लक्ष मात्र व ढोबळ किंमत रु. २१५९७.३२ लक्ष मात्र (९% ई.टी.पी. चार्जेस सह) इतकी नमूद करण्यात आलेली आहे.

सदर वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग संगमनेर यांचे जा.क्रं./ताशां/ ३४१/२०१४, दि. २४/०३/२०१४ चे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून सदरच्या पत्रानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पुर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविणेबाबत व याबाबत तसा संस्थानचा ठराव करुन पाठविणेबाबत कळविले आहे. सदर पत्रासोबत त्यांनी कक्ष अधिकारी (पा.पु.-०९), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्र ग्रापापु २०१४/ प्र.क्रं. १२/१४/पापु-०९, दि. ७/३/२०१४ ची प्रत जोडली आहे. सदर पत्रानुसार कक्ष अधिकारी (पा.पु.-०९) यांनी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई तसेच मुख्य अभियंता, नागरी व ग्रामीण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांना खालीलप्रमाणे कळविले आहे.

*" उपरोक्त विषयासंदर्भात संदर्भाधीन पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुतची योजना पुर्णपणे शिर्डी संस्थानासाठीच करणे योग्य राहील. यासाठी लागणारा पूर्ण निधी शिर्डी संस्थानकडुन प्राप्त करुन ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना करावी. अन्य गांवे स्वतंत्रपणे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाताळता येतील.*

*अशा प्रकारची योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करुन प्रस्ताव सादर करणे योग्य नाही. "*

वर नमुद दोन्हीही पत्र सोबत अवलोकनार्थ जोडली आहेत.

**प्रस्तावः-** संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आला असून तो ६.६० MLD हया क्षमतेचा आहे. तसेच पाईपलाईन्स हया २२ वर्ष जुन्या झालेल्या आहेत. सध्या संस्थान परिसरातील इमारतींना कनकुरी येथील साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टँक, नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती, रुग्णालये, श्री साईप्रसादालय व साईधर्मशाळा इ. करीता पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी ही कालबाहय झालेली असून सदरच्या पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास सदरची पाईपलाईन लिकेज होवून संपुर्ण संस्थान परिसराचा पाणी पुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे.

तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्धी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि.१९/१०/२०१८ या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. त्यावेळी श्रींचे दर्शनाकरीता येणारे भक्तांमध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. त्यावेळी साईभक्तांना पुरेशा प्रमाणात शुध्द पाण्याचा पूरवठा करणे गरजेचे आहे.

वरील बाबी विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत उपरोक्त वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम तातडीने सुरु होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीव न प्राधिकरण यांनी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गावे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे. या योजनेची एकुण किंमत रु. २१५.९७ कोटी इतकी आहे. त्यापैकी योजनेतील २ गावांसाठीची किंमत रु. १९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु. २१५.९७ - १९.०४ = रु. १९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर संस्थानसाठी रु. १९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

तसेच सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्‌भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वतः मान्यता प्राप्त आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये रु.१८३.९३ कोटी खर्चाचा हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आले आहे. सदर अंशदानाच्या रकमेचा समावेश योजनेच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला नाही.

वर नमुद केलेप्रमाणे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुतची योजना ही शिर्डी संस्थानकडुन पूर्ण ठेव पध्दतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबवावयाची झाल्यास कनकुरी व पिंपळवाडी या दोन गावांसाठीची किंमत वगळता संस्थानसाठी रु. १९६.९३ कोटी मात्र इतका हिस्सा येतो. तसेच लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविल्यानुसार प्रकल्प खर्चाचा प्रमाणशीर वाटा रु. १८३.९३ कोटी खर्च संस्थानने उचलणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशीर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांना प्रस्तुत योजनेचे सविस्तर सादरीकरणांसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे पाचारण करण्यात यावे असे मत आहे.

तरी विषयांकित योजनेचे सादरीकरण पाहून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, या प्रस्तावाबाबत उपरोक्त विषय नं.१०७, निर्णय क्र.३९५ मधील चर्चेनुसार कार्यवाही होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०९ सन २०१४-१५ करिता पाणी पुरवठा विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजनेचा साठवण तलाव कनकुरी येथे असून तेथे साठवण तलावातील पाणी शुध्द करुन संस्थानचे विविध इमारतींना तेथुन पाणी पुरवठा करण्यात येतो. शुध्द पाणी साठविणेसाठी संस्थान इमारतींचे प्रत्येक ठिकाणी हौद व इमारतींचे टेरेसवर आर.सी.सी. टाक्या बांधून तसेच सिंटेक्स टाक्या ठेवून पाणी साठविणेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. शुध्द

करण्यात आलेले पाणी प्रत्येक इमारतीचे हौदामध्ये साठविण्यात येवून त्यानंतर ते वापरासाठी घेणेकरीता इमारतींचे टेरेसवरील टाक्यांमध्ये साठविण्यात येते. इमारतींचे टेरेसवरील टाक्यांमधील साठविण्यात आलेले पाणी वितरीत रुममध्ये वितरीत करणेसाठी प्रत्येक इमारतींना पाईपलाईन कनेक्शन करण्यात आलेले आहेत. सदरच्या पाईपलाईन, प्लंबीग मटेरियल, इलेक्ट्रिक मटेरियल तसेच रुममध्ये बसविण्यात आलेले कॉक हे साईभक्तांचे सततचे वापराने खराब होतात. याकरीता त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागते अथवा ते बदली करावे लागतात. याकरीता आवश्यक मटेरियलची खरेदी वारंवार करण्यापेक्षा विभागासाठी आवश्यक मटेरियलची वार्षिक खरेदी करण्यात येते.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये सन २०१४-१५ करीता पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणारे साहित्य व त्यासाठी येणारे अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समिती/मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेवून सदर प्रस्ताव खरेदी विभागाकडे सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

पाणी पुरवठा विभागासाठी सन २०१४-१५ करीता दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्याची यादी तयार करण्यात आलेल्या असून सदर यादी सोबत जोडलेली आहे. यादीतील अ.नं. ०१ ते अ.नं. ४३२ नुसार साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १,३२,२३,७१०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम ही मोठया स्वरुपाची असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे सिव्हिल ॲप्लिकेशन नं.पी.आय. एल.नं.१८/ २०११ मधील सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२ वर मे.कोर्टाने दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी सदरचे साहित्य खरेदी करणेसाठी येणारे अंदाजे अपेक्षित रु.१,३२,२३,७१०/- (अक्षरी एक कोटी बत्तीस लाख तेवीस हजार सातशे दहा) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरचे साहित्य खरेदी करणेस परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.३९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.११० साईटेक प्रकल्पाअंतर्गत IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व As Number घेणेसाठी श्री.राहुल कुरकुरे, होस्ट-ईन सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** Reliance व Airtel यांची इंटरनेट सेवा घेऊन श्री साईभक्तांना online.sai.org.in या वेबसाईटवर अद्यायावत सेवा, सुविधा सुरु करण्यात आलेल्या आहेत. Reliance यांची सेवा व्यवस्थीत नसले कारणाने बीएसएनएल यांचेकडून १० एमबीपीएस ची सेवा onlinesai.org.in या वेबसाईट करीता घेण्यात आलेली असून इंटरनेट लिंक काही तांत्रिक अडचणीमुळे बंद पडल्यास, सदर वेबसाईट वरील सेवा सुविधा अखंडीतपणे चालू राहणेसाठी Airtel यांची इंटनेट लिंक ऑटोमेटीक (स्वयंचलितपणे) चालू राहणेसाठी APNIC या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number घेणेसाठीचे प्रत्यक्ष खर्चास, तसेच सदर सुविधेचे रेजिस्ट्रेशन श्री राहुल कुरकुरे यांचेमार्फत (कुठल्याही प्रकारचे मानधन न देता) करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५१ नुसार मान्यता देण्यात आली होती.

APNIC या संस्थेकडून ३२ Statice IP व AS Number घेणेसाठीचे रजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे करणेसाठी श्री राहुल कुरकुरे- होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांची कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांची सदर कामी जा.नं.एसएसएसटी/आयटी/९०६/२०१२ दिनांक ३०/०५/२०१२ रोजीचा कार्यादेशा अन्वये कन्सलटंन्ट म्हणून एक वर्षाचे कालावधीकरीता नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार २५६ Statice IP व AS Number दिनांक ०४/०९/२०१२ रोजी घेण्यात आलेला असून, दिनांक ३०/०९/२०१३ रोजी त्याची मुदत संपली होती. त्यावेळी सदर कामी भारतात सेवा देणारी कोणतीही संस्था कार्यरत नव्हती. परंतु यावर्षी IRINN नावाची कंपनीने सदर सुविधा पुरविणेस सुरवात केलेली असलेबाबत श्री कुरकुरे यांनी, सुचविले होते. त्यानुसार IRINN कडून सदर सुविधा घेणेबाबतचे मान्यतेसाठी मा. श्री. रमणी सो. यांना कळविले असता, दि. १९/०९/२०१३ व दि.२५/०९/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे मा. श्री.के.व्ही.रमणी सो. यांनी सदर सुविधा घेणेबाबत कळविलेले होते. त्यास अनुसरुन श्री राहुल कुरकुरे यांचेमार्फत दिनांक १८/०९/२०१३ व दि. २३/०९/२०१३ रोजीचे ई-मेल नुसार कार्यवाही करण्यात येऊन IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number ची दिनांक ०१/१०/२०१३

ते दिनांक ३०/०९/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी रक्कम रुपये १४,०४५/- मात्र (सर्व करांसहीत) अदा करुन नुतनिकरण करण्यात आलेले आहे.

**मागणी:** APNIC या संस्थेकडून ३२ Statice IP व AS Number घेणेसाठीचे रजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे करणेसाठी श्री राहुल कुरकुरे- होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांची कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांची सदर कामी कन्सलटंट म्हणून जा.नं.एसएसएसटी/आयटी/९०६/२०१२ दिनांक ३०/०५/२०१२ रोजीचा आदेशान्वये नेमणूक करण्यात आलेली होती. IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number ची दिनांक ०१/१०/२०१३ ते दिनांक ३०/०९/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी श्री राहुल कुरकुरे यांचेमार्फत नुतनिकरण करण्यात आलेले आहे. दिनांक १२/०३/२०१४ रोजीचे ई-मेलनुसार श्री राहुल कुरकुरे यांनी त्यांची कन्सलटंट म्हणून फेर नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार श्री राहुल कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांची कुठल्याही प्रकारचे मानधन न देता कन्सलटंट म्हणून नेमणूक करणेकामी दिनांक ०७/०४/२०१४ रोजी टिपणी सादर केली असता, मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत मा. प्रशासकीय अधिकारी सो., यांनी निर्देश दिलेले आहेत. IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number या सुविधेचे रेजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे पहाणेसाठी श्री राहुल कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांची (कुठल्याही प्रकारचे मानधन न देता) पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number ची सुविधेचे रेजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे पहाणेसाठी श्री.राहुल कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांची (कुठल्याही प्रकारचे मानधन न देता) पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, IRINN या संस्थेकडून २५६ Statice IP व AS Number ची सुविधेचे रेजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे पहाणेसाठी श्री.राहुल कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि., पूणे यांना विनामोबदला एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक देणेत यावी. मात्र त्यांनी संस्थानला फक्त सहकार्य करावे, संस्थानचे नावाचा चुकीचा वापर करु नये, अशा आशयाचे लेखी पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१११** **मोबाईल लाईव्ह दर्शन सुविधेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः कलम १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रः दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७.

प्रास्ताविक : मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७ अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तां करीता तीन वर्षा करीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार जा.नं.एसएसएसटी/ आयटी/ १२४७८/२०११ दि.०७/०३/२०११ रोजी Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Private Limited यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक २१/०३/२०१४ अखेर संपुष्टात आली असल्याने सदर सुविधा पुरविणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडू सो., यांचे मार्गदर्शनाखाली निविदा मसुदा तयार करण्यात आलेला असून दिनांक ०४/०३/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये विधी विभाग व लेखाशाखा विभागाकडे तपासून घेणेसाठी पाठविण्यात आलेली आहेत. Vistaas Digital Media Private Limited यांनी सदर सुविधा पुढील पाच वर्षासाठी मिळणेबाबत Vistaas Digital Media Private Limited यांनी दि. ०८/०३/२०१४ रोजीचा ई-मेल पत्र अन्वये विनंती केलेली आहे.

मागणी: Vistaas Digital Media Private Limited यांना श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधेबाबत देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत २१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. दिनांक ०४/०३/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये निविदा मसुद्यातील आर्थिक व कायदेशीर बाबींची तपासणी करणेसाठी तो विधी व लेखाशाखा विभागाकडे देण्यात आलेला असून तो अद्यापपर्यंत इकडील विभागास प्राप्त झालेला नाही. सदर सुविधेची संस्थान नियमाप्रमाणे निविदा मागवून उच्चत्तम निविदाधारकास कार्यादेश देणेसाठी विलंब लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे श्री साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून संदर्भ क्रं. ०१ मधील तिसऱ्या वर्षाचे रॉयल्टी दरानुसार (रक्कम रुपये १,३३,१०,०००/+ taxes) श्रींचे मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधा निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालू ठेवण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** Vistaas Digital Media Private Limited यांना श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधेबाबत देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत २१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेली असल्याने व सदर सुविधेची संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून उच्चत्तम निविदाधारकास कार्यादेश देणेसाठी विलंब लागणार असल्याने श्री साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून संदर्भ क्रं. ०१ मधील तिसऱ्या वर्षाचे रॉयल्टी दरानुसार (रक्कम रुपये १,३३,१०,०००/+ taxes) श्रींचे मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधा निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालू ठेवणेच्या मान्यतेस्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस आपली मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, Vistaas Digital Media Private Limited यांना श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधेबाबत देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.२१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेली असून सदर सुविधेचा विहित पध्दतीने निविदा मागवून उच्चत्तम निविदाधारकास कार्यादेश देणेसाठी विलंब होणार आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरिता जी उच्चतम रॉयल्टी ठरेल, तो दर Vistaas Digital Media Private Limited यांना रॉयल्टी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधा निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालू ठेवणेत यावी व अशा प्रकारे त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.११२ श्री साईभक्तांचे सुविधेसाठी LED Screen खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :** १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०५.

**प्रास्ताविक :** साईटेक प्रकल्पाअंतर्गत ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शन पास सुविधा भक्तांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आलेल्या आहेत. ऑनलाईन रुम बुकिंग व दर्शनपास सुविधेमध्ये श्री साईभक्तांना शिरडीत आलेनंतर मार्गदर्शन होणेकामी निवासासाठी असलेल्या सर्व निवासस्थानांची सध्यस्थिती एकूण खोल्या, खोल्यांचे प्रकार, त्यातील भरलेल्या व रिकाम्या खोल्या, त्यांचा सेवाआकार याची माहिती सातत्याने प्रदर्शित करणारे डिजीटल डिस्प्ले बोर्ड प्रत्येक निवासस्थानामध्ये खोली वाटप काऊंटरजवळ, संस्थानचे मंदिर परिसरात, नविन व जुने प्रसादालय, सर्व निवासस्थानचे बाहेरील भागात, बस स्टॉपसमोर तसेच जवळचे रेल्वे स्टेशन अशा आवश्यक त्या ठिकाणी इंग्रजी / मराठी भाषेत लावणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०५ नुसार ठरलेले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार बाभळेश्वर येथील पायरेन्स या संस्थेस भेट देऊन त्यांनी हवामान अंदाज व तापमानाची माहिती प्रकाशित करणेसाठी बसविणेत आलेल्या डिजीटल डिस्प्ले बोर्डबाबत प्रत्यक्ष पहाणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री साईभक्तांना शिरडीत आल्यावर रुम, दर्शन, आरती, उत्सव कालावधीतल कार्यक्रम, आदी स्वरुपाची माहिती उपलब्ध होणेकामी संस्थानचे निवासस्थाने व इतर ठिकाणी LED Screen बसविणेसाठी प्राथमिक स्वरुपात माहिती इंटरनेटव्दारे संकलीत करुन LED Screen खरेदीबाबत प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

**मागणी :** निवासस्थाने विभाग व इतर ठिकाणी श्री साईभक्तांना आवश्यक माहिती उपलब्ध होणेकामी खरेदी कराव्या लागणाऱ्या LED Screen चा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | ठिकाण | नग | अंदाजे किंमत प्रती नग | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १० MM OUTDOOR LED VIDEO WALL (Size १० Feet X ७ Feet = ७० Sq Feet ) | साईआश्रम भक्तनिवास, मंदिर परिसर, शिरडी बस स्थानक व साईनगर रेल्वे स्टेशन. | ०४ | २०,००,०००/- | ८०,००,०००/- |
| ०२ | ०६ MM INDOOR LED VIDEO WALL (Size ५ Feet X ५ Feet = २५ Sq Feet ) | साईआश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती निवासस्थान. | ०५ | १०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ०३ | संगणक संच संगणकीय साहित्य, नेटवर्क, इंटरनेट, केबल व सदर कामी लागणारे इतर आवश्यक ते साहित्य | वरील प्रत्येक ठिकाणी | - | - | २०,००,०००/- |
| | | | | एकूण अंदाजे रक्कम रुपये- | **१,५०,००,०००/- + Tax** |

उपरोक्त LED Screen वर निवासस्थानाची प्रसारीत होणारी माहितीचा डाटा साईटेक प्रकल्पाव्दारे तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीत आवश्यक ते बदल करुन प्रसारीत करता येईल, तसेच सदरचा डाटा हा फक्त इंग्रजी भाषेतच प्रसारीत करता येईल. सदर LED Screen सोबत जोडलेल्या मसुद्यानुसार फक्त निवासस्थान विभागाचीच माहिती प्रसारीत करता येईल, असे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी दिनांक २२/०४/२०१४ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे.

परंतू आयटी कमिटी अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी सो., यांनी दिनांक २३/०४/२०१४ रोजीचे ई-मेलनुसार सदर LED Screen वरती हिंदी भाषेत माहिती प्रसारीत होणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात कुठलाही संदेश तसेच संस्थानची आवश्यक ती माहिती श्री साईभक्तांचे मार्गदर्शना करीता प्रसारीत होणे आवश्यक आहे. याकामी सविस्तर रित्या LED Screen साईज, Resolution, PC Interface, Ethernet, Wi-Fi, HDMI, USB etc., तसेच याबाबत नामांकीत पुरवठाधारक कंपनीचे उदा. Sony, Samsung, Philps, Toshiba etc., LED Screen चा अभ्यास करुन त्यावर मा. श्री. के. व्ही. रमणी सो., हे अभिप्राय देणार आहे. सदर अभिप्राय प्राप्त झालेनंतर LED Screen खरेदीसाठीची निविदा प्रक्रिया इतर आवश्यक ती कार्यवाही आयटी कमिटी अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी सो., यांचे मार्गदर्शना खाली संस्थानचे विहीतपध्दतीने करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे नामांकीत कंपनीचे LED Screen ची इंटरनेटव्दारे माहिती घेतली असता सदर LED Screen खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये १,५०,००,०००/- + Tax इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :** श्री साईभक्तांना शिरडीत आल्यावर रुम, दर्शन, आरती, उत्सव कालावधीतील कार्यक्रम, आदी स्वरुपाची माहिती उपलब्ध होणेकामी संस्थानचे निवासस्थाने व इतर ठिकाणी LED Screen बसविणेसाठी संस्थानेच विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया व इतर आवश्यक कार्यवाही दिनांक २३/०४/२०१४ रोजीचे ई-मेलनुसार आयटी कमिटी अध्यक्ष मा. श्री. के. व्ही. रमणी सो., यांचे मार्गदर्शना खाली करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,००,०००/- + Tax (अक्षरी रक्कम एक कोटी पन्नास लाख+ Tax मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना शिरडीत आल्यावर रुम, दर्शन, आरती, उत्सव कालावधीतील कार्यक्रम, आदी स्वरुपाची माहिती उपलब्ध होणेकामी संस्थानचे निवासस्थाने व इतर ठिकाणी बसविणेसाठी संस्थानला LED Screen खरेदी करावयाच्या आहेत, अशा प्रकारे संस्थानच्या संकेत स्थळावर इच्छा जाहीर करावी व देणगीदाखल LED Screen मिळणेसाठी प्रयत्न करावेत.**

**जर LED Screen देणगी स्वरुपात मिळाल्या नाहीत, तर याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.११३** **साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondary Internet Link सुविधा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :** १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** : दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प उभारणीसाठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी या सुविधा online.sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदरची सेवा इंटरनेटव्दारे देणेसाठी रिलायंन्स ची लिंक प्रायमरी व एअरटेलची लिंक सेकंडरी म्हणुन घेण्यात आलेली होती. रिलायन्स व ऐअरटेल यांची सेवा व्यवस्थित मिळत नसल्यामुळे, मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी BSNL यांची १० MBPS इंटरनेट सुविधा घेऊन प्रथम कार्यवाही पूर्ण करावी व येणाऱ्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे कार्योत्तर मंजूरीसाठी सदर प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले होते. त्यानुसार BSNL यांची १० Mbps सेवा दिनांक १३/०२/२०१४ पासुन कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

BSNL यांची सेवा काही तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास सद्यस्थितीत Airtel यांच्या ५१२ Kbps या Secondary Internet Link वर उपरोक्त ऑनलाईन सुविधा अहोरात्र भक्तांच्या सेवेसाठी कार्यान्वीत राहणेकामी मदत होत आहे. परंतु सदर लिंकचे स्पिड हे अत्यंत कमी असुन सदरकामी १० Mbps ही लिंक दुसऱ्या Internet Service Provider कडुन कार्यान्वित करणे

अपेक्षित आहे. याकामी दोन ISP पुरवठा धारकांचे कोटेशन प्राप्त झाले असुन सदर पुरवठा धारकांना दि.२५/०३/२०१४ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मा. उपकार्यकारी अधिकारी सोा., यांचे समोर चर्चेकरीता बोलविले असता मा. उपकार्यकारी अधिकारी सोा., यांनी सदर Secondary Internet Link सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिले आहे.

**मागणी:** BSNL यांची सेवा काही तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास सद्यस्थितीत Airtel यांच्या ५१२ Kbps या Secondary Internet Link वापरण्यात येते उपरोक्त ऑनलाईन सुविधा अहोरात्र भक्तांच्या सेवेसाठी कार्यान्वीत राहणेकामी सदर लिंकचे स्पिड हे कमी पडत असुन, याकामी १० Mbps इंटरनेट लिंक दुसऱ्या Internet Service Provider कडुन कार्यान्वित करणेकामी संस्थानचे विहीत पध्दतीने कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट:** श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी या सुविधा online.sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदर सुविधा अहोरात्र सुरु राहणेकामी BSNL यांची सेवा काही तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास, दुसरी १० Mbps इंटरनेट लिंक कार्यान्वित करणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने ISP (Internet Service Provider) पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागविणेस सदरची लिंक घणेकामी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन सदर लिंक कार्यान्वीत करणेकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ११,५०,०००/- + टॅक्स चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.११४** **दर्शन रांगेतील मोफत लाडू प्रसादाचे वाटप करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले विनियम मधील १७(१) मधील कलमानुसार भक्तागणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी तरतुद केलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजी झालेले सभेत दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताविक-** मा.उच्च न्यायलय खंडीपीठ औरंगाबाद यांनी दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटप करण्यात मान्यता दिलेली आहे. सदरचे आदेशास अनुसरुन व व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाप्रमाणे दि.१५/०८/२०१३ पासून दर्शन रांगेतील साईभक्तांना गेट नं.३ जवळील दर्शन रांगेच्या गॅलरीजवळ लाडू प्रसादाचा साठा करुन दर्शन रांगेतील प्रत्येक साईभक्तांस ५० ग्रॅमचे २ लाडू असलेले एक पाकिट याप्रमाणे लाडू प्रसाद पाकिटे मोफत वाटप करणेची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.परंन्तु मोफत लाडू प्रसाद वाटपाचे ठिकाणी खालील प्रमाणे अडचणी येत आहेत.

१) मंदीर सुरक्षीततेच्या कारणास्तव मोफत लाडू प्रसादाचे वाटप मंदीर परिसराच्या बाहेर करावे अशी सूचना पोलीस अधिक्षक अ.नगर यांनी दि.२५/१०/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत झालेल्या मिंटिगमध्ये केली असलेचे सरंक्षण कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

२) मोफत लाडु वाटपाचे ठिकाण जुन्या भक्तानिवास इमारतीमधील दर्शन हॉलचे आत मध्ये असलेने भरलेले लाडू प्रसाद कॅरेटसची वाहन व्दारे वाहतुक गेट नं ४ मधून गेट नं.३ पर्यन्त करावी लागते या परिसरात साईभक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असते त्यामुळे वाहतुक करणे त्रासदायक आहे.

३) साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असलेन वाहनामुळे भक्तांना इजा अपघात होणेची शक्यता आहे.

४) कॅरेटस भरलेले वाहन गेट नं. ३ जवळ घ्यावे लागते व सर्व कॅरेटस तेथेच उतरवून घ्यावे लागतात. त्याच ठिकाणी भक्तांची वर्दळ असते. त्यामुळे भक्तांना हा त्रास सहन करावा लागतो वाहन आंतमध्ये आणावे लागत असलेने भक्तांना येणे जाणेसाठी अडचण निर्माण होते.

५) लाडू प्रसाद वाटपाचे ठिकाणी तळ मजल्यापासून दर्शनलाईन मधून येणारे भक्त व पहिल्या मजल्यावरील दर्शन लाईन मधून येणारे भक्तांची लाडू वाटपाचे ठिकाणी एकत्रित गर्दी होते.एकत्रित गर्दी झाल्यामुळे प्रत्येक साईभक्तास लाडू प्रसाद पाकिट देण्यात अतिशय त्रासदायक होत आहे.

६) साईभक्तांनी दर्शन रांगेत लाडूप्रसाद घेतलेनंतर या ठिकाणी एकत्रित गर्दी होत असलेने लाडू प्रसादाचे पाकिट भक्तांकडून पडून पायदळी तुडविले जातात काही भक्त त्याच ठिकाणी लाडु प्रसाद पाकिटे फोडून खातात. त्यामुळे प्रसाद व लाडू प्रसाद पाकिटांचे कागद खाली पडून फरशी चिकट होते त्यामुळे भक्त फरशीवरून पाय घसरुन पडणेची शक्यता असते.

७) दर्शन रांगेजवळील गॅलरी लहान असलेमुळे जास्त प्रमाणात लाडू प्रसाद कॅरेटची साठवणूक करता येत नाही.

८) बहिस्थ लोकांचा उपद्रव होईल या उद्देशाने व मा.अध्यक्ष सो.यांचे निर्देशानुार गेट नं. ३ जवळील दर्शन रांगेत गॅलरीचे आतमध्ये दर्शन रांगतील साईभक्तांना लाडू प्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.परंन्तु मागील ३ महिन्यांचा अनुभव पाहता बाहेरील व्यक्तीना अथवा गावकऱ्यांनी कधीही मोफत लाडू प्रसादाची मागणी केली नाही.दर्शन रांगेतील भक्तां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाहेरील व्यक्तीना मोफत लाडू प्रसाद देण्यात आलेला नाही.

९) मोफत लाडू वाटपासाठी रात्री ज्याठिकाणी लाडू प्रसादाची साठवणूक केली जाते तेथे खेळती हवा राहत नाही .त्यामुळे लाडू खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१०) शिर्डी पोलिस स्टेशन यांनी संदर्भीय क्रं.२ चे पत्रान्वये दर्शन लाईनमध्ये मोफत लाडू प्रसादाचे वाटप प्रवेशव्दार क्रं.३ जवळील जुन्या भक्तनिवास तळमजल्या वरील पॅसेजमध्ये करण्यात येते. पॅसेजमध्ये लाडू प्रसाद कॅरेटची साठवणूक केली जाते.लाडू प्रसादाची वाहतुक वाहनाव्दारे करुन वाहन आंतमध्ये आणले जाते. परंतु वाहनाची कुठल्याही प्रकारे चकिंग होत नाही लाडूचे वाटप काउन्टर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन मदीर व मंदीर परीसराचे बाहेर वाटण्यात येवू नेये ते अन्यत्र ठिकाणी हालविण्यात यावेत मोफत लाडूचे काऊन्टर हे सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक आहे त्यामुळे सदर बाब गांभियाने दयावी असे कळविले आहे.

११) दर्शन रांगेतील साईभंक्ताना मोफत लाडू प्रसादाचे कुपन देवून मोफत लाडू प्रसादाचे वाटप लाडू विक्री काऊन्टर जवळ ठेवल्यास दर्शन घेवून मंदीराचे बाहेर आलेले भक्त लाडू प्रसाद विक्री कांऊन्टर कडे लाडू प्रसाद घेणेसाठी पुन्हा रांगेत उभे राहाण्याचे स्वारस्य दाखविणार नाहीत साईभक्त दिलेले कुपन इतरत्र टाकून देतील किवा अन्य इसमांना देवून टाकतील त्यामुळे भक्तांना देण्यात येणारे कुपनचा दुरुपयोग होवून दर्शन रांगेतील साईभक्तांना लाडू प्रसादाचा लाभ न होता इतर लोक त्याचा लाभ घेतील.दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसाद वाटणेचा मुळ उद्देश सफल होणार नाही.तसेच सद्य स्थितीत मोफत लाडू प्रसाद तयार करण्यासाठी प्रत्येक माहिन्यास सरासरी दोन ते सव्वा दोन कोटी पर्यन्त खर्च येत आहे. दर्शन रांगेत भक्तांना कुपन देवून मोफत लाडू प्रसाद वाटप करणेचे ठरविल्यास दररोज १००० कुपन असलेले एक बुक याप्रमाणे ६० ते ७० बुक लागतील प्रति बुकांस छपाईसाठी रु. ५५/- प्रमाणे रु ३८५०/-एक दिवसांकरीता बुक छपाई खर्च येईल याकामी अंदाजे रु १,१५,५००/- कुपन छपाईसाठी मासिक खर्च येईल शिवाय पुरवठा धांरकाकडून वेळेत पुरवठा न झालेस भक्तांना कुपन वाटपसाठी अडचणी येतील.

**मागणी-** उपरोक्त मोफत लाडू प्रसाद वाटपाचे ठिकाणी येणाऱ्या अडचणी विचारात घेता सद्यास्थितीत-

**अ)** जुन्या पिंपळवाडी रोडवर मंदीर परीसराचे बाजुने संपुर्ण दर्शनलाईन रिलींग करणेत आली असून संपुर्ण रिलिग करुन भक्तांना उन पावसाच्या त्रास होवू नये या करीता रिलिंगवर छत करण्यात आले आहे तसेच रस्त्याकडील बाजुस लोखंडी जाळीचे रिलिंग लावण्यात आलेले आहे. त्यामुळे या दर्शन लाईनमध्ये साईभक्ता व्यतिरिक्त इतर कुणालाही अनाधिकृत प्रवेश करता येत नाही. मंदीराचे दर्शन लाईन मध्ये पूर्व व पश्चिम या दोन्ही बाजुकडून साईभक्त दर्शनासाठी रांगेत येतात.या रांगेत मध्यवर्ती ठिकाणी स्कॅनर बसविलेले असून स्कॅनरमधून भक्तांची पुर्णपणे तपासणी झालेनंतर भक्तांना आतमध्ये प्रवेश देण्यात येतो.स्कॅनरजवळ दोन्ही बाजूकडून धिम्यागतीने दर्शन रांग सतत चालू असते. स्कॅनर जवळ मोफत लाडू प्रसादाचे कॅरेटस साठविणेसाठी जागाही मोठया प्रमाणत आहे शिवाय सदरची जागा बंदिस्त असलेने बाहेरील लोकांचा उपद्रवही होणार नाही.त्यामुळे दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसाद वाटपाचा मुळ उद्देश ही साध्य होईल लाडू प्रसादाची वाहतुकही बाहेरुन करता येईल व त्यामुळे भक्तांना वाहनाचा त्रास होणार नाही.याठिकाणी मोफतलाडू प्रसादाचे वाटप करण्यास हरकत नाही.

**किंवा**

**ब)** समाधी मंदीरातुन भक्त दर्शन घेवून बाहेर पडलेनंतर गुरुस्थान मंदीर समोरील ध्यान मंदीर चे जवळील जागेमध्ये बाजुचा भाग बंदीस्त करुन लाडू प्रसादाची कॅरेटस साठवता येतील व दर्शन घेवून आलेल्या साईभक्तांना सदरचे ठिकाणी वाटप करुन लाडू प्रसाद वाटप करणेचा मुळ उद्देशही सफल होईल प्रवेशव्दार क्रं.४ मधून वाहन गुरुस्थान मंदीरापर्यन्त आणता येईल वाहनातून कॅरेटस उतरवून घेतल्यानंतर त्याच मार्गाने वाहन पुन्हा बाहेर नेता येईल त्यामुळे साईभक्तांनाही त्रास होणार नाही. या ठिकाणी मोफत लाडू वाटप करणेसाठी कुठल्याही प्रकारे अडचणी येणार नाहीत.

तरी वरीलप्रमाणे **'अ'** अथवा **'ब'** ठिकाणी साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटप करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.११५** **दुधाची प्रतवारी तपासणेसाठी मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ मधील महाराष्ट्र शासन राजपत्रातील १७ (१) मधे भक्तगणांना आवशक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणेची तरतुद करण्यात आलेली आहे.

**प्रास्तविक-** कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना नाममात्र दरामध्ये चहा,कॉफी,दुध देणेची सुविधा करण्यात आलेली आहे. याकामी गोदावरी दुध संघ,कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स,तिसगाव, संगमनेर यांचे कडून दैनंदिन लागणारे दुध खरेदी करण्यात येते.कॅन्टीन विभागाकडे दररोज २००० ते २५०० लिटर्स दुध खरेदी करण्यात येते.संबंधीत पुरवठाधारकांकडून चांगल्या प्रतीचे दुधाचा पुरवठा होणे अपेक्षीत आहे.त्या करीता दैनंदिन पुरवठाधारकांकडून पुरविण्यात येणाऱ्या दुधाची प्रतवारी तपासणे आवशक व गरजेचे आहे.त्याकरीता दुधाची प्रतवारी तपासणीसाठी मशिन खरेदी करणे जरुरीचे आहे.

मशिन खरेदीकामी गोदावरी खोरे दुध संघ,कोपरगाव यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी आमचे कडील मशिन अल्फा टेक्नो इडिया,पुणे यांचे कडून खरेदी केले असून मशिन अद्यायावत व चांगल्या प्रकारचे असलेचे सांगीतले.त्याप्रमाणे अल्फा टेक्नो इंडीया,पुणे यांचेकडे दूरध्वनी वरुन चौकशी केली असता त्यांनी मशिनबाबत माहिती ई-मेल व्दारा पाठविली आहे.त्यांचेकडे असलेल्या विविध प्रकारच्या मशिनपैकी Alfa milko Scon Ultra sonic milk analyser हे मशिन लहान आकाराचे असून हाताळण्यास योग्य आहे.तसेच हे मशिन ऑपरेट करण्याची पध्दतही सोपी असलेने दुधाची डिग्री,फॅट तपासणीकामी कुठलीही अडचण येणार नाही.त्यांनी या मशिनची किंमत रु.३९,९००/- इतकी कळविली आहे.कंपनीने आगाऊ रक्कमेची मागणी आहे.याशिवाय ट्रान्सपोर्ट,विमा,इन्स्टालेशन व इतर कराची रक्कम अतिरीक्त आदा करावी लागेल,असे कळविले आहे.

राहाता येथील श्री दंडवते हे इतर कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत त्यांचे कडे समक्ष चौकशी केली असता त्यांनी त्यांचे कंपनी मार्फत जुन्या मॉडेलमधे तांत्रीक सुधारणा करण्यात येत असून तुम्हास १० ते १५ दिवसांमधे लहान आकाराचे व ऑपरेटींग करण्यास अतिशय सोपे असलेले मशिन कंपनी कडून उपलब्ध होणार असून सदर मशिन साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागास माफक दराने देवू तसेच मशिन खरेदीकामी रु.४०,०००/- मात्र पर्यंत अपेक्षित खर्च येईल असे सांगीतले आहे.

**मागणी -**कॅन्टीन विभागाकडे दुध पुरवठाधारकांकडून मख्य कॅन्टीन व नविन भक्तनिवास कॅन्टीन अशा दोन ठिकाणी दुधाचा पुरवठा करण्यात येतो. अन्नसुरक्षा कायदा २०११ नुसार आलेल्या दुधची तपासणी नंतर वापरण्यात येणे कायद्यानुसार बंधनकारक आहे.तसेच भक्तांचे आरोग्याचे दृष्टीने हितकारक आहे. त्याकरीता दुधाची प्रतवारी तपासणीसाठी दोन मशिन खरेदी करणे जरुरीचे आहे.याकरीता रु.१,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे.सदरचा खर्च कॅन्ीन विभाग अंदाज पत्रकातील कॅन्टीन विभाग खर्चासाठी खरेदी विभागाकडे वर्ग केलेल्या रु.१३,९२,४७,०००/-रकमेतून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** कॅन्टीन विभागाकरीता उपरोक्त प्रमाणे आवशक असणारे दोन दुध तपासणी मशिन विहीत पध्दतीप्रमाणे खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबतचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागामध्ये ०२ नग दुधाची प्रतवारी तपासणी मशिन विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.११६** **चहा, कॉफी व दुधाचे दरवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ मधील महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिनियम १७ (१) मधे भक्तगणांना आवशक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद करण्यात आलेली आहे

कॅन्टीन विभागामार्फत मुख्यकॅन्टीन, भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा साईनाथ रुग्णालय व्दारावती, साईबाबा हॉस्पीटल, नविन भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास या ठिकाणी साईभक्तांना माफक दराने चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे, मिनरल वॉटर मिळणेची व्यवस्था करणेत आलेली आहे. कॅन्टीन विभागास चहा, कॉफी, दुध तयार करणेसाठी लागणारी साखर, चहा पावडर, दुध, कॉफी, विलायची इत्यादी मटेरीयलचे सन २०११-१२ सन २०१२-१३ सन २०१३-१४ सन २०१४-१५ या अर्थिक वर्षातील दर खलील प्रमाणे आहेत.

**सन-२०११-१२**

| अ.नं. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | साखर | रु.२९.२६ प्रति किलो |
| २ | चहा पावडर | रु.१९९.०० प्रति किलो |
| ३ | कॉफी | रु.१८०.०० प्रति किलो |
| ४ | दुध | रु.२२.५० प्रति लिटर |
| ५ | पेपरकप | रु.०.२४ प्रति नग |
| ६ | विलायची | रु.१२३९.०० प्रति किलो |

**सन २०१२-१३**

| अ.नं. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | साखर | रु.३७.१७ प्रति किलो |
| २ | चहा पावडर | रु.१८९.०० प्रति किलो |
| ३ | कॉफी | रु.२८५.०० प्रति किलो |
| ४ | दुध | रु.२२.९० प्रति लिटर |
| ५ | पेपरकप | रु.०.४२ प्रति नग |
| ६ | विलायची | रु.९३५.०० प्रति किलो |

**सन २०१३-१४**

| अ.नं. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | साखर | रु.३४.७६ प्रति किलो |
| २ | चहा पावडर | रु.१८५.०० प्रति किलो |
| ३ | कॉफी | रु.२८५.०० प्रति किलो |
| ४ | दुध | रु.२६.९० प्रति लिटर |
| ५ | पेपरकप | रु.०.४१ प्रति नग |
| ६ | विलायची | रु.७४९.५१ प्रति किलो |

**सन २०१४ - २०१५**

| अ.नं. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | साखर | रु.३४.५८ प्रति किलो |
| २ | चहा पावडर | रु.१७३.०० प्रति किलो |
| ३ | कॉफी | रु.२९०.०० प्रति किलो |
| ४ | दुध | रु.३४.५० प्रति लिटर |
| ५ | पेपरकप | रु.००.३७ प्रति नग |
| ६ | विलायची | रु.७४९.५१ प्रति किलो |

वरील अर्थिक वर्षामध्ये दुध व कॉफीचे दरात वाढ झालेली आहे.सन २०१४-१५ चे मटेरीयलचे दरानुसार मनुष्यबळाचा खर्च वगळता चहा,कॉफी,दुध तयार करणेसाठी खालील प्रमाणे खर्च येत आहे.

**अ) १००० कप चहा तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल**

| अ.नं | तपशिल | प्रमाण | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | साखर | ७ किलो | रु.३४.५८ प्रति किलो | रु. २४२.०६ |
| २ | चहा पावडर | १.२५० किलो | रु.१७३.०० प्रति किलो | रु. २१६.२५ |
| ३ | दुध | ५० लिटर | रु.३४.५० प्रति लिटर | रु.१,७२५.०० |
| ४ | पॉलीकप | १००० कप | रु.००.३७ प्रति नग | रु. ३७०.०० |
| ५ | विलायची | ०.१०० ग्रॅम | रु.७४९.५१ प्रति किलो | रु. ७४.९५ |
| *६ | इंधन खर्च | १००० कप | रु.००.२८ प्रति कप | रु. २८०.०० |
| | | | | रु.२,९०८.२६ |

१ कप चहासाठी येणारा खर्च रुपये २,९०८.२६/ १००० = **रु.२.९१ प्रति कप**

**ब) ६०० कप कॉफी तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल खर्च**

| अ.नं | तपशिल | प्रमाण | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | साखर | ४ किलो | रु.३४.५८ प्रति किलो | रु. १३८.३२ |
| २ | कॉफी | ००.३०० ग्रॅम | रु.२९०.०० प्रति किलो | रु. ८७.०० |
| ३ | दुध | ४० लिटर | रु.३४.५० प्रति लिटर | रु.१,३८०.०० |
| ४ | पॉलीकप | ६०० कप | रु.००.३७ प्रति नग | रु. २२२.०० |
| *६ | इंधन खर्च | ६०० कप | रु.००.२८ प्रति कप | रु. १६८.०० |
| | | | | रु.१,९९५.३२ |

१ कप कॉफीसाठी येणारा खर्च रुपये १९९५.३२ / ६०० = **रु.३.३३ प्रति कप**

**क) १००० कप दुध तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल खर्च-**

| अ.नं | तपशिल | प्रमाण | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | साखर | ७ किलो | रु.३४.५८ प्रति किलो | रु. २४२.०६ |
| २ | दुध | १०० लिटर | रु.३४.५० प्रति लिटर | रु.३,४५०.०० |
| ३ | पॉली कप | १००० कप | रु.००.३७ प्रति नग | रु. ३७०.०० |
| *४ | इंधन खर्च | १००० कप | रु.००.२८ प्रति कप | रु. २८०.०० |
| | | | एकुण- | रु.४,३४२.०६ |

१ कप दुधासाठी येणारा खर्च रुपये ४३४२.०६ / १००० = **रु.४.३४ प्रति कप**

सध्या चहा कॉफी, दुधाची खलील नाममात्र दराप्रमाणे साईभक्तांना विक्री करण्यात येत आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **एका कपाची निर्धारीत किंमत** | **सध्याची विक्रीची किंमत** | **आर्थिक तुट** |
|---|---|---|---|---|
| १ | चहा | रु.२.९१ | रु.१.०० | रु.१.९१ |
| २ | कॉफी | रु.३.३३ | रु.१.५० | रु.१.८३ |
| ३ | दुध | रु.४.३४ | रु.१.५० | रु.२.८४ |

वरील प्रमाणे चहा,कॉफी,दुधाचे विक्रीत होणारी आर्थिक तुट सहन करुन साईभक्तांना उपरोक्त सुविधा देण्यात येत आहेत.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात चहा, कॉफी, दुधाची दैनिक मासिक व वार्षिक सरासरी विक्री तसेच निर्धारीत दराप्रमाणे त्यासाठी होणारा खर्च मिळणारी रक्कम व वार्षिक होणारी तुट खालीलप्रमाणे-

**अ) चहा**

| **अ. नं.** | **तपशिल** | **कप संख्या** | **निर्धारीत किंमत रु.२.९१ प्रतिकप प्रमाणे होणारी रक्कम** | **रु.१./- प्रतिकप विक्रीप्रमाणे मिळणारी रक्कम** | **आर्थिक तूट** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दैनंदिन सरासरी विक्री | २७,६१६ | रु.८०,३६३/- | रु.२७,६१६/- | रु.५२,७४७/- |
| ०२ | मासिक सरासरी विक्री | ८,३९,९८० | रु.२४,४४,३४२/- | रु.८,३९,९८०/- | रु.१६,०४,३६२/- |
| **०३** | **वार्षिक सरासरी विक्री** | **१,००,७९,७५८** | रु.**२,९३,३२,०९६/-** | रु.**१,००,७९,७५८/-** | रु.**१,९२,५२,३३८/-** |

**ब) कॉफी**

| अ.नं | **तपशिल** | **कप संख्या** | **निर्धारीत किंमत रु.३.३३ प्रतिकप प्रमाणे होणारी रक्कम** | **रु.१.५०/- प्रतिकप विक्रीप्रमाणे मिळणारी रक्कम** | **आर्थिक तूट रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दैनंदिन सरासरी विक्री | ५,२२२ | रु. १७,३८९/- | रु. ७,८३३/- | रु. ९,५५६/- |
| ०२ | मासिक सरासरी विक्री | १,५८,८३२ | रु. ५,२८,९११/- | रु. २,३८,२४८/- | रु. २,९०,६६३/- |
| **०३** | **वार्षिक सरासरी विक्री** | **१९,०५,९८४** | रु.**६३,४६,९२७/-** | रु.**२८,५८,९७६/-** | रु.**३४,८७,९५१/-** |

**क) दुध**

| अ.नं | **तपशिल** | **कप संख्या** | **निर्धारीत किंमत रु.४.३४ प्रतिकप प्रमाणे होणारी रक्कम** | **रु.१.५०/- प्रतिकप विक्रीप्रमाणे मिळणारी रक्कम** | **आर्थिक तूट रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दैनंदिन सरासरी विक्री | ५,०४५ | रु. २१,८९५/- | रु. ७,५६८/- | रु. १४,३२७/- |
| ०२ | मासिक सरासरी विक्री | १,५३,४४७ | रु. ६,६५,९६०/- | रु. २,३०,१७१/- | रु. ४,३५,७८९/- |
| **०३** | **वार्षिक सरासरी विक्री** | **१८,४१,३६८** | रु.**७९,९१,५३७/-** | रु.**२७,६२,०५२/-** | रु.**५२,२९,४८५/-** |
| | **सन २०१३-१४ मधील चहा,कॉफी व दुधाचे विक्रीतून निर्धारीत किंमती नुसार झालेली एकूण वार्षिक आर्थिक तूट =** | | | | **रु २,७९,६९,७७४/-** |

वरीलप्रमाणे सन २०१३-१४ चे आर्थिक वर्षामध्ये रु.२,७९,६९,७७४/- (अक्षरी रपये दोन कोटी एकोणऐंशी लाख एकोणसत्तर हजार सातशे चौऱ्याहत्तर मात्र) इतकी आर्थिक तूट झालेली आहे.परंतू साईभक्तांना सेवा व सुविधा देणे हा प्रमुख उद्देश असलेने नाममात्र दरात चहा, कॉफी, दुधाची विक्री करण्यात येते.चहा रु.१ /- प्रतीकप व कॉफी, दुध विक्री १.५० प्रतिकप याप्रमाणे साईभक्तांना

विक्री करणे येत आहे. परंतू ०.५० पैशाचा वापर भक्तांकडून चलनात होत नाही. त्यामुळे चहा काऊंटरवर आर्थिक देवाण-घेवाण करणे अडचणीचे झाले आहे.प्रसंगी भक्तांशी वाद विवादही होत आहेत त्याकरीता चहा कॉफी,दुधाची पुर्णांकित रक्कमेत दरवाढ केल्यास आर्थिक देवाण-घेवाण करणे सोयीचे होईल व गर्दीचे वेळेस चहा,कॉफी घेणेसाठी भक्तांना जास्त वेळ रांगेत उभे राहावे लागणार नाही. भक्तांना आर्थिक देवाण -घेवाण कामी अडचण येणार नाही व भक्तांशी वाद विवाद होणार नाहीत. म्हणून नाममात्र दरवाढ करणेस हरकत नाही.

साईभक्तांना चहा, कॉफी, दुध देतेवेळी ०.५० पैशाचे नाणे टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण कामी अडचण येत आहे. चहा, कॉफी, दुधासाठी लागणाऱ्या मटेरीयलची दरवाढ झालेली आहे. सध्या खाजगी कॅन्टीनधारक चहा रु.५/- प्रतीकप कॉफी व दुध रु.७ / १० प्रतीकप या दराने विक्री करीत आहेत.सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सस्थानचे कॅन्टीन मधे चहा रु.१/- प्रतिकप, कॉफी व दुध प्रत्येकी रु.१.५० प्रतिकप या दराने विक्री झालेने उपरोक्त प्रमाणे रु.२,७९,६९,७७४/- (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणऐशी लाख एकोणसत्तर हजार सातशे चौऱ्याहत्तर मात्र) वार्षिक आर्थिक तूट झालेली आहे. परंतु साईभक्तांना माफक दरांत सेवा व सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची असलेने चहा प्रतिकप रु.२/-कॉफी व दुध प्रतिकप रु.३/- अशी पुर्णांकित रकमेत नाममात्र दरवाढ केल्यास वार्षिक होणारी आर्थिक तूट निम्याहून कमी होईल. सर्वसाधारणतः अंदाजे रु.१,४०,००,००० तूट भरुन निघेल. साईभक्तांनाही चांगल्याप्रकारे सेवा व सुविधा देता येईल.असे नम्र मत आहे.

तरी सध्या असलेल्या चहाची प्रतिकप किंमत रुपये १/- ऐवजी रु.२/- तसेच कॉफी व दुधाची प्रतिकप किंमत रु.१.५० ऐवजी रु.३/- अशी पुर्णांकित रकमेत नाममात्र दरवाढ करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांसाठी चहा रु.१/-, दुध व कॉफी प्रत्येकी रु.१.५० मात्र प्रती कप (१०० मि.ली.) या माफत दरामध्ये वितरण केले जात आहे. परंतू ०.५० पैशाचा वापर भक्तांकडून चलनात होत नाही. चहा, दुध, कॉफी साठी कुपन देतेवेळी ०.५० पैशांचे नाणे टंचाईमुळे आर्थिक देवाण-घेवाण करणेकामी अडचण निर्माण होते. तसेच मध्यंतरीच्या कालावधीमधील वाढत्या महागाईचा विचार करता साईभक्तांचे सुविधेकरीता कॅन्टीन विभागामार्फत चहा रु.२/-, दुध व कॉफी प्रत्येकी रु.३/- मात्र प्रती कप (१०० मि.ली.) या सवलतीच्या दराने विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.११७** **एक नवीन ॲपे रिक्षा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय विभागाकडील दि.१३/०१/२०१४ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, श्री साई प्रसादालय विभागामार्फत साईभक्तांना सकाळी १०.०० ते रात्रौ १०.०० वाजेपर्यंत मुख्य प्रसादभोजन हॉल, साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईनाथ रुग्णालय, साईबाबा हॉस्पिटल व साईआश्रम-१ येथे स्वयंसेवी प्रसादाभोजनाची व्यवस्था करणेत आलेली आहे. सदरील सेवेसाठी प्रसादालयात कामय व कंत्राटी असे एकुण ७५० कर्मचारी कार्यरत आहे. सदर कर्मचाऱ्यांकरीता ०४ वेळचा चहा तसेच प्रसादालय व्हीआयपी १ व २ मध्ये विशेष भोजनाची व्यवस्थेकरीता दहीसाठी ०२ वेळा दूध हे कॅन्टीन विभागाकडून आणावा लागतो.

सदर चहा व दूध हे प्रसादालयातील कर्मचारी स्वतःचे दोन चाकी गाडीवर आणतात. रस्त्यावरील गर्दीमुळे अथवा इतर कारणाने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच चहा गरम असल्याने तो अंगावर सांडून मोठी इजा होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्याकरीता वाहन विभागामार्फत ॲपे रिक्षा (तिन चाकी) खरेदी करुन मिळाल्यास त्याचा वापर चहा व दूध आणणेसाठी होईल तसेच गर्दीचे कालावधीत वाहन उपलब्ध न झाल्यास स्वयंसेवी भोजनकक्षासाठी प्रसादभोजन ने-आण करणेकामी उपयोग करता येईल. सदरील वाहन हे प्रसादालयाकडेच ठेवणेत येऊन प्रसादालयाकडील परवानाधारक कर्मचारी नेमून ती आवश्यकतेनुसार चालविता येईल तसेच वाहनाचा टॅक्स, विमा, दुरुस्ती देखभाल, इंधन खर्च व इतर बाबी वाहन विभागामार्फत करणेत येतील. तरी वाहन विभागामार्फत एक ॲपे रिक्षा (तिन चाकी) वाहन खरेदी करुन मिळणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रसादालय विभागाचे मागणीनुसार, एक ॲपे रिक्षा (तिन चाकी वाहन) खरेदी करावयाचे झाल्यास पियाजिओ कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करता येईल. या कामी अंदाजे रु.२,१०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख दहा हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

नवीन ॲपे रिक्षा (तिन चाकी वाहन) वाहनांची दुरुस्ती देखभाल वाहन विभागामार्फत करता येईल. तसेच वाहनाचे दैनंदिन वापर नोंदी लॉगबुक रजिस्टर, इंधन बिलाची नोंद व पुर्तता प्रसादालय विभागमार्फत करता येईल.

तरी प्रसादालय विभागाकरीता एक नवीन ॲपे रिक्षा खरेदी करणे कामी पियाजिओ कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचे कडून कोटेशन बोलाविणेस व या कामी येणाऱ्या रु.२,१०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख दहा हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरीता आवश्यक असलेली ॲपे रिक्षा देणगीदार साईभक्तांकडून देणगीदाखल मिळणेसाठी प्रयत्न करावेत. देणगीदाखल मिळत नसल्यास संस्थानमार्फत खरेदी करणेकामी पियाजिओ कंपनीचे अधिकृत डिलर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.२,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.११८** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०३.२०१४ रोजीचे सभेतील विषय नंबर ०९ निर्णय क्रमांक २६२ मध्ये "श्रीचे दर्शन व आरती पासेस देणगीमुल्य स्विकारुन जनसंपर्क कार्यालयामार्फत दिले जातात. पास देण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करत असताना याठिकाणी पासच्या रकमेपेक्षा जादा रोख रक्कम स्विकारत असलेबाबत अनेक भक्तांच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे आर्थिक बाबींच्या दृष्टीने पारदर्शकता व अचुकता येण्यासाठी साईटेक प्रकल्पांतर्गत सॉफ्टवेअरमध्ये दर्शन/आरती पास देण्याची कार्यपध्दती दोन टप्प्यात करावी. जनसंपर्क कार्यालयामध्ये पाससाठी आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करुन घेण्यात यावी व भक्तांना नोंदणी/टोकन नंबर देण्यात यावा. तो नोंदणी/टोकन नंबर संस्थानच्या कोणत्याही देणगी काऊंटरवर सांगितल्यास या ठिकाणी रोख रक्कम भरुन पावती/पास भक्तांना देण्यात यावा व शिफ्ट क्लोजिंगनंतर शिफारस करणाऱ्यास दिवसभरात किती व्यक्तींना त्यांच्या शिफरशीने पास देण्यात आले याची माहिती एसएमएसव्दारे मोबाईलवर देण्यात यावी. तसेच उपरोक्त सॉफ्टवेअर कार्यान्वित करतेवेळी देणगी काऊंटरवरील सिस्टीम काही कालावधीसाठी बंद होत असेल तर अशा वेळी साईभक्तांकडून देणगी स्विकारणेकामी पावती पुस्तक (मॅन्युअल) ठेवण्यात यावे" असे निर्देशीत केलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त ठरावास अनुसरून असे नमूद करावेसे वाटते की, दर्शन/आरतीचे पासेस देण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करत असताना या ठिकाणी पासेसच्या रकमेपेक्षा जादा रोख रक्कम स्विकारत असलेबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही तक्रारदारांचे तक्रारपत्र/लेखी सुचना अगर याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार अद्यापपर्यंत संस्थानचे जनसंपर्क कार्यालयाकडे अथवा प्रशासनाकडे आलेली नाही. तसेच संस्थानने साईभक्तांना आपल्या तक्रार/सूचना देण्यासाठी जनसंपर्क कार्यालय, मंदीर परीसर, भक्तनिवासस्थाने आदि ठिकाणी "सुचना पेटया"ठेवलेल्या आहेत या सूचना पेटयामध्येही अद्यापपर्यंत अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या नाहीत. सध्या जनसंपर्क विभागाच्या पासेस वितरण काऊटंरकडून साईटेक प्रणालीव्दारे कार्यान्वित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरव्दारे दर्शन/आरती पासेस दिले जातात. पासेसवर पास कुणाच्या शिफारशीने दिला त्याचे पद, पास धारकाचे नाव, देणगी दिलल्या देणगीदाराचे नाव आदि सविस्तर माहिती असते. यानुसार सध्या दर्शन/आरतीचे पासेस दिले जातात. यावर संबधित पास धारकाचा फोटो घेण्यात येतो. व या पासेसचे शनीगेटला चेकींग (स्कॅनींग) केले जाते. त्यामुळे सध्याची चालू असलेली ही प्रणालीच पारदर्शी आहे.

तथापी उपरोक्त संदर्भीय निर्णयान्वये कार्यवाही करणेसाठी खालीलप्रमाणे आदेश व्हावेत असे वाटते.

०१) जनसंपर्क विभागाने दर्शन/आरती पासेससाठी आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करुन भक्तांना श्रींच्या दर्शन/आरतीसाठी नोंदणी/टोकन देण्याची कार्यवाही करावी.

०२) माहिती व तंत्रज्ञान विभागाने साईटेक प्रणालीतंर्गत कार्यान्वित केलेल्या जनसंपर्क कार्यालयाच्या दर्शन/आरती पासेस वितरण सॉफ्टवेअरमध्ये तसेच लेखाशाखेच्या देणगी काऊटंर सॉफ्टवेअरमध्ये याबाबतचे आवश्यक ते बदल करावे.

०३) लेखाशाखा विभागाने भक्तास जनसंपर्क कार्यालयाकडून दिलेल्या नोंदणी/टोकन वरुन रोख रक्कम भरुन पावती /पास भक्तांना देण्यात यावा व शिफ्ट क्लोजिंगनंतर शिफारस करणाऱ्यास दिवसभरात किती व्यक्तींना त्यांच्या शिफारशीने पासेस देण्यात आले याची माहिती एसएमएसव्दारे मोबाईलवर देण्यात यावी. तसेच उपरोक्त सॉफ्टवेअर कार्यान्वित करतेवेळी देणगी काऊंटरवरील सिस्टीम काही कालावधीसाठी बंद होत असेल तर अशा वेळी साईभक्तांकडून देणगी स्विकारणेकामी पावती पुस्तक (मॅन्युअल) ठेवणे. आदि बाबतची कार्यवाही करावी. यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाकडून साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वित केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते बदल करुन घेण्यात यावे.

०४) जनसंपर्क विभागाने उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता झालेनंतर सदर निर्णयाची माहिती महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मान्यवर, देणगीदार

आदिंना होणेसाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करुन प्रसिध्दीसाठी देण्याची कार्यवाही करावी.

अशा स्वरुपाची वरील निर्णयानुसार अ.नं. १ ते ४ प्रमाणे संबधीत विभागांनी कार्यवाही करणेसंबधी आदेश होणेसाठी दिनांक २१.०४.२०१४ रोजीची टिपणी मंजुरीसाठी ठेवलेली होती, सदर टिपणीवर खालीलप्रमाणे निर्देश झालेले आहेत.

**०१)** सद्यस्थितीत सुरू असलेली पास देण्याची व्यवस्था सुरळीत सुरु आहे.

**०२)** लेखी तक्रार अप्राप्त, उक्त नमुद ठरावाप्रमाणे कार्यवाही करावयाची झालेस १,२,३ प्रमाणे पुर्तता करावी लागेल. त्यामुळे तक्रारी वाढतील व भक्तास त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मा. व्यवस्थापन समितीसमोर फेरविचारासाठी प्रस्ताव ठेवावा. असे मत आहे, असे निर्देश दिलेले आहेत.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०३.२०१४ रोजीचे सभेतील विषय नंबर ०९ निर्णय क्रमांक २६२ वर मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत सांगोपांग चर्चा होऊन निर्णय होणेसाठी फेर सविनय सादर.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६२ अन्वये आजतागायत कार्यवाही चालु केलेली नाही. या निर्णयावर कार्यवाही चालू केल्यानंतर प्रशासनामध्ये काय अडचण येते किंवा साईभक्तांकडून काय प्रतिक्रीया येतात, हे समजेल. जर अडचणी येत असतील किंवा साईभक्तांच्या तक्रारी येत असतील तर त्याचा सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा. तोपर्यंत मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २६२ कायम ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.११९** **दर्शन हॉलमधील स्टील बॅच/ रिलींगबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची दर्शनव्यवस्था ही शांतीनिवास पहिला माळा व भक्तीनिवास हॉल स्टील बॅच/रिलींग बसवून करण्यात आलेली आहे. सदर रिलींग हे दि.३१.०३.२००० रोजी ५५२ नग स्टील बँच रिलींगसह रक्कम रुपये १८,६०,२४०/- मात्र ने खरेदी करुन दर्शन रांगे मध्ये बसविण्यात आलेली आहे. सध्या साईभक्तांचे वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता, कुठलाही अनुचित प्रकार घडून साईभक्ताला रिलींग पासून अपाय होऊ नये, यासाठी पाहणी करुन नव्याने ५५२ नग रिलींग खरेदी करुन दर्शन रांगेत बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर स्टील बॅच /रिलींग खरेदी करण्यासाठी अंदाजे खर्च रक्कम रुपये ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तिस लाख )मात्र खर्च येणार आहे.

तरी साईभक्तांची दर्शनरांगेची व्यवस्था सुरळित होणेसाठी खरेदी विभागामार्फत दर्शन हॉल मध्ये ५५२ नग स्टिल रिलींग विहित पद्धतीने खरेदी करुन विद्युत विभागामार्फत बसविण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तिस लाख ) मात्रच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण अधिकारी/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२०** **श्री साईप्रसादालयाकरीता सीसीटीव्ही सिक्युरिटी सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सद्य स्थितीत मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेत एकुण १०१ कॅमेरे, फेस रेकोगनेशन सॉप्टवेअर, बॅगेजेस स्कॅनर इ. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन प्रसादालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याअनुशंगाने श्री अशोक ढगे, कन्सलटंट यांचे समवेत प्राथमिक सर्वेक्षणही करण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रसादालयात खालील ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

१) Dining Hall
२) आतील Entrance परिसर
३) Water Plant
४) लाडु कक्ष
५) Booking Counter
६) Gas Plant
७) Parking
८) सर्व Passage व रोड
९) अन्नदान कक्ष
१०) अन्नदान कक्षाची मागील बाजु

११) प्रवेशद्वार (रोडकडील, रस्ता ५ फुटापर्यंत कव्हर करणे)

१२) Toilet Entrance

यासाठी साधारणतः ८० ते ८५ कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे. परंतु यात VVIP, Dining Hall व IT Dept चा समावेश करण्यात आलेला नाही. सदर प्रसालयातील सिक्युरीटी सिस्टीम व फॅसिलिटी मॅनेजमेंटसाठी (३ वर्षाकरीता) अंदाजे ३.६० कोटी + Tax खर्च अपेक्षित आहे. शिवाय बांधकाम विभागामार्फत NOC Room, UPS Room, Server Room यांचेमार्फत तयार करुन घेता येईल, तसेच सदरचे ठिकाणी विद्युत विभागामार्फत वातानुकूलित यंत्रणा बसविता येईल.

तरी प्रसादालयाकरीता सीसीटीव्ही सिक्युरीटी सिस्टीम बसविणेसाठी व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३.६० कोटी + Tax मात्र खर्चाचे मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सी.सी.टी.व्ही. कंट्रोल)

---

**विषय नं.१२१ डॉ.कौशिककुमार हिरजीभाई मकवाना, तत्कालीन प्र.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.मकवाना हे तत्कालीन प्र.वैदयकिय संचालक, रुग्णालये विभाग म्हणून संस्थान सेवेत कार्यरत आहे.राजीव गांधी जिवनदायी योजने अंतर्गत संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे ऑपरेशन करुन त्यांचेवर हॉस्पिटलमध्ये उपचार केले जातात. सदरचे योजने अंतर्गत शस्त्रक्रिया व वैदयकिय उपचारावर झालेल्या खर्चाचे बिल शासनाकडून मिळणेसाठी प्रस्ताव तात्काळ संबंधीत ॲथोरिटीला पाठविणे आवश्यक आहे.तथापी राजीव गांधी योजने अंतर्गत रुग्णांवर करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया व वैदयकिय उपचारावर झालेल्या खर्चाचे असंख्य बिलांचा परतावा शासनाकडून मिळणेकामी त्यांचे मार्फत शासनाचे संबंधीत ॲथोरिटीला विहीत वेळेत प्रस्ताव पाठविले गेले नाहीत. त्यामुळे संस्थानला सदर योजने अंतर्गत शासनाकडून मिळणारी बहुतांशी बिलांची रक्कम (सुमारे रुपये ६४ कोटी) अदयाप पर्यंत प्राप्त झालेली नाही असे निदर्शनास आलेले आहे.त्याचा परिणाम संस्थानचे अर्थिक बाबींवर झालेला आहे.त्यास डॉ.मकवाना हेच सर्वस्वी जबाबदार असल्याचे दिसून येते.

म्हणून सदर गैरशिस्त वर्तनाबाबत डॉ.मकवाना यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८८७/२०१४ दि.२५-०२-२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन डॉ.मकवाना यांनी दि.१५-०३-२०१४ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन त्यात त्यांनी,च्श्री साईबाबा संस्थान सेवेत आल्यापासून माहे जानेवारी २०११ पासून ते आजतागायत,जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत करण्यात आलेल्या ह्दय शस्त्रक्रियांच्या बिलांची रक्कम शासनाकडून लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी, मागील कालावधीत,मी वैद्यकिय प्रशासक पदाबरोबरच (ऑगष्ट २०१२ पासून) प्र.उप वैद्यकिय संचालक व प्र.वैद्यकिय संचालक पदाची जबाबदारी व कर्तव्ये पार पाडुन, तत्कालीन जीवनदायी योजने अंतर्गत बिलींगचे अतिरिक्त कामकाज पार पाडलेले आहे,रुग्णालय प्रशासनाने केलेली कार्यवाही,पत्र व्यवहार व वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे,संस्थानला आजतागायत ११७४३ रुग्णांच्या बिलांपोटी एकुण ९६.३५ कोटी रुपये इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलचा नावलौकीक उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा सुविधा व विशेषतः जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत ह्दय शस्त्रक्रियांसाठी,जसजसा वाढत गेला, तसतशी रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत गेल्याने, सुरुवातीच्या सन,२००७ ते २०१० या कालावधीच्या तुलनेत, सन २०११ ते २०१४ कालावधीत, ह्दय शस्त्रक्रियांच्या संख्येत साधारणपणे दुप्पटीपेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली, परंतु, शासनाकडून शस्त्रक्रियांच्या बिलांपोटी निधी उपलब्ध होण्यास विलंब होत गेल्याने, तसेच, त्यामध्ये दरमहा करण्यात येणाऱ्या साधारण ४०० शस्त्रक्रियांची वाढ होत गेल्याने,दरमहा साधारणतः रुपये ४ कोटींपेक्षा जास्त रकमेची भर पडत गेल्यानेही, योजने अंतर्गत मोठी रक्कम शासनाकडे प्रलंबित राहू लागली.

**जीवनदायी योजने अंतर्गत करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांचा वर्ष निहाय तपशिल खालीलप्रमाणे :-**

| Sn. | Year | No.of Surgeries |
|---|---|---|
| 1 | 2007-08 | 570 |
| 2 | 2008-09 | 1718 |
| 3 | 2009-10 | 2012 |
| 4 | 2010-11 | 2958 |
| 5 | 2011-12 | 3863 |
| 6 | 2012-13 | 4833 |
| 7 | 2013-14(upto 26.11.2013) | 3027 |
| | **Total :-** | **18981** |

योजने अंतर्गत शासनाकडून,जसजसा निधी उपलब्ध होत गेला,तशी तशी संस्थानला अनुदान रक्कम प्राप्त झालेली आहे, रुग्णालय विभागाकडून जीवनदायी आरोग्य योजन अंतर्गत रक्कम प्राप्त

करुन घेण्यासाठी वेळोवेळी केलेली कार्यवाही,शासनस्तरावर वेळोवेळी केलेल्या पत्र व्यवहार व पाठपुराव्याचा तपशिल खालीलप्रमाणे असून, सोबत छायांकित प्रती जोडण्यात आलेल्या आहेत.

**जीवनदायी योजने अंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाच्या वरिष्ठस्तरावर केलेला पत्र व्यवहार**

| क्रं. | तपशिल- | पत्रांची संख्या |
|---|---|---|
| १. | मा.उप-संचालक,मा.संचालक व मा.सचिव,आरोग्य,यांचे कार्यालयांस पाठविणेत आलेली पत्रे. | १९ |
| २. | मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे थकीत अनुदान रक्कमेबाबत निर्णयार्थ ठेवण्यात आलेले विषय व ठराव | ३ (२ ठराव व १ प्रलंबीत विषय) |

उपरोक्तप्रमाणे, वेळोवळी करण्यात आलेला पत्र व्यवहार व पाठपुराव्यामुळे संस्थानला आज तागायत १८९८१ शस्त्रक्रियांच्या बिलापैकी, एकुण ११७४३ रुग्णांच्या बिलांपोटी, म्हणजेच ६२% इतक्या बिलांची एकुण रु.९६.३५ कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली असून ती संस्थान खाती जमा आहे.

परंतू मा.उप-संचालक,नाशिक यांच्या कार्यालयाकडून,बिले सादर करण्याच्या निकषांमध्ये सुरुवातीच्या तुलनेत,किती तरी अधिक माहिती व बाबींची पुर्तता करणे सक्तीचे करण्यात आले,वेळोवेळी वाढ करण्यात आलेले निकष खालीलप्रमाणे:-

१. बिलांसोबत,रुग्णांच्या छातीवरील शस्त्रक्रियेचा व्रण दर्शविणारा **फोटो** जोडूण देणे.
२. बिलांसोबत, शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **स्टिकर्स** चिकटवून देणे.
३. बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **बॉक्सेस** जोडून देणे.
४.बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **पाउचेस** जोडून देणे.
५.बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे **Utilization Certificate** जोडून देणे.
६. बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे **Tax Invoices** जोडून देणे.
७. बिलांसोबत,सदर बिल यापुर्वी सादर केले नसल्याबाबतचे **प्रमाणपत्र** जोडून देणे.

उपरोक्त प्रमाणे बिले सादर करण्यामध्ये बदल करण्यात आल्यानुसार,बिलांसोबत साधन सामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस् जोडणे सक्तीचे करण्यात आल्यामुळे,शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीची ,टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध होत नसल्यामुळे व पाठपुरावा करुन जसजशी उपलब्ध झाली त्यानुसार बिले तयार करुन सादर करण्यात आली.

तसेच, मा.उप-संचालक,आरोग्य, नाशिक यांच्या कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेली,परंतू अनुदान बाकी असलेली साधारण रु.३४/- कोटी इतक्या रक्कमेची,३९६२ बिले सुध्दा परत पाठविण्यात आल्यामुळे व टॅक्स इनव्हाईसेस् अभावी तयार करावयाची बाकी असलेली साधारण रु.३०/- कोटी इतक्या रकमेची साधारण ४३०० बिले,अशी एकुण (रु.३४/-+ रु.३०/-) अशी साधारण रु.६४/- कोटी इतक्या रकमेची बिले नवीन निकषांनुसार दाखल करावयाची बाकी राहिलेली होती.

दुसरे असे की सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ दि.१७-०८-२००४ रोजीच्या,"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी",अधिनियमा अंतर्गत कलम २१ च्या पोट कलम २ (ग) नुसार,जीवनदायी योजने अंतर्गत खर्च झालेली रक्कम, ही जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने/वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी खर्च झालेली असुन, सदर योजने अंतर्गत, शासनाकडुन निधीच्या उपलब्धतेनुसार, संस्थानला टप्प्या टप्प्याने रक्कम अदा करण्यात आलेली आहे व येत असून,सदर रक्कम ही माझ्या वैयक्तिक लाभासाठी वापरण्यात आलेली किंवा खर्च झालेली नाही.

तथापी, जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत शासनाकडे बाकी असलेल्या साधारण रु.६४/- इतक्या बाकी रक्कमेस व्यक्तीशः अजिबात जबाबदार नसून वर उल्लेख केल्यानुसार व सोबत जोडण्यात आलेल्या पत्र व्यवहाराच्या तपशिलानुसार माझे काम व जबाबदारी यामध्ये कोणतीही हयगय,हलगजीपणा किंवा कसूर केलेली नाही.

तरी जीवनदायी योजने अंतर्गत खालील कारणांमुळे बिले प्रलंबित राहिल्याचे आढळून येतेः-

**१.** बिले सादर करण्यामध्ये बदल करण्यात आल्यानुसार बिलांसोबत साधनसामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस जोडणे सक्तीचे करण्यात आल्यामुळे तसेच शासनाच्या नवीन निकषांनुसार,बिले तयार करण्यासाठी आवश्यक असलेले (Raw Material),शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारे Balloons,Octopus इ. साधन सामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस् Continuous follow-up करुनही Suppliers कडून उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

**२.** योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांची संख्या दुप्पटीपेक्षा जास्त वाढत गेली,त्या प्रमाणात शासनाकडून अनुदान रकमेत वाढ होवू शकली नाही, परंतू दरमहा करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांची बिलांपोटी साधारण रु.४/- कोटी इतक्या रकमेची वाढ होत गेल्यामुळे साधारण रु.६४/- कोटी इतकी रक्कम बाकी राहिलेली आहे.

**३.** तसेच मा.उप-संचालक,आरोग्य विभाग,नाशिक यांच्या कार्यालयाकडे दाखल कण्यात आलेली,परंतू अनुदान बाकी असलेली साधारण रु.३४/- कोटी इतक्या रक्कमेची,३९६२ बिले सुध्दा परत पाठविण्यात आल्यामुळे व टॅक्स इनव्हाईसेस् अभावी तयार करावयाची बाकी असलेली साधारण रु.३०/- कोटी इतक्या रकमेची साधारण ४३०० बिले,अशी एकुण (रु.३४/-+३०/-) अशी साधारण रु.६४/- कोटी इतक्या रकमची बिले नवीन निकषांनुसार दाखल करावयाची होती.

**४.** सदर विषयी,मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात आलेला विषय प्रलंबित असुन,जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे ओरीजनल टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध होवू शकत नसलेल्या, शस्त्रक्रियांच्या बिलांमधून,टॅक्स इनव्हाईसेस् पोटी रक्कम कपात करण्यात मान्यता देण्यात येवून बिले सादर करणेबाबत दि.०३-०२-२०१४ रोजीचे मा.व्य.सभेंत मोठया संख्येने व ६० कोटीपेक्षा जास्त रकमेची बिले अडकून पडल्याबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

**५.** सदरचे कामांत वेळोवेळी संगणक व हार्डवेअर इत्यादीमध्ये तांत्रिक अडचणी आल्याने माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत अडचणी दूर करुन कामे केलेली आहेत.तसेच या कामासाठी सध्या जनसंपर्क कार्यालयातील कंत्राटी कर्मचारी डबल डयुटी करत असून त्यांना डबल डयुटीचे वेतन देणेकामी त्यासाठी लागणारी कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांची सुधारीत मंजूरीही अदयापपर्यंत इकडील विभागास मिळालेली नाही.

काही पुरवठांधारकाकडून शक्य होतील तेवढे टॅक्स इनव्हाईसेस उपलब्ध करुन दिल्यामुळे प्राप्त झालेल्या टॅक्स इनव्हाईसेस नुसार एकुण रु.२२.२४ कोटी इतक्या रक्कमेची २४८२ बिले टॅक्स इनव्हाईसेस जोडून नव्याने तयार करुन मा.उप संचालक,आरोग्य विभाग,नाशिक यांच्या कार्यालयास दि.१५-०३-२०१४ अखेर फेर सादर करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेंच्या दि.१०-०१-२०१० रोजीच्या सभेतील विषय नं.१० निर्णय क्रं.१० / आणि दि.०८-०१-२०१३ रोजीच्या सभेतील विषय नं.१९ निर्णय क्रं.१९ योजनेची अमंलबजावणी व करणेत येणाऱ्या शस्त्रक्रिया पुर्ववत (योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार दरमहा ४/५ शस्त्रक्रियांच्या ऐवजी दरमहा ४२५/४५० शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण ) चालू ठेवण्यात आल्यामुळे मागील वर्षभरात जानेवारी २०१३ ते नोव्हेंबर २०१३ या काळात एकूण बाकी रकमेमध्ये दरमहा साधारण रु.४/- कोटी म्हणजेच साधारण रु.४०/- कोटी इतक्या रकमेची भर पडलेली आहे.मी माझ्या कामांमध्ये कोणतीही हयगई हलगर्जीपणा(Neglience) केलेला नसून, वेळोवेळी सर्व स्तरावर जनसंपर्क विभागाकडून पत्र व्यवहार करुन घेतलेला असून माझी कोणतीही चुक किंवा दोष नसतांना अशा प्रकारची नोटीस प्राप्त झाल्यामुळे मला मोठा मानसिक धक्का बसलेला असून नैराश्यही आलेले आहे.तसेच वैद्यकिय प्रशासक पदाबरोबरच वैद्यकिय संचालक पदाचा अतिरिक्त कामकाज पाहत आहे.उप वैद्यकिय संचालक पदही रिक्त असल्याने त्याही पदाचे काम पहावे लागत आहे.दिवसभर काम करुन रात्रीच्या वेळी रुग्णालतून रुग्णांसंदर्भात

आर.एम.ओ.डॉक्टर अपघात विभाग व इतर वार्डमधून दुरध्वनी येत असतो.त्यामुळे चांगले काम करुनही संदर्भीय पत्राची नोटीस येते त्यावेळेस अतिरिक्त कामांबाबत प्रोत्साहान राहत नाही.आपणांस विनंती की, उपरोक्तबाबत कुणी संस्थान प्रशासनाच गैरसमज करुन देण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याची खात्री करुन घेण्यात यावी.जेणेकरुन रुग्णालय प्रशासनात व सेवेत सुत्रता राहिल हि विनंती आहे.

तरी जीवनदायी योजने अंतर्गत रु.६४/-कोटी इतक्या रक्कमेस व्यक्तिशः अजिबात जबाबदार नसून मी माझा उपरोक्तप्रमाणे सविस्तर लेखी खुलासा सादर करीत आहे.तो ग्राहय धरण्यात येवून माझ्या विरुध्द सदर रु.६४/-कोटी इतक्या रकमेचे व्याज वसूल करण्याची किंवा इतर कोणतीही कारवाई करण्यात येवू नये व संदर्भीय नोटीस रद्द करण्यत यावी हि नम्र विनंती."असे म्हटलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** सबब, डॉ.कौशिककुमार हिरजीभाई मकवाना, तत्कालीन प्र.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना उपरोक्त गैरशिस्त गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस संस्थानला लागू असलेल्या दि इंडस्ट्रियल एम्प्लायमेंन्ट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (०१) मध्ये नमुद केलेल्या

**(अ)** ताकीद दयावी किंवा ठपका दयावा

**(ब)** पेमेंन्ट ऑफ वेजेस ॲक्ट,१९३६ हयाच्या तरतूदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा (एकुण वेतनाच्या ३ % इतका दंड)

**(क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीने लेखी आदेशाने सस्पेन्ड करावे व

**(ड)** नोटीसीशिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे. "ड" प्रमाणे नोटीसी शिवाय कायमस्वरुपी बडतर्फ (डिसमीस) करावयाचे झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्यास गैरवर्तनाबाबत आरोपपत्र देवून,

खातेचौकशी करावी लागेल.खाते चौकशी निष्कर्ष अहवाल प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे मत आहे.

सबब, उपरोक्त चार शिक्षेपैकी डॉ.कौशिककुमार हिरजीभाई मकवाना यांना कोणती एक शिक्षा करावयाची किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चालू असलेल्या जीवनदायी योजने अंतर्गत रु.६४ कोटी मात्र रकमेची बीले कोणत्या कारणांमुळे उशीराने शासनाकडे सादर झालेली आहेत, याची नैसर्गिक न्यायतत्वाच्या नियमानुसार चौकशी करणेसाठी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी व वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची समिती गठीत करणेत यावी व या समितीने पुर्ण चौकशी करुन मा.त्रिसदस्य समितीपुढे अहवाल सादर करावा. त्यानंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत निर्णय घेतला जाईल, असे ठरले.**

(कार्यवाही- क.कामगार अधिकारी, हॉस्पिटल)

---

**विषय नं.१२२ श्री.अशोक शंकरराव वाळुंज, मॅनेजर पब्लिक रिलेशन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.वाळुंज हे व्यवस्थापक जनसंपर्क, रुग्णालये विभाग म्हणून संस्थान सेवेत आहेत. राजीव गांधी जिवनदायी योजने अंतर्गत संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे ऑपरेशन करुन त्यांचेवर हॉस्पिटलमध्ये उपचार केले जातात. सदरचे योजने अंतर्गत शस्त्रक्रिया व वैदयकिय उपचारावर झालेल्या खर्चाचे बिल शासनाकडून मिळणेसाठी प्रस्ताव तात्काळ संबंधीत ॲथोरिटीला पाठविणे आवश्यक आहे. तथापी राजीव गांधी योजने अंतर्गत रुग्णांवर करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया व वैदयकिय उपचारावर झालेल्या खर्चाचे असंख्य बिलांचा परतावा शासनाकडून मिळणेकामी त्यांचे मार्फत शासनाचे संबंधीत ॲथोरिटीला विहीत वेळेत प्रस्ताव पाठविले गेले नाहीत. त्यामुळे संस्थानला सदर योजने अंतर्गत शासनाकडून मिळणारी बहुतांशी बिलांची रक्कम (सुमारे रुपये ६४ कोटी) अदयाप पर्यंत प्राप्त झालेली नाही असे निदर्शनास आलेले आहे.त्याचा परिणाम संस्थानचे अर्थिक बाबींवर झालेला आहे. त्यास श्री.वाळुंज हे सर्वस्वी जबाबदार असल्याचे दिसून येते.

म्हणून सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.वाळुंज यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८८८/२०१४ दि.२५-०२-२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यास अनुसरुन श्री.वाळुंज यांनी दि.०८-०३-२०१४ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला असुन त्यात त्यांनी, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २००७ पासून ते आजतागायत,जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत करण्यात आलेल्या ह्दय शस्त्रक्रियांच्या बिलांची रक्कम शासनाकडून लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी, मागील ७ वर्षाच्या कालावधीत, मी स्वत:, मॅनेजर पब्लिक रिलेशन्स (जनसंपर्क अधिकारी) पदाची जबाबदारी व कर्तव्ये पार पाडुन, तत्कालीन जीवनदायी योजने अंतर्गत बिलींचे अतिरिक्त कामकाज पार पाडलेले आहे,त्याबाबत केलेली कार्यवाही,पत्र व्यवहार व वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे, संस्थानला आजतागायत ११७४३ रुग्णांच्या बिलांपोटी एकुण ९६.३५ कोटी रुपये इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे., सोबत आजतागायत प्राप्त झालेल्या धनादेशांची यादी जोडलेली आहे.

तथापी, श्री साईबाबा हॉस्पिटलचा नाव लौकीक उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा सुविधा व विशेषत: जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत ह्दय शस्त्रक्रियांसाठी,जसजसा वाढत गेला, तसतशी रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत गेल्याने,सुरुवातीच्या सन,२००७ ते २०१० या कालावधीच्या तुलनेत, सन २०११ ते २०१४ कालावधीत, ह्दय शस्त्रक्रियांच्या संख्येत साधारणपणे दुप्पटीपेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली, परंत, शासनाकडून शस्त्रक्रियांच्या बिलांपोटी निधी उपलब्ध होण्यास विलंब होत गेल्याने, तसेच, त्यामध्ये दरमहा करण्यात येणाऱ्या साधारण ४०० शस्त्रक्रियांची वाढ होत गेल्याने,दरमहा साधारणत: रुपये ४ कोटींपेक्षा जास्त रकमेची भर पडत गेल्यानेही, योजने अंतर्गत मोठी रक्कम शासनाकडे प्रलंबित राहू लागली.

**जीवनदायी योजने अंतर्गत करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांचा वर्ष निहाय तपशिल खालीलप्रमाणे:-**

| Sn. | Year | No.of Surgeries |
|---|---|---|
| 1 | 2007-08 | 570 |
| 2 | 2008-09 | 1718 |
| 3 | 2009-10 | 2012 |
| 4 | 2010-11 | 2958 |
| 5 | 2011-12 | 3863 |
| 6 | 2012-13 | 4833 |
| 7 | 2013-14(upto 26.11.2013) | 3027 |
| | **Total :-** | **18981** |

एकुण १८९८१ शस्त्रक्रियांच्या बिलांपैकी, ११७४३ बिलांपोटी,म्हणजेच ६२% इतक्या बिलांची रु.९६.३५ कोटी इतकी रक्कम शासनाकडून प्राप्त झालेली आहे.

योजने अंतर्गत शासनाकडून, जसजसा निधी उपलब्ध होत गेला,तशी तशी संस्थानला अनुदान रक्कम प्राप्त झालेली आहे, मी स्वतः जीवनदायी आरोग्य योजन अंतर्गत रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी वेळोवेळी केलेली कार्यवाही,शासन स्तरावर वेळोवेळी केलेल्या पत्र व्यवहार व पाठपुराव्याचा तपशिल खालीलप्रमाणे असून, सोबत प्रती जोडण्यात आलेल्या आहेत.

मी स्वतः जीवनदायी योजने अंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी शासनाच्या वरिष्ठस्तरावर केलेला पत्र व्यवहार-

| **क्रं.** | **तपशिल-** | **पत्रांची संख्या** |
|---|---|---|
| १. | मा.उप-संचालक, मा.संचालक व मा.सचिव, आरोग्य, यांचे कार्यालयांस पाठविणेत आलेली पत्रे. | १९ |
| २. | मा.ना.विमलताई मुंदडा,मंत्री,सार्वजनिक आरोग्य,मंत्रालय,मुंबई | १ |
| ३. | मा.ना.डॉ.राजेंद्र शिंगणे,मंत्री,सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण,मंत्रालय,मुंबई | १ |
| ४. | मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पा.मंत्री,शालेय शिक्षण, विधी व न्याय, मंत्रालय,मुंबई | १ |
| ५. | मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पा.मंत्री,कृषी व पणन, मंत्रालय,मुंबई | २ |

**मी, स्वतः हॉस्पिटल/संस्थान अंतर्गत केलेला पत्र व्यवहार व कार्यवाही :-**

| **क्रं.** | **तपशिल-** | **पत्रांची संख्या** |
|---|---|---|
| १. | मा.मटेरीयल्स मॅनेजर,श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी प्रत-मा.वित्त व्यवस्थापक श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १३ |
| २. | मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे थकीत अनुदान रकमेबाबत निर्णयार्थ ठेवण्यात आलेले विषय | २ |
| | **एकुण :-** | **१५** |

उपरोक्तप्रमाणे,सन २००८-२०१३, या ५ वर्षाच्या कालावधीत (एकुण ३९ पत्रे,सरासरी ३ आठवडयाला १ पत्र) वेळोवेळी करण्यात आलेला पत्र व्यवहार व पाठपुराव्यामुळे, संस्थानला आज तागायत १८९८१ शस्त्रक्रियांच्या बिलापोटी, एकुण ११७४३ रुग्णांच्या बिलांपोटी, म्हणजेच ६२% इतक्या बिलांची एकुण रु.९६.३५ कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे.

परंतू मा.उप-संचालक,नाशिक यांच्या कार्यालयाकडून,बिले सादर करण्याच्या निकषांमध्ये सुरुवातीच्या तुलनेत,किती तरी अधिक माहिती व बाबींची पुर्तता करणे सक्तीचे करण्यात आले,वेळोवेळी वाढ करण्यात आलेले निकष खालीलप्रमाणे:-

१. बिलांसोबत,रुग्णांच्या छातीवरील शस्त्रक्रियेचा व्रण दर्शविणारा **फोटो** जोडूण देणे.

२. बिलांसोबत, शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **स्टिकर्स** चिकटवून देणे.

३. बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **बॉक्सेस** जोडून देणे.

४.बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टेन्ट,व्हॉल,पेसमेकर इ.चे **पाउचेस** जोडून देणे.

५.बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे **Utilization Certificate** जोडून देणे.

६. बिलांसोबत,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्रीचे **Tax Invoices** जोडून देणे.

७. बिलांसोबत,सदर बिल यापुर्वी सादर केले नसल्याबाबतचे **प्रमाणपत्र** जोडून देणे.

उपरोक्त प्रमाणे बिले सादर करण्यामध्ये बदल करण्यात आल्यानुसार,बिलांसोबत साधन सामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस् जोडणे सक्तीचे करण्यात आल्यामुळे,सदर साधनसामुग्रीची ,खरेदी करणाऱ्या औषध खरेदी विभागाकडे,टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध करुन देण्यासाठी एकुण १३ पत्रांद्वारे वारंवार मागणी करुन,सदर पत्रांची प्रती,वित्त विभागासही देण्यात आलेल्या होत्या, तथापी, वित्त विभागाकडूनही टॅक्स इनव्हाईसेस् किंवा त्यांच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे बिले तयार करण्यासाठी आवश्यक असलेले, शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस् वेळच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात आलेले नसल्यामुळे,बिले तयार करता येवु शकलेलो नाहीत.

तसेच, मा.उप-संचालक,आरोग्य, नाशिक यांच्या कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेली,परंतू अनुदान बाकी असलेली साधारण रु.३४/- कोटी इतक्या रक्कमेची,३९६२ बिले सुध्दा परत पाठविण्यात आल्यामुळे व टॅक्स इनव्हाईसेस् अभावी तयार करावयाची बाकी असलेली साधारण रु.३०/- कोटी इतक्या रकमेची साधारण ४३०० बिले,अशी एकुण (रु.३४/-+ रु.३०/-) अशी साधारण रु.६४/- कोटी इतक्या रकमेची बिले नवीन निकषांनुसार दाखल करावयाची बाकी राहिलेली होती.

त्या नंतर, स्टोअर्स मॅनेजर, श्री.दिलीप औदिश्च (शर्मा) यांनी,काही पुरवठादारांकडून,शक्य होतील तेवढे, टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध करुन दिल्यामुळे, प्राप्त झालेल्या टॅक्स इनव्हाईसेस् नुसार,

एकुण रु.१८.४२ कोटी इतक्या रकमेची २१२२ बिले,टॅक्स इनव्हाईसेस् जोडून,नव्याने तयार करुन, मा.उप-संचालक, आरोग्य विभाग, नाशिक यांच्या कार्यालयास दि.२८.२.२०१४ अखेर फेर सादर करण्यात आलेली आहेत.

सदर बिले तयार करण्यासाठी औषध खरेदी विभागाकडून जसजसे टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, तसतशी सदर बिले नव्याने तयार करुन,मा.उप-संचालक,नाशिक,यांच्या कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, जीवनदायी योजने अंतर्गत प्रलंबित रक्कम संस्थानला लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी,मी स्वत:अत्यंत प्रामाणिकपणे कार्यवाही केलेली असून,शासनाकडे बाकी असलेली साधारण रु.६४/- कोटी इतकी रक्कम ही, योजने अंतर्गत करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांची संख्या दुप्पटीपेक्षा जास्त वाढत गेली,परंतू,त्या प्रमाणात शासनाकडून अनुदान रक्कमेत वाढ होऊ शकली नाही,परंतू,दरमहा करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांच्या बिलांपोटी साधारण रु.४/- कोटी इतक्या रकमेची वाढ होत गेल्यामुळे साधारण रु.६४/- कोटी इतकी रक्कम बाकी राहिलेली आहे.

दुसरे असे की, सद्‌गुरु श्री साईबाबांच्या सेवेची संधी म्हणून,मी,मागील ७ वर्षापासून,डयुटी व्यतिरिक्त दररोज किमान ४ ते ६ तास जादा काम, कोणत्याही मोबदल्याशिवाय केलेले व करीत आहे, त्यामुळे,माझ्या बहूतेक सर्व साप्ताहिक सुट्टया, इतर रजा बुडीत (Lapse) झालेल्या आहेत,तसेच,मला देण्यात आलेल्या सन,२०११-१२ व सन २०१२-१३ च्या गोपनीय अहवालांच्या प्रतीनुसार,मला माझ्या एकुण कामकाजावरुन करण्यात आलेल्या प्रतवारीमध्ये "A उत्कृष्ट" असा शेरा प्राप्त झालेल्या आहे,सोबत प्रती जोडलेल्या आहेत.

दुसरे असे की, सन,२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१४, दि.१७-०८-२००४ रोजीच्या, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी" अधिनियमा अंतर्गत कलम २१ च्या पोट कलम २ (ग) नुसार, जीवनदायी योजने अंतर्गत खर्च झालेली रक्कम, ही, जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टिने/ वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी खर्च झालेली असुन,सदर योजने अंतर्गत, शासनाकडून, निधीच्या उपलब्धतेनुसार, संस्थानला टप्प्याटप्प्याने रक्कम अदा करण्यात आलेली आहे व येत असून, सदर रक्कम ही माझ्या वैयक्तिक लाभासाठी वापरण्यात आलेली किंवा खर्च झालेली नाही.

तसेच, वर व सोबतच्या तक्त्यातील पान क्रं.३ मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार,मा.व्यवस्थापन समिती सभेच्या,दि.१०.०१.२०१० रोजीच्या सभेतील विषय नं.१०, निर्णय क्रं.१० व आणि दि.२.१.२०१३, रोजीच्या सभेतील विषय नं.१९, निर्णय क्रं.१९, योजनेची अमंलबजावणी व करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया पुर्ववत (योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार,दरमहा ४/५ शस्त्रक्रियांच्या ऐवजी दरमहा ४२५/४५० शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण )चालु ठेवण्यात आल्यामुळे,मागणी वर्षभरात, जानेवारी, २०१३ ते नोव्हेंबर, २०१३ या काळात,एकुण बाकी रकमेमध्ये दरमहा साधारण रु.४/- कोटी म्हणजेच, साधारण रु.४०/- कोटी इतक्या रक्कमेची भर पडलेली आहे.

तरी जीवनदायी योजने अंतर्गत बाकी रु.६४/- कोटी इतक्या रकमेस मी,स्वत: व्यक्तिश: अजिबात जबाबदार नसून,खालील कारणांमुळे बिले प्रलंबित राहिलेली आहेत :-

**१.** शासनाच्या नवीन निकषांनुसार, बिले तयार करण्यासाठी आवश्यक असलेले (Raw Material), शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारे Balloons, Octopus इ. साधन सामुग्रीचे इनव्हाईसेस् उपलब्ध करु न देण्यासाठी औषध खरेदी विभागाकडे पत्रांद्वारे वारंवार मागणी करुनही,टॅक्स इनव्हाईसेस् वेळच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

**२.** सदर पत्रांच्या प्रती, वित्त विभागासही देण्यात आलेल्या होत्या,परंतू वित्त विभागाकडूनही टॅक्स इनव्हाईसेस् उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत व पत्रांची उत्तरेही देण्यात आलेली नाहीत.

**३.** सदर पत्रांच्या प्रती,मी,माझे Immediate Superior,मा.वैद्यकिय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांना सोबत जोडण्यात आलेल्या दि.२८-११-२०११ रोजीच्या पत्रान्वये स्पष्ट कळविले होते की, **१.** टॅक्स इनव्हाईसेस् न मिळाल्यामुळे, सदर बिले नामंजूर झाल्यास,**२.**अनुदान रक्कम न मिळाल्यास किंवा **३.** लेखा परिक्षणात काही आक्षेप घेण्यात आल्यास,त्याबाबत,जनसंपर्क विभागास (म्हणजेच सदर काम, मी करीत असल्यामुळे, मला) जबाबदार धरण्यात येवू नये,असे मी सव्वा दोन वर्षापुर्वीच लेखी कळविले होते व त्या नंतरही पत्रांद्वारे टॅक्स इनव्हाईसेस्‌ची वारंवार मागणी केलेली आहे.

**४.** सदर विषयी,मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात आलेला विषय प्रलंबित असुन,सदर विषयी, मा.उपसंचालक, नाशिक यांनी सुचीत केल्यानुसार त्यांचे कार्यालयास पत्र देण्यात आले असते तर त्यानुसार बिले तयार करुन लवकरात लवकर सादर करता येवू शकली असती.

तरी मी माझ्या कामामध्ये कोणताही हयगय,हलगर्जीपणा (Neglience) केलेला नसून, वेळोवेळी सर्व स्तरावर पत्र व्यवहार केलेला असून,माझी कोणतीही चुक किंवा दोष नसताना,अशा प्रकारचे नोटीस प्राप्त झाल्यामुळे,मला मोठा मानसिक धक्का बसलेला असून,मानहानी सहन करावी लागल्यामुळे नैराश्यही आलेले आहे.

तरी जीवनदायी योजन अंतर्गत बाकी रु.६४/- कोटी इतक्या रकमेस,मी स्वतः व्यक्तिशः अजिबात जबाबदार नसून, मी माझा उपरोक्तप्रमाणे सविस्तर लेखी खुलासा (एकुण ५३ पाने) सादर करीत आहे.तो ग्राहय धरण्यात येवून, माझ्या विरुध्द, सदर रु.६४/- कोटी इतक्या रकमेचे व्याज वसूल करण्याची किंवा इतर कोणतीही कारवाई करण्यात येवु नये हि नम्र विनंती."असे म्हटलेले आहे.

श्री.वाळुंज यांचे नोटीसी बाबत श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जा.नं.०८ दि.१४-०३-२०१४ रोजीचे पत्र इकडील कार्यालयाकडे सादर केलेले असून त्यात त्यांनी,"श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी येथे मॅनेजर पब्लिक रिलेशन्स् या हुद्दयावर कार्यरत असलेले, श्री.अशोक शंकरराव वाळुंज हे श्री साईबाबा संस्थान कर्मचारी या शासन मान्यता प्राप्त संघटनेचे सदस्य आहेत.

श्री.वाळुंज यांना उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये श्री.अशोक वाळुंज यांचेकडून जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत शासनाकडे बाकी असलेल्या रु.६४/- कोटी रकमेवरील व्याजाची रक्कम वसूल का करण्यात येवू नये? याबाबतचा सविस्तर लेखी खुलासा मागविण्यात आलेला आहे.

श्री.वाळुंज यांनी त्यांचा सविस्तर लेखी (५३ पाने) खुलासा दि.१०-०३-२०१४ रोजी सादर केलेला असून त्याची प्रत संघटनेस प्राप्त झालेली आहे.

याबाबत कळविण्यात येते की, श्री.वाळुंज हे अत्यंत प्रामाणिक,कष्टाळू व सचोटीने काम करणारे असून सदर बाबतीत त्यांचेकडून कोणताही निष्काळजीपणा किंवा हजगर्जीपणा झालेला नसून श्री.वाळूंज हे जनसंपर्क अधिकारी असूनही त्यांनी बिलींग व फायनान्स विभाग सदर योजनेच्या बिलींगचे कामकाज पारपाडत नसल्यामुळे व संस्थानचे अर्थिक नुकसान होऊ नये म्हणून,श्री.वाळूंज यांनी त्यांचे विभागाचे कामकाज पारपाडून,जीवनदायी योजनेच्या बिलींगचे अतिरिक्त कामकाज सुध्दा अत्यंत कार्यक्षमतेने व सचोटीने पार पाडलेले असून,श्री साईबाबा संस्थान प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या प्रतवारी मध्ये श्री.वाळुंज यांना त्यांच्या काम-काजावरुन करण्यात आलेल्या प्रतवारी मध्ये दर वर्षी "A/उत्कृष्ट" असा शेरा देण्यात आलेला आहे.श्री.वाळुंज यांच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, सदर योजने अंतर्गत बिले तयार करण्यासाठी आवश्यक असलेले,शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तुंचे,खरेदीचे टॅक्स इनव्हाईसेस्, औषध खरेदी व वित्त विभागाकडे श्री.वाळुंज यांनी सतत लेखी मागणी करुनही,सबंधीत औषध खरेदी विभाग व वित्त विभागाकडून वेळच्यावेळी देण्यात आलेले नसल्यामुळे श्री.वाळुंज यांना सदर बिले तयार करता येवू शकलेली नव्हती.

तसेच टॅक्स इनव्हाईसेस् न जोडता,जुन्या निकर्षानूसार तयार करुन पाठविण्यात साधारण ३४ कोटी रुपये इतक्या रकमेची शासनाकडून परत पाठविण्यात आलेली असल्यामुळे, प्रलंबित बिले साधारण ६४ कोटी रुपये इतक्या रकमेची झालेली असली तरीही श्री.वाळुंज हे सदर विलंबास जबाबदार नसून, श्री.वाळुंज यांना "रु.६४/- कोटी रकमेवरील व्याजाची रक्कम वसूल का करण्यात येवू नये?" अशा प्रकारचे, प्रशासनाकडून कारणे दाखवा नोटीस बजावणे हे श्री.वाळुंज यांच्या सारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यावर अन्यायकारक असुन, निश्चितपणे श्री.वाळुंज यांचे मानसिक व नैतिक मनोधैर्य खच्ची करणारे आहे व सदर नोटीस ही संघटनेला अमान्य आहे.

श्री.वाळुंज यांनी सदैव श्री साईबाबा संस्थान व जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने विचार केलेला असून, सन १९९५-९६ पासून राज्यभरात लागू असलेली,परंतू नाशिक आरोग्य विभागात कुणालाही ज्ञात नसलेली,जीवनदायी आरोग्य योजना, श्री.वाळुंज यांनी स्वतः मेहनत व कष्ट सोसून श्री साईबाबा हॉस्पिटलला, जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत सन २००७ मध्ये शासन मान्यताप्राप्त करुन घेतलेली असल्याने, फार मोठया प्रमाणावर उच्चांकी ह्दय शस्त्रक्रिया करण्यात येवूनही, संस्थानचे आर्थिक नुकसान झालेले नसून संस्थानला आजतागायत साधारण रु.९६ कोटी ३५ लाखांपेक्षा जादा अनुदान रक्कम प्राप्त झालेली आहे.

तसेच, श्री.वाळुंज यांनी स्वतः मेहनत व कष्ट सोसुन श्री साईबाबा हॉस्पिटलला,केंद्र शासनाच्या, मा.पंतप्रधान राष्टीय सहायता निधी अंतर्गत, मा.पंतप्रधान कार्यालयाची मान्यता प्राप्त करुन घेतलेली आहे.

श्री.वाळुंज श्री साईबाबा हॉस्पिटलला केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय सबलीकरण मंत्रालया अंतर्गत अनूसुचित जाती व जमातीतील (SC/ST) रुग्णांस वैद्यकिय अर्थिक मदत प्राप्त करुन घेण्यासाठी Dr.Ambedkar Medical Aid-२००४ अंतर्गत मान्यता प्राप्त करुन घेतलेली आहे ते ही संस्थानला खर्च येवू न देता.

तसेच श्री.अशोक वाळुंज यांनी उपरोक्त संदर्भीय विषयी सादर केलेला,त्यांचा लेखी खुलासा ग्राह्य धरण्यात येवून, श्री.अशोक वाळुंज यांच्या विरुध्द "रु.६४/- कोटी रकमेवरील व्याजाची रक्कम वसूल करण्याची" किंवा इतर कोणतीही कारवाई करण्यात येवू नये, अशी शिफारस व विनंती आहे."असे म्हटलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** सबब, श्री.अशोक शंकरराव वाळुंज, मॅनेजर पब्लिक रिलेशन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना उपरोक्त गैरशिस्त गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस संस्थानला लागू असलेल्या दि इंडस्ट्रियल एम्प्लायमेंन्ट (स्टॅन्डींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम २३ (०१) मध्ये नमुद केलेल्या

**(अ)** ताकीद दयावी किंवा ठपका दयावा

**(ब)** पेमेंन्ट ऑफ वेजेस ॲक्ट,१९३६ हयाच्या तरतूदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा (एकुण वेतनाच्या ३ % इतका दंड)

**(क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीने लेखी आदेशाने सस्पेन्ड करावे व

**(ड)** नोटीसीशिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

या चार शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे. "ड" प्रमाणे नोटीसी शिवाय कायमस्वरुपी बडतर्फ (डिसमीस) करावयाचे झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्यास गैरवर्तनाबाबत आरोपपत्र देवून, खातेचौकशी करावी लागेल.खाते चौकशी निष्कर्ष अहवाल प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे मत आहे.

सबब,उपरोक्त चार शिक्षेपैकी श्री.अशोक शंकरराव वाळुंज यांना कोणती एक शिक्षा करावयाची किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चालू असलेल्या जीवनदायी योजने अंतर्गत रु.६४ कोटी मात्र रकमेची बीले कोणत्या कारणांमुळे उशीराने शासनाकडे सादर झालेली आहेत, याची नैसर्गिक न्यायतत्वाच्या नियमानुसार चौकशी करणेसाठी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी व वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची समिती गठीत करणेत यावी व या समितीने पुर्ण चौकशी करुन मा.त्रिसदस्य समितीपुढे अहवाल सादर करावा. त्यानंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत निर्णय घेतला जाईल, असे ठरले.**

(कार्यवाही- क.कामगार अधिकारी, हॉस्पिटल)

---

**विषय नं.१२३** **तक्रार यु.एल.पी.क्र.२०८/२०११ श्री.सुनिल दत्तात्रय राणे विरुध्द श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी कोर्ट केसची वकील फि व इतर कोर्ट खर्च रु.५०,०००/- चे बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री.साईलिला, मुंबई कार्यालय यांचे सेवेची सस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना नोटीसीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतका नोटीस-पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रशासना तर्फे सादर करणेत आलेला नव्हता.तथापी, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील ऐत्या वेळेचा निर्णय क्रं.५९५ (०४) व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९६ अन्वये श्री. राणे यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिना मुदतीचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून देऊन, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ३५७२/२०११ दि.०७-११-२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०९-११-२०११ पासून संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत आले होते.

सदर सेवामुक्त (टर्मिनेशन) आदेशासंदर्भात श्री.राणे यांनी मा.कामगार न्यायालय (तिसरे), मुंबई येथे १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, २) श्री.किशोर रामराव मोरे साो. (कार्यकारी अधिकारी), ३) श्री.जयंत मुरलीधर ससाणे सो., तत्कालीन अध्यक्ष यांचे विरूध्द दि.१३-१२-२०११ रोजी तक्रार (यु.एल.पी) क्र.२०८/२०११ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/ २०११ कोर्ट केसमधील निशाणी यु-२ चे मनाई हुकूम अर्जा संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी श्री.राणे यांचे बाजूने अंतरिम आदेश दिलेला आहे.

मा.कामगार न्यायालयाचे सदर अंतरिम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सेवामुक्त सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय (झालेली सेवा-१० वर्षे, वय-४९ वर्षे)यांना पुन्हा तात्पुरते कामावर हजर/रूजू करून घेणेबाबतचा प्रस्ताव निर्णय होणेकामी दि.१५-०९-२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता.त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.)क्रं.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरुन सहाय्यक संपादक,श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरुपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर (सेवेत) हजर (रुजू) करुन घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपुर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते.त्याचप्रमाणेच वेतन,अनुज्ञेय भत्ते,वेतन बॅन्ड,ग्रेड-पे,इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस निर्णय क्रं.७९२ अन्वये दि.२९-०९-२०१२ रोजीचे आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे.त्यास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना पुन्हा सहाय्यक संपादक या पदावर मुंबई कार्यालय येथे कामावर हजर करुन घेणेत आलेले आहे.तथापी, श्री.राणे यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेली सदर मुळ कोर्ट केस अदयाप मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असून न्याय प्रविष्ठ आहे.

सदरचे कोर्टकेसचे वकिलपत्र ॲड.सचिन एस.शानभाग,हायकोर्ट ॲडव्होकेट,मुंबई यांचेकडे देण्यात आलेले आहे.म्हणून त्यांनी दि.२६-०७-२०१३ रोजीचे पत्रान्वये वकालत नामा,रिप्लाय ड्राफ्टींग फी,वेळोवेळी कोर्टासमोर संस्थानचे वतीने उपस्थित राहिले असून वकिल फी पोटी रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार) मिळावी अशी विनंती केलेली आहे.ॲड.सचिन एस.शानभाग यांनी संस्थानच्या वतीने दि.२३-१२-२०११, दि.०६-०१-२०१२,दि.२०-०१-२०१२,दि.१०-०२-२०१२, दि.०६-०३-२०१२, दि.२८-०३-२०१२, दि.१६-०४-२०१२, दि.०४-०५-२०१२, दि.१२-०६-२०१२,दि.१९-०६-२०१२, दि.२६-०६-२०१२, दि.२९-०६-२०१२, दि.१३-०७-२०१२, दि.१६-०७-२०१२, दि.२१-०८-२०१२, दि.१४-०९-२०१२, दि.१६-१०-२०१२, दि.०२-११-२०१२, दि.०७-१२-२०१२ या दिवशी सुनावणीकामी मा.कामगार न्यायालयात उपस्थित राहिलेले आहेत असे नमुद केलेले आहे.

श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या सदरच्या कोर्ट केसमध्ये अंतिम निर्णय आदेश होणे बाकी असुन त्यांना यापुर्वी वकिल फि पोटी ॲडव्हान्स रक्कम देण्यात आलेली नाही.औरंगाबाद खंडपीठाकडील उच्च न्यायालयातील ॲडव्होकेट यांना रु.१०,०००/- ते रु.२५,०००/- पर्यंत वकिल फि व कोर्ट खर्च कामी रक्कम यापुर्वी अदा करणेत आलेली आहे.हायकोर्ट ॲडव्होकेट यांना किती रक्कम वकिल फि व कोर्ट खर्च म्हणून अदा करावी याबाबत फिक्स असे शेडयुल ठरविणेत आलेले नाही.

सबब, श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला,मुंबई कार्यालय यांनी संस्थान विरुध्द मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्रं.२०८/२०११ कोर्ट केस संदर्भात मागणी केलेल्या रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) रक्कमेपैकी किती रुपये श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांना वकील फी पोटी अदा करावी या संदर्भात निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तक्रार यु.एल.पी.क्र.२०८/२०११ श्री.सुनिल दत्तात्रय राणे विरुध्द श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी या केसमध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे श्री.सचिन एस.शानभाग, हायकोर्ट ॲडव्होकेट, मुंबई यांनी सदर तक्रारीमध्ये पुढे अपील करायला संधी नाही, त्यामुळे दि.२६.०२.२०१४ रोजीचे आदेशान्वये कार्यवाही करणेत यावी, असे तोंडी सांगितल्याचे समजले, तसे त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, त्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२४** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे कोर्ट केसबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, बी.ए. (मराठी), पत्रकारितेचा डिप्लोमा पूर्ण हे जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १०५८८/ २००१ दि.०५-१०-२००१ रोजीचे आदेशास अनुसरून संस्थानचे मुंबई कार्यालय येथे सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर दि.०१-१०-२००१ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतका नोटीस-पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रशासनातर्फे सादर करणेत आलेला नव्हता. तथापि, प्रशासनाचा प्रस्ताव नसतांना मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५९५ (०४) व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९६ अन्वये " मुंबई येथील श्री साईलिला संपादकीय कार्यालय शिर्डी येथे हलविणेत येऊन, या कार्यालयाची संपादकीय जबाबदारी श्री.मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर सोपविणेत यावी. सध्या श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने, त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतना इतका नोटीस पे देऊन सेवा मुक्त करण्यात यावे. तसेच श्री साईलिला अंक द्वैमासिक काढण्याऐवजी प्रत्येक महिन्यास काढण्यात यावा. प्रत्येक अंक प्रकाशित करण्यापूर्वी सदरचा अंक मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.वि.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांना प्रथम दाखविण्यात यावा." असा निर्णय पारीत करणेत आला होता. त्यानुसार श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिना मुदतीचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून देऊन, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५७२/२०११ दि.०७-११-२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०९-११-२०११ पासून संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत आले होते.

सदर सेवामुक्त (टर्मिनेशन) आदेशासंदर्भात श्री.राणे यांनी मा.कामगार न्यायालय (तिसरे), मुंबई येथे १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, २) श्री.किशोर रामराव मोरे साो. (तत्कालीन कार्यकारी अधिकारी), श्री.जयंत मुरलीधर ससाणे साो., तत्कालीन अध्यक्ष यांचे विरूध्द दि.१३-१२-२०११ रोजी तक्रार (यु.एल.पी) क्र.२०८/२०११ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे.

श्री.राणे यांनी संस्थान विरूध्द दि.०७-११-२०११ रोजीचा सेवामुक्ती (टर्मिनेशन) आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा, मागील सेवा सलग धरून, बॅक वेजेससह पुर्ववत कामावर रूजू

करून घेणेत यावे. याकरीता दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केसमधील निशाणी यु-२ चे अर्जा संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिलेला आहे.

**ORDER**

1. Application is partly allowed.
2. The Respondents are hereby directed to allow the complainant temporarily to work on his previous post till pending and final disposal of the main complaint.
3. If the Respondents are not willing to allow him to resume duties temporarily, in that event, his 50% salary be paid to him till pending and final disposal of the main complaint from the date of his termination.

Mumbai :
Dated :21.08.2012

(G.G.Hulsure)
Presiding Officer,
Third Labour Court, Mumbai

उपरोक्तप्रमाणे मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भात दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशा संदर्भात संस्थान ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग, मुंबई यांचेशी दि.२८-०८-२०१२ रोजी दुरध्वनीवरून चर्चा केली आहे. चर्चेअंती ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग यांनी मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना पुर्वीप्रमाणेच सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई किंवा शिरडी कार्यालय येथे सेवामुक्त करणेपूर्वी जे मासिक वेतन/पगार, अनुज्ञेय भत्ते व वेतन बॅन्ड देय्य होते. त्याच मासिक वेतन/पगारावर नियमित वार्षिक वेतनवाढीसह वेतन/पगार अधिक अनुज्ञेय भत्ते/वेतन बॅन्ड, ग्रेड-पे इत्यादीसह तात्पुरते स्वरूपात कामावर(सेवेत) हजर(रूजू) करून घेणेत यावे.

किंवा मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास स्थगिती मिळावी, सदरचा अंतरिम आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होऊन मिळावा या कामी श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे संस्थानचे वतीने दि.२०-०९-२०१२ अखेर रिव्हीजन अर्ज दाखल करणेत यावा. अशा सुचना चर्चेअंती दिल्या होत्या.

म्हणून सदर न्यायालयीन प्रकरणा संदर्भातील मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशास अनुसरून योग्य तो निर्णय घेणेकामी प्रस्ताव तयार करून, तो मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५-०९-२०१२ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.७९२ अन्वये "श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरूपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर(सेवेत) हजर (रूजू) करून घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपूर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते. त्याचप्रमाणेच वेतन, अनुज्ञेय भत्ते, वेतन बॅन्ड, ग्रेड-पे, इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस मान्यता देणेत आली."असा निर्णय पारित झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-०९-२०१२ रोजीचे निर्णय क्र.७९२ यांस अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचा अंतिम आदेश होईपावेतो तात्पुरते स्वरूपात जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९१०/२०१२ दि.२९-०९-२०१२ रोजीच्या आदेशान्वये दि.०१/१०/२०१२ पासून कामावर/सेवेत हजर/रूजू करून घेणेत आलेले आहे.

त्यानंतर आता श्री.राणे यांनी संस्थान विरूध्द दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केस संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२८-०२-२०१४ रोजी खालीलप्रमाणे अंतीम आदेश (Judgement) दिलेले आहे.

**ORDER**

1. Complaint is hereby allowed.
2. It is hereby declared that,respondents have engaged in unfair labour practices under item 1 (b) and (f) of Sch.IV of the said Act by terminating the services of the complainant w.e.f.7/11/2011 and hereby directed to desist the same.
3. The respondents are hereby further directed the complainant is entitled for reinstatement and continuity of service with full back wages and as he was reinstated w.e.f.1/10/2012,to give continuity of service and full back wage from the date of termination i.e.7/11/2011 till 1/10/2012.
4. In the discussed facts respondents should pay cost of Rs.3,000/- to the complainant.

Mumbai :
Dated :28.02.2014

(G.G.Hulsure)
Presiding Officer,
Third Labour Court, Mumbai

उपरोक्त आदेशास अनुसरुन तक्रारदार श्री.राणे यांचे ॲडव्होकेट श्री.अशोक बी.सोनवणे यांनी दि.१०-०३-२०१४ रोजीचे पत्रान्वये,"मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांचे दि.२८-०२-२०१४ रोजीचे आदेशाप्रमाणे"तक्रारदार श्री.राणे यांना दि.०७-११-२०११ ते दि.०१-१०-२०१२ या कालावधीतील अनुज्ञेय असलेले सर्व फायदे व कॉस्ट रक्कम रु.३,०००/- तात्काळ आदा करावी अन्यथा योग्य ती पुढील कारवाई केली जाईल."असे कळविले आहे.

याबाबत संस्थान ॲडव्होकेट श्री.सचीन एस.शानभाग,मुंबई यांचेशी मोबाईल दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांना मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं.२०८/२०११ संदर्भात दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतिम आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी अशा सुचना चर्चेअंती दिल्या आहेत.

सबब, मा.तिसरे कामगार न्यायालय,मुंबई यांनी तक्रार यु.एल.पी.क्रं.२०८/२०११ संदर्भात दि.२८-०२-२०१४ रोजी दिलेल्या अंतीम आदेशास अनुसरुन श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला,मुंबई कार्यालय यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ ए/२९१०/२०१२ दि.२९-०९-२०१२ अन्वये देण्यात आलेला नेमणूक आदेश कायम करुन श्री.राणे हे मागील कालावधीतील पुर्ण वेतन फुल बॅक वेजेस सह सलग नोकरीत पुर्ववत घेण्यास पात्र असल्यामुळे त्यांना दि.०७-०११-२०११ पासून ते दि.०१-१०-२०१२ या मागील एक वर्ष कालावधीतील पुर्ण वेतन,अनुज्ञेय भत्ते,वेतन बँड,ग्रेड पे इत्यादी वार्षिक वेतन वाढीसह आदा करण्यास व कॉस्टची रक्कम रु.३,०००/- श्री. राणे यांना आदा करण्यास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२५ शिकाऊ उमेदवारी योजना अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवाराचे विद्यावेतन दर वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या विद्युत विभाग,आय.टी.आय.,कनिष्ठ महाविद्यालय, माहिती तंत्रज्ञान विभाग, लेखाशाखा विभाग व वाहन विभाग या वेगवेगळया विभागामध्ये शिकाऊ उमेदवारांची व्यवसायानुसार एक व दोन वर्षासाठी शिकाऊ उमेदवार म्हणुन भरती केली जाते. या जागा दरवर्षी भरावयाच्या असतात.

सदर उमदवारांना शिकाऊ उमेदवारी काळात प्रतीमहा शासनाच्या नियमांनुसार विद्यावेतन देण्यात येते. पुर्विच्या विद्या वेतनामध्ये शासनाने त्यांचे कडील पत्र क्र.मुसुकेंअ/ एटीएस/ २०१४/ १२५/ दि.०३-०३-२०१४ नुसार दि.२७/०९/२०१३ पासुन वाढ केलेली आहे.त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वर्षे | पुर्वीचे विद्यावेतन दर | सुधारीत दराने द्यावयाचे विद्यावेतन रूपये |
|---|---|---|---|
| १. | प्रथम वर्षे | १४९०/- | २१००/- |
| २. | व्दितीय वर्षे | १७००/- | २४००/- |
| ३. | तृतीय वर्षे | १९७०/- | २८००/- |
| ४. | चतुर्थ वर्षे | २२२०/- | ३१००/- |

सदरील शासन निर्णयाप्रमाणे वाढीव विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना राजपत्र दर्शविलेल्या सुधारीत दराने दि.२७-०९-२०१३ पासुन आदा करण्यात यावे असे कळविले आहे.आपले आस्थापनेमध्ये ऑक्टोंबर-२०१३ सत्रामध्ये खालील व्यवसायाचे शिकाऊ उमेदवार वेगवेगळया विभागामध्ये भरती केलेली आहे.त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.शासन राजपत्रा प्रमाणे विदयावेनात वेळोवेळी होणारी वाढ (सुधारीत विद्यावेतन) शिकाऊ उमेदवार यांना लागु करणे संस्थानवर नियमानुसार बंधनकारक आहे.

| अ. नं. | व्यवसाय | शिकाऊ उमेदवार संख्या | सध्याचे विद्यावेतन रूपये | वाढीव विद्यावेतन रूपये | वाढीव दराने प्रतिमहा प्रति शिकाऊ उमेदवार | | एकुण वाढीव बोजा प्रतिमहा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रति महा | एकुण | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | वेल्डर(गॅस व इले.) | ०६ | १७००/- | २४००/ | ७००/- | ४२००/- | २४,७४०/- |
| २. | विजतंत्री (इले) | ०६ | १९७०/- | २८००/ | ८३०/- | ४९८०/- | |
| ३. | आर.ए.सी.मेकनीक | ०४ | १९७०/- | २८००/ | ८३०/- | ३३२०/- | |
| ४. | मेकॅ.मोटार व्हेईकल | ०२ | १९७०/- | २८००/ | ८३०/- | १६६०/- | |
| ६. | कोपा/पासा | ०८ | १७००/- | २४००/ | ७००/- | ५६००/- | |
| ७. | आय.टी.ॲन्ड ई.एस.एम. | ०६ | १९७०/- | २८००/ | ८३०/- | ४९८०/- | |

तरी वरील शासन निर्णयानुसार शिकाऊ उमेदवारांना सुधारीत दराने वाढीव विद्यावेतन दि.२७/०९/२०१३ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने देणेस (लागु करणेस) व देय तारखे पासुन फरकाची रक्कम आदा करणेस तसेच या पुढे शासन निर्णयानुसार शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतनात वेळोवेळी होणारी वाढ (सुधारीत विदयावेतन) मंजुर करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२६ श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. सुब्रामणी राजू व प्रसाद बाबू, बंगलोर यांनी आपले पत्र आवक क्र २०६९२ दि.०६/०३/२०१४. पत्रान्वये कळविले की, श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१४ निमित्ताने दिनांक १२/०७/२०१४ रोजी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे, तसेच त्यांनी अर्जामध्ये फुल सजावटी येणाऱ्या कारागीरांची मोफत राहण्यासाठी व दर्शनासाठी सोय करणेस मागणी केलेली आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान,संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते, सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री आंनद इंगवले, नवी मुंबई यांनी मकर संक्राती निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात फुल सजवट करण्यास परवानगी दिलेली होती. मागील वर्षी श्री रामनवमी उत्सवासाठी श्री देवराज, कर्नाटक यांना फुल सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे व श्री रामनवमी उत्सव -१४ साठी श्रीमती रिम्पल लोहिया, माजी विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी. यांना फुल सजावट करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संरक्षण विभागा मार्फत फुल सजावटीचे सामान तपासणी करण्यात येते, फुल सजवाटीचे काम करणारे कारागीर यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटो इ. माहिती घेण्यात येते.

श्री सुब्रामणी राजू व प्रसाद बाबू, बंगलोर यांना श्री गुरुपौर्णिमा उत्सवा निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरास फुल सजावट करणेस परवानगी देणेस व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी ०१ AC रुम, दर्शन , भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत करता येईल

मंदीर व मंदीर परिसरात फुल सजावट करणेस व देणगीदार,फुल सजावट करणारे कारागीर यांना राहण्याची,जेवणाची, दर्शनाची सोय करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. सुब्रामणी राजू व प्रसाद बाबू, बंगलोर यांच्या विनंतीनुसार त्यांना श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात यावी व फुल सजावटदार यांना निवासासाठी ०१ ए.सी. रुम, सजावट करणारे कारागीर यांना निवास आणि सामान ठेवणेसाठी ०१ हॉल तसेच त्यांची प्रसादभोजन व दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, पुढील प्रत्येक उत्सवापुर्वी, उत्सव निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेकामी नावनोंदणी चालू आहे, या आशयाचे संस्थानचे संकेत स्थळावर व ठिक-ठिकाणी फलक लावणेत यावेत. त्याकरिता जास्त भक्तांनी नावनोंदणी केल्यास सर्वांना संधी देणेसाठी मंदिर व मंदिर परिसराचा भाग फुलांची सजावट करणेसाठी विभागुन देणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख / अधिक्षक, श्री साईप्रसाद निवासस्थान/ अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१२७ लेंडीबाग परिसरातील नंदादिप मंदीराजवळ पिंपळवृक्षांची छाटणी (डहाळणी) करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेंडीबागेत नंदादीप या ठिकाणी पिंपळ वृक्ष आहे. या पिंपळझाडांच्या दर्शनासाठी साई भक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. या पिंपळाच्या झाडांवरील पानावर काजळीचा थर येवून सदरची पाने काळी पडतात. सकाळ व सायंकाळचे वेळेस या पानातून काळा चिकट द्रव्य झाडांच्या खाली पडते त्यामुळे मंदीर परिसरातील फरशी, इमारत व पिंपळ झाडा खाली उगवलेली झाडे काळी पडतात व भक्तांच्या अंगावर चिकट द्रव्य पडते.

मंदीर परिसरातील पिंपळ झाडांवर काजळी सारखा, चिकट द्रव्य पडत असल्याने या बाबत संस्थान मार्फत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी यांचेशी संपर्क साधण्यात आला त्यावेळेस कृषी विद्यापीठ येथील वनस्पती रोगशास्त्र व अणूजीव शास्त्र विभागा श्री डॉ. खोत साहेब व श्री. पवार यांनी शिर्डी येथे येवून पिंपळ झाडांची समक्ष पाहणी केली. त्यांनी या झाडांवर पडलेल्या रोगा बाबत औषध फवारणी करण्याचे सुचविले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व कृषी अणुजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जी.जी. खोत, सहयोगी प्राध्यापक डॉ बी.एम. ईल्हे आणि किटकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.एस.के पाटील यांनी दिनांक ०२/०२/२०१४ रोजी श्री साईबाबा संस्थान मंदीर परिसरातील प्रादुर्भावित पिंपळ वृक्षांची पाहणी केली.

सदरहू चमुने पाहणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, पिंपळाच्या संपूर्ण झाडांवर खवले/ देवी कीड (स्केल इनसेक्ट) या किडीचा प्रार्दुभाव झाल्याचे आढळून आले आहे. या किडीच्या प्रादुर्भावामुळे झाडांच्या फांदया वाळलेल्या आहेत. तसेच या किडीचा चिवट स्त्राव पानांवर पसल्यामुळे पाने काळी पडलेली आहे व त्यावर काळया बुरशीची वाढ झालेली आहे. त्यामुळे पानातील प्रकाशसंष्लेषण क्रियेवर परिणाम झालेला असून सदर झाडाचा काही भाग वाळलेला आहे. सदर चमुने अभ्यासाअंती खालील प्रमाणे शिफारशी केल्या आहेत. झाडावरील किड व रोगग्रस्त वाळलेल्या फांदया छाटून व जाळून नष्ट कराव्यात.

या किडीच्या नियंत्रणासाठी मॅलशिऑन ५० ईसी. ३० मि.ली १० लिटर पाणी याप्रमाणे १० ते १२ दिवसाच्या अंतराने गटूर / एचटा. पी स्प्रे पंपाने झाडावर दोन फवारण्या कराव्यात.

या किडीच्या जैविक नियंत्रणासाठी व्हर्टीसिलीयम लेकॅनी ( फुले बगीसाईड) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संध्याकाळच्या वेळी १० ते १२ दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. फवारणी करण्यापूर्वी ७ ते ८ तास अगोदर व्हर्टीसिलीयम लेकॅनी (फुले बगीसाईड) पाण्यात भिजत घालावे. फवारणीच्या वेळी पाण्यात व्हर्टीसिलीयम लेकॅनी बरोबर ५० मिली प्रती १० लिटरा पाण्यात दूध मिसळावे. फवारणी करतेवेळी परिसर निर्मनुष्य करावा.

म.फुले कृषी विद्यापीठ येथील शास्त्रांनी दिलेल्या सुचनेनुसार झाडावरील किड व रोगग्रस्त वाळलेल्या फांदया छाटून व जाळून नष्ट कराव्यात. यानुसार लेंडीबाग परिसरातीला नंदादीप जवळील पिंपळवृक्षाची फांदया छाटणी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावर निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.४१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२८ श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळांची विक्री करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधे १४(२) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबात असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पणवस्तुंची लिलावाव्दारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

साईभक्त फुले, हार, समाधीवर किंवा मुर्तीवर फेकतात. अनावधानाने नारळ फेकल्यास मुर्तीला इजा होऊ शकते. अथवा नाराळामध्ये बॉम्ब सारखी वस्तू घेवुन येऊ शकतात. करिता दर्शन रांगेमध्ये लाडू वाटपाचे ठिकाणी नारळ जमा करुन घेणे बाबत कार्यवाही करणे. असे संरक्षण विभागाने कळविलेले आहे. सुरक्षेच्या दुष्टीने त्यानुसार बगीचा विभागा मार्फत श्रींना अर्पण केलेले नारळ व हार गोळा करण्यात येतात. जमा झालेल्या नारळ फळांची विक्री करण्यात येते व हार ,फुले या निर्माल्याची विल्हेवाट लावण्यात येते. यापूर्वी साईभक्त हे दर्शनासाठी आले नंतर आपल्या बरोबर आणलेले नारळ मंदीर परिसरातील नारळ स्टॉलच्या खोलीत नारळ फळे अर्पण करत असे दिनांक ०२/११/२०१३ पासून संरक्षण विभागा मार्फत प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ या ठिकाणाहून साईभक्त दर्शनासाठी आत दर्शन रांगेत येतांना त्यांची संरक्षण विभागा मार्फत तपासणी करुन साईभक्तां कडील नारळ फळे प्रवेश व्दार नं ०१,०२,०३,०४ या ठिकाणी काढले जातात/ जमा केली जातात, त्यानंतर साईभक्तांना दर्शन रांगेत दर्शनासाठी सोडले जाते.

जमा झालेले नारळ फळांची जुने प्रसादालय इमारत या ठिकाणी साठवण करुन संस्थानच्या दैनंदिन वापरा व्यतरिक्त शिल्लक राहिलेले नारळ फळे विक्री करण्यात येत.

दिनांक १७/०७/२०१३ ते दिनांक ३०/०६/२०१४ या कालावधीसाठी श्री इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगांव यांना टेंडर देण्यात आलेले आहे. त्यांची संपण्याची मुदत जुन- २०१४ अखेर आहे. ( दिनांक १७/०७/२०१४ ते दिनांक ३१/०३/२०१४ अखेर रु.१५,९७,१५०/- मात्र रक्कमेची नारळ फळे विक्री करण्यात आली आहे.) नारळ फळे विक्री करणेकामी प्रशासकीय मंजूरी घेण, वर्तमान पत्रात जाहिरात

देणे, दरपत्रके मागविणे, मा. व्यवस्थपन समितीचे सभेत व्यापाऱ्यांना वाटाघाटी बोलविणे, ऑर्डर देणे.इ. कामात वेळ जाणार असल्यामुळे सदर टेंडरची प्रक्रिया लवकर करणे आवश्यक आहे.

समाधी मंदीरात दर्शनासाठी दर्शन रांगेत प्रवेश करतांना साईभक्तां कडून प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ या नारळ फळे काढून घेण्यात येतात / जमा करण्यात येतात, जमा केलेले नारळ फळे संस्थान कामासाठी सत्यनारायण पुजा, अभिषेक पुजा, प्रसादालय या ठिकाणी देवून शिल्लक राहिलेले नारळ फळांची विल्हेवाट लावणेसाठी विक्री करणेसाठी माहे-जुलै-२०१४ ते जून २०१५ या कालावधीसाठी विक्री करता येईल.

प्रवेश व्दार नं ०१, ०२,०३,०४ येथे जमा झालेले नारळ फळे यांची संस्थान वापरा व्यतिरिक्त शिल्लक राहिलेले नारळ फळे यांची वर्तमान पत्रात जाहिरात देवून विक्री करणेसाठी, दरपत्रक मागवून उच्चत्तम दरांने विक्री करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२९ कुंडयांमधील रोपे खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागा मार्फत संस्थान परिसरात शोभेची रोपे/ झाडे लावून परिसर सुशोभित करण्यात आलेला आहे. या मध्ये लेंडीबाग, जनसंपर्क कार्यालय समोरील परिसर व मंदीर परिसर या विविध प्रकारची शोभेची झाडे/ रोपे लावण्यात आलेली आहेत.

तसेच बगीचा विभागामार्फत संस्थान परीसर व ऑफीस तसेच वेळोवळी कार्यक्रमासाठी व उत्सवा निमीत्ताने शोभेच्या कुंडया ठेवल्या जातात. उत्सव काळात साईभक्तांकडुन बऱ्याच कुंडयांच्या रोपाचे नुकसान होते.

सदरच्या कुंडयामधील रोपांना ४ ते ५ वर्ष झालेले आहेत. सदरचे रोपे खराब झाल्यामुळे ते बदलणे आवश्यक आहे. संस्थानकडे सध्या १४०० नग प्लास्टिक कुंडया आहेत. संस्थानच्या ग्रीन हाउुस कडे सर्व कुंडया ठेवलेल्या आहेत. साधारण ४०० प्लास्टिकच्या कुंडया रिकाम्या आहेत. साधारणतः २५० रु. रोपाप्रमाणे ४०० कुंडयातील रोपांना साधारणतः रु.१,००,००० (एक लाख) खर्च येईल. सर्व कुंडयातील रोपे हि विविध फुलांची व पानांची मोठया साईजचे रोपे असतील. तरी सदरची रोपे खरेदी करण्यासाठी आपणास वेगवेगळया नर्सरी कडुन कोटेशन मागुन न्युनत्तम दराने खरेदी करता येईल.

सदर कुंडयामधील शोभेची रोपे खरेदी करण्याकामी अंदाजे रु १,००,००० ( एक लाख ) खर्च अपेक्षीत आहे.

कुंडयामध्ये शोभेची रोपे लावण्यासाठी रोपे खरेदी करण्यासाठी व याकामी येणा-या रु.१,००,००० (एक लाख मात्र) खर्चास मा. त्रिसमीतीच्या सभेपुढे सदर विषय मंजुर करुन मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे समोर कोटेशन उघडुन मान्यता घेता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होण्यास विनंती.

**निर्णय क्र.४१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंडयांमध्ये लावण्यासाठी शोभेची रोपे विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच शोभेची रोपे खरेदी करणे अगोदर देणगीदार साईभक्तांकडून देणगीदाखल मिळतात का ते पहावे, देणगीदाखल मिळत नसल्यास संस्थानमार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावी. असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३० मंदिरातून निघणारे हार व फुलांपासून सुगंधी द्रव्ये बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** एरोव्होना इको सोसीयल डेव्हलपमेंट यांचे को फाउुंडर श्रीमती अमिता देशपांडे यांनी श्री साईबाबा संस्थानमध्ये सर्व अधिकारी यांच्या उपस्थितीत पर्यावरणासंबंधी माहे फेब्रुवारी २०१४ रोजी एक मिटींग घेतली होती. यामध्ये त्यांनी मंदिराच्या परीसरात व मंदिरातुन निघणारा कचरा याची विल्हेवाट योग्य प्रकारे लावता येईल व सुगंधी औषधी वनवृक्षाची लागवड करुन पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. व प्रसादलयात बायोगॅस प्रकल्पाची निर्मीती करता येईल. असे सुचवीले आहे.

या अनुशंघाने दिनांक १२/०५/२०१४ रोजीच्या फॅक्स नुसार मंदिरातुन निघणारे दररोजचे ५०० ते १००० किलो फुलांचे निर्माल्य यापासुन गुलाबपाणी व अगरबत्ती यासारखे उत्पादन तयार करता येईल. यासाठी central Intstitute of medicinal and Aromatic Plants ,लखनौ हि केंद्र शासनाची संस्था हा उपक्रम राबवत आहेत.

श्री साईबाबा संस्थान, लखनौ येथील केंद्रीय संस्था व एरोव्होना इको सोसीयल डेव्हलपमेंट या तीनही संस्था मिळुन आपण गुलाबपाणी व आगरबत्ती बनविण्याचे काम करता येईल असे सुचविले आहे. या उपक्रमाची पुर्तता ८ आठवडयात होणार असुन यापासुन शिर्डी व आसपासच्या लोकांना रोजगार मिळेल.

आगरबत्ती व गुलाबपाणी हा उपक्रम राबवताना एरोव्होना इको सोसीयल डेव्हलपमेंट हया लखनौ येथील central Intstitute of medicinal and Aromatic Plants लखनौ व साईबाबा संस्थान यांच्यामधील दुवा (co-ordination) म्हणुन काम पाहणार आहेत. त्यामध्ये मशिनरी, प्रशिक्षण व उपक्रमाची उभारणी कागदपत्राची पुर्तता करणार आहेत. यासाठी त्यांनी फी म्हणुन ९६,००० रु. मागणी केलेली आहे. व प्रकल्प पुर्ण होई पर्यत त्यांनी २ व्यक्तींना येण्या जाण्याचा खर्च व राहण्याची सोय करावी. तसेच ५०% ॲडव्हान्स सुरवातीला देवुन उर्वरीत ५०% रक्कम २ महिन्यानंतर दयावे. व दोन महिन्यात प्रकल्प पुर्ण करणार असे कळविलेले आहे.

सदर प्रकल्पात खर्चाबाबत समावेश असल्यामुळे व आर्थिक दृष्ठया फायदयाचा आहे किंवा नाही या सर्व बाबी तपासणी करणे आवश्यक आहे. सदरचा प्रकल्प हा प्रायोगीक तत्वावर राबवुन त्यानंतरच संस्थानने करावयाचा किंवा नाही याबाबत निर्णय घेता येईल.

सदरच्या प्रस्तावावर निर्णय होण्यास विनंती.

**निर्णय क्र.४१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिरातून निघणारे हार व फुलांपासून सुगंधी द्रव्ये बनविणेकामी संस्थानचे संकेत स्थळावर तसेच मंदिर परिसरामध्ये ठिक-ठिकाणी फलक लावणेत येऊन प्रसिध्दी देण्यात यावी व अशा प्रकारे काम करणाऱ्या संस्थांकडून कोटेशन मागविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३१ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या साफसफाई कामासाठी संस्थानमार्फत ४० कंत्राटी सफाई कामगार पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व साईबाबा मंदिरा बाहेरील परिसरातील रस्ते साफसफाई करणेसाठी शिर्डी नगर पंचायतीचे आरोग्य विभागाकडील कर्मचारी कमी पडतात.त्यामुळे नगर मनमाड रोड, (लक्ष्मीनगर ते ५०० रुम) मनोज कुमार पथ, या रस्त्यांची साफ सफाई करणे करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी नगरपंचायतला दिलेले ४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांची मुदत दि.३१ मार्च २०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

दि.१ एप्रिल २०१४ ते दि.३१ मार्च २०१५ पुढील वर्षाच्या कालावधी साठी मुदत वाढ मिळणे कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि. २५/०२/२०१४ चे पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.३०/०३/२०१३ रोजीचे सभेपुढील विषय नं. ५६ निर्णय क्र. ३१८ ने ०१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत.

नगरपंचायतीचे दि. २५/०२/२०१४ चे विनंती पत्रानुसार उपरोक्त कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

**४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्च:-**

| अ.क्र. | तपशील | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २५३=११ |
| २ | प्रॉ.फंड १३.६१% | ३४=४४ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.७५% | ०=२५ |
| | एकूण | २८७=८० |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | ३५=५७ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | ३२३=३७ |
| ६ | प्रति दिन ४० कर्मचारी रु. | १२९३४=८० |
| ७ | प्रति दिन ४० कर्मचारी ३६५ दिवसांकरीता | ४७२१२०२=०० |
| ८ | +१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | ४७२१२०=२० |
| | **एकुण रुपये -** | ५१९३३२२=२० |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या कर्मचा-यांचे वेतनापोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रुपये ५१,९३,३२२/- (अक्षरी रुपये एक्कावन्न लाख त्र्यान्नव हजार तिनशे बावीस ) मात्र पर्यंत खर्च येईल.

या करीता सन २०१४-२०१५ चे आरोग्य विभागाचे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.१३२ लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करीता वार्षिक इंधन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** २१ (१) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्ताविक-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर, वाहन इ. विभागाकडील चादर, बेडशीट, रग, गादीकव्हर, उशीकव्हर, बसेसचे शीटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात. याकामी लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार दोन पाळयांमध्ये करण्यात येते. सदरचे कपडे धुण्याचे कामी २ युनिट (दोन मशिनरी) कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्याद्वारे प्रतिदिवशी (दोन शिफ्ट असल्यास) साधारणपणे १५०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

धुण्यासाठी येणा-या कपडयामध्ये प्रामुख्याने निवासस्थाने विभागाकडील व्ही.आय.पी.खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी स्टीम बॉयलरव्दारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात. धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो. याकरीता कॅलेन्डरींग मशिनला स्टीम सोडावी लागते, मशीनमध्ये धुवून पिळलेले बेडशीट, उशीकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होवून बाहेर पडतात. यासर्व मशिनसाठी स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. त्याकरीता डिझेल, ऑईल, ग्रीस एस.के.जी.ज् साई सिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे पेट्रोल पंपावरुन आवश्यकतेनुसार खरेदी केले जाते. माहे एप्रिल-२०१३ ते माहे मार्च-२०१४ अखेर ६,४०८ लिटर डिझेल खरेदी करुन वापरण्यात आलेले आहे. स्टिम बॉयलर करिता दररोज सरासरी २० लिटर डिझेल (दरमहा ६०० लि.डिझेल) लागते, एका वर्षाकरीता स्टिम बॉयलर व कॅलेंडर मशिनकरीता ०८ लिटर ऑईल व सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीस लागते.

**मागणी-** माहे जुलै-२०१४ ते माहे जुन-२०१५ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७५०० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी ०८ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीसची आवश्यकता भासणार असून त्याकामी अंदाजे रु.५,७०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख सत्तर हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे डिझेल, ऑईल, ग्रीस एस.के.जी.ज् साई सिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे पेट्रोल पंपावरुन अथवा योग्य भाव देणा-या मान्य झालेल्या इतरांकडून खरेदी करता येईल.

**संस्थान अधिनियम यानुसार छाननीकरुन अनुमान-** नमूद आधिनियमातील तरतुदी नुसार संस्थानकडे असणा-या मशिनरी करीता इंधनाची आवश्यकता असल्याने ते खरेदी करावे लागेल.

**विभागाचा अभिप्राय-** माहे जुलै-२०१४ ते माहे जुन-२०१५ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७५०० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी ०८ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीसची आवश्यकता असून त्याकामी अंदाजे रु.५,७०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख सत्तर हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.सदरचे डिझेल,ऑईल,ग्रीस एस.के.जी.ज् साई सिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे पेट्रोल पंपावरुन अथवा संस्थानचे मान्य त्या निम्नधारकाकडून खरेदी करता येईल.

वरीलप्रमाणे इंधन खरेदीस अंदाजे रुपये ५,७०,०००/- (अक्षरी रु.पाच लाख सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.सन २०१४/२०१५ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च याबाबीकरीता रुपये १२,००,०००/- मात्रची तरतुद आहे.

तरी माहे जुलै-२०१४ ते माहे जुन-२०१५ या एका वर्षाचे कालावधीकरीता उपरोक्तचे खर्चास मान्यता मिळणेस व शिरस्त्याप्रमाणे एस.के.जी.ज् साई सिध्दी पेट्रोलियम, शिर्डी यांचे पेट्रोल पंपावरुन अथवा संस्थानचे मान्य त्या निम्नदरधारकाकडून आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मान्यता देणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१३३ साईबाबा भक्तनिवासस्थान कार्यालयाकरीता खुर्च्या खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** २१-१-क- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावीक -** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत सन - १९९४ पासुन साईभक्तांचे सेवेत आहे. सदर इमारतीमध्ये एकुण ५४४ खोल्या व हॉल, दुकान गाळे आहेत. सदर पैकी ४८४ खोल्या साईभक्तांचे वापरासाठी उपलब्ध आहेत. त्यामध्ये ३५० खोल्या ऑनलाईन आरक्षणासाठी व १३४ खोल्या थेट येणा-या साईभक्तांसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत.

पुर्वी ज्या ठिकाणी आरक्षणाकामी काऊंटरचे निर्माण केलेले आहे तेथुनच सध्या खोली आरक्षणाचे काम केले जात आहे. सदर ठिकाणी साईभक्तांची होणारी गर्दी तथा अडचण विचारात घेऊन तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री किशोर मोरे सो. यांनी खोली आरक्षण काऊंटर अद्ययावत व प्रशस्त

करणेबाबत निर्देश दिल्याने सध्याचे काऊंटरचे उत्तर बाजुस नविन काऊंटर व प्रशासकिय कार्यालयाचे काम पुर्णत्वाचे मार्गावर आहे.

**विभागाची मागणी-** सदर ठिकाणचे काऊंटर तथा कार्यालयासाठी चांगल्या दर्जाच्या खुर्च्या खरेदी केल्यास कर्मचा-यांची कार्यक्षमता वाढुन कार्यालयाचे देखणेपणामध्ये निश्चितच भर पडेल, असे नम्र मत आहे. सध्या विभागाकडे असणा-या खुर्च्या सततच्या वापराने खराब झालेल्या आहेत. आवश्यक खुर्च्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं | तपशिल | आवश्यक नग | अंदाजे किंमत प्रती नगास रुपये | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ऑफिस खुर्ची- गोदरेज कंपनी (एक्झीक्युटीव्ह चेअर, हायबॅक) अधिक्षक यांचेकरीता कोड नंबर- Premier- ७१०१ - R | ०१ | ८,०००/- | ८,०००/- |
| २ | खोली आरक्षण काऊटंर करीता गोदरेज - Starr - ५D O २ R | ०५ | ५०००/- | २५,०००/- |
| | **एकुण -** | **०६** | **---** | **३२,०००/-** |

**(अक्षरी रुपये- बत्तीस हजार मात्र)**

**छाननी करुन अनुमान-** उपरोक्तप्रमाणे खुर्च्या खरेदीकामी अंदाजे रुपये ३२,०००/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतूद सन- २०१४/ २०१५ चे मंजुर अर्थसंकल्पीय रक्कमेतून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय-** तरी उपरोक्तप्रमाणे खुर्च्या खरेदीकामी येणा-या अंदाजे रुपये ३२,०००/- मात्रचे खर्चास तथा खुर्च्या नामांकित कंपनीकडून खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभे समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे कार्यालयाकरीता आवश्यक असलेल्या नामांकित कंपनीच्या खुर्च्या विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१३४ साईआश्रम भक्तनिवास विभागातील प्रत्येक निवासी खोल्यांमध्ये श्री साईबाबांच्या फोटो लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भक्तनिवास विभागाकडे साईभक्तांचे निवासासाठी एकुण १२ इमारती असून एका इमारतीमध्ये एकूण ४ माळे मिळुन १२८ खोल्या याप्रमाणे १२ इमारती मधुन १५३६ खोल्या आहेत.

या निवास खोल्यांमध्ये श्री साईबाबांचा एक फोटो दर्शनासाठी असावा जेणेकरुन खोलीमधील वातावरण प्रसन्न राहील. या करिता साईभक्त श्री. अर्जुन रान्डेर, बोधन (आंध्रप्रदेश) यांनी पत्राद्वारे सूचना केलेली आहे.

भक्तांने दिलेल्या सूचनेचा विचार करुन या विभागातील प्रत्येक खोली मध्ये साईबाबांचा फोटो लावणेबाबत विचार करता येईल.

यासाठी एका इमारती मधील १२८ खोल्यांमध्ये एकाच पोजमध्ये,याप्रमाणे १२ इमारती मधून १२ वेगवेगळे पोजमध्ये १६ इंच x २० इंच या साईजच्या फोटो साठी अंदाजे रु. ४५०/- प्रति नग खर्च येईल. एकूण १५३६ नग फोटो साठी अंदाजे रु.६,९१,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी

१) १५३६ नग फोटो विहीत पध्दतीचा अवलंब करुन खरेदी प्रक्रिया करण्यास, व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ६,९१,२००/- च्या खर्चास

**किंवा**

सदरचे फोटो देणगी स्विकारण्यास व एकाच साईभक्तांकडून इतक्या मोठया किमंतीचे फोटो देणगी स्वरुपात मिळणार नाही. त्यासाठी

२) टप्याटप्याने वेगवेगळया १२ साईभक्तां कडून प्रत्येकी १२८ नगाप्रमाणे १२ इमारतीसाठी फोटो देणगी म्हणुन स्विकारता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय मा. त्रीसदस्य समितीपुढे निर्णयास्तव सादर,

**निर्णय क्र.४२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील मुद्दा क्र.२ नुसार मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.१३५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता बसविणेत आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) प्रकल्प संस्थानमार्फत चालविणेकामी कंत्राटी हाऊसकिंपींग पध्दतीने कर्मचारी नेमणूक करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** बांधकाम विभागाने श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय करीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) प्रकल्पा साठी साईआश्रम भक्तनिवास विभागा मार्फत आऊटसोर्स मधील दोन महिने कालावधीसाठी ६ ते २, २ ते १० या शिफ्ट प्रमाणे ५ कर्मचारी देणेबाबत दि.२५/०२/२०१४ रोजीच्या मंजुर प्रस्तावानुसार कळविण्यात आलेले आहे.

जा.न.एसएसएस/ वशी- साईआश्रम-१/५६९१/२०१३ दि.१४/०३/२०१३ रोजीचे वर्कऑर्डर अन्वये साईआश्रम भक्तनिवास मध्ये मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स् / स्वच्छता कामी मनुष्यबळ पुरविणेबाबत आदेश पारीत झालेला आहे. त्या आदेशातील अटी शर्ती १६ नुसार -

१६) वर्क ऑर्डरमध्ये नमुद केलेले कर्मचारी संख्येव्यतिरिक्त संस्थानचे आवश्यकतेनुसार वेळोवेळी जादा कर्मचारी संख्या पुरवावी लागेल. सदर जादा कर्मचा-यांचे वेतन किमान दराप्रमाणे देय राहील.

सबब मे .बी.व्ही.जी इंडिया लि. पुणे यांना दिलेल्या कार्यादेशा मधील अटी व शर्तीस अधिन राहुन बांधकाम विभागाच्या मागणी नुसार सदरच्या कामासाठी ५ कर्मचारी २ महिन्यांसाठी ( माहे मार्च २०१४ व माहे एप्रिल २०१४) देता येईल.

यासाठी अकुशल किमान वेतन दर रु.२५३.११ पै. या प्रमाणे ५ अकुशल कर्मचा-यांसाठी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे दोन महिन्यांसाठी पगारावर खर्च अपेक्षित आहे.

| अकुशल कर्मचारी संख्या | अकुशल किमान वेतन दर | अ.नं. | महिना | महिन्याचे एकूण दिवस | एकूण होणारा मासिक पगार खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ५ | रु. २५३.११ पै | १ | मार्च २०१४ | ३१ दिवस | ३९,२३२.०५ |
| | | २ | एप्रिल २०१४ | ३० दिवस | ३७,९६६.५० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | ७७,१९८.५५ |
| | | | | **पुर्णांकित रु** | ७७,१९९.०० |

तरी बांधकाम विभागाचे दि.२५/०२/२०१४ च्या मंजुर प्रस्तावानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता बसविणेत आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) प्रकल्पासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागामार्फत दररोज ५ आऊटसोर्स कर्मचारी उपरोक्त दिलेल्या वर्कऑर्डर मधील अटी शर्तीला अधिन राहून कर्मचारी लावण्यात आलेले आहेत. याकामी येणारा अपेक्षित खर्च रु.७७,१९९/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. त्रीसदस्य समितीपुढे निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.४२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता बसविणेत आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) प्रकल्प संस्थानमार्फत चालविणेकामी नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत येऊ नये. सदरकामी प्रस्तावात नमुद कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडे आऊट सोर्स पध्दतीने पुरविणेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ०५ कर्मचारी पुरविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.१३६ साईधर्मशाळा विभागासाठी नविन गाद्या खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८/०७/२०१३ पासुन नाविन सुरु करण्यात आलेला आहे. या ठिकाणी एकूण ६ इमारती असुन त्यापैकी प्रत्येक इमारतीमध्ये ३२ हॉल असे ५ इमारतीमध्ये एकूण १६० हॉलमध्ये साईभक्तांची तसेच पालखीधारकक व पदयात्रींची निवास व्यवस्था करण्यात येत आहे. प्रत्येककहॉलमध्ये १८ कॉट टाकण्यात आलेले असुन ५ इमारतीमधील १६० हॉलमध्ये (१६० x १८) २८८० कॉटची साईधर्मशाळेमध्ये आवश्यकता आहे. **डी** इमारती मध्ये श्री साईबाबा संस्थन संचलित ज्युनियर कॉलेज सुरु करण्यात आलेले आहे.

१. दिनांक ३१/०७/२०१३ रोजीची मंजुर टिपणीने साई प्रसाद निवासस्थान विभाग यांनी साईधर्मशाळा विभागाकडे एकूण ४६९ कॉटस् (सी आर सी स्केअर पलग, स्टील पलंग) वर्ग करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार ४६९ कॉटस साईधर्मशाळेकडे आणण्यात आलेले आहेत. त्यापैकी ४६९ कॉटपैकी ३५६ कॉटस व ४४६ गादया त्या परत साईप्रसादलयाकडे पाठविण्यात आलेल्या आहेत.

साई धर्मशाळा येथील एकुण गाद्यांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे-

| अ नं. | तपशील | विभागाकडुन घेतलेले | खरेदी केलेले | एकुण उपलब्ध | एकुण आवश्यकता | नवीन खरेदी आवश्यक गाद्या | दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | रबराईज्ड क्वायर मेट्रेसेस | द्वारावती विभाग संख्या- **२४० नग (७५"x३६")** | श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ. प्रा. लि.सिकंदराबाद सख्या- **९६० (७२"x३०")** | १२०० | २८८० | १६८० | २४८७/- | ४१,७८,१६०/- |

साईधर्मशाळा विभागास ५ इमारती मिळून एकुण २८८० रबराईज्ड क्वायर मेट्रेस व कॉटस यांची आवश्यकता आहे. पैकी सध्या साई धर्मशाळा विभागाकडे विभागाकडुन घेतलेले व खरेदी केलेले असे एकुण १२०० रबराईज्ड क्वायर मेट्रेस उपलब्ध आहेत. २८८० मधुन १२०० रबराईज्ड क्वायर वजा जाता १६८० रबराईज्ड क्वायर मेट्रेस खरेदी करणे आवश्यक आहे.

**२.** यापुर्वी, श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.सिकंदराबाद यांचेकडून रबराईज्ड क्वॉयर मेट्रेस (७२" x ३०") या साईजचे ९६० साई धर्मशाळा व ४,६१० साई आश्रम १ साठी असे एकुण ५,५७० मेट्रेस रु.२,४८७/- ला एककयाप्रमाणे रु.१,३८,५२,५९०/-मात्र रकमेस जा.क्र/एसएसएस/वशी-खरेदी/ ३६१३/ २०१३, दि.१/१०/२०११ चे आदेशानुसार खरेदी करण्यात आलेले आहेत.

आता फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात श्री रत्नाकर,जनरल मेनजर,श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि. यांचेशी मेट्रेस खरेदी बाबत चर्चा केली असता, श्री साईबाबांकरीता आम्ही मागील दराने म्हणजे रु.२,४८७/-मात्रने मेट्रेस देण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. जर मेट्रेस खरेदी करणे झालेस श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.सिकंदराबाद यांचेकडून मागील मान्य दराने म्हणजे रु. २,४८७/- मात्रने खरेदी करणेचा विचार करता येईल, असे नम्र मत आहे. साधारणपणे १६८० नग क्वॉयर मेट्रेस खरेदी करावयाचे असुन त्यासाठी मागील मान्य दराने म्हणजे रु.२,४८७/- ने रु.४१,७८,१६०/- इतका खर्च येणार आहे.

बांधकाम विभागाचे श्री जोरी सो. क. अभियंता यांचे कडे विचारणा केली असता बांधकाम विभागामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या कॉटची आतील साईज ही (७२" x ३०") अशी आहे. त्यामुळे मेट्रेसची साईज ही ७२" x ३०" अशी खरेदी करणे आवश्यकआहे. श्री. व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा. लि. सिकंदराबाद यांनी उपरोक्त दर्शविलेल्या साईजचे मेट्रेस पुरविले आहेत.

सदर बाबतीत अधिक्षक, नवीन भक्तनिवासस्थान यांचेशी चर्चाकेली असता, जर सेंच्युरी, करलॉन, स्लिप वेल, गोदरेज अशा नामांकित कंपन्यांकडून क्वॉयर मेट्रेस खरेदी केलेस ते जास्त काळ टिकतील असे मत व्यक्त केले.

साई धर्मशाळेस एकूण १६८० गाद्यांची खरेदी सेंच्युरी, करलॉन, स्लिप वेल, गोदरेज अशा नामांकित कंपन्याकडून खरेदी कराव्या लागणार आहेत. त्यासाठी संस्थानचे खरेदी विभागाकडून विहीत पदधतीने (जाहिरात प्रसिध्द करुन, निवीदा मागवन) खरेदी करुन मिळणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मंजुरी मिळणेस विनंती.

**उपरोक्त बाबींचा विचार करता,**

**१)** दि.२८/०८/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.सिकंदराबाद यांचेकडुन खरेदी करण्यात आलेल्या मेट्रेसप्रमाणे मागील मान्य दराने म्हणजे रु.२,४८७/- मात्र १६८० नग क्वॉयर मेट्रेस खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु. ४१,७८,१६०/- मात्रचे खर्चाचे मान्यतेसाठी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस, तसेच सदरची खरेदीचा खर्च रु.१० लाखाचे वर असल्याने मा.उच्य न्यायालयाची मान्यता घेणेकामी विधी विभागामार्फत कार्यवाही करण्याबाबत मान्यतेसाठी सादर.

**२)** २८८० मधुन १२०० रबराईज्ड क्वायर मेट्रेस वजा जाता १६८० रबराईज्ड क्वायर मेट्रेस खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्या कामी येणाऱ्या अंदाजे रु.४६ लाख मात्रचे खर्चाचे मंजुरीस व सदरकामी मा.उच्य न्यायालयाची परवानगी घेणेच्या निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.४२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३७ श्री साईबाबा औ.प्र.संस्थेसाठी (अ) प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल, (ब) प्रशिक्षणार्थ्यासाठी स्टेशनरी, (क) प्रशिक्षणार्थ्यासाठी कार्याशाळा गणवेश (ड) माहितीपुस्तीका व प्रवेशअर्ज छपाई (ई) प्रशिक्षणार्थाचे खर्चाने नियमित गणवेश, सेप्टी शुज- सॉक्स व केंद्रशासनाच्या NIMI संस्थेची पुस्तके खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट २०१४ पासून सुरु होत आहे,या सत्रामध्ये प्रवेश घेणा-या तसेच व्दितीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीची संख्या खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र | व्यवसायाचे नांव | युनीट | प्रथम वर्ष व्यवसाय | व्दितीय वर्ष व्यवसाय | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टुल ॲण्ड डायमेकर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०२ | इलेक्ट्रीशियन | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०३ | मोटर मेकॅनीक | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०४ | फिटर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०५ | मेकॅनीक आर.ए.सी. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०६ | मशिनीष्ट ग्राईंडर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०७ | टर्नर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०८ | आय.टी.ॲण्ड ई.एस.एम. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०९ | कॉम्पुटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामींग असिस्टंट | ०२ | ५२ | | |
| १० | वेल्डर (गॅस ॲण्ड इलेक्ट्रीक) | ०२ | ३२ | | |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ४२ | | |
| १२ | क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन | ०१ | २१ | | |
| | | | **३०५** | **१५८** | **४६३** |

संस्थेमार्फत प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल,प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी,कार्यशाळा गणवेष,व नियमीत गणवेष, प्रवेश प्रकियेसाठी माहितीपुस्तिका-प्रवेशअर्ज तसेच प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने गणवेष,सेप्टी शुज-सॉक्स व केंद्रशासनाच्या चेन्नई येथिल नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टीटयुट (NIMI) संस्थेची पुस्तके यांची दरवर्षी खरेदी केली जाते. या सत्रासाठीही खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. याबाबत अंदाजे खर्च व तपशिल खालीलप्रमाणे.

**अ) प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी कच्चा माल खरेदीः-** २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी लागणारा प्रात्यक्षिक कच्चा माल व भांडारमध्ये शिल्लक असलेला कच्चा माल यांची पडताळणी करुन खरेदीकरीता आवश्यक असलेल्या कच्चा माल खरेदीकामी अंदाजे रु.४,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी खरेदीः-**

| अ. क्र. | स्टेशनरी तपशिल | खरेदी आवश्यक | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८०जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४X२१ से.मि.११.७ कि .ग्रॅम (छपाई नमुन्या प्रमाणे) | २०० नग | ५०/- | १०,०००.०० |
| ०२ | थेअरी पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८०जीएसएम, ११.७ कि .ग्रॅम ३४X२१ से.मि.(नमुन्या प्रमाणे) | ५०० पॅड | ६०/- | ३०,०००.०० |
| ०३ | स्केच पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड)मॅपलिथो कागद ८०जीएसएम, ११.७ कि .ग्रॅम ३४X२१ से.मि.(नमुन्या प्रमाणे) | ५०० पॅड | ६०/- | ३०,०००.०० |
| ०३ | २ क्वायर रजिष्टर ३४X२१ से.मि.(नमुन्या प्रमाणे) | ४५० नग | ४०/- | १८०००.०० |
| | | | एकुण | ८८,०००.०० |

**क) प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांसाठी कार्यशाळा गणवेष-**

| अ.क | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी) | २२३ | २२३ | ६००/- | १,३३,८००.०० |
| ०२ | CFP प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | २१ | २१ | ६००/- | १२,६००.०० |
| ०३ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | ५२ | ५२ | २००/- | १०,४००.०० |
| ०४ | मुलींसाठी ॲप्रान | ३० | ३० | २००/- | ६,०००.०० |
| | | | | एकुण... | १,६२,८००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

**ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई बाबत. :-**

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सत्र ऑगष्ट २०१४ मधील प्रवेश प्रक्रिया एस.एस.सी.चा निकाल घोषीत झालेच्या दुस-या दिवसापासुन सुरु होत असते. प्रवेशाबाबतची माहिती उमेदवारांना देणेकामी संस्थेची माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी लागते. त्यामध्ये संस्थेमध्ये चालविले जाणारे व्यवसाय, प्रवेश पध्दती, संस्थेची नियमावली व इतर माहिती उमेदवारांना माहिती पुस्तिकेतुन दिली जाते.या दृष्टीने या सर्व उपक्रमांची माहिती माहिती पुस्तिकेतुन उमेदवार व समाजापर्यंत पोहचविली जातें.

याकरीता यावर्षीच्या माहिती पुस्तिकेमध्ये वरील सर्व उपक्रमांची माहिती तसेच वेळोवेळी संकलीत केलेले फोटोग्राफ्स समाविष्ठ करुन माहिती पुस्तिका चांगल्या दर्जाची छपाई करुन घेतली जाते.

ऑगष्ट २०१३-१४ या वर्षात ३००० माहिती पुस्तिका,प्रवेश अर्ज व प्रवेश कार्यक्रम पत्रिका हे रु.१०.९० प्रती नग या दराने छपाई करुन रु.१५/- या दराने वितरीत केली. २०१४-१५ करीता माहिती पुस्तिका छपाई करुन घेतलेस अंदाजे रु.१५/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार रु.१५/- या दराने ती वितरीत करता येईल. या प्रमाणे माहिती पुस्तिका व नियमावली ३००० नग पर्यंत छपाईसाठी रु.४५०००/- खर्च अपेक्षित आहे.

**इ) शासकीय संस्थेकडील पुस्तके,गणवेष व सेप्टी शुज प्रशिक्षणार्थ्यांच्या खर्चाने :-**

| अ. नं. | तपशिल | संख्या (संच) | आवश्यक संच | अंदाजे दर | अंदाजे एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष (प्रत्येकी दोन गणवेष) | ५९२ | ५९२ | ६००/- | ३,५५,२००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता (प्रत्येकी दोन गणवेष ) | ६० | ६० | ६००/- | ३६,०००.०० |
| ०३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी सेप्टी शुज प्रत्येकी एक पेअर व सॉक्स प्रत्येकी चार पेअर | ३२६ | ३२६ | ७००/- | २,२८,२००.०० |
| ०४ | केंद्र शासनाच्या नॅशनल इन्स्ट्रक्शनल मेडीया इन्स्टीटयूटने (NIMI) प्रकाशित केलेली पुस्तके | ३०५ | ३०५ | ६००/- | १,८३,०००.०० |
| | | | | **एकुण...** | **८,०२,४००.००** |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होऊ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.अशी वरील अ, ब, क, व ड नुसार एकुण रु.८,२५,८००/-ची खरेदी ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने खरेदी करता येईल. तसेच वरील इ बाबत मागील वर्षी पर्यंत प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमित गणवेष, शुज व NIMI पुस्तकांसाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेउन ती लेखाशाखेत अनामत खाती ठेऊन एकत्रित खरेदी प्रक्रिया करुन पुरविण्यात येत असत व त्यांची उर्वरित रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती अवलंबीलेली आहे. चालू वर्षी याकामी प्रशिक्षणार्थ्याकडून प्रत्येकी रु.२५००/- जमा घेतली जात असे. ती आता रु.३०००/- प्रत्येकी जमा घेतल्यास कालाक्रमाने वाढलेले दर वाढलेली निमी संस्थेचे पुस्तकाचे दर यासाठीही सोईचे ठरेल. तसेच सदर रक्कम लेखाशाखेत कपडे, पुस्तके व शुज अनामत खाती ठेऊन खरेदी व वितरण प्रक्रिया पुर्ण करता येईल.

वरीलप्रमाणे खरेदी ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने न्यूनतम दरानुसार खरेदी करणेस व कार्यवाहीस मान्यतेसाठी सदरचा विषय हा मा.व्यवस्थापन समिती पुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रशिक्षणार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक असलेले सेफ्टी शुज टाटा इंटरनॅशनल लि., आग्रा या उत्पादक कंपनीकडून व नामांकित कंपनीचे सॉक्स खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.१३८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २०१४-२०१५ चे सत्रासाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २०१४ चे सत्रापासून सुरू होणारे प्रशैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २०१४ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. त्रिसदस्य समितीकडून होणे आवश्यक आहे.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक-२७/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ६४ निर्णय क्रमांक ४०७ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला.

**१)** १९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या खालील गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. याशिवाय क्वचीत प्रसंगी अर्जदारांचे बहुतांश शिक्षण १५ कि.मी.मधील गांवात झालेले असते, पैकी १० वी, १२ वी किंवा एखाद-दुसरे वर्ष परिसराबाहेर शिक्षण झालेले असेल त्यांचा अर्ज १५ कि.मी. साठीच्या जागांवर घेण्याचा प्रकरणपरत्वे निर्णय प्राचार्य यांनी घ्यावयाचा आहे.

शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | १९ | काकडी | ३७ | अस्तगांव | ५५ | देर्डे-चांदवड |
| २ | साकुरी | २० | डांगेवाडी | ३८ | कालेवाडी | ५६ | चांदगव्हाण |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ३९ | संवत्सर | ५७ | डाउच बु |
| ४ | पिंपळस | २२ | सोयेगांव | ४० | कोकमठाण | ५८ | हिंगणी |
| ५ | को-हाळे | २३ | वेस | ४१ | लक्ष्मणवाडी | ५९ | मुर्शतपुर |
| ६ | नांदुर्खी बु | २४ | जवळके | ४२ | कान्हेगांव | ६० | कोपरगांव |
| ७ | नांदुखी खु | २५ | बहादराबाद | ४३ | वारी | ६१ | धारणगांव |
| ८ | डो-हाळे | २६ | शहापुर | ४४ | देवगांव | ६२ | जेउर पाटोदा |
| ९ | कनकुरी | २७ | पोहेगांव खु | ४५ | पुणतांबा | ६३ | जेउर कुंभारी |
| १० | निमगांव -को-हाळे | २८ | पोहेगांव बु | ४६ | रामपुरवाडी | ६४ | शिंगणापूर |
| ११ | निघोज | २९ | चांदेकसारे | ४७ | वाकडी | ६५ | रामपूर |
| १२ | सावळीविहीर खु | ३० | घारी | ४८ | मनेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १३ | सावळीविहीर बु | ३१ | डाउच खु | ४९ | रांजणगांव-देशमुख | ६७ | आडगांव |
| १४ | सोनेवाडी | ३२ | रास्तापुर | ५० | अंजनापूर | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| १५ | पिंपळवाडी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५१ | बहादरपुर | ६९ | धनगरवाडी |
| १६ | रूई | ३४ | एकरूखे | ५२ | मढी बु | ७० | शिंगवे |
| १७ | केलवड | ३५ | गणेशनगर | ५३ | मढी खु | ७१ | सडे |
| १८ | खडकेवाके | ३६ | रांजणगांव | ५४ | देर्डे-को-हाळे | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठी जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते खालीलप्रमाणे-

**२) (अ)** मागासवर्गीयासाठी राखीव जागा (तक्ता क्र. २)

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१) (जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |
| | एकूण- | ५० % |

**२. (ब) इतर आरक्षण :-**

१) अपंग उमेदवार ३ %.

२) महिला उमेदवार व्यवसाय निहाय ३० % .

३) तांत्रिक विषयासह शालांत परीक्षा (४५% अधिक गुणांसह) उत्तीर्ण उमेदवारांना व्यवसाय निहाय २५%.

४) संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % .५)सर्टिफाईड (बोल्स्टर) स्कुलमधील व्यक्ती १% .

**२. (क)** प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा अट शासनानी काढून टाकली आहे.

**३. (अ)** पुर्वीपासून संस्थेचे प्रशिक्षण सत्र १ ऑगस्ट ते ३१ जुलै असे असत तथापी ऑगस्ट २०१३ चे एक वर्षाचे नंतर

वार्षिक परीक्षा घेण्याचे सत्र सुरु झाल्यानंतर काही कालावधीने एक वर्षाच्या सत्राचे प्रत्येकी सहा महिण्याचे दोन भाग करुन प्रत्येकी सहा महिण्याचे सेमिस्टर परीक्षा पध्दती शासनांनी सुरु केलेली आहे.

**३. (ब)** आतापर्यंत प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याकडून प्रवेशाचे वेळी एक वर्षाची विहित प्रशिक्षण शुल्क व रु. ५०००/- अनामत रक्कम घेतली जात असे. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षाचे प्रशिक्षण शुल्क त्या-त्या वर्षी घेतली जात असे सेमिस्टर पध्दत सुरु झाली तरी फीबाबत शासनाचे वेगळे निर्देश येत नाहीत तो पर्यंत मागील वर्षाची पध्दती चालू ठेवावी. फी बाबत शासनाकडून काही वेगळे निर्देश प्राप्त झाल्यास त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**३. (क)** प्रवेशाचे वेळी प्रशिक्षणार्थ्याकडून शासनानी विहित केलेले प्रशिक्षण शुल्क बिनपरतीचे घेण्यात येते. तसेच अनामत रक्कम रु.५०००/- अभ्यासक्रम कालावधीसाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याकडून प्रवेशाचे वेळी घेतली जाते. सदर रु.५०००/- अनामत रक्कम घेण्याबाबत शासनाचे निर्देश नाहीत. प्रशिक्षणार्थ्याने मध्येच प्रशिक्षण सोडले किंवा त्याला संस्थेतून कमी केल्यास सदर अनामत रक्कम परत न करता कायम स्वरुपी संस्थान जमा घेतली जाते. आपल्या संस्थेत मोठया प्रमाणात शेतकरी, शेतमजूर व अल्प उत्पन्न गटातील ग्रामिण भागातील तरुण प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेतात. गेल्या ५-६ वर्षातील प्रवेशाचे अनुभवातून असे वाटते की, प्रवेशाचे वेळी एकत्र सर्व प्रशिक्षण शुल्क व त्यासोबत रु. ५०००/- अनामत रक्कम भरणे बहुतांश उमेदवार व त्यांचे पालकांना जिकरीचे जाते. त्याबरोबरच त्यांना युनिफॉर्म, पुस्तके, सेफ्टीशुज इ. साठी वेगळी रक्कम रु.२५००/- खर्च असतो. याबाबत सहानुभुतीपुर्वक विचार होऊन सदर अनामत रक्कम ऑगस्ट २०१४ पासूनचे प्रवेशासाठी प्रत्येकी रु.५०००/- ऐवजी प्रत्येकी रु.१०००/- करावी असे मत आहे. त्यावर विचार होऊन प्रत्येकी फक्त रु.१०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक हजार मात्र.) अनामत रक्कम घेणेबाबत मान्यता असावी. ही विनंती.

**४.** दि.१ ऑगस्ट २०१४ पासून सुरु होणा-या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी

तसेच व्यवसायनिहाय आकारले जाणारे प्रती प्रशिक्षणार्थी वार्षिक प्रशिक्षण शुल्क खालीलप्रमाणे-

*(तक्ता क्र. ३)*

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क | प्रवेश क्षमता नियमित | सुपर न्युमररी अतिरिक्त जागा ३० % | एकूण | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | शिर्डी प शिर्डी् पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | टूल ॲण्ड डायमेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर) | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. १२,०००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. १२,०००/- | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. १२,०००/- | १२ | ०४ | १६ | १३ | ३ |
| ४ | फिटर * | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ + १६* | ०५ +०५* | २१+२१* | १७ + १७* | ४ + ४* |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण (गणित व विज्ञान विषयात एकत्रित किमान ५०% गुण) | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | रु. ०८,४००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | रु. ०८,४००/- | २४ | ०७ | ३१ | २५ | ६ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | रु. ०८,४००/- | ३२ | १० | ४२ | ३३ | ९ |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १० वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | रु. ०८,४००/- | ४० | १२ | ५२ | ४२ | १० |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | रु. ०६,०००/- | १६ | ०५ | २१ | १७ | ४ |
| | | | | | २३२ + १६* | ७२+ ५* | ३०४+ २१* | २४५+ १७* | ५९+ ४* |

प्रशिक्षणाची सुविधा वाया जावू नये. यासाठी रकाना क्र.५ मधिल शुल्काशिवाय संपुर्ण प्रशिक्षण कालावधीसाठी प्रती प्रशिक्षणार्थी वरील प्रस्तावानुसार अनामत रक्कम प्रवेशाच्या वेळी घेता येईल. प्रशिक्षणार्थ्याने मध्येच प्रशिक्षण सोडल्यास व किंवा विनापरवानगी गैरहजेरी/गैरवर्तन/अन्य कोणत्याही कारणाने त्याचे नाव कमी केल्यास सदर अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

**५.** वरीलपैकी तक्ता ३ मधील अ.नं. १ ते १२ च्या सर्व व्यवसायांना व तुकडयांना केंद्र शासनाची कायमची मान्यता (संलग्नता) पुर्वीच मिळालेली आहे. तथापी क्र.४ वरील फिटर* व्यवसायाची अतिरीक्त ३ री तुकडी मागील वर्षी सुरु करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन साहित्य खरेदी प्रक्रीया सुरू होती. तथापी पुरवठा आदेश दिलेल्या पुरवठादार मे. महालक्ष्मी सेल्स, कोल्हापूर यांनी साहित्य पुरविण्यास असमर्था दशविल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करुन पुरवठा आदेश रद्द केला आहे. आता शासन निर्णय झाल्याने केंद्र शासनाच्या डी.जी.ई ॲण्ड टी. विभागाची संलग्नता मिळविणेसाठी त्याची साहित्य खरेदी व शासन संलग्नता मिळविणेची कार्यवाही सुरु करता येईल. आता केंद्र शासनाची संलग्नता प्राप्त करण्यापुर्वी मानकानुसार सर्व साहित्य व सुविधांची तयारी करुन कॉलिटी कौन्सील ऑफ इंडिया (QCI) यांचेकडे विहित शुल्क भरुन निरिक्षण करुन घ्यावे लागेल. त्याची तंतोतत पुर्तता झाली तरच केंद्र शासनाकडे QCI मान्यतेसाठी शिफारस करु शकते. आगामी काळात याबाबत कार्यवाही करता येईल. केंद्र शासनाची कायम संलग्नता मिळाल्याशिवाय सदर फिटर ३ री तुकडी चालू करता येणार नाही.

**६. (अ)** मागील वर्षी शासनानी मान्यता दिल्यामुळे ३०% प्रमाणे प्रत्येक ट्रेडमध्ये जादा (सुपरन्युमररी ) जागा भरल्या आहेत.या पुढेही जादा जागांना शासनाकडून मान्यता मिळेल त्या भरता येतील. तथापी शासनाची मान्यता मिळेलच असे नाही. तसा बदल झाल्यास संबधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. शासनांनी मान्यता दिलेल्या सुपरन्युमररी जागेवर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्यात येतात. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तिकेत दिली जाते. त्या जागांना गुणानुक्रम व परीसर आरक्षण यांचे बंधन पाळता येत नसल्याने तसे बंधन असणार नाही. ही माहीतीही माहिती पूस्तकेत नमुद केली जाते.

**६. (ब)** उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकृतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

**६. (क)** उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. त्रिसदस्य समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास शक्यतो माहिती पुस्तिकेत ते बदल नमूद करण्यात येतात.

**६. (ड)** नियमित अभ्यासक्रमांबरोबरच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लि. (MKCL) यांचा MS-CIT हा अभ्यासक्रम चालतो. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किल (MES) या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. याशिवाय नाशिक येथिल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) यांचेकडील अभ्यासक्रमांचे अभ्यासकेंद्र म्हणून आपल्या संस्थेला मान्यता आहे. आवश्यकतेनूसार त्यांचेकडील सुधारित ऑनलाईन संगणक व इतर अभ्यासक्रम चालविता येतील. या उपक्रमांची माहितीही माहिती पुस्तिकेत देण्यात येते. संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करण्यात येतात. तसेच सुधारित शुल्काबाबत जे निर्णय होतील त्याचीही माहिती त्यामध्ये नमुद करण्यात येते. प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदलही माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

**७.** ऑगस्ट २०१३ च्या सत्रासाठी राज्य शासनानी त्यांचे औ.प्र.संस्थेतील प्रवेश प्रक्रीया ऑनलाईल संगणकीय पध्दतीने केली आगामी ऑगस्ट २०१४ सत्रात राज्य शासनाकडून सर्व किंवा काही अशासकीय औ.प्र.संस्थांचे प्रवेश त्यांचे सोबत किंवा त्यांचेप्रमाणे ऑनलाईन करण्याचा निर्णय होऊ शकतो. तसा निर्णय झाल्यास त्यानुसार कार्यवाही करावी लागेल.

तरी वरीलप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २०१४ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश देणेकामी कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच आपल्या संस्थेत मोठया प्रमाणात शेतकरी, शेतमजूर व अल्प उत्पन्न गटातील ग्रामिण भागातील तरुण प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेतात. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांकडून घेण्यात येणारी अनामत रक्कम रु.५०००/- मात्र ऐवजी प्रत्येकी रु.१०००/- मात्र स्विकारणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.१३९ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी टयुटोरियल बुक छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व १२ वी कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत १२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यास ०७ नग या प्रमाणे ८५०० नग टयुटोरियल बुक ची आवश्यकता आहे. टयुटोरियल बूक दरवर्षीप्रमाणे नमुन्यानुसार छपाई करुन घ्यावयाचे आहेत. सदरच्या छपाई किंमतीवर १० टक्के सेवाशुल्क आकारणी करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देता येईल.

खालील प्रमाणे टयुटोरियल बूके छपाई करणे आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | टयुटोरियल बूक | ८५०० | १५.०० | १,२७,५००/- |

सदरचे टयुटोरियल बूके प्रचलित पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या रु. १,२७,५००/- पर्यंतच्या खर्चाचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे टयुटोरियल बुक प्रचलित पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,२७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१४० श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ.११वी कला व वाणिज्य शाखेच्या तुकडयात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-२०१५ मध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रत्येकी दोन वर्ग तुकडया मंजूर आहेत.तसेच सन २०१३-२०१४ मध्ये इ. ११ वी विज्ञान शाखेच्या तीसऱ्या तुकडी चालू करण्यात आलेली आहे. या प्रत्येक वर्ग तुकडीची प्रवेश क्षमता ८० आहे. सन २०१३-१४ मध्ये इ.११ वी व १२ वी चे मिळून १०९२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन २०१३-२०१४ मध्ये ११ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या वर्गात प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश पूर्ण झालेले आहेत. शिर्डीतील मा. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचेसह ग्रामस्थानी इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेच्या वर्ग तुकडया वाढविणेबाबतची मागणी केलेली आहे.

**नवीन तुकडीसाठी आवश्यक बाबी:-**

१) **तुकडी मान्यता-** मा. शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे नवीन तुकडी मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर करावा लागेल.

२) **विद्यार्थी-** सन २०१४-२०१५ मध्ये प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांमधून नवीन तुकडीसाठी विद्यार्थी उपलब्ध होतील.

३) **इमारत व फर्निचर-** सध्याच इमारतीत वर्ग तुकडी सुरु करता येईल.

४) **शिक्षक-** सध्या उपलब्ध असलेल्या अर्धवेळ शिक्षकांना पूर्ण वेळ कार्यभार देता येईल व आवश्यकतेनुसार नवीन शिक्षकांची नेमणूक करता येईल.

५) **शैक्षणिक शुल्क-** नवीन तुकडीसाठी सध्या सुरु असलेल्या इ. ११ वी व १२ वी च्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क रु. ३३०/- आकारणी केली जाते. विद्यार्थीनीना शुल्क पूर्णपणे माफ आहे. नवीन तुकडीवाढीसाठी सध्याच्याच पद्धतीने कार्यवाही करता येईल.

स्थानिक ग्रामस्थ यांचे मागणीनुसार नवीन इ. ११ वी कला, वाणिज्य शाखेच्या तुकडया सुरु करणेकामी गुणवत्ता असलेल्या विद्यार्थीनी/ विद्याथ्यांना प्रवेश देता येईल.

सन २०१४-२०१५ मध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी विज्ञान शाखेची तुकडी सुरु करणेत आलली आहे. सन २०१४-२०१५ मध्ये इ. १२ वी विज्ञान शाखेची नैसर्गिक वाढीने तिसरी नवीन तुकडी सुरु करणेस तसेच स्थानिक ग्रामस्थ यांचे दि. १३/०३/२०१४ चे निवेदनातील मागणीनुसार नवीन इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेच्या तुकडया वाढीचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-२०१५ मध्ये इ. १२ वी विज्ञान शाखेची नैसर्गिक वाढीने तिसरी नवीन तुकडी सुरु करणेस तसेच स्थानिक ग्रामस्थ यांचे दि.१३/०३/२०१४ रोजीचे**

**निवेदनातील मागणीनुसार नवीन इ. ११ वी कला व वाणिज्य शाखेच्या तुकडया वाढविणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१४१ कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोग वह्या छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ या वर्षाकरीता कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ विज्ञान शाखेत २४० विद्यार्थी व १२ वी विज्ञान १६० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या वर्गातील विद्यार्थ्यांना भौतिक शास्त्र, रसायणशास्त्र, जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान, व गणित या विषयासाठी प्रयोग वहयांची मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक १५३(१५)नुसार न्युनतम दराचे श्री साई एन्टरप्रायजेस, कोपरगाव व साईकिरण पिंटर्स, बाभळेश्वर यांचेकडून करुन घेण्यात आली आहे. सन २०१४-१५ या वर्षासाठी खालीलप्रमाणे प्रयोगवहयाची छपाई करुण घेणे आवश्यक असल्याने मागील वर्षीचे प्रयोगवहया छपाईचे छपाई धारक यांना दुरध्वनी वरुन आवश्यक प्रयोगवहयांची छपाई मागील दराने करुण देणार का याबाबत विचारना केली असता मे. साई एन्टरप्रायजेस, कोपरगांव यांनी दि.२६/०३/२०१४ चे पत्रान्वये भौतिकशास्त्र प्रयोगवहयांची छपाई मागील दर रुपये ६२/- प्रमाणे करुन देण्यास तयार आहे. तसेच मे. साईकिरण ऑफसेट प्रिंटर्स, बाभळेश्वर यांनी दि.०२/०४/२०१४ चे पत्रान्वये रसायनशास्त्र ,जीवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान व गणित या प्रयोगवहयांची मागील दराने छपाई करुन देणेस असल्याचे कळविले आहे.सन २०१४-१५ या वर्षाकरीता खालील प्रमाणे प्रयोग वहयांची छपाई करणे आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिक शास्त्र जर्नल | २५० | ६२.०० | १५५००.०० |
| ०२ | रसायनशास्त्र | २२५ | ५२.०० | ११७००.०० |
| ०३ | जीवशास्त्र | २२५ | ५८.०० | १३०५०.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान | २०० | ५२.०० | १०४००.०० |
| ०५ | गणित | १५० | ५२.०० | ७८००.०० |
| | | | **एकूण रुपये** | **५८४५०.००** |

वरीलप्रमाणे प्रयोग वहयांची छपाई करणे आवश्यक असल्याने मे.श्री साई एन्टप्रायजेस, कोपरगांव यांचेकडून वरील मागणी तक्यातील अ.नं. ०१ भौतिकशास्त्र प्रयोगवही २५० नग ६२/- रुपये १५५००/- तसेच मे.साईकिरण पिंटर्स, बाभळेश्वर यांचेकडून वरील तक्त्यातील अ.नं. ०२ ते ०५ या प्रयोग वहया छपाईकामी एकूण रुपये ४२,९५०/- या प्रमाणे एकूण रुपये ५८,४५०/- मात्र खर्च येणार आहे.

तरी वरील प्रयोगवहयांची छपाई संबंधीत छपाईधारकांकडून करुन घेणेस त्याकामी येणाऱ्या रुपये ५८,४५०/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असलेल्या प्रयोग वह्यांची प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे छपाई करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.५८,४५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१४२ वरिष्ठ वेतन श्रेणीत शासन निर्णयानुसार दुरुस्ती करुन फरकाची रक्कम मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सौ. झेड. व्ही. इनामदार यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी विभागाकडे जा.न.एसएसएस/वशी-१/४३९१/९१ दि. २४ एप्रील १९९१ च्या आदेशानुसार नेमणूक करण्यात आली असून त्या दि. १ मे १९९१ रोजी नेमणुकीचे पदावर कामावर हजर झालेल्या आहेत.

शासन निर्णय क्र.वेतन-११९९/प्र.क्र.२/सेवा-३ मंत्रालय, मुंबई -३२ दि.२०जुलै २००१ अन्वये शासनाकडील कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत निर्णय झालेला आहे त्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. ०१ व ०३ जुलै २००४ रोजीचे सभेतील विषय नं. १८ निर्णय क्र.३५७ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत जा.न.एसएसएस/वशी-१/२११०/२००४ दि.२७ जुलै २००४ चा आदेश पारीत झालेला आहे त्यानुसार सौ. झेड. व्ही. इनामदार यांचीही एकाच पदावर (दि.०१/०५/१९९१ ते दि. ०१/०५/२००३) अखेर १२ वर्ष सेवा पूर्ण झालेली असल्याने त्यांनाही खालीलप्रमाणे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे.

पाचव्या वेतन आयोगानुसार

**अ)** नेमणूकीची वेतनश्रेणी:- ७५००-२५०-१२०००

**ब)** १२ वर्षे नंतरची वरिष्ठ वेतन श्रेणी:- ८०००-२७५-१३५०० दि. ०१/०५/२००३ पासून देण्यात येत आहे.

**क)** सध्या त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार खालीलप्रमाणे वेतन निश्चिती होवून त्यांना वेतन मिळत आहे. [(८०००-२७५-१३५००) वेतन बॅन्ड ९३००-३४८०० ग्रेड पे ४८००]

उच्च माध्यमिक वर्गांना (माध्यमिक शाळेस) वा वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेल्या/ स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयांत शिकविणा-या शिक्षकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करणेबाबत शासन निर्णय क्र. एचएससी १३००/ (२८०३/२०००) /उमाशि-१ दि. ३ जून,२००० अन्वये निर्णय झालेला असून त्यामध्ये १३ मे, १९९९ च्या शासन निर्णयानुसार व वित्त विभागाच्या दि. १० डिसेंबर,१९९८ च्या अधिसूचनेनुसार आवश्यक ती अर्हता असलेल्या पूर्णवेळ उच्च माध्यमिक शिक्षकांना मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीऐवजी, खालीलप्रमाणे सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. तसेच इतर ज्या अनुषंगीक पदावर या सुधारित वेतनश्रेणीमुळे परिणाम होईल, अशा पदांच्या वेतनश्रेण्या व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेण्या दि.१ मार्च २००० पासून मान्य करण्यात येत असून, त्या १ मार्च २००० पासून सुधारित करण्यात येत आहेत.

**ज्या पदांच्या वेतनश्रेण्या सुधारित करण्यात येत आहेत त्या खालीलप्रमाणे :-**

| क्र. | पदनाम | मंजूर वेतनश्रेणी | सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ५ | माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य | रु.७५००-१२,०००<br>रु.८,०००-२७५-१३,५०० व श्रेणी | रु.७५००-११,०५०<br>रु.९,१२५-२७५-१४,०७५ व श्रेणी |

**असे नमूद केलेले आहे,**

सदर निर्णयाचा अधार घेवून सौ. झेड.व्ही. इनामदार (मुख्याध्यापक) यांनी दि. २७/१०/२०१२ रोजीचे विनंती अर्जानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार सुधारणा होवून त्यानुसार वार्षीक वेतनवाढी व इतर रक्कमा मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**सुधारित वेतनश्रेणी नुसार यांना खालील प्रमाणे वेतन वाढी देय होतात.**

| दिनांक | वेतन |
|---|---|
| ०१.०५.२००३ | ९१२५ |
| ०१.०५.२००४ | ९४०० |
| ०१.०५.२००५ | ९६७५ |

वेतनात वरील प्रमाणे सुधारणा केल्यास झाल्यामुळे माझे ०१.०९.२००६ चे वेतन रु.९,६७५ /- देय होईल व त्यानुसार ६ व्या वेतन आयोगाचे वेतन निश्चिती नुसार खालीलप्रमाणे वेतन देय होईल.

| अ. | वेतन वाढ तारीख | पे बॅड | | वेतनवाढ | | ग्रेड पे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rs. | Increm | Total | G.Pay | Total |
| १. | ०१/०१/२००६ | PB -३Rs.१५६००-३९१०० | १८००० | | १८००० | ५७०० | २३७०० |
| २. | ०१/०७/२००६ | PB -३Rs.१५६००-३९१०० | १८००० | ७२० | १८७२० | ५७०० | २४४२० |
| ३. | ०१/०७/२००७ | PB -३Rs.१५६००-३९१०० | १८७२० | ७४० | १९६४० | ५७०० | २५१६० |
| ४. | ०१/०७//२००८ | PB -३Rs.१५६००-३९१०० | १९४६० | ७६० | २०२२० | ५७०० | २५९२० |
| ५. | ०१/०७/२००९ | PB -३Rs.१५६००-३९१०० | २०२२० | ७८० | २१००० | ५७०० | २६७०० |
| ६. | ०१/०७/२०१० | PB -३Rs.१५६००-३९१०० | २१००० | ८१० | २१८१० | ५७०० | २७५१० |
| ७. | ०१/०७/२०११ | PB -३Rs.१५६००-३९१०० | २१८१० | ८३० | २२६४० | ५७०० | २८३४० |
| ८. | ०१/०७/२०१२ | PB -३Rs.१५६००-३९१०० | २२६४० | ८५० | २३४९० | ५७०० | २९१९० |
| ९. | ०१/०७/२०१३ | PB -३Rs.१५६००-३९१०० | २३४९० | ८७० | २४३६० | ५७०० | ३००६० |

उपरोक्तप्रमाणे सौ. झेड.व्ही. इनामदार (मुख्याध्यापक) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी यांना शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी देता येईल. तरी श्रीमती इनामदार झेड. व्ही. यांना देय होत असलेल्या फरकाची अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र ) अदा करणेकामी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३० यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.झेड.व्ही. इनामदार (मुख्याध्यापीका) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी यांना शासन निर्णयानुसार वेतनश्रेणी देणेस व त्यांना देय होत असलेल्या फरकाची अंदाजे रक्कम रु.२,५०,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१४३ प्रयोगशाळा सहाय्यक (विज्ञान व माहिती तंत्रज्ञान) पदाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे श्री निलेश शिवाजी कोळगे यांची प्रयोगशाळा संहा. (विज्ञान व माहिती तंत्रज्ञान) या पदावर रु.५०००/- या मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांचा सेवेचा कालावधी हजर झालेल्या तारखेपासून पुढील ०३ वर्षासाठी असा होता. त्यानुसार श्री कोळगे हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे दि.२७/०१/२०१२ रोजी कामावर हजर झालेले होते. दि.२७/०१/२०१२ पासून जुलै २०१३ अखेर ते कामावर हजर होते. परंतु संदर्भ क्रं.०२ नुसार श्री कोळगे यांनी दि.१०/०८/२०१३ रोजी प्रयोगशाळा सहा. पदाचा राजीनामा विद्यालयास कळविलेला होता. त्या अर्जाद्वारे श्री कोळगे यांचा

राजीनामा दि.१६ सप्टेंबर २०१३ पासून मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरचे रिक्त झालेले पद विद्यालयास भरावे लागणार आहे. सदरचे पदासाठी आवश्यक असणारी माहिती खालीलप्रमाणे..

| अ.नं. | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रयोगशाळा सहा. (विज्ञान व माहिती तंत्रज्ञान ) | ०१ | बी.सी.एस./बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स/एम.सी.एम. | खुला |

उपरोक्त प्रमाणे सदरचे पद खुल्या प्रवर्गासाठी असल्याने बी.सी.एस./बी.एस्सी, कॉम्प्युटर सायन्स/ एम.सी.एम. जात संवर्ग खुला अशी जाहिरात देवून सदरचे पद भरावे लागणार आहे.

निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे पी.आय.एल. १८/२०११ मधील सिव्हल ॲप्लीकेशन नं. १५६९५ वरील दि.०२.०५.२०१४ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील प्रयोगशाळा सहा. (विज्ञान व माहिती तंत्रज्ञान) पद भरणेकामी मान्यता मिळालेली आहे. मा.खंडपीठाच्या आदेशास अधीन राहून वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व जाहिरातीस अनुसरुन येणाऱ्या उमेद्वारांमधून मुलाखतीद्वारे सदरचे पद भरणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.१४४ शिर्डी येथील संस्थानचे साईउद्यान इमारतीतील पोस्ट ऑफिस करिता वापरास दिलेल्या जागेचा रेट कमी करणे व मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांचे दि. २८/११/२००३ व दि. ०१/१२/२००३ चे पत्रास अनुसरुन संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२००३ चे मंजूर ठरावाप्रमाणे शिर्डी येथे पोस्ट ऑफीसचे वापरांसाठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर दि. १८/१२/२००३, दि. १७/११/२००४ या कालावधीसाठी ११ महिने मुदतीसाठी संस्थानचे नगरपंचायत मिळकत नं. ५०४ पैकी साईउद्यान इमारतीमधील २ हॉल्स (१,५९९.४१ स्क्वे.फुट) वापरांस प्रथमतः देणेत आले. सदर जागेची परवाना फी शासकीय दराने ( लाईट बिल अलहिदा) पोस्ट ऑफीसने संस्थानला अदा करणेबाबत जा.क्र. एसएसएस वशी-०२/६९४/२०१० दि. ०७/०४/२००४ ने कळविणेत आले. त्यानंतर दि. २६/१०/२००४ रोजीचे पत्राने अधिक्षक, श्रीरामपूर पोस्ट ऑफीस, श्रीरामपूर यांनी त्यांचे वरिष्ठ कार्यालयाने सदर जागेची मासिक परवाना फी रु. १,०००/- मात्र निश्चीत केलेली आहे. असे कळविले असून त्यानुसार सध्या पोष्ट ऑफीसकडून या जागेचे रु. १,०००/- मासिक परवाना फी प्राप्त होत आहे.

तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७/१२/२००४ चे ठरावांस अनुसरुन पुढील ११ महिने कालावधीसाठी ( दि. १८/११/२००४ ते दि. १७/१०/२००५) तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि. १४/१२/२००५ चे व्यवस्थापन समितीचे ठरावाने पी.डब्ल्यु.डी. ने ठरवून दिलेले दराने पोस्ट ऑफीसकडून मासिक परवाना फी घ्यावी व पोस्ट ऑफीसकडून पांच वर्षाचा करारनामा करणेत यावा व त्यानंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी, असा निर्णय झालेला आहे. शिर्डी पोस्ट ऑफीसला दि. १८/१२/२००३ पासून खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे जागा वापरांस दिलेली आहे.

| अ.क्र. | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव दिनांक | वापरांस दिलेला कालावधी |
|---|---|---|
| १ | दि. १३/१२/२००३ निर्णय क्र. ५९० | दि. १८/१२/२००३ ते दि. १७/११/२००४ |
| २ | दि. २७/१२/२००४ निर्णय क्र. १६६ | दि. १८/११/२००४ ते दि. १७/१०/२००५ |
| ३ | दि. १४/१२/२००५ निर्णय क्र. ७७० | दि. १८/१०/२००५ ते दि. १७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्र. २३९ | दि. १७/१०/२०१० ते दि. १६/१०/२०११ |
| ५ | दि. २४/०९/२०११ निर्णय क्र. ७३४ | दि. १७/१०/२०११ ते दि. १६/१०/२०१२ |
| ६ | दि. २६/०२/२०१३ निर्णय क्र. १७९ मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४२२/२०१३ मधील दि. १३/०८/२०१३ रोजीचा आदेश. | दि. १७/१०/२०१२ ते दि. १६/१०/२०१३ |

मा.त्रिसदस्य समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७९ नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४२२/२०१३ दाखल केले होते. त्यामध्ये दि. १३/०८/२०१३ रोजी मा.कोर्टाने ऑर्डर करुन शिर्डी पोस्ट ऑफीसला जागा वापरांस परवानगी दिली. त्यानुसार जा.नं. एसएसएस वशी - विधी/२४४६/२०१३ दि.२६/०८/२०१३ रोजीचे पत्राने पोस्ट ऑफीसला मुदतवाढीचा आदेश देण्यात आला होता. सदरचे कालावधीचा लिव्ह अॅन्ड लायसेन्स करारनामा करणेबाबत व रेंट संस्थान जमा करणेबाबत श्रीरामपूर पोस्टचे श्री देवरे, श्री पंडीत, श्री साबळे यांचेशी दि. ०९/१०/२०१३ व दि. १२/१०/२०१३ रोजी वेळोवेळी दुरध्वनीवर संपर्क करुन चर्चा केली आहे. तसेच जा.नं. एसएसएस वशी - विधी/३५५५/२०१३ दि. ०७/११/२०१३ रोजीचे पत्राने मासिक परवाना फी रु. १२,३८५/- याप्रमाणे अदा केलेली नाही व करारनामा करुन दिलेला नाही. पुणे व

श्रीरामपूर ही दोन्ही कार्यालय कायदेशीर बाबींची पुर्तता करीत नसल्यामुळे त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी असे श्रीरामपूर पोस्ट ऑफीस व पोस्टमास्तर जनरल, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

त्यानंतर श्रीरामपूर पोस्ट ऑफीसने पोस्ट मास्तर जनरल पुणे यांना दि. ११/१०/२०१३ रोजीचे पत्राने संस्थान करारनामा करणेबाबत व रेंट अदा करणेबाबत कळवत आहे. अशा आशयाचे पत्र दिलेले आहे. तद्नंतर जा.नं. एसएसएस वशी- विधी/३६८६/२०१३ दि. १६/११/२०१३ रोजीचे पत्राने ॲडव्होकेट श्री एस.डी.कुलकर्णी यांना पोस्ट ऑफीसचे संदर्भात कायदेशीर मार्गदर्शन मिळणेस व नोटीस पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे.

आता श्रीरामपूर पोस्ट ऑफीस, श्रीरामपूर यांनी दि. १९/११/२०१३ रोजीचे पत्राने पोस्ट मास्तर जनरल, पुणे हे एफ. आर. ए. सी. ने ठरविलेला शिर्डी पोस्ट ऑफीसचे जागेचा रेंट देणेस मान्यता देत नाही. त्यामुळे पोस्ट ऑफीसचे कामाचा संस्थानला होणारा उपयोगाचा विचार करता प्रतीमहा रु. २०००/- ते ३०००/- घेणेबाबत विनंती केली आहे. तसेच दि. २८/११/२०१३ चे पत्राने एफ. आर. ए. सी. ने ठरविलेला रेंट खुपच जास्त आहे. त्यांनी ठरविलेला रेंट हा व्यावसायीक स्वरुपाचा आहे उदा. बँक ज्या फक्त नफा कमवतात त्यामुळे संस्थानने पोस्ट ऑफीसचे सेवेचा विचार करुन रु. ७०००/- प्रतीमहा रेंट ची आकारणी करावी असे कळविले आहे.

शिर्डी पोस्ट ऑफीसला दि. १७/१०/२०१२ ते दि. १६/१०/२०१३ याकालावधीसाठी दिलेली मुदत मा.त्रिसदस्य समितीचे व मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने दिलेली आहे. दि. १६/१०/२०१३ रोजी पोस्ट ऑफीसची मुदत संपुष्टात आल्यानंतर पुढील मुदतवाढीबाबत शिर्डी पोस्ट ऑफीस व श्रीरामपूर पोस्ट ऑफीसने पुढील मुदतवाढी बाबत अर्ज दिलेला नाही.

शिर्डी पोस्ट ऑफीस मार्फत साईभक्तांना, गावकऱ्यांना व संस्थानला मिळणाऱ्या सोयींचा व प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पो.ऑफ इंडिया यांना दिलेल्या ४ खोल्या बांधकाम क्षेत्र ११४.३२ चौ.मी. व मोकळी जागा २६६.१८ चौ.मी. मासिक परवाना फी रु. ४,४२७/- (पी.डब्ल्यु.डी. चे दराने ) आकारणेत येते करीता शिर्डी पोस्ट ऑफीसला दिलेल्या २ हॉल क्षेत्र १,५९९.४१ स्क्वे.फुट जागेचा विचार करता श्रीरामपूर पोस्ट ऑफीसने दिलेल्या पत्रानुसार साईउद्यान इमारतीतील पोस्ट ऑफीसचे जागेचा रेंट रु. १२,३८५/- प्रती महिना ऐवजी रु. ७०००/- प्रती महिना व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲन्ड लायसेंन्स तत्वावर दि. १७/१०/२०१३ ते दि. १६/१०/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी जागा मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून वापरांस देणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४५ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि., शिर्डी यांना लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास देण्यात आलेल्या व्यवसायांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना साईभक्तांचे सोईचे दृष्टीने संस्थान परिसरात खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा व्यवसाय करणेसाठी दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ याकालावधीसाठी प्रती गाळयास रु. ५,५००/- परवाना फी व विद्युत बिल वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. १४/०१/२०१२ रोजीचे ठरावांस अनुसरुन जा.क्र. विधी /६२३५/२०१२ दि. १२/०३/२०१२ चे आदेशाने सदर परवानगी दिलेली आहे.

**१) क्लोकरुम व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण (All Rooms) | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | **क्लोकरुम**<br>१) सुलभ क्लोकरुम,<br>२ ) साईप्रसाद नं.१<br>३) साईप्रसाद नं.१ रुम नं.१३ व<br>रुम नं. १४ | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२<br>--//--<br>--//--<br>--//-- | रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती रुम रु. ५०,०००/-<br>रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती रुम रु. ५०,०००/- | १)सुलभ शौचालय इमारत<br>२) चहा कॅन्टीन शेजारी रुम.<br>३) चहा कॅन्टीन चे उत्तरेकडील रुम. | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४) व्दारावती निवासस्थान क्लोकरुम | --//-- | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | ४) द्वारावती निवासस्थान गेटलगत. | |

**२) कारपार्किंग व्यवस्था.**

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान परिसरात (५०० रुम) लायसेन्स फी रु. ५७,०६४/- व धर्मशाळा परिसर (२०० रुम) लायसेन्स फी रु. १४,२६८/- आकारुन लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर कारपार्किंग चालविणेस दि. ३१/०५/२०१२ अखेर परवानगी देण्यात आलेली आहे. (सोसायटीने दि. २०/०४/२०१२ चे पत्राने कारपार्किंग व्यवस्था चालू ठेवणेस मुदतवाढ मागीतली आहे.)

**३) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था.**

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांचे मार्फत खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे संस्थान परिसरात जागा साईभक्तांचे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम ठेवणेस परवानगी दिलेली आहे. सदर मुदत दि. ३१/०५/२०१२ अखेर संपत आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईप्रसाद नं.१ इमारतीचे जवळील पत्राशेड मधे. | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |
| | २) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | --//-- | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईउद्यान परिसर पिंपळवाडी रोडलगत पत्राशेड | |

**४) पादत्राणे गृह व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १) पादत्राणे गृह | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईप्रसाद नं.१ इमारतीचे जवळील पत्राशेड मधे. | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |
| | २) पादत्राणे गृह | --//-- | रु. ५,५००/- डिपॉझीट प्रती स्टॉल रु. १०,०००/- | साईउद्यान परिसर पिंपळवाडी रोडलगत. पत्राशेड | |

**५) दुध व दुग्धजन्य पदार्थ व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | <u>दुध व दुग्धजन्य पदार्थ स्टॉल</u> | | | | |
| | १) दुध स्टॉल नं.२, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- | १) साईप्रसाद नं. १ परिसर - स्टॉल | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |
| | २) दुध स्टॉल नं.५, | --//-- | रु. ५,५००/- | २) स्वागत कक्ष परिसर - स्टॉल | |

**६) प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | <u>प्रसाद नॉव्हेल्टी</u> | | | | |
| | १) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- | १) धर्मशाळा ब्लॉक नं.१, | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |
| | २ ) प्रसाद स्टोअर नं.०२, | --//-- | रु. ५,५००/- | २) धर्मशाळ ब्लॉक नं.२, | |

**७) एस.टी.डी.बुथ व्यवस्था.**

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मा.परवाना फी | ठिकाण | आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | **एस.टी.डी.बुथ**<br>१) एस.टी.डी.-०१, | दि.०१/०६/२०११ ते दि. ३१/०५/२०१२ | रु. ५,५००/- | १) साईप्रसाद नं. १ पॉ. हाऊस समोर स्टॉल | जा.क्र.एसएसएस वशी / ६२३५ /२०१२ दि.१२ /०३/२०१२ |
| | २) एस.टी.डी.-०२, | --//-- | रु. ५,५००/- | २) धर्मशाळा परिसर (२००रुम) गाळा | |

साईभक्तांच्या सोईसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांना उपरोक्त प्रमाणे लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास दिलेल्या परवानगीची मुदत दि. ३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आली त्यानंतर सोसायटीने प्रस्तुत जागेत उपरोक्त वेगवेगळे व्यवसाय चालविण्यासाठी ५ वर्षासाठी परवानगी मिळावी अशा विनंती ७ अर्ज करण्यात आली आहे.

संस्थानचे अधिनियम कलम १७ (३) प्रमाणे प्रमाणे संस्थानची स्थावर मालमत्ता शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी (Alinate) संक्रमित करता येत नाही. No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, sold or otherwise alienated by the committee, except with the previous sanction in writing of the State Government. अशी सदरची तरतुद आहे. सदर तरतुदीचा विचार केलेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी, शिर्डी यांचे प्रस्तुतचे अर्जात विनंती केलेप्रमाणे त्यांना त्यांचे व्यवसायासाठी ५ वर्षाकरीता संस्थानची जागा lease, Mortgage , Alinated करता येणार नाही. त्याच प्रमाणे मा. कोर्टाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशाचा विचार करता क्लॉज नं.6 we direct that, without prior permission of this Court, the Committee.

a) Shall not take any steps in creating third party interest in the movable Or immovable properties of the Respondent No.-2 trust;
b) Shall not enter into an agreement , contract for purchase of any Immovable property on behalf of the Respondent No.2 Trust;
c) Shall not take any major financial decision of whatsoever nature;
d) Shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies;
e) Shall not convert precious metals in any form nor melt it in any form;

मा.उच्च न्यायालयाची देखील मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी संस्थान नोकरांची सहकारी संस्था आहे. संस्थानचे मान्यतेने साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सेवाभावी संस्था म्हणून आवश्यक ते पुरक व्यवसाय करणे हे संस्थेचे उद्देशामध्ये नमुद आहे. याबाबतचा विचार करता दि. ०१/०६/२०१२ ते दि. ३१/०५/२०१३ या एक वर्षासाठी उपरोक्त व्यवसाय पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देणेबाबतचे निर्णयार्थ मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेत विषय नं. ५६ अन्वये सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ६२८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, सदरहू गाळ्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. मात्र त्याबाबतचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे पुढील मुदतवाढीचा आदेश सोसायटीस दिलेला नाही.

प्रसादालय परिसरातील तसेच साईउद्यान परिसरांतील संस्थानचे जागेवर व इमारतीमधील खोल्यांत व्यवसायासाठी देणेत आलेली परवानगी मुदत दि. ३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे. व्यवसाय चालविणेसाठी ५ वर्षाची मुदतवाढीची मागणी त्यांचेकडून झालेली आहे. अलिकडेच महाराष्ट्र शासनाचे संस्थानला दि. २८/१०/२०१३ रोजीचे पत्र (संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन पी.आय.एल. नं. २५/२०१२ चे अनुशंगाने) प्राप्त झाले असून सोसायटीचे पेढा विक्री मुद्याचे अनुशंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करणेचे संस्थानला सुचीत केले आहे.

"मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याने प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात याव्यात.

मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थीक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कारवाई करण्यात यावी. "

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने ५ वर्षासाठी व्यवसायास मुदतवाढ मिळणेस मागणी केलेली आहे. शासनाचे उपरोक्त पत्राचे अनुशंगाने पतपेढीकडून आकारणेत येणारे नाममात्र फीचे नुकसानीबाबतचे मुद्याबाबत**:-** श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रे.को. सोसायटी ही सहकारी कायद्यान्वये

नोंदणी कृत संस्था आहे. संस्थान नोकरांची सहकारी संस्था आहे. संस्थानच्या मान्यतेने साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सेवाभावी संस्था म्हणून इतर आवश्यक पुरक व्यवसाय करणे व सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्याची भावना यांच्या प्रसारास उत्तेजन देणे असे प्रस्तूत सोसायटीचे ध्येय धोरण आहे. साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी प्रस्तूतचे व्यवसाय संस्थानमार्फत दिलेले आहेत. त्यांचा नफा मिळविणेचा हेतू नाही. साईभक्तांची सोय व्हावी. असा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे त्यांना कॉन्ट्रॅक्ट दिलेमुळे शासन पत्रातील नुकसान संदर्भातील मुद्यावर विचार करतांना प्रस्तुतचे व्यवसाय सोसायटीस दिलेमुळे मुद्यापेक्षा साईभक्तांना मिळणारे सुखसोयीचा विचार होणेची आवश्यकता आहे. असे दिसून येते याबाबतचा विचार करता.

१) उपरोक्त गाळे/ स्टॉल पतपेढीकडून काढून घेणे व प्रस्तुत व्यवसाय चालविणेसाठी निविदा मागविणेबाबत.

२) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविणेबाबत संस्थानचा नफा मिळविणेचा प्रामुख्याने प्रस्तुतचा उपक्रम नाही. तर भक्तांना सुविधा देणेबाबतचा हेतू आहे करीता व्यवसाय विशिष्ठ मुदतीसाठी चालू ठेवणे.

३) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि.२१/१२/२०१३ चे पत्राने उपरोक्त व्यवसायाची मुदत दि. ३१/०५/२०१२ नंतर पुढील पाच वर्षाची मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे परंतू आजपावतो पुढील मुदत वाढ प्राप्त नाही. तरी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने व मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेने दि. ०१/०६/२०१२ पासून व्यवसायास पुढील पाच वर्षा किंवा कमीत कमी दोन ते तीन वर्षासाठी मागील लिव्ह अँन्ड लायसेन्स फी मध्ये १० टक्के वाढ करुन मुदतवाढ देणेस मा.उच्च न्यायालयात सिव्हील अर्ज दाखल करणे.

याबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४६ शिर्डी शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या वाहनांवर शिर्डी नगरपंचायत मार्फत विशेष स्वच्छता कर वसूल न केल्यामुळे भरपाई रक्कम वाढीव दरासह मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **०१)** शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशातून व परदेशातून दररोज हजारो साईभक्त येतात. संस्थानतर्फे साईभक्तांना आवश्यकतेप्रमाणे सेवा सुविधा देण्यात येतात. तसेच शिर्डी नगरपंचायतीमार्फत देखिल आवश्यक उपाय योजना राबविल्या जातात. शिर्डी नगरपंचायतीकडून दि.०१/०४/१९९२ पासून वाहन कर (विशेष स्वच्छता व आरोग्य कर) आकारला जात होता. मात्र या कर आकारणीमुळे भक्तांच्या भावना दुखावतात व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडूनच सदरचे कराची आकारणी होते, असा साईभक्तांचा गैरसमज निर्माण होतो, असे दिसून आले.

शिर्डी नगरपंचायतीने अशी कर आकारणी करु नये, यासाठी संस्थानने जा.नं. एसएसएस/ वशी-०२/ १३२१०/ २००४ दि. ३१/१२/२००४ चे पत्राने शिर्डी नगरपंचायतीस लेखी कळविले होते. याबाबत नगरपंचायतीने दि. ११/०५/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम त्यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळावी. सन २००४-०५ साली रुपये-४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यात २०% वाढ करण्यात यावी, असे संस्थानला कळविण्यात आले होते.

नगरपंचायतीचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना द्यावयाच्या अनुदानाबाबत तत्वःता मान्यता देण्यात आली. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना द्यावयाच्या रक्कमेबाबत मा.जिल्हाधिकारी,अ.नगर व स्थानिक विश्वस्त यांचे समंतीने निर्णय घ्यावयाचे ठरले. त्यानंतर दि.०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेमध्ये भक्तांकडुन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) नियंत्रण कर आकारु नये, यासाठी शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख) मात्र म्हणजेच प्रति ३ महिन्यास रुपये- १०,००,०००/- (अक्षरी रु.- दहा लाख) आगाऊ देण्यात यावे, असे मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांनी सांगितले व सर्वानुमते त्यांस मान्यता देण्यात आली.

त्यानंतर मा.व्य.समितीचे दि.०५/११/२००५ च्या सभेत विषय नं.०२, निर्णय क्रं.६५१ (६) उपरोक्त प्रमाणे रक्कम अदाईसाठी मान्यता देणेत आली. तसेच याकामी शासनाची परवानगी घ्यावी, असे ठरले.

**०२)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी भक्तांकडुन स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) कर आकारु नये. भक्तांच्या सोईसाठी अनुदान रक्कम रु. ४०,००,०००/- (अक्षरी रु.चाळीस लाख) मात्र शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रतिवर्षी देण्यास मान्यता मिळणेकामी संस्थानने जा.नं.एसएसएस/वशी-०२/१३०५४/०५ दि.०९/११/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. त्यावर महाराष्ट्र शासनाचे क्र. बैठक २०१०-

प्र.क्र.१६/१०/का-सोळा विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई दि. ७/०४/२०१० रोजीचे पत्रा सोबतचे दि. २७/०१/२०१० रोजीचे बैठक इतिवृत्तात रक्कम रु. ५०,००,०००/- मात्र दर वर्षी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू त्याबात इतिवृत्ता शिवाय वेगळा आदेश आलेला नाही.

**०३)** दरम्यानच्या काळात संस्थानने शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना मा.व्यवस्थापन मंडळाच्या ठरावास अनुसरुन शासन मान्यतेस अधिन राहुन खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

**नोव्हेंबर-२००५ ते मार्च-२०१२ अखेर शिर्डी नगरपंचायत यांना अदा करण्यात आलेली रक्कम-**

| अ.नं. | शिर्डी नगरपंचायत यांचे कडील मागणी दिनांक / महिना | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्रं. निर्णय क्रं. | शिर्डी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| ०१ | नोव्हेंबर-/डिसेंबर -०५ ते जानेवारी -२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०४/०२/२००६ आ.वे.वि.नं.२३, निर्णय क्रं.९८ | पा.न.५०३०३ दि.१३/०३/२००६. |
| ०२ | फेब्रुवारी /मार्च / एप्रिल-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०३/०६/२००६ आ.वे.वि.नं.३३,निर्णय क्रं.४०८ | पा.न.५१७४६ दि.२७/०६/२००६. |
| ०३ | मे-२००६ ते जुलै-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.१४/१०/२००६,आ.वे.वि. नं.४४,निर्णय क्रं.८२७ | पा.न.५३२२९ दि.१९/१०/२००६. |
| ०४ | ऑगष्ट-२००६ ते ऑक्टोबर-२००६. | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६६४ दि.२६/०१/२००७. |
| ०५ | नोव्हेंबर/ डिसेंबर-०६, ते जानेवारी-२००७ | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६७९ दि.१३/०३/२००७. |
| ०६ | फेब्रुवारी-२००७ ते डिसेंबर-२००७ | रु.३६,६६,६६६/- | दि.१०/०१/२००८ आ.वे.वि.नं.२२,निर्णय क्रं.१३३ | पा.न.५६७०७ दि.०१/०२/२००८. |
| ०७ | जानेवारी-२००८ ते जून-२००८ | रु.२०,००,०००/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.१९, निर्णय क्रं.६२४ | पा.न. २६७६ दि.१६/०७/२००८. |
| ०८ | जून -२००८ अखेर १०% वाढ | रु.९,५९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५,निर्णय क्रं.५९३ | पा.न.६३४४० दि. १८/०८/२००८. |
| ०९ | जुलै-२००८ ते ऑगष्ट-२००८ | रु.८,०६,६६६/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.४६२२५१ दि.१८/१०/२००८. |
| १० | सप्टेबर-२००८ ते डिसेंबर-२००८ | रु.१६,१३,३३२/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.६५५१० दि. १८/०२/२००९. |
| ११ | जाने.२००९ ते मार्च -२००९ | रु.१२,०९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.नं.६६८८९ दि.०४/०५/२००९ |
| १२ | एप्रिल २००९ ते मार्च २०१० | रु. ५०,००,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र.क्र.१६/१०/का.सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी | पा.नं. ७६७०२ दि. १४/०५/२०१० |
| १३ | एप्रिल २०१० ते मार्च २०११ | रु. ५०,००,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र. क्र. १६ / १० / का. सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि. २७/ ०१/ २०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी व दि. २६/०३/२०११ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभे तील विषय नं.४१ निर्णय क्र.२४१ अन्वये | रु. ५०,००,०००/- युनियन बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र. ५८७७४१ दि.०८/०६ / २०११ ने रक्कम अदा केली पावती क्र. ८५९०६ दि. ०६/०७/२०११ |
| १४ | एप्रिल २०११ ते जुन २०११ | रु.१२,५०,०००/- | शासन मंजूरी क्र. २०१० / (प्र. क्र. १६ / १० / का. सोळा विधी व न्याय विभाग, मुंबई येथील विशेष सभा दि. २७/ ०१/ २०१० रोजी सभेतील विषय नं.१३ अन्वये मंजूरी व दि. २८/०८/२०११ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभे तील विषय नं.५७ निर्णय क्र. ६५२ व दि. २४/०९/२०११ निर्णय क्र. ६७४ अन्वये. | रु.१२,५०,०००/- कार्पोरेशन बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र.०३९१७२ दि.१८ /१०/ २०११ ने रक्कम अदा केली पावती क्र. ८५९४७ दि.२९/१०/ २०११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१५** | जुलै २०११ ते सप्टेंबर २०११ | रु.१२,५०,०००/- | वरिल प्रमाणे | रु.१२,५०,०००/- कार्पोरेशन बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र. ३८८९२ दि. १९/०३/ २०१२ ने रक्कम अदा केली पावती क्र. ९१३५० दि. ३०/०३/२०१२. |
| **१६.** | आक्टोबर ११ ते मार्च २०१२ | रु.२५,००,०००/- | वरिलप्रमाणे | रु. २५,००,०००/- युको. बँक शाखा, शिर्डी चा चेक क्र. ९६४५८०, दि. ०१/०८/२०१२ ने रक्कम अदा केली. |
| | **एकुण रक्कम रुपये-** | **रु.३,०२,५६,६६२/-** | | |

**०४)** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी पुन्हा दि. १७/१०/२०१३ रोजीचे पत्राने सन २०१२ - २०१३ कालावधीचे रक्कम रु. ५०,००,०००/- व सन २०१३ - २०१४ या कालावधीसाठी रक्कम रु. ५०,००,०००/- असे एकुण रक्कम रु. १,००,००,०००/- मिळणेस विनंती करण्यात आली होती. त्यानुसार मा. त्रिसदस्य समितीचे दि. १४/११/२०१३ रोजीचे सभेत विषय नं. २८ निर्णय क्र. ९१७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना दिल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता कर /आरोग्य कर ( नाके ) अनुदानाबाबत अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही. शासनाकडून मान्यता आल्यानंतर संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व त्यानंतर सदरहू अनुदान शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना आदा करणेत यावे, असे ठरले आहे. प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन जा.क्र. एसएसएस वशी विधी /४५३७/२०१३ दि. ०३/०१/२०१४ ने शासनास मान्यता देणेबाबत विनंती केली आहे. ( शासनाची मान्यता अद्याप प्राप्त नाही. )

**०५)** शासनाने आता दि. १५/०१/२०१४ रोजीचे पत्राने शिर्डी येथील तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या दि. २७/०१/२०१० रोजी झालेल्या बैठकीत शिर्डी नगरपंचायतीस प्रतिवर्षी रु. ५० लाख देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तथापि, याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला नाही, असे इकडेस कळविले आहे. त्याचप्रमाणे श्री साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस सदर करापोटी देण्यात येणाऱ्या रकमांचा वर्षनिहाय सविस्तर तपशील तसेच नगरपंचायतीकडून संस्थानला कोणत्या सवलती दिल्या जातात याचा सविस्तर तपशील शासनाकडून मागविणेस आला आहे. तसेच याबाबींचा आढावा घेऊन यासंदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. संस्थानकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशा आशयाचे पत्र पाठविले आहे.

आता शिर्डी नगरपंचायतीने जा.क्रं.न.पं./टी-२/२२०/२०१४ दि.२०/०१/२०१४ रोजीचे संस्थानला पत्र पाठविले आहे. त्यापत्रामध्ये दि. ०१/०४/२००२ पासून शिर्डी शहरात येऊन थांबणाऱ्या वाहनांवर विशेष स्वच्छता/ आरोग्य कर आकारणेस सुरुवात केली व माहे नोव्हेंबर २००५ पर्यंत विशेष स्वच्छता/ आरोग्य कराची आकारणी केलेली आहे. त्यानंतर श्री साईबाबा संस्थान शिर्डीने सन २००४-०५ या आर्थीक वर्षातील उत्पन्नाइतकी विशेष स्वच्छता/ आरोग्य करापासूनची मिळालेली रक्कम नगरपंचायतीस दिल्यास सदर कर बंद करणेस परवानगी दिलेली होती. त्यानुसार प्रत्येक वाहनाकडून प्रत्यक्ष फी वसूल करणेऐवजी साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस नोव्हेंबर २००५ पासून प्रतीवर्षी रु.४०,००,०००/- रक्कम आणि त्यापुढील प्रतिवर्षी १०% वाढीसह एकरकमी रक्कम आर्थीक मदत म्हणून देणेचे ठरले. व त्यानुसार नगरपंचायतीस खालील प्रमाणे वर्षनिहाय आर्थीक मदत प्राप्त झालेली आहे, असे प्रस्तुत पत्रात नमुद केले आहे. प्राप्त रक्कमेचा तपशिल खालील १०% रक्कमेची वाढीव रक्कम त्यांचे हिशोबाप्रमाणे संस्थानकडून मागणी केली आहे.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **ठरल्याप्रमाणे संस्थानकडून नगरपंचायतीस देय रक्कम** | **नगरपंचायतीस प्रत्यक्षात प्राप्त झालेली रक्कम** | **१०% वाढीव फरकासह शिल्लक रक्कम** | **१०% वाढीव** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००५-२००६ | ४०,००,०००/- | ४०,००,०००/ | निरंक | |
| २ | २००६-२००७ | ४४,००,०००/- | ४४,००,०००/ | निरंक | |
| ३ | २००७-२००८ | ४८,४०,०००/- | ४८,४०,०००/ | निरंक | |
| ४ | २००८-२००९ | ५३,२४,०००/- | ५०,००,०००/ | ३,२४,०००/- | १०% |
| ५ | २००९-२०१० | ५८,५६,४००/- | ५०,००,०००/ | ८,५६,४००/- | १०% |
| ६ | २०१०-२०११ | ६४,४२,०४०/- | ५०,००,०००/ | १४,४२,०४०/- | १०% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | २०११-२०१२ | ७०,८६,२४४/- | ५०,००,०००/ | २०,८६,२४४/- | १०% |
| ८ | २०१२-२०१३ | ७७,९४,८६८/- | -- | ७७,९४,८६८/- | १०% |
| ९ | २०१३-२०१४ | ८५,७४,३५५/- | -- | ८५,७४,३५५/- | १०% |
| | **एकुण** | **५,४३,१७,९०७/-** | **३,३२,४०,०००/-** | **२,१०,७७,९०७/-** | १०% |

संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस ठरविल्याप्रमाणे विशेष स्वच्छता/ आरोग्य रक्षण करापोटी आर्थीक मदत प्राप्त झालेली नाही. व चालू आर्थिक वर्ष सन २०१३-२०१४ अखेर रु. २,१०,७७,९०७/- एवढी रक्कम अप्राप्त राहिलेली आहे, असे त्यांचे म्हणणे प्रस्तुत पत्रात नमुद केले आहे. शिर्डी शहर श्री साईबाबांच्या मंदीराच्या अस्तित्वामुळे जगप्रसिध्द झाले आहे त्यामुळे शिर्डीला दररोज सुमारे एक लाख भाविक साईबाबांचे दर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाच्या वर्षिक सणव उत्सवांच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड प्रमाणात वाढत असते. नगरपंचायतीचे स्वतःचे उत्तन्न रहीवाशी नागरीकांकडून वसूल घेणाऱ्या घरपट्टी, पाणीपट्टी, व दुकानभाडे व विविध फी व्दारे जमा होत असून सदर उत्पन्न वार्षिक सरासरी २.५ कोटी एवढेच आहे. नगरपंचायतीने सदर उत्पन्नामधून आपल्या रहीवाशी नागरीकांना स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, रस्ते, बाजार, सांडपाणी निकासी, बगीचे इ. नगरपरिषद कायदा १९६५ कलम ४९ मध्ये नमुद सुमारे ६२ प्रकारची कामे पार पाडावयाची आहेत. सदरची जबाबदारी पार पाडणेसाठी नगरपंचायत स्वतःचे तुटपूंजे उत्पन्न व शासनाच्या विविध योजनामधून अनुदान मिळवून प्रयत्न करीत आहे. साईबाबांची महती जगभर झपाट्याने पसरत गेल्यामुळे भाविक व वाहनाचे प्रमाण प्रतीवर्ष तीन ते चार पटीने वाढत चाललेले आहे. तरी शिर्डी नगरपंचायतीस संस्थानकडून विशेष स्वच्छता/ आरोग्य कर पोटी ठरल्याप्रमाणे अदा करण्यात न आलेली सन २००८-२००९ ते २०१३-२०१४ या आर्थीक वर्षाची शिल्लक रक्कम रु. २,१०,७७,९०७/- मिळावी तसेच ०१ एप्रिल २०१४ पासून पुढील कालावधीत प्रती वर्षी विशेष स्वच्छता करापोटी रु. २,००,००,०००/- नगरपंचायतीस मिळणेस विनंती आहे. आपणाकडून सदर करापोटी भरपाई न मिळाल्यास शिर्डी नगरपंचायत दि. ०१ एप्रिल २०१४ पासून शिर्डी शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांकडून विशेष स्वच्छता कर/ आरोग्य रक्षण कराची (नाके) पुर्ववत वसुली चालू करेल याची नोंद घ्यावी ही विनंती. अशा आशयाचे पत्र शिर्डी नगरपंचायतीने दिलेले आहे.

शिर्डी नगरपंचायत यांनी वाढीव १०% रक्कमेची मागणी यापुर्वीही दि. ०४/०२/२०१२ व दि.२९/१०/२०१२ रोजीचे पत्राने केली होती. मात्र शासनाचे इतिवृत्तास अनुसरुन नगरपंचायतीस ५० लाख अदा करीत असल्याचे नगरपंचायतीस यापुर्वीच जा.क्र. एसएसएस वशी विधी/ १५०८/२०१२ दि. ०७/०७/२०१२ व जा.क्र. एसएसएस वशी विधी/४९२१/२०१३ दि. २८/०१/२०१३ चे पत्राने कळविणेत आले आहे. आता दखील नगरपंचायतीने १०% वाढ हिशोबी धरुन रक्कम कळविलेली आहे. त्याचप्रमाणे शिर्डी येथे येणारे गर्दीचे हिशोबाने रक्कम रु. २ कोटी प्रतिवर्षी नगरपंचायतीस मिळणेबाबत विनंती केलेली आहे. नगरपंचायतीस शासनाचे दि. ७/०४/२०१० रोजीचे पत्राप्रमाणे प्रतिवर्षी द्यावयाचे रक्कम रु.५० लाख मात्रचे मंजूरीसाठी मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेत विषय नं. २८ निर्णय क्र. ९१७ अन्वये रक्कम अदाईसाठी शासन स्तरावर प्रकरण चालू आहे. नगरपंचायतीस प्रतिवर्षी ५० लाख देणेचा निर्णय झाला आहे. परंतू निर्णय निर्गमीत झालेला नाही असे आता इकडे कळविले असून शासनाने खालील मुद्यावर संस्थानकडून माहिती मागविणेत आलेली आहे.

१) श्री साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस सदर करापोटी देण्यात येणाऱ्या रकमांचा वर्षनिहाय सविस्तर तपशील तसेच नगरपंचायतीकडून संस्थानला कोणत्या सवलती दिल्या जातात याचा सविस्तर तपशील.

२) तसेच याबाबींचा (उपरोक्त बाबींचा) आढावा घेऊन यासंदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनास संस्थानकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन स्तरावर पुढील निर्णय देणार आहे.

नगरपंचायतीकडून संस्थानला पुरवणित येणारे सुविधांबाबत संस्थानचे विविध खात्याने नगरपंचायतीकडून सवलती देणेत येत नसल्याचा अहवाल दिलेला आहे. नगरपंचायतीकडून याबाबत माहिती प्राप्त होत आहे.

संस्थानकडून शासन निर्णया प्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे रक्कम नगरपंचायतीस अदा करणेत येईल असे नगरपंचायतीस कळविता येईल. त्याप्रमाणे त्यांनी रु. २ कोटी वाढीव रक्कमेची प्रतिवर्षी मिळणेबाबत दि. ०१/०४/२०१४ पासून स्वच्छता कराची रक्कम मिळणेबाबत मागणी केलेली आहे. संस्थानकडून करापोटी भरपाई (रक्कम) न मिळालेस दि. ०१/०४/२०१४ पासून शिर्डी शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांकडून विशेष स्वच्छता कर/ आरोग्य रक्षण कराची (नाके) पुर्ववत वसुली चालू करेल याची नोंद घ्यावी अशा आशयाचे पत्र नगरपंचायतीने दिलेले आहे.

शिर्डी येथे येणारे भक्तांचे संख्येत दिवसें दिवस होणारी वाढ शिर्डी येथे रस्ते, साफसफाई, रहदारी, बाजार, पार्किंग, पाणी इ. पायाभूत सुविधावर तान येत आहे. इ. मुद्दे नगरपंचायतीने त्यांचे पत्रात नमुद केले आहे.

उपरोक्त परिस्थीतीबाबत शिर्डी नगरपंचायतीस रु.२ कोटी वाढीव द्यावयाचे पथकराचे रक्कमेबाबत व शासनास सादर करावयाचे प्रस्तावाबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४७ महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणे, कार्यक्रमाअंतर्गत शिर्डीतील रस्ते विकासासाठी नगरपंचायतच्या कर्जाच्या हिस्याची रक्कम मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र.न.पं.बांध/दे.०८/५१८/१४,दि.१५.०२.२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे. चशिर्डी नगरपंचायतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणे कार्यक्रमा अंतर्गत शिर्डी हद्दीतील खालील २७ रस्त्यांचे कामे करावयाची आहे.

१) कनकुरी रस्ता, २) बिरेगांव रस्ता नविन पिंपळवाडी रस्ता ते चौफुली, ३) बिरेगांव रस्ता चौफुली ते बिरोबा मंदिर. ४) शिर्डी बन रस्ता बिरोबा मंदिर चौफुली पर्यंत ५) पिंपळवाडी रस्ता ते चौफुली रस्ता, ६) शिर्डी निमगांव/निघोज शिवरस्ता. ७) पिंपळवाडी रस्ता लुटे वस्ती ते साकुरी शिव नाला. ८) शिर्डी-साकुरी शिवरस्ता पुर्व, ९) शिर्डी-साकुरी शिवरस्ता पश्चिम. १०) नांदुर्खी रस्ता ते साकुरी शिवरस्ता, ११) शिडी नाला रस्ता (उर्वरीत लांबी ०/३०० ते ०/६००), १२) शिडी नाला रस्ता (उर्वरीत लांबी ०/६०० ते ०/११००), १३) शिडी पिंपळवाडी रस्ता १/० ते न.प.हद्द, १४) स्वागतकक्ष ते नगरपंचायत हद्द, १५) साईलीला ते पुखराज लोढा वस्ती. १६) पुखराज लोढा वस्ती ते पिंपळवाडी रस्ता. १७) श्री साईबाबा संस्थान नविन प्रसादालयाकडील रस्ता. १८) बिरेगांव चौफुली ते पिंपळवाडी व रुई शिवरस्ता. १९) शिर्डी पिंपळवाडी रस्ता ते एस टी पी रोड, २०) स्वामी रिसोर्ट ते पानमळा रस्ता. २१) शिर्डी बिरेगाव साकुरी / राहाता शिवरस्ता, २२) शिर्डी बिरेगांव शिवरस्ता (पश्चिमेकडील), २३) शिर्डी रुई पिंपळवाडी शिवरस्ता, २४) साईद्वारकानगर ते बिरेगांव शिर्डी शिवरस्ता. २५) हॉटेल गोराडीयासमोरील रस्ता. २६) शिर्डी पिंपळवाडी मुख्य रस्ता (०/४६५ ते १/०), २७) शिर्डी बन रस्ता नविन पिंपळवाडी रस्ता ते बिरेगांव नालापर्यंतचा रस्ता.

उपरोक्त रस्त्यांचे कामासाठी अंदाजे रु.२५ कोटी, २५ लाख खर्चाचा रस्ता विकास प्रकल्प या कार्यालयाकडून महाराष्ट्र शासनास सादर करणेत आलेला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एनयुआर-२००८/प्र.क्र.२००३/नवि-३३, मंत्रालय मुंबई, दि.२०.०२.२०१० मध्ये अ व ब वर्ग तिर्थक्षेत्रासाठी व क वर्ग नगरपालिकांसाठी खालीलप्रमाणे वित्तीय प्रबंध नमुद केलेला आहे.

| | |
|---|---|
| १) स्थानिक स्वराज्य संस्था | - ०५ % |
| २) मंदिर ट्रस्ट | - १० % |
| ३) कर्ज हिस्सा | - १५ % |
| ४) शासन अनुदान | - ७० % |
| | १०० % |

शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे कर्ज घेऊन त्याची परत फेड करणे नगरपंचायतीस शक्य होणार नाही. त्यामुळे नगरपंचायतीने दि.१७.०७.२०१३ चे सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.१४ ब नुसार कर्ज हिस्सा १५% व देवस्थानचा हिस्सा १० % अशी २५ % रक्कम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी खर्च करावी, असे ठरले आहे.

रस्ता विकास प्रकल्पामध्ये असलेली कामे ही तिर्थक्षेत्राशी संबंधित असुन मुख्य रस्त्यांची आहेत. सदर रस्त्याचा उपयोग साईभक्तांना व नागरीकांना होणार आहे. तरी दाखल केलेल्या रस्ता विकास प्रकल्पातील कर्जाच्या हिस्स्याची १५% रक्कम व मंदिर ट्रस्टच्या हिस्याची १०% रक्कम अशी एकूण २५ % रक्कम श्री साईबाबा संस्थानने खर्च करावी, अशी विनंती केलेली आहे. (प्रस्तावीत खर्चानुसार होणारी रक्कम- कर्जाचा हिस्सा रु.-२,५२,५०,०००/- मंदिर ट्रस्ट चा हिस्सा रु-३,७८,७५,०००/- एकुण मागणी रक्कम रु.६ कोटी, ३१ लाख, २५ हजार मात्र)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे, अशी तरतुद आहे. यासाठी प्रस्तावास छाननी समितीची शिफारस व राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करता येईल व मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास शिर्डी नगरपंचायतीकडून प्रस्तावीत कामांचे प्लॅन-एस्टिमेट व आवश्यक त्या मंजुऱ्या व कागदपत्रांची पुर्तता करुन घेता येतील व सध्या छाननी समितीची स्थापना झालेली

नसल्यामुळे सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद व विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई, यांचे मंजुरीसाठी पाठविता येईल.

तरी एकुण खर्च रु.२५ कोटी, २५ लाख, यानुसार (१) मंदिर ट्रस्टचा १०% हिस्सा रु.- २,५२,५०,०००/- व (२) नगरपंचायतच्या कर्जाचा १५% हिस्सा रुपये-३,७८,७५,०००/- अशी एकुण रक्कम रु.६ कोटी, ३१ लाख, २५ हजार मात्र, श्री साईबाबा संस्थानने खर्च करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४८ महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणे, कार्यक्रमाअंतर्गत शिर्डीतील रस्त्यांना पथदिवे बसविणेसाठी नगरपंचायतीच्या कर्जाच्या हिस्याची रक्कम मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र.नप./टे.क्र.८/९८७/२०१४, दि.२१.०३.२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे. चशिर्डी नगरपंचायतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणे कार्यक्रमा अंतर्गत शिर्डी हद्दीतील खालील २७ रस्त्यांचे कामे करावयाची आहे.

| अ.नं | रस्त्याचे नांव | अ.नं | रस्त्याचे नांव | अ.नं | रस्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनकुरी रस्ता, | २ | बिरेगांव रस्ता नविन पिंपळवाडी रस्ता ते चौफुली | ३ | बिरेगांव रस्ता चौफुली ते बिरोबा मंदिर |
| ४ | शिर्डी बन रस्ता बिरोबा मंदिर चौफुली पर्यंत | ५ | पिंपळवाडी रस्ता ते चौफुली रस्ता, | ६ | शिर्डी निमगांव/निघोज शिवरस्ता. |
| ७ | पिंपळवाडी रस्ता लुटे वस्ती ते साकुरी शिव नाला. | ८ | शिर्डी-साकुरी शिवरस्ता पुर्व, | ९ | नांदुर्खी रस्ता ते साकुरी शिवरस्ता, |
| १० | नांदुर्खी रस्ता ते साकुरी शिवरस्ता, | ११ | शिडी नाला रस्ता (उर्वरीत लांबी ०/३०० ते ०/६००), | १२ | शिडी नाला रस्ता (उर्वरीत लांबी ०/६०० ते ०/११००) |
| १३ | शिडी पिंपळवाडी रस्ता १/० ते न.प.हद्द, | १४ | स्वागतकक्ष ते नगरपंचायत हद्द, | १५ | साईलीला ते पुखराज लोढा वस्ती. |
| १६ | पुखराज लोढा वस्ती ते पिंपळवाडी रस्ता. | १७ | श्री साईबाबा संस्थान नविन प्रसादालया कडील रस्ता. | १८ | बिरेगांव चौफुली ते पिंपळवाडी व रुई शिवरस्ता. |
| १९ | शिर्डी पिंपळवाडी रस्ता ते एस टी पी रोड, | २० | स्वामी रिसोर्ट ते पानमळा रस्ता | २१ | शिर्डी बिरेगाव साकुरी /राहाता शिवरस्ता, |
| २२ | शिर्डी बिरेगांव शिवरस्ता (पश्चिमेकडील), | २३ | शिर्डी रुई पिंपळवाडी शिवरस्ता, | २४ | साईद्वारकानगर ते बिरेगांव शिर्डी शिवरस्ता. |
| २५ | हॉटेल गोराडीयासमोरील रस्ता | २६ | शिर्डी पिंपळवाडी मुख्य रस्ता (०/४६५ ते १/०), | २७ | शिर्डी बन रस्ता नविन पिंपळवाडी रस्ता ते बिरेगांव नालापर्यंतचा रस्ता |

उपरोक्त रस्त्यांना पथदिवे उभारणीचे कामासाठी अंदाजे रु.१४ कोटी, १८ लाख खर्चाचा विकास प्रकल्प शिर्डी नगरपंचायतीकडून महाराष्ट्र शासनास सादर करणेत आलेला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एनयुआर-२००८/ प्र.क्र.२००३/नवि-३३, मंत्रालय मुंबई, दि.२०.०२.२०१० चे शासन निर्णयात अ व ब वर्ग तिर्थक्षेत्रासाठी व क वर्ग नगरपालिकांसाठी खालीलप्रमाणे वित्तीय प्रबंध नमुद केलेला आहे.

१) स्थानिक स्वराज्य संस्था - ०५ %    २) मंदिर ट्रस्ट - १० %
३) कर्ज हिस्सा (न.पं.) - १५ %    ४) शासन अनुदान - ७० %
एकुण- १०० %

शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे कर्ज घेऊन त्याची परत फेड करणे नगरपंचायतीस शक्य होणार नाही. त्यामुळे नगरपंचायतीने सर्वसाधारण सभा दि.१५.०२.२०१४ ठराव क्र.२ (२) नुसार कर्ज हिस्सा १५% व देवस्थानचा हिस्सा १० % अशी २५ % रक्कम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी खर्च करावी, असे ठरले आहे.

पथदिवे उभारणी कामे ही मंजुरी रस्ते विकास प्रकल्पातील रस्त्यांसाठी तसेच अस्तित्वातील पथदिवे सुधारणा करणे असुन ही तिर्थक्षेत्राशी संबंधित आहेत. सदर पथदिव्यांचा उपयोग साईभक्तांना व नागरीकांना होणार आहे. तरी दाखल केलेल्या पथदिवे विकास प्रकल्पातील कर्जाच्या हिस्स्याची १५% रक्कम व मंदिर ट्रस्टच्या हिस्याची १०% रक्कम अशी एकूण २५ % रक्कम श्री साईबाबा संस्थानने खर्च करावी, अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तावीत एकूण खर्च रु.१४ कोटी, १८ लाख मात्र, नुसार होणारा कर्जाचा हिस्सा रु.२,१२,७०,०००/- मंदिर ट्रस्ट चा हिस्सा रु.१,४१,८०,०००/- एकुण रक्कम रु.३ कोटी, ५४ लाख, ५० हजार मात्र.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार च्स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे, या तरतुदीस अनुसरुन प्रस्तावास छाननी समितीची शिफारस व राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करता येईल व मा.त्रिसदस्य समितीची मान्यता मिळाल्यास शिर्डी नगरपंचायतीकडून प्रस्तावीत कामांचे प्लॅन-एस्टिमेट व आवश्यक त्या मंजुऱ्या व कागदपत्रांची पुर्तता करुन घेता येतील व सध्या छाननी समितीची स्थापना झालेली नसल्यामुळे, सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद व विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई, यांचे मंजुरीसाठी पाठविता येईल.

सदर प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.४३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने २० वा श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीची कर्तव्ये व अधिकार- १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**१७. (२) ठ-** श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

नाटय रसिक संच शिर्डी यांनी दिनांक २६/०४/२०१४ चे पत्राने या वर्षी श्रावण शुध्द प्रतिपदा ते श्रावण शुध्द अष्टमी शके १९३६, म्हणजे रविवार **दि.२७/०७/२०१४ ते सोमवार दि.४/०८/२०१४** अखेर साजरा करणे करीता परवानगीची मागणी केलेली असून यापत्रात संस्थानमार्फत खालील बाबीवर खर्च करणेस विनंती केलेली आहे.

१) मंडप व स्टेज व फुले डेकोरेशन
२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
३) मिरवणूक खर्च, बँड, वाद्य इत्यादी.
४) पत्रिका, हॅन्डबील, बॅनर, इत्यादी छपाई.
५) चहा व नाश्ता,श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करणार आहेत.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी नाटय रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या १९ वर्षापासून दरवर्षी सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे ४५०० साईभक्त सहभाग घेत असतात. दरवर्षी पारायण सोहळयाची रुपरेषा खालीलप्रमाणे असते.

१) दररोज सकाळी ७.०० ते ११.३० - पुरुष पारायणार्थी
२) दररोज दुपारी १.०० ते ५.३० -महिला पारायणार्थी
३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/ व्याख्यान/ इतर करमणुकीचे कार्यक्रम.
४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा.
५) अवतरणिकेच्या दिवशी एकच बॅच ( स्त्री व पुरुष ) राहील.
६) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

मागीलवर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास या कामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशील | २०१३ चा प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षाचे कार्यक्रमा साठी अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | मंडप, पार्टीशन, रथ सजावट व स्टेज (डेकोरेशन व सजावटीसह ) | २,६८,६३७-०० | ३,००,०००-०० |
| २ | कलाकार बिदागी | ५७,३४९-०० | ७५,०००-०० |
| ३ | प्रसाद खर्च (आचारी मजुरीसह) | ५,३३,११५-०० | ५,७५,०००-०० |
| ४ | इतर खच ( निमंत्रण पत्रिका व फ्लेक्स बोर्ड ) | १६,६९०-०० | २०,०००-०० |
| | **एकुण खर्च** | **८७५७९१-००** | **९,७०,०००/-** |

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामस्थांचे आग्रहास्तव १६ गुंठे जागेत घेण्यात आले होते. ४५०० पारायणार्थी पारायणासाठी सहभागी झले होते. यात सकाळी पुरुष व दुपारी महिला असे दोन वेळेत वाचनाचे आयोजन केले होते. तेथे जागेची अडचण निर्माण झाली होती. यावर्षी पारायणार्थीचे संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

१) सन ११९५ साली दिक्षीत वाडयाच्या सभागृहात झाले. १९६६ पासून ते सन २००६ पर्यत गेट नंबर ४ चे परीसरात आयोजीत करण्यात येत असे.

२) साईभक्ताच्या संख्येत वाढ झालेने त्यांच्या जाणे- येणेस जागा अपुरी पडत असलेने सन २००७ पासून १६ गुंठे जागेत आयोजित करणेत येत होते.

३) भक्तांच्या संख्येत दिवसेदिवस लक्षणीय स्वरुपात वाढ होत असलेने तसेच २०१० मध्ये मंडप कोसळल्याने साईप्रसादालयाचे हॉलमध्ये आयोजीत केले होते.

**खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती.**

१) उपरोक्त श्रावण मासातील पारायण आयोजीत करणे निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चित झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रुपये ९,७०,०००/- चे खर्चास तसेच पारायणाची जागा निश्चित होणे आवश्यक आहे.

२) मागील वर्षप्रमाणे पारायणासाठी १६ गुंठेची जागा निश्चित करणे असल्यास त्या जागेत पारायणार्थी बसू शकतील तसेच भक्तांचे जाणे येणेसाठी पुरेसी जागा राहील याबाबी विचारात घेता पारायणार्थीची कमाल संख्या निश्चित करणे .

३) इच्छुक पारायणर्थीना पारायणासाठी बसण्याची व्यवस्था करणे असल्यास साईनगर अगर दुसऱ्या मोठया जागेवर मंडप टाकणे.

४) जागा निश्चितीबाबत तसेच पारायणार्थीची कमाल संख्या निश्चित करणेबाबत नाटयरसिक संचाचे पदाधिकाऱ्यांची सभा आयोजीत करावी किंवा कसे ?

५) अंदाजे रक्कम रुपये खर्च रु.९,७०,०००/- ( रुपये नऊ लाख सत्तर हजार ) मात्र चे खर्चास मंजूरी मिळणे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजित करणे बाबत निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चित झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु.९,७०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने २० वा श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा साजरा करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, पारायण सोहळा संपल्यानंतर काही स्थानिक सहली आयोजक पारायणार्थीना घेऊन धार्मिक ठिकाणी सहली काढतात व त्या वाहनांवर पारायण सोहळयाचे फलक लावतात, त्यामुळे बाहेरील भक्तांमध्ये चुकीचा संदेश जातो. यासाठी स्थानिक सहली आयोजकांना सहलीच्या वाहनांवर व ओळखपत्रांवर पारायण सोहळयाचे नावाचा उल्लेख करु नये, असे लेखी कळविणेत यावे. पारायण सोहळयामध्ये होणारा सर्व खर्च संस्थानने करावा व विविध ठिकाणी लावणेत येणाऱ्या फलकांवर साईबाबा संस्थान व्यतिरिक्त इतर मंडळांची नावे लिहीणेत येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.१५० श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील." त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव शुक्रवार दि.११/०७/२०१४ ते रविवार दि.१३/०७/२०१४असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस शनिवार दि.१२/०७/२०१४ आहे. या उत्सवासाठी खालीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १७६००० पाकीटां- सह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील.<br>तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था- | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | शुक्रवार<br>दिनांक- ११/०७/२०१४<br>(प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल. |
| | शनिवार<br>दिनांक १२/०७/२०१४<br>(मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल.<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (१२/०७/२०१४ ) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्श-नासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | रविवार<br>दिनांक-१३/७/२०१४<br>(सांगता दिवस) | सायंकाळी ०७.३० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (समाधी मंदीराचे उत्तरेकडील स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>**इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | शुक्रवार दि.११/०७/२०१४<br>शनिवार १२/०७/२०१४<br>रविवार दि.१३/०७/२०१४ | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. **किर्तनकार निश्‍चिती करावयाची आहे**. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि. ११/०७/२०१४ ते दि. १३/०७/२०१४ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील. |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स, मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे- येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना दि.२६/०४/२०१४ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक ११/०७/२०१४ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि. १२/०७/२०१४ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.त्रिसस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक ११/०७/२०१४ रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्‍चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. |

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| | | या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहातील. तसेच श्री रामनवमी उत्सव सन २०१४ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी शुक्रवार दिनांक ११/०७/२०१४ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, शनिवार दि-नांक १२/०७/२०१४ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते.मा.त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटुंबीय व - नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात येईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. श्री रामनवमी उत्सवात सन २०१४ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते. ०१) प्रथम दिवस - बुंदी (०२) मुख्य दिवस - बुंदी (०३) सांगता दिन - बुंदी<br>या उत्सवात देखील यानुसार तीन दिवस तीन मिष्टांन्न देण्यात येतील. |
| ९ | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १३ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम नं. १ व २, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारती मधून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या व सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था साईआश्रम (धर्मशाळा) परिसरात करण्यात येते. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १७ | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१३ मध्ये प्रत्यक्ष खर्च रुपये २३,३३,५३९/-/- (अक्षरी रु. तेवीस लाख तेहतीस हजार पाचशे एकोणचाळीस मात्र) इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१४ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रुपये ४२,७०,०००/- (अक्षरी रु.बेचाळीस लाख सत्तर हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१४ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ४२,७०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बेचाळीस लाख सत्तर हजार) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१५१ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजुर करणेकामी गोपनिय अहवालाचे प्रतवारीमध्ये शिथीलता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचा-यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र. १४७ :- शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.०१ एप्रिल २०१० नुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू करणेत आलेली 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ' संस्थान आस्थापनेवरील पात्र ठरणा-या कर्मचा-यांना लागू करणेत यावी.

सदर निर्णयानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणेसाठी साधारणपणे पात्र असलेल्या ९९ कर्मचा-यांची शासन निर्णयाप्रमाणे गोपनीय अहवालाची पडताळणी करुन त्यापैकी ७८ पात्र कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ मंजुर करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

विषय नं.७२ निर्णय क्र.७७२- संस्थान मधील कायम कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ देणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पात्र ठरत असलेल्या ७८ कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अतंर्गत पहिला लाभ त्यांचे देय असलेल्या तारखेपासुन लागु करण्यात यावा.

तसेच उर्वरित अपात्र कर्मचा-यांना त्यांच्या गोपनिय अहवालाबाबत माहिती देण्यात यावी व त्यानुसार संबधीत कर्मचा-यांचे लेखी म्हणणे घेण्यात येऊन, त्या-त्या विभागाचे विभागप्रमुख तसेच प्रशासकीय अधिकारी / प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावे. व अपात्र कर्मचा-यांमधील योग्य कर्मचा-यांच्या गोपनिय अहवालाचा पुर्नविचार होणेसाठी सदरहु अभिप्राय मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात यावे असे ठरलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदर योजनेच्या पहिल्या लाभासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती तसेच शासकिय सेवेतील कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकषानुसार -

अ) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पहिल्या लाभासाठी एकूण- ७८ कर्मचारी पात्र झाल्यामुळे जा.नं.एसएसएस/वशी-०१/३२८४/२०१३ दि.३१ डिसेंबर २०१३ अन्वये संबंधीत कर्मचा-यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

ब) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पहिल्या लाभासाठी **-२१** कर्मचारी अपात्र ठरले आहेत. त्यामुळे त्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना शिर्डी यांनी दि.३०/१२/२०१३ चे पत्रान्वये संबधीत कर्मचारी प्रामाणिकपणे काम करीत आहेत, तरी त्यांना १२ वर्षानंतरची कालबाह्य वेतनश्रेणी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त कर्मचा-यामध्ये डॉक्टर-०१, सिस्टर इनचार्ज-०१, परिचारीका-०३, लिपीक टंकलेखक-०१ व वर्ग ०४ कर्मचारी-१५ असे एकुण २१ कर्मचारी असुन त्यांचे लगतचे ०५ वर्षामधील सेवा पुस्तकातील नोंदी तसेच वैयक्तीक धारिण्या पाहील्या असता त्यामध्ये खालील प्रमाणे वर्गवारी करण्यात आली.

| अ.नं. | तपशील | रु.४२०० किंवा त्यापेक्षा कमी ग्रेड वेतन घेणारे कर्मचारी | रु.४२०० पेक्षा जास्त ग्रेड वेतन घेणारे कर्मचारी |
|---|---|---|---|
| ०१ | गैरवर्तन रिपोर्ट नसलेले कर्मचारी | **०४** | **०१** |
| ०२ | गैरवर्तन रिपोर्ट नुसार ताकीद, सक्त ताकीद अशी वेळेस किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी (फक्त एक किंवा दोन गैरवर्तन रिपोर्ट झालेले कर्मचारी ) | **०४** | **०१** |
| ०३ | गैरवर्तन रिपोर्ट नुसार विनापरवानगी गैरहजर, दंड, सेवा निलंबन अशा गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | ०८ | ०१ |
| ०४ | गोपनीय अहवालानुसार **बी-** प्रत वारी असलेले कर्मचारी | ०२ | ०० |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार उपरोक्त कर्मचा-यापैकी अ.नं. ०१ व ०२ वरील कर्मचारी (एकूण-१०) यांना त्यांचे गोपनीय अहवाल दाखविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर कर्मचा-यांकडून त्यांचे लेखी म्हणणे घेण्यात आलेले असून संबंधीत विभागाचे अधिक्षक/ विभाग प्रमुख यांचेकडून अभिप्राय घेण्यात आलेले आहेत. व सदर अभिप्रायांचे पुर्नविलोकन प्रशासकीय अधिकारी/ प्र. प्रशासकीय अधिकारी यांनी केले असून सोबत परिशिष्ट जोडले आहे.

संबंधीत कर्मचा-यांबाबत संबंधीत विभाग प्रमुख यांचे अभिप्राय व पुर्नविलोकन अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन संबंधीत कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करणेबाबत परिशिष्ट क्र.१ व २ मधील एकुण १० कर्मचा-यांचे प्रतवारीमध्ये शिथीलता देऊन विचार करता येईल.सोबत उपरोक्त २१ कर्मचा-यांचे परिशिष्ट क्र.१ ते ३ माहितीस्तव जोडले आहे.

सोबतचे परिशिष्ट क्र.१ मधील ०५ कर्मचारी व परिशिष्ट क्र.२ मधील ०५ कर्मचारी असे एकुण १० कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजुर करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अपात्र कर्मचाऱ्यांच्या गोपनिय अहवालाचे प्रतवारीमध्ये शिथीलता देण्यात येऊ नये, ज्या वेळेस अपात्र कर्मचारी लगतचे पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची आवश्यक योग्य व उचित प्रतवारी प्राप्त करुन शासन नियमाप्रमाणे पात्र होतील, त्या वर्षापासून/ तारखेपासून या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजुर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५२ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (दुसरा लाभ) मिळणेस अपात्र ठरलेल्या ३५ कर्मचाऱ्यांना नियमात शिथिलता देऊन सदर योजनेचा लाभ लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक ०१ एप्रिल, २०१० तसेच वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/ प्र.क्र.४१/सेवा-३, दिनांक ०५ जुलै, २०१० अन्वये, राज्य शासकिय कर्मचाऱ्यांना लागू असलेली 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत मा. त्रिसदसीय व्यवस्थापन समितीचे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

***निर्णय क्र. १४७ :*** *शासन निर्णय क्रमांक वेतन -११०९/प्र.क्र.४४/सेवा मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.०१ एप्रिल २०१० नुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू करणेत आलेली "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना " संस्थान आस्थापनेवरील पात्र ठरणा-या कर्मचा-यांना लागू करण्यात यावी.*

*तसेच सदर योजनेचा दुसरा लाभ मिळणेसाठी साधारणपणे पात्र असलेल्या २३४ कर्मचा-यांची शासन निर्णयाप्रमाणे गोपनीय अहवालाची पडताळणी करुन पात्र कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ देणेत यावा.*

उपरोक्त निर्णयानुसार, सदर सभेतील सादर करणेत आलेल्या प्रस्तावातील साधारणतः २३४ कर्मचाऱ्यांपैकी सदर योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या एकुण **१३८** पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १० जून, २०१३ (**१३५** कर्मचारी), दि. ०१ नोव्हेंबर,२०१३ (**०१** कर्मचारी) व दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ (**०२** कर्मचारी) रोजीच्या आदेशाने या योजनेचा लाभ संबंधीत कर्मचाऱ्यांना त्यांना देय्य असलेल्या तारखेपासून लागू करणेत आलेला आहे.

तद्नंतर, उपरोक्त निर्णयानुसार अपात्र ठरलेल्या ८७ कर्मचाऱ्यांनी संस्थान व्यवस्थापनाकडे दिनांक १८ जून, २०१३ रोजी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार, मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीच सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला :

***निर्णय क्र. ८४० :*** *यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत कर्मचाऱ्यांना त्यांच्या गोपनीय अहवालाबाबत माहिती देण्यात यावी व त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांचे लेखी म्हणणे घेण्यात येऊन,त्या-*

*त्या विभागाचे विभागप्रमुख तसेच, प्रशासकीय अधिकारी / प्र. प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावे व अपात्र कर्मचाऱ्यांमधील योग्य कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाचा पुर्नविचार होणेसाठी सदरहू अभिप्राय मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावे, असे ठरले.*

उपरोक्त निर्णयानुसार, मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजीचे सभेत अपात्र ठरलेल्या ८७ कर्मचाऱ्यांपैकी, सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वात / निकषात / नियमात (दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे) शिथिलता देऊन पात्र ठरणाऱ्या **५२** कर्मचाऱ्यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या आदेशाने या योजनेचा लाभ संबंधीत कर्मचाऱ्यांना त्यांना देय्य असलेल्या तारखेपासून लागू करणेत आलेला आहे.

**आता,** उपरोक्त दोन ही निर्णयाने अपात्र ठरलेल्या एकुण **३५** कर्मचाऱ्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे अर्जाने अशी विनंती केली आहे की,

*.. आम्हांस संस्थान सेवेत २४ वर्ष काम करुन आम्हांस सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ (२४ वर्ष) चा लाभ मिळाला नाही तरी आमच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी कमी असल्यामुळे आम्हांस अपात्र करविणेत आले आहे सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना दुसरा लाभ मिळणेकामी B+ प्रतवारी आवश्यक आहे. मा. व्यवस्थापन समितीने B प्रतवारी असलेल्या ५२ कर्मचाऱ्यांना दुसरा लाभ द्यावे हे कळविले आहे त्याचप्रमाणे आम्हांस B- प्रतवारी असल्यामुळे संस्थान त्याचा लाभ आम्हास देणार नाही. तरी इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे आमच्या गोपनीय अहवालात असलेल्या त्रुटी दुर करुन आम्हालाही सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ (२४ वर्ष) मंजुर करावा, ही विनंती.*

**(ब) कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (दुसरा लाभ) लागू करणेसाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती आहेत :**

**०१)** पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यास दुसरा लाभ मंजूर करतांना तो पहिल्या लाभाप्रमाणेच दिनांक २० जुलै २००१, च्या आदेशामधील व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक आदेशातील तरतूदींच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावा. म्हणजेच ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे, त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

**०२)** पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, दुसरा लाभ मंजूर करण्यासाठी, त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहीत केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील.

यापूर्वी संस्थान कर्मचा-यांना **आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी** मंजूर करतांना पात्र तारखेच्या लगतच्या मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेऊनच कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

संबंधीत कर्मचाऱ्यांचे देय तारखेच्या लगतच्या मागील ०५ वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात आलेले आहेत. गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचाऱ्यांबाबत सर्वसाधारण मूल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

| | | |
|---|---|---|
| (०१) **अ +** = अत्युकृष्ट | (०२) **अ** = उत्कृष्ट | (०३) **ब+** = निश्चित चांगला |
| (०४) **ब** = चांगला | (०५) **ब -** = साधारण | (०६) **क** = साधारणपेक्षा कमी |

शासकिय सेवेतील कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वाचा विचार करण्यात येतो.

**०१)** वेतन श्रेणीतील पे बँड -१एस (रु. ४४४०-७४४०) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ग्रेड पे रु. १३०० परंतु वेतन श्रेणीतील पे बँड-पीबी २ (रु. ९३००-३४८००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ग्रेड पे रु.४२०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचाऱ्यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **ब+ (निश्चित चांगली)** प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०२)** वेतन श्रेणीतील पे बँड-पीबी२ (रु. ९३००-३४८००) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ग्रेड पे रु. ४२०० पेक्षा जास्त परंतु वेतन श्रेणीतील पे बँड -पीबी३ (रु. १५६००-३९१००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ग्रेड पे रु. ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचाऱ्यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **अ (उत्कृष्ट)** प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०३)** वेतन श्रेणीतील पे बँड-०१ एस (रु.४४४०-७४४०) व प्रतिमहिना ग्रेड पे रु.१३०० पासून ते वेतन श्रेणीतील पे बँड-३ (रु. १५६००-३९१००) व प्रतिमहिना ग्रेड पे रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे एकाकी/पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या पदावरील कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **ब+ (निश्चित चांगली)** प्राप्त करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मार्गदर्शक तत्वानुसार, उपरोक्त योजनेचा लाभ आजपावेतो प्रथम टप्प्यात १३८ व दुसऱ्या टप्प्यात ५२ कर्मचाऱ्यांना लागू करणेत आलेला आहे. **तथापि,** दुसऱ्या टप्प्यातील या ५२ कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ मंजूर करणेसाठी, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, उपरोक्त योजना लागू करणेबाबतचे मार्गदर्शक तत्वांमध्ये, ज्याठिकाणी गोपनीय अहवालाची (शासकीय सेवेत) सरासरी प्रतवारी ब+ आवश्यक आहे तेथे (गैरशिस्त वर्तन रिपोर्ट नाही, किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले) ब, आणि ज्या ठिकाणी अ अशी आवश्यक आहे त्याठिकाणी (गैरशिस्त वर्तन रिपोर्ट नाही, किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले) ब+ अशी एका स्तराने शिथील करणेत आलेली आहे.

**(क) आता,** वर परिच्छेद अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणे, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (दुसरा लाभ) लागू होणेस अपात्र ठरलेल्या साधारण ३५ कर्मचाऱ्यांच्या दिनांक १८ डिसेंबर, २०१३ रोजीचे अर्जातील विनंती विचार घेतां, या कर्मचाऱ्यांची विगतवारी पुढील प्रमाणे आहे :

**तक्ता क्रमांक ०१ : ग्रेड वेतनानुसार असणारे कर्मचारी**

| अ.नं. | तपशील / ग्रेड वेतनाचा गट | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| ०१ | रु. ४२००/- किंवा त्यापेक्षा कमी ग्रेडवेतन असणारे कर्मचारी | ३५ |
| ०२ | रु. ४२००/- किंवा त्यापेक्षा जास्त ग्रेडवेतन असणारे कर्मचारी | ०० |
| | **एकुण** | **३५** |

तक्ता क्रमांक ०२ : लगतचे ०५ वर्षाचे गोपनीय अहवालानुसार सरासरी प्रतवारी असणारे कर्मचारी-

| अ.नं. | गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| ०१ | **बी (B)** | २५ |
| ०२ | **बी (B-)** | १० |
| | **एकुण** | **३५** |

तक्ता क्रमांक ०३: गोपनीय अहवालाचे सरासरी प्रतवारीसह गैरवर्तन अहवालामुळे कार्यालयीन दंडात्मक शिक्षा झालेल्या कर्मचारी-

| अ.नं. | तपशील / प्रतवारीसह कार्यालयीन दंडात्मक शिक्षांचा तपशील | रु.४२००/- किंवा त्यापेक्षा कमी ग्रेड वेतन असणारे कर्मचारी |
|---|---|---|
| ०१ | गोपनीय अहवालानुसार **बी (B)** प्रतवारी व गैरवर्तन अहवालामुळे साधारणत: ०१ ते ०४ वेळेस **ताकीद, सक्त ताकीद** अशा शिक्षा झालेले कर्मचारी | ०८ |
| ०२ | गोपनीय अहवालानुसार **बी (B)** प्रतवारी व गैरवर्तन अहवालामुळे **दंड वगैरे** अशी गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | १५ |
| ०३ | गोपनीय अहवालानुसार **बी (B)** प्रतवारी व गैरवर्तन अहवालामुळे **सेवानिलंबन वगैरे** अशी गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | ०२ |
| ०४ | गोपनीय अहवालानुसार **बी- (B-)** प्रतवारी व गैरवर्तन अहवालामुळे **ताकीद, सक्त ताकीद, दंड व सेवानिलंबन वगैरे** अशा गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | ०८ |
| ०५ | गोपनीय अहवालानुसार **बी- (B-)** प्रतवारी व **गैरवर्तन अहवाल नसलेले कर्मचारी** | ०२ |
| | **एकुण-** | **३५** |

उपरोक्त तक्ता क्रमांक ०१ मधील माहितीचा विचार करतां, अपात्र ठरलेले ३५ कर्मचारी हे सर्व ग्रेड वेतन रुपये ४२००/- पेक्षा कमी ग्रेड वेतन घेणारे विविध विभागातील कर्मचारी आहेत. तक्ता क्रमांक ०३ नुसार त्यांच्या संस्थान सेवेतील वर्तणुकीचा लेखा-जोखा सोबतचे, परिशिष्ट अ मध्ये नांव, पदनाम, विभागाचे माहितीसह सविस्तर तपशील नमुद केला आहे. तसेच परिशिष्ट ब मध्ये त्यांची लगतचे ०५ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या प्रतवारीसह, येणारी सरासरी प्रतवारी नमुद केली आहे.

**(ड)** आता, उपरोक्त विषयांकित योजनेचा लाभ वरील अपात्र ३५ कर्मचाऱ्यांना द्यावयाचा ठरल्यास, त्यासाठी परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे मार्गदर्शक तत्वानुसार निश्चित केलेल्या सरासरी प्रतवारीमध्ये (म्हणजेच आवश्यक असणारी सरासरी प्रतवारी बी+ (B+) मध्ये) शिथिलता द्यावी लागेल. तथापि, प्रत्येक वेळेस मार्गदर्शक तत्वामध्ये अशा प्रकारे अपात्र कर्मचाऱ्यांना शिथीलता देणेऐवजी, वर नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, असे अपात्र कर्मचारी लगतचे पाच वर्षाची गोपनीय अहवालाची आवश्यक योग्य व उचित प्रतवारी प्राप्त करुन, पात्र होतील त्या वर्षापासून / तारखेपासून या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (पहिला किंवा दुसरा लाभ) मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मंजूर करता येईल.

तरी उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन, वरील अपात्र ३५ कर्मचाऱ्यांना विषयांकित योजनेचा लाभ मंजूर करणेसाठी,

**(१)** गोपनीय अहवालाच्या प्रतवारीमध्ये शिथीलता देणेत यावी किंवा कसे, तसेच अशी शिथीलता देणेसाठी पुर्वी अंमलात आणलेली (दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४० प्रमाणे) विहित पध्दत अवलंबविणेत यावी किंवा कसे,

**किंवा**

**(२)** वर नमुद केलेप्रमाणे, अपात्र कर्मचाऱ्यांना शिथीलता देणेऐवजी, वर नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, असे अपात्र कर्मचारी लगतचे पाच वर्षाची गोपनीय अहवालाची आवश्यक योग्य व उचित प्रतवारी प्राप्त करुन, पात्र होतील त्या वर्षापासून/ तारखेपासून अशा कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (पहिला किंवा दुसरा लाभ) मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मंजूर करणेत यावा किंवा कसे,

तरी उपरोक्त पर्यायांवर यथोचित विचार होऊन निर्णय होणेकामी मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अपात्र कर्मचाऱ्यांच्या गोपनिय अहवालाचे प्रतवारीमध्ये शिथीलता देण्यात येऊ नये, ज्या वेळेस अपात्र कर्मचारी लगतचे पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची आवश्यक योग्य व उचित प्रतवारी प्राप्त करुन शासन नियमाप्रमाणे पात्र होतील, त्या वर्षापासून/ तारखेपासून या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजुर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५३** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्या करणेसाठी विहीत कार्यपध्दती व नियम निश्‍चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन व कामकाज पार पाडणेसाठी, त्याचे प्रभावी नियंत्रण व नियमन होणेसाठी, मा. शासनाने सन २००९ मध्ये मंजूर केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार तसेच आकृतीबंधात मंजूर नसलेले परंतु संस्थान व्यवस्थापनाने कामकाजाच्या सोयीचे दृष्टीने कार्यरत केलेले असे एकुण **३८** विभाग सध्या संस्थानचे आस्थापनेवर कार्यरत आहेत. या विभागांचे दैनंदिन व्यवस्थापन, कामकाज व नियंत्रणासाठी प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक/ विभागप्रमुख, उपअधिक्षक, वरिष्ठ लिपीक, लिपीक, वर्ग ४ कर्मचारी आदि विविध श्रेणीतील पदांची आवश्यकतेनुसार निर्मिती करणेत आलेली आहे. सध्या संस्थान आस्थापनेवर माहे मार्च, २०१४ अखेर **२२१६** कायम कर्मचारी कार्यरत आहेत.

या संस्थान अंतर्गत असणाऱ्या विविध विभागातील अधिकारी/ कर्मचारी वर्गाच्या व्यवस्थापनाच्या कामाच्या सोयीचे दृष्टीने वेळोवळी, आवश्यकतेनुसार बदल्या केल्या जातात. अशा बदल्या करणेसाठी सध्या कुठलाही विशिष्ट प्रकारची विहित कार्यपध्दती अथवा नियम-विनियम तयार करणेत आलेले नाहीत. अधिकारी/ कर्मचारी वर्गाच्या बदल्या करतेवेळेस त्या-त्या संबंधित विभागाची कामाची निकड, पदाचे कामकाज, जबाबदारी व महत्व लक्षात घेऊन पात्र व उचित कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात.

तसेच, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रमांक सासंवि-२०१०/४१/(१५६)/का.सोळा, दिनांक ३० सप्टेंबर, २०१० व तद्‌नंतरचे पत्राव्दारे असे कळविले होते की, श्री साईबाबा संस्थानचे कर्मचारी शासकिय नसले तरी त्यांची शासकिय कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन वर्षाच्या कालावधीत बदली करणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती शासनास कळविणेत यावी.

**तथापि,** असे निदर्शनास आले आहे की, संस्थानमध्ये बदल्यांचे आदेश पारित केल्यानंतर, झालेल्या बदल्यांबाबत कर्मचाऱ्यांमध्ये रोष, नाराजी निर्माण होते तर काही कर्मचारी अयोग्य व बाहेरील स्त्रोतांचा वापर करुन संस्थान प्रशासनावर दबाव आणणेचा प्रयत्न करतात तर काही विभागप्रमुख या बदली आदेशांस विरोध दर्शवून बदली झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यमुक्त करणेस/ कामावर हजर करणेस विरोध करतात, टाळाटाळ करतात, किंबहुना प्रशासनाचे आदेशाचा अवमान करतात.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करतां, संस्थान अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्या करणेसाठी विहित कार्यपध्दती, नियम-विनियम निश्चित करणे आवश्यक आहे, अस नम्र मत आहे.

**(ब)** महाराष्ट्र शासनाने सन २००६ चा अधिनियम क्रमांक २१ अन्वये, **महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५** हा अधिनियम पारित केलेला आहे.

सदर अधिनियमाचे कायद्यात रुपांतर झालेले असून, त्याबाबतची पुस्तिका मुंबई कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणेत येत आहे.

महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या उपरोक्त अधिनियमांत प्रामुख्याने खालील तरतुदी आहेत :

***प्रकरण दोन : पदस्थापनेचा पदावधी, बदली व बदली करणारे प्राधिकारी.***

***कलम ०३ : नेमणुकीचा पदावधी***

***(१)*** *अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ, ब आणि क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक यांच्या करीता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षांचा असेल,*

*परंतु, असा कर्मचारी हा गट क मधील बिगर - सेक्रेटरिएट सेवेतील कर्मचारी असेल तर, अशा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधींची सेवा पूर्ण केल्यानंतर, त्याची त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदली करण्यात येईल,*

*परंतु आणखी असे की, असा कर्मचारी सेक्रेटरिएट सेवेत असेल तर, अशा कर्मचाऱ्याला तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी त्याच पदावर ठेवण्यात येणार नाही आणि लागोपाठच्या दोन पदावधींपेक्षा अधिक पदावधींसाठी त्याला त्याच विभागात ठेवण्यात येणार नाही.*

***(२)*** *गट ड मधील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्बाध रिक्त पद असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्याविरुध्द गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज, त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली केली जाणार नाही.*

***कलम ०४ : बदलीचा पदावधी***

***(१)*** *सामान्यपणे, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने कलम ३ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्याच्या नेमणुकाचा पदावधी पूर्ण केला असल्याखेरीज त्याची बदली करण्यात येणार नाही.*

***(२)*** *समक्ष प्राधिकारी, प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात, त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशा शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करील.*

***(३)*** *.....*

***(४)*** *शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे, वर्षातून केवळ एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील :*

*परंतु, खाली नमुद केलेल्या परिस्थितीत वर्षातील कोणत्याही वेळी -*

*(एक) नव्याने निर्माण केलेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, पदावनती, पुनःस्थापन यामळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदांवर किंवा रजेवरुन परत आल्याच्या बाबतीत,*

*(दोन) अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणांमुळे बदली करणे आवश्यक आहे अशी समक्ष प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल अशा बाबतीत, तसे लेखी नमूद केल्यानंतर आणि लगतनंतरच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने.*

*अशी बदली करणेत येईल.*

***(५)*** *कलम ३ मध्ये किंवा या कलमामध्ये काही ही अंतर्भूत असले तरीही, विशेष प्रकरणांत, समक्ष प्राधिकाऱ्याला, कारणे लेखी नमूद करुन कलम ६ च्या तक्त्यामध्ये उल्लेखिलेल्या लगतपूर्व, बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेऊन शासकीय कर्मचाऱ्याची, त्याचा पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदली करता येईल.*

***कलम ०५ : पदावधी वाढविणे***

**(१)** शासकीय सेवक व कर्मचारी यांच्या नेमणुकीचा कलम ३ मध्ये निर्धारित केलेला पदावधी खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक प्रकरणामध्ये वाढविता येईल-

(क) नेमणुकीच्या ठिकाणी किंवा पदावर पदावधी पूर्ण केल्यानंतर, बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीसाठी एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तेव्हा,

(ख) कर्मचारी एखाद्या विशिष्ट कामासाठी आवश्यक ती तांत्रिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारा असेल व त्यापदासाठी योग्य असा बदली कर्मचारी तात्काळ उपलब्ध नसेल तेव्हा, आणि

(ग) एखादा कर्मचारी, एखाद्या प्रकल्पावर काम करीत असेल व तो प्रकल्प पूर्णतेच्या शेवटच्या टप्प्यात असेल आणि त्याला तेथून काढून घेण्याने प्रकल्प पूर्ण होणेच धोक्यात येणार असेल तेव्हा.

**(२)** कलम ३ मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंर्तभूत असले तरी, एकाच विभागातील किंवा कार्यालयातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या मोठया प्रमाणात बदल्या केल्यामुळे, शासकीय कामावर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची सुनिश्चिती करण्यासाठी, कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या कर्मचाऱ्यांची एका वर्षात एकाच वेळी बदली करण्यात येणार नाही.

**(क)**आता, मा. शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांसाठी तयार केलेल्या उपरोक्त नियम-विनियमाचा आधार घेऊन संस्थान व्यवस्थापनाच्या आस्थापनेवरील असलेल्या कायम कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत खाली नमुद केलेली विहीत कार्यपध्दती अवलंबिता येईल व त्याप्रमाणे नियमावली करता येईल :

**०१.** सर्वप्रथम, मा. शासनाने मंजूर केलेल्या संस्थानचे आकृतीबंधातील वर्ग ३ व वर्ग ४ मधील समकक्ष पदांची यादी पदनाम व वेतनश्रेणीसह सामान्य प्रशासन शाखेकडून (आस्थापना विभागाकडून) मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने, मा. व्यवस्थापन समितीकडून मान्य करुन घेणेत येईल.
**०२.** संस्थान आस्थापनेवर स्थायी (कायम) कर्मचारी म्हणून नियुक्त असणाऱ्या वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या विभागांतर्गत **दर तीन वर्षांनी** समकक्ष पदावर (उपरोक्त मान्य यादीतील पदांवर, कोणत्याही विभागातून, कोणत्याही विभागात) करणेत येतील.
**०३.** वर्ग ३ व वर्ग ४ या पदावरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतांना, त्या पदाची त्या विभागातील कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा विचार करुन, कर्मचाऱ्याची मानसिक व शारिरीक क्षमता तसेच शक्य होईल त्याठिकाणी सध्या संस्थानमध्ये कार्यरत होत असणारी संगणकीय कार्यप्रणालीचा विचार करतां, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचाही विचार करणेत येईल.
**०४.** अधिक्षक / विभागप्रमुख या श्रेणीतील अधिकारी / कर्मचारी वर्गाच्या बदल्या सर्वसाधारणपणे दर तीन वर्षानी करणेत याव्यात, तथापि अशा बदल्या करतांना अ.नं. ०२ मध्ये नमुद केलेल्या बाबींचा विचार करणेत येईल.
**०५.** वर्ग ३ व वर्ग ४ या श्रेणीतील कर्मचाऱ्यांनी वैद्यकिय कारणास्तव बदली मागितली असेल तर, संस्थानचे रुग्णालय विभागाकडील सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याकडून ( विशेषतः कर्मचाऱ्याने नमुद केलेल्या आजारातील तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्याकडून) वैद्यकिय संचालक यांचेमार्फत वैद्यकिय दाखला मागविणेत येऊन, तद्नंतरच सदर कर्मचाऱ्याचे बदलीबाबत यथोचित निर्णय मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने घेणेत येईल.
**०६.** संस्थान व्यवस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या विविध विभागांपैकी, जसे प्रसादालय, कॅन्टिन, बांधकाम, बगीचा, मंदिर, संरक्षण ईत्यादी विभाग हे मानवी व शारिरीक श्रमाचे जास्त काम असणारे विभाग आहेत. या विभागाकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या दर तीन वर्षांनी करणेत येईल. तसेच विशेषतः संरक्षण विभागाकडे वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतांना महाराष्ट्र पोलिस दलात भरती करतांना ज्या शारिरीक क्षमतेच्या अटीचा विचार करणेत येतो, (जसे उंची, वजन, छाती इत्यादी) त्या अटींचा विचार करणेत येऊन त्यानुसार प्राधान्याने / अग्रक्रमाने बदल्या करणेत येतील.
**०७.** कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतांना, विभागाचे प्रस्थापित झालेले कामकाज व कार्यपध्दती विस्कळीत होणार नाही याचा विचार करुन, दरवर्षी प्रत्येक विभागातून साधारणतः ३० टक्के कर्मचारी यांच्या बदल्या करणेत येतील.
**०८.** संस्थान व्यवस्थापन कामकाजाच्या सोयीचे दृष्टीने वर्षातून एकदा (माहे एप्रिल / मे या महिन्यांमध्ये) विहीत कालावधीची मर्यादा राखून, कर्मचाऱ्याच्या बदल्या करु शकेल. तथापि, अशा बदल्या करतांना उत्सवांचा कालावधी, सलग सुटटयांचा कालावधी तसेच त्या त्या विभागातील कामाची निकड लक्षात घेऊन करता येतील.
**०९.** वर्ग ३ व वर्ग ४ मधील एखाद्या कर्मचाऱ्यांचे कामाबाबत / वर्तणुकीबाबत संबंधित विभागप्रमुख / अधिक्षक यांनी लेखी तक्रार करुन, त्याची बदली करण्याची मागणी केली असल्यास, त्याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन त्याबाबत यथोचित निर्णय घेणेत येईल.
**१०.** संस्थान प्रशासनाने पारित केलेल्या बदली आदेशानुसार प्रत्येक विभागप्रमुख/ अधिक्षक यांनी त्यांचे अखत्यारीत कर्मचाऱ्यांना बदली झालेल्या ठिकाणी हजर होणेकामी कार्यमुक्त करणे/ बदली होऊन आलेल्या कर्मचाऱ्यांना हजर करुन घेणे ही कार्यवाही तात्काळ करणे आवश्क असुन ते त्यांचेवर व बदली झालेल्या कर्मचाऱ्यावर बंधनकारक राहील. सदर बदली आदेशाने संबंधीत विभागातील दैनंदिन कामकाजात काही अडचणी निर्माण होणार असतील तर त्याबाबत अलाहिदा अहवाल सादर करुन त्याबाबत निर्णय घेणेत येईल. या तरतुदीनुसार अधिकारी/ कर्मचारी यांनी बदली आदेशाची कार्यवाही तात्काळ पूर्ण करणे आवश्यक राहील, अन्यथा संबंधितांवर मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने कार्यालयीन आदेशाचा अवमान केलेबाबत शिस्तभंगाची कारवाई कामगार विभागामार्फत ठराविक मुदतीत करणेत येईल.
**११.** ज्या कर्मचाऱ्यास तो ज्या विभागात काम करीत आहे, त्या विभागात त्याचा पदावधी पूर्ण झालेला आहे, परंतु त्याचे सेवानिवृत्तीस जर एक वर्ष किंवा त्याहून कमी कालावधी शिल्लक राहिला असेल तर अशा कर्मचाऱ्याची बदली करणेत येणार नाही.
**१२.** संस्थान आस्थापनेवरील मंदिर, जनसंपर्क, खरेदी, निवासस्थाने, रुग्णालये इत्यादी विभाग संवेदनशील असून, या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे भक्तांशी/ पुरवठादारांशी/ लाभार्थ्यांशी वैयक्तिक हितसंबंध निर्माण होण्यापुर्वीच या विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या विहित पध्दतीने अग्रक्रमाने करणेत येतील.
**१३.** संस्थान व्यवस्थापनाच्या कामकाजाचे सोयीचे दृष्टीने, अपरिहार्य कारणास्तव व परिस्थितीनुरुप अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अंतिम अधिकार मा. कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

आवश्यकता भासल्यास, मा. व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष यांचेशी विचार विनिमय करुन अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे बदलीबाबत परिस्थितीनुरुप कार्यवाही करणेत येईल.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार व परिच्छेद क मधील अ.नं. ०१ ते १३ प्रमाणे संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांचे/ अधिकाऱ्यांचे बदल्या- नेमणुकांबाबत विहित कार्यपध्दती व नियमावली निश्चित करता येईल. तथापि, सदर नियमावलीबाबत सर्वंकष चर्चा होऊन, त्यामध्ये यथोचित बदल करुन ती लागू करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्या करणेसाठी विहीत कार्यपध्दती व नियम निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला. प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांच्या/ अधिकाऱ्यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल्या- नेमणुका प्रशासनाने आपल्या अखत्यारित कराव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५४** **मंजूर आकृतीबंधानुसार पदनामात बदल होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.दिनकर मनोहर देसाई व श्री.संजय मधुकर जोरी, शाखा अभियंता बांधकाम विभाग यांनी दि.०६/०३/२०१४ चे अर्जात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

आम्ही बांधकाम विभागात शाखा अभियंता या पदावर आहोत. जा.नं.एसएसएस/वशी-०१/३२८४/२०१३ दि.३१ डिसेंबर २०१३ चे आदेशान्वये आम्हांला सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आलेला असून त्यानुसार पदोन्नती साखळीतील वरच्या पदाचा वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ५४०० दि.०१/०४/२०१० पासून मंजूर करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागात शाखा अभियंता पदाकरीता पदोन्नती साखळीतील वरचे पद उप अभियंता हे असून त्या पदाचा वेतनबँण्ड अधिक ग्रेड वेतन वर नमूद केलेप्रमाणे आहे. तसेच संस्थानचे मंजूर कर्मचारी आकृतीबंधातील बांधकाम विभागाचे पदांमध्ये उप अभियंता हे पद उपलब्ध आहे. आम्ही सध्या उपअभियंता या पदाचेच काम करीत असून आमचे पदनाम शाखा अभियंता ऐवजी उप अभियंता असा बदल होणेस विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांना उपरोक्त निर्णय क्रमांक : सासंवि-२००९/४३३/ (३७/०९) का.सोळा. मंत्रालय मुंबई ३२, दि.०७/०८/२००९ चे आदेशान्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाचा मंजुर आकृतीबंध माहितीसाठी सोबत सादर केलेला आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४४९/२००५ दि.१८/१०/२००५ चे आदेशान्वये श्री.दिनकर मनोहर देसाई व श्री.संजय मधुकर जोरी यांची संस्थानचे बांधकाम विभागात शाखा अभियंता या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून सध्या त्यांना वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक गेड पे ५४०० याप्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे. बांधकाम विभागाचे मंजुर आकृतीबंधात शाखा अभियंता हे पद समाविष्ट नाही. यापुर्वी मंजुर आकृतीबंधात ज्या पदांचा समावेश नाही. अशा प्रकारच्या जुन्या पदनामात जा.नं.एसएसएस/ वशी-०१/३१९/२०१३ दि.२६/०४/२०१३ नुसार बदल करण्यात आलेला आहे.

बांधकाम विभागाकडील शाखा अभियंता व मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता या पदाबाबतची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं | पुर्वीचे पदनाम<br>वेतनबॅन्ड + ग्रेड पे | पद संख्या | विभाग | मंजूर आकृतीबंधानुसार नविन पदनाम, वेतन बॅन्ड + ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | शाखा अभियंता<br>५th Pay वेतनश्रेणी<br>(६५००-१०५००)<br>वेतनबँड ९३००-३४८००+<br>ग्रेड पे ४४००<br>६ th Pay-PWD ३०६(१८) | ३ | बांधकाम | उप अभियंता<br>५th Pay वेतनश्रेणी<br>(८०००-१३५००)<br>वेतनबँड -९३००-३४८००<br>ग्रेड पे.५४००<br>६ th Pay-PWD ३०६(८) |

जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४४९/२००५ दि.१८/१०/२००५ चे आदेशान्वये श्री.देसाई व श्री.जोरी यांना दि.०१/०४/१९९८ पासून पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ६५००-१०५०० (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४००) ही वेतनश्रेणी लागू करुन त्यांचे पदनाम कनिष्ठ अभियंता ऐवजी शाखा अभियंता असे करण्यात आलेले आहे.

त्यानंतर त्यांची शाखा अभियंता या पदावर सलग १२ वर्ष सेवा झाल्यामुळे शासन निर्णयानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ जा.नं.एसएसएस/वशी-०१/३२८४/२०१३

दि.३१/१२/२०१३ चे आदेशान्वये वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ५४०० लागू करण्यात आलेला आहे.

शाखा अभियंता हे पद मंजुर आकृतीबंधात समाविष्ट नसल्यामुळे त्यांनी मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता (बांधकाम) असे पद मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शाखा अभियंता व उप अभियंता या दोन्ही पदाचे मुळचे वेतनश्रेणीत फरक आहे. परंतु, श्री.देसाई व श्री.जोरी यांची शाखा अभियंता या पदावर सलग १२ वर्ष सेवा झालेली असल्यामुळे त्यांना दि.०१/०४/२०१० पासून उच्च वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ५४०० लागू करण्यात आलेला आहे. मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता या पदासाठी वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ५४०० मंजुर आहे. शाखा अभियंता व उप अभियंता या दोन्ही पदाचे कामाचे स्वरुप सारखेच आहे. त्यामुळे श्री.देसाई व श्री.जोरी यांचे पदनामात बदल केल्यास संस्थानवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही.

सबब, संस्थान प्रशासनाचे दैनंदिन कामकाजाचे सोईच्या दृष्टीने मंजुर आकृतीबंधानुसार श्री.दिनकर मनोहर देसाई व श्री.संजय मधुकर जोरी यांचे सध्याचे पदनाम शाखा अभियंता ऐवजी मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता (बांधकाम) असा बदल करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रशासनाचे दैनंदिन कामकाजाचे सोईच्या दृष्टीने मंजुर आकृतीबंधानुसार श्री.दिनकर मनोहर देसाई व श्री.संजय मधुकर जोरी यांचे सध्याचे शाखा अभियंता ऐवजी मंजुर आकृतीबंधानुसार उप अभियंता (बांधकाम) असा पदनामात बदल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५५ मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील त्यांचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षास व या कक्षात कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता पुर्वीच्या मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसुल) यांचे पर्यवेक्षणाखली त्यांचे श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्ष स्थापन करणेत आलेला होता.

तथापि, आता मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन/ कार्या/ १६-क/ १०८५ /२०१३, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने नवनिर्मित शिडी उपविभागीय कार्यालय यांचेकडेस त्यांचे अधिनस्त असलेल्या तालुक्यातील भूसंपादन प्रस्ताव हस्तांतरीत करणेत आलेली आहेत. तसेच या आदेशाने मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा उपरोक्त भूसंपादन कक्ष कर्मचारी वृंदासह मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे अधिनस्त देणेत आलेला आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ ते १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित भूसंपादन कक्षासाठी खालीलप्रमाणे कर्मचारीवृंद मंजूर करणेत आलेला होता. सदरचा कक्ष श्रीरामपूर उपविभागीय कार्यालयात दिनांक ०२ ऑगष्ट, २००० रोजी कार्यान्वीत झाला. या कक्षात काम करणारे कर्मचाऱ्यांना संस्थान आस्थापना विभागाकडील दिनांक २७ ऑगष्ट, २००० रोजीचे मंजूर टिपणीनुसार या कक्षातील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे मानधन / वेतन देणेस मंजुरी देणे आली :

| अ.नं. | तपशील | मागणी / मंजूर पद संख्या | सुरुवातीस देण्यात येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी<br>(ज्यांना मराठी टंकलेखन व संगणकाचे ज्ञान आहे) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन चालक | ०१ | ४०००/- |

तद्नंतर विषयांकित भूसंपादन कक्षास वेळोवेळी मुदतवाढी देणेत आल्या तसेच कर्मचाऱ्यांचे मंजुरीत व वेतन/ मानधनात बदल करणेत आले. दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर विषयांकित कक्षात खालीलप्रमाणे कर्मचारीवृंद काम करीत असून त्यांना त्यांचेपुढे नमुद केलेनुसार वेतन/ मानधन देणेत येत आहे :

| अ.नं. | तपशील | मंजूर पद संख्या | सध्या प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.बी.आर.वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसिलदार | ०१ | १०,०००/- (एकत्रित) |
| ०२ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकुन | ०१ | ०७,०००/- (एकत्रित) |
| ०३ | लिपीक टंकलेखक संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०४ | किमान वेतन कायद्याप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन |
| ०४ | शिपाई संवर्ग कर्मचारी (कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रोजंदारीवर) | ०१ | किमान वेतन कायद्याप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन |

सध्या, मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे दिनांक २१ जून, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५२० नुसार, विषयांकित कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना आहे त्याच मानधनावर व अटी/ शर्तीवर त्यांची मुदत संपुष्टात आलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. म्हणजेच, दिनांक ०१ मे, २०१३ ते दिनांक ३० एप्रिल, २०१४ अखेर मुदतवाढ देणेत आली असून, ती दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी संपुष्टात येत आहे.

**(ब) आता,** मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी त्यांचेकडील जावक क्रमांक कावि/ भूसं/ ४६/ २०१४, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ चे विनंती पत्राव्दारे, एकुण १६ भूसंपादन प्रस्तावावर कार्यवाही सरु असल्याने, या सर्व प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करणेकामी या भूसंपादन कक्षाची या कार्यालास अत्यंत आवश्यकता आहे. तसेच श्री साईबाबांची जन्मशताब्दी वर्ष, येणाऱ्या कुंभमेळयासाठी भूसंपादनाची नवीन प्रकरणे या वर्षी दाखल होण्याची शक्यता आहे, या सर्व बाबीं विचारात घेऊन या कक्षास पुढील ०१ (एक) वर्षासाठी ( ०१/०५/२०१४ ते ३०/०४/२०१५) अखेर मुदतवाढ देणेस विनंती आहे.

तसेच, उपरोक्त पत्रात, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी असे नमुद केले आहे की, या कक्षाकडे काम करणारे सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री. बी.आर.वाव्हळ व सेवानिवृत्त अव्वल कारकुन श्री. आर. बी. नागरे यांनी अनुक्रमे रुपये २०,०००/- व रुपये १५,०००/- मात्र मानधन मिळावे म्हणून विनंती केलेली आहे, त्यावर उचित निर्णय घेणेस विनंती आहे.

याव्यतिरिक्त, उपरोक्त पत्रात असे ही नमुद केले आहे की, या कक्षात जे कुशल व अकुशल कर्मचारी आहेत यांनी दिनांक ०४/१२/२०१३ रोजीचे अर्जाने केलेल्या, आम्हांस वारंवार मुदतवाढ देणेऐवजी संस्थानचे कर्मचाऱ्याप्रमाणेच नेमणुका द्याव्यात ज्यामुळे प्रत्येक वेळी मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्भवणार नाही, या विनंतीवर उचित निर्णय घेणेस विनंती आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद ब नमुद केलेले मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे पत्र उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडेस अभिप्रायासाठी पाठविणेत आले होते. उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने असा अभिप्राय दिला आहे की, मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी पत्रात नमुद केलेल्या बाबी विचारात घेऊन, त्यांचे कार्यालयातील भूसंपादन कक्षास व सदरहू कक्षाकडील एकंदर ०७ कर्मचाऱ्यांना, त्यांनी सुचित केलेप्रमाणे तूर्त ०१ वर्षासाठी (१२ महिन्यांसाठी) म्हणजेच दिनांक ०१ मे, २०१४ ते दिनांक ३० एप्रिल, २०१५ अखेर मुदतवाढ देणेस हरकत नाही, असे मत आहे, तथापि विषयांकित भूसंपादन कक्षास व या कक्षाकडे कार्यरत असणाऱ्या एकंदर ०७ कर्मचाऱ्यांना कोणत्या अटी शर्तीनुसार मुदतवाढ द्यावी याबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रस्ताव सादर करुन त्यांचे निर्णयानुसार व निर्देशानुसार उचित निर्णय घेणेत यावा.

**(ड)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे पत्राने केलेली विनंती व उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचे दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजीचे अभिप्राय विचारात घेऊन, विषयांकित भूसंपादन कक्षास मुदतवाढ व या कक्षात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मानधनात वाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांचे कार्यालयातील त्यांचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षामधील काम सध्या बंद असल्यामुळे या कक्षातील कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ व मानधन वाढ देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

**तथापि, सदरचा भू-संपादन कक्ष दि.०१.०६.२०१४ पासून बंद करणेत यावा तसेच या कक्षास व कक्षातील कर्मचाऱ्यांना दि.३१.०५.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन, त्यांचे पगार/ वेतन संबंधीतांना आदा करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५६ साईभक्तांना सेवा देणाऱ्या विभागांचे साप्ताहिक सुट्टीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीक्षेत्र शिर्डी हे ग्रामीण भागातील जागतीक दर्जाचे देवस्थान असल्याने दिवसेंदिवस देश विदेशातुन श्री साईबाबांचे दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने साईभक्त शिर्डी येथे येत असतात. श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणे कामी संस्थानकडे एकुण ३७ विभाग कार्यरत आहेत.

शासकीय कार्यालये व इतर कार्यालयांना रविवारी सुट्टी असल्याने श्री साईबाबांचे दर्शनास येणाऱ्या साईभक्तांची शनिवार व रविवार या दिवशी शिर्डीत जास्त प्रमाणात गर्दी होत असते. यावेळी श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांबरोबरच महत्वाच्या तसेच अतिमहत्वाच्या व्यक्ती दर्शनासाठी येत असतात. अशा वेळी संस्थानचे एकूण विभागांपैकी काही विभाग हे रविवारी बंद असतात त्यामुळे भक्तांना सोई सुविधा देणेस अडचणी निर्माण होतात.

श्री साईभक्तांना सुविधा देणेकामी प्रामुख्याने खालील विभागांचा समावेश होत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) सामान्य प्रशासन विभाग | २) विधी विभाग | ३) जनसंपर्क कार्यालय |
| ४) कामगार विभाग | ५) सभा कामकाज | ६) लेखाशाखा विभाग |
| ७) कॅन्टीन विभाग | ८) बांधकाम विभाग | ९) विद्युत विभाग |
| १०) साईप्रसाद भक्तनिवास | ११) बगीचा विभाग | १२) माहिती तंत्रज्ञान विभाग |
| १३) प्रसादालय विभाग | १४) प्रकाशने | १५) खरेदी विभाग |
| १६) दप्तर विभाग | १७) द्वारावती भक्तनिवास | १८) साईबाबा भक्तनिवास |
| १९) आरोग्य विभाग | २०) संरक्षण विभाग | २१) ध्वनिक्षेपन विभाग ॲण्ड टेलीफोन |
| २२) भांडार विभाग | २३) मंदिर विभाग | २४) वाहन विभाग |
| २५) पाणी पुरवठा विभाग | २६) श्री साईनाथ रुग्णालय | २७) श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २८) मेकॅनिकल | २९) फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ३०) साईआश्रम भक्तनिवासस्थान |
| ३१) साईआश्रम धर्मशाळा | ३२) लाडु निर्मीती विभाग | |

वरील विभागांचे अधीक्षक / विभाग प्रमुख, प्रभारी विभाग प्रमुख त्यांचेनंतर जबाबदार असलेले वरिष्ठ लिपीक व इतर कर्मचारी यांची रविवार या दिवशी आठवडा सुट्टी असल्याने ते डयुटीवर / कामावर हजर राहत नाहीत. त्यामुळे साईभक्तांना सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेकामी अडचणी निर्माण होतात व परिणामी साईभक्तांची गैरसोय होते.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता वरील विभागांकडील सर्व अधीक्षक/ विभाग प्रमुख, प्रभारी विभाग प्रमुख तसेच त्यांचेनंतर जबाबदार असलेले वरिष्ठ लिपीक व इतर कर्मचारी यांनी शनिवार व रविवार या दिवशी कामावर हजर रहावे असे मत आहे.

त्यासाठी संस्थानचे मुंबई कार्यालय व शैक्षणिक संकुल वगळता इतर सर्व विभागांच्या शनिवार व रविवार या दिवसाच्या आठवडा सुट्टया बंद करून सदरच्या आठवडा सुट्टया बुधवार या दिवशी घेणेबाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना सेवा देणाऱ्या विभागांचे साप्ताहिक सुट्टीचा वार बदलणे संदर्भात कर्मचाऱ्यांचे काय म्हणणे आहे, असे समितीने विचारले. यावर सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबरच्या सभेमध्ये याबाबत चर्चा झाली असता कर्मचाऱ्यांनी असहमती दर्शविली होती, अशी माहिती समितीस देण्यात आली. त्यामुळे उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५७ संस्थान व्यवस्थापनांतर्गत असणारे विविध विभागातील कामांचे मनुष्य बळ व्यवस्थापन संस्थेमार्फत परिक्षण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली संस्थानमधील विविध विभागांचा दैनंदिन कामकाजाचा आढावा घेणेकामी सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत दिनांक २९ मार्च, २०१४ व दिनांक १६ एप्रिल, २०१४ रोजी झालेल्या आढावा बैठकीत (सभेत), संस्थानमधील विविध विभागात असणाऱ्या कामकाजाचे मनुष्य बळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) संस्थान कर्मचाऱ्यांचे प्रत्यक्ष कामाचे स्वरुप, कामाची कार्यक्षमता, कामाचा बोजा याचे परिक्षण ( Work Efficiency & Energy Audit) करुन घ्यावे, अशी ढोबळ चर्चा झालेली होती.

त्या अनुषंगाने, प्रथम टाटा कन्सल्टंन्सी या कंपनीशी संपर्क साधणेत आला, तथापि त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे, मोठया व्यावसायिक संस्थांशी संपर्क साधला असतां, साईभक्त श्री. मिलींद घाटोळे, पर्सोनेल मॅनेजर, असूटेक्ट इंडिया लि., पुणे यांनी धनंजय गोखले (प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयुट), पुणे यांचे नांव सुचविले. त्यानुसार, श्री. धनंजय गोखले, पुणे यांचेशी संपर्क साधला असतां, ते स्वतः त्यांचे सहकाऱ्यांसह दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी संस्थानचे मुख्य कार्यालयात चर्चेसाठी सकाळी ११ वाजता उपस्थित होते.

**(ब)** श्री. धनंजय गोखले, पुणे यांचेशी दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांचेसह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे संस्थानचे चालणारे कामकाज, उपलब्ध कर्मचारी वर्ग व इतर अनुषंगिक बाबींबाबत काही विभागांचे उदाहरणांसह सर्वसाधारण प्राथमिक चर्चा केली. तसेच संस्थानचे कामकाजाचे प्रभावी व सुरळीत नियोजन कसे करता येईल व त्याबाबत काय कार्यवाही करता येईल याबाबत मार्गदर्शन करणेची विनंती करणेत आली. या चर्चेचे वेळेस, त्यांनी त्यांचे संस्थेबाबत व संस्थेच्या कामकाजाबाबत थोडक्यात माहिती देतांना, त्यात प्रामुख्याने, ते स्वतः व त्यांची कंपनी गेल्या १४ वर्षापासून या क्षेत्रात काम करीत असून, सध्या त्यांचे ५०-६० कायम / प्रासंगिक कर्मचारी वर्ग संबंधित कामकाज करीत आहेत. त्यांना देश-विदेशातील विविध संस्थांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाचा अनुभव आहे, असे सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा झालेनंतर, श्री. धनंजय गोखले व त्यांचे सहकाऱ्यांनी संस्थान प्रतिनिधीसोबत सर्व विभागांची प्रत्यक्ष कार्यस्थळावर जाऊन पहाणी केली .

तद्नंतर, त्यांना सामान्य प्रशासन शाखेमार्फत श्री. धनंजय गोखले, पुणे यांना दिनांक २२ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने, संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचे, मनुष्य बळ व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून, संस्थानमधील विविध ३८ विभागांमार्फत चालणारे कामकाजाचे प्रभावी नियोजन करुन, त्यासाठी असलेले उपलब्ध मनुष्यबळाचे पुर्नःनियोजन (Manpower Energy Audit ) करणेचा संस्थान व्यवस्थापनाचा मानस आहे. त्यास अनुसरुन, त्यांचे सल्लागार संस्थेमार्फत संस्थान मनुष्य बळ व्यवस्थापन विषयक (Manpower Energy Audit चे संदर्भात) सविस्तर व्यावसायिक प्रस्ताव (जसे, सल्लागार संस्थेचे काय काम राहिल, त्याबाबतचा अहवाल कसा देणार, त्यासाठी किती कालावधी लागणार, व्यावसायिक शुल्क किती रहाणार आदि बाबींचा) सादर करणेबाबत कळविणेत आले.

**(क)** उपरोक्त विवेचनानुसार, धनंजय गोखले (प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयुट), पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अेपीआर/एसएसएसटी/१४-१५/०४०३, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने व्यावसायिक प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

**०१. मनुष्यबळ व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून सल्लागार संस्थेच्या कामकाजाची कार्यकक्षा :**

- संस्थानाच्या दैनंदिन कामकाजाचे, संस्थानामधील विविध ३८ विभागांचा अभ्यास करणे.
- उपलब्ध मनुष्यबळाचे मनुष्यबळ संरचना, कामाची मांडणी, व्याख्या आणि विभागणी, कौशल्य तक्ता, मनुष्यबळ संख्या या गोष्टींचा अभ्यास करुन विश्लेषण करणे.
- सध्याचे काम कसे चालावे याबाबत मनुष्यबळ संख्या संरचना, विभागणी व गृहितके निश्चित करणे.

**०२. कामाचे टप्पे आणि प्रस्तावित कालावधी :**

- व्यावसायिक प्रस्ताव सादर केलेपासून, व्यावसायिक प्रस्ताव मंजूर होऊन, प्रत्यक्ष कार्यादेश मिळेपर्यन्त तसेच त्यानंतर काम पुर्ण करणे यासाठी ०७ टप्प्यात साधारणतः ०२ महिन्यांचा कालावधी प्रस्तावित आहे.

**०३. संस्थानकडून अपेक्षित असलेली मदत :**

- संस्थेच्या सल्लागारांची निवासाची आणि भोजनाची विनामुल्य व्यवस्था.
- विभागवार अधिकाऱ्यांची व इतर आवश्यक अधिकारी आणि कार्यकारी वर्ग यांची ठरलेल्या वेळेनुसार उपलब्धता.
- संस्थेच्या सल्लागारांसाठी विविध विभागांमध्ये विनासायास प्रवेश.
- प्रस्तावित कालावधीतील प्रत्येक टप्प्यांमध्ये संस्थान अधिकाऱ्यांचे सहकार्य.
- गृहितके निश्चित करणेसाठी (बेंच मार्किंग साठी) अन्य काही संस्थांना भेट देण्याची वेळ आल्यास त्या संस्थेस संस्थानमार्फत सल्लागार संस्थेच्या नांवाने कार्यउद्देशाचे पत्र.

**०४. संस्थेचा सल्लागार संघ :**

- मुख्य मार्गदर्शक (०१) / प्रकल्प व्यवस्थापक (०१) / समन्वयक (०१) यांचेसह एकुण परिक्षक संघ १५ व्यक्तिंचा राहिल.

**०५. सल्लागार संस्थेचे शुल्क :**

- या संपूर्ण प्रकल्पासाठी मानधन (शुल्क) रुपये ११,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये अकरा लाख पन्नास हजार मात्र) अधिक (+) सरकारी नियमानुसार सेवाकर.
- उपरोक्त मानधनाचे (शुल्क अदायगीचे) ०४ टप्पे खालीलप्रमाणे :

| अ.नं. | कामाचा टप्पा | मानधनाची रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | संस्थेचा व्यावसायिक प्रस्ताव मान्य होणे, कार्यादेश मिळणे व काम सुरु करणेसाठी आगाऊ रक्कम मिळणे | २,२२,५००/- |
| ०२ | संस्थान व्यवस्थापनातील उच्च पदस्थ अधिकारी वर्ग (जसे EO, DEO, AO आणि काही निवडक विभागप्रमुख) यांचेसाठी ०२ दिवसाची कार्यशाळा आयोजित करणे | २,८०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०३ | संस्थान विभागवार कामकाज परिक्षणाची सुरुवात (सल्लागार संस्थेचे अंदाजे १२ ते १५ सल्लागार, ३-३ च्या गटाने AO यांचे मदतीने त्यांचे अखत्यारीतील विभागांचे परिक्षण व अभ्यास करतील) | ४,०२,५००/- |
| ०४ | अहवाल तयार करुन सादर करणे | २,४५,०००/- |
| | **एकुण मानधन** | **११,५०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे व्यावसायिक प्रस्ताव धनंजय गोखले (प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयुट), पुणे यांनी सादर केला आहे. ( सोबत, मुळ प्रस्तावाची प्रत तात्काळ संदर्भासाठी जोडली आहे)

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेनुसार, धनंजय गोखले (प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टीटयुट), पुणे या सल्लागार संस्थेने व्यावसायिक प्रस्ताव सादर करुन, संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचे, मनुष्य बळ व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून, संस्थानमधील विविध ३८ विभागांमार्फत चालणारे कामकाजाचे प्रभावी नियोजन करुन, त्यासाठी असलेले उपलब्ध मनुष्यबळाचे पुर्नःनियोजन करणे, अहवाल सादर करणे इत्यादी बाबींसाठी (Manpower Energy Audit करणेसाठी) प्रकल्प शुल्क म्हणून रुपये ११,५०,०००/- मात्र मानधनाची मागणी केलेली असुन, त्यांनी वर नमुद केलेल्या टप्प्याप्रमाणे आगाऊ रक्कम मिळावी म्हणून विनंती केलेली आहे, वास्तविक संस्थानमार्फत बहुतांशी कोणत्याही कामासाठी आगाऊ रक्कम आदा केली जात नाही, त्यामुळे याबाबत सल्लागार संस्थेशी चर्चा करुन निर्णय घेता येईल, असे मत आहे.

वर नमुद केलेला Manpower Energy Audit प्रकल्प राबविणे, त्याची कार्यकक्षा ठरविणे, सल्लागार संस्था कोणत्या प्रकारे अहवाल सादर करणार, त्याची अंमलबजावणी कशी करावी तसेच या प्रकल्पासाठी सल्लागार संस्थेस आदा करावयाचे शुल्क कशाप्रकारे व किती टप्प्यात आदा करणेत यावे आदिबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी, आजचे मा. त्रिसदस्यीय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपरोक्त सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी श्री. धनंजय गोखले, पुणे यांना समक्ष बोलविणेत आलेले असून, त्यांचेशी चर्चा करुन उपरोक्त प्रस्तावावर यथायोग्य निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानमधील विविध विभागात असणाऱ्या कामकाजाचे व संस्थान कर्मचाऱ्यांचे प्रत्यक्ष कामाचे स्वरुप, कामाची कार्यक्षमता, कामाचा बोजा (Manpower Energy Audit) चे मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत परिक्षण करणेसाठी श्री.धनंजय गोखले, पुणे, सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी या एकाच संस्थेला चर्चेसाठी बोलविणे ऐवजी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, संबंधीतांकडून दरपत्रके/ कोटेशन घेणेत यावे व जास्तीत जास्त संस्थांना चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१५८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांबाबत.**

**विषय नं.१५९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम (सेवाप्रवेश नियम) बाबत.**

**निर्णय क्र.४४६ विषय नं.१५८ व १५९ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१४ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** संस्थानतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रविवार दि. ११ जूलै, २०१४ ते दि. १३ जूलै, २०१४ अखेर "श्रीं " चा गुरुपौर्णीमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळयाचे दिवसांत साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

**अ)** श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१४ निमीत्त करावयाची व्यवस्था: (कालावधी दि. ११.०७.२०१४ ते दि. १३.०७.२०१४ अखेर ०३ दिवस)

**अ (०१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले )**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | **मंडपाची साईज** | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीं चे चावडी समोरील जागेत १८' उंचीचा | ५०'X३०' | १५००.०० |
| ०२ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'X४०' | २४००.०० |
| ०३ | व्दारकामाई ते रथ पालखी गेट पर्यन्त. | १६०'X१७' | २७२०.०० |
| ०४ | समाधि मंदिर गेट नं. ३ ते मारुती मंदिरापर्यन्त १५' उंचीचा | ५०'X२०' | १०००.०० |
| ०५ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यन्त दक्षिणोत्तर १५' उंचीचा | ६०'X२५'<br>३५'X२०' | १५००.००<br>७००.०० |
| ०६ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | ५५'X२५' | १३७५.०० |
| ०७ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | १५'X१५' | २२५.०० |
| ०८ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'X१५' | २२५.०० |
| ०९ | पालखी स्वागता करीता तसेच माहिती केंद्रासाठी स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह | १५'X१५' | २२५.०० |
| १० | जुने प्रसादालय प्रवेशव्दार (नगर-मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर पर्यन्त) | ३०'X१५'<br>४५'X२५' | ४५०.००<br>११२५.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **१३४४५.००** |
| | **अंदाजे रु.२.८५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च-अ (१)** | | **१,१४,९५५/-** |

**अ (०२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले )**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण** | **मंडपाची साईज** | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त १८' उंचीचा | २८४'X१९'.५" | ५५१५.२८ |
| ०२ | गेट नं. ३ समोरील मोकळ्या जागेत (१६ आर जागेत) | २१०'X८०' | १६८००.०० |
| ०३ | साईकॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यावर दर्शन रांगेसाठी | २९२'X१८' | ५२५६.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२७५७१.००** |
| | **अंदाजे रु.२.९० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च - अ (०२)** | | **२,३९,८६८/-** |

**अ (०३)** पालखीतील पदयात्री साईभक्तांचे निवासासाठी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व कनात व बिछायतीसह (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)

कालावधी- दिनांक ०६/०७/२०१४ ते ०८/०७/२०१४ अखेर ३ दिवस.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिंगवे नाईक येथे | ४०'X६०' | २४००.०० |
| २ | गुहा, ता.राहुरी येथे | ४०'X६०' | २४००.०० |
| ३ | निर्मळ पिंप्री,ता. राहाता येथे | ४०'X६०' | २४००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **७२०० चौ.फुट** |
| | **अंदाजे रु.२.८५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च अ (३)-** | | **६१,५६०/-** |

**अ (०४) मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था :**

कालावधी :- ११.०७.२०१४ ते दि.१३.०७.२०१४ अखेर - ३ दिवस

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण/ एकक | अंदाज दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | **मंदीर परिसरामध्ये कलाकारांची स्टेज व्यवस्था :-** मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था :- ३' उंचीचे स्टेज, स्टेजवर सिंथेटीक मॅटींग, स्टेजचे मागील बाजूस आकर्षक रंगाचा पडदा, व कलाकरांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था | १६'x२४' = ३८४ चौ.फुट | १६.०० | १८,४३२.०० |
| | **एकूण अ (४)** | | | **१८,४३२/-** |

**अ (०५) बॅरीकेडींग कालावधी दि. ११.०७.२०१४ ते दि.१३.०७.२०१४ अखेर ०३ दिवस**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण रनिंग फुट | अंदाज दर रु. प्रति र.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेटींग करणे | ९०० रनिंग फुट | ५.५० | १४८५०.०० |
| | **एकूण - अ(५)** | | | १४८५०.०० |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१४ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ)** | | | | **४,४९,६६५/-** |

**ब) पावसाळयाकरीता ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व्यवस्था दि.०१/०७/२०१४ ते दि.३०/०९/२०१४ अखेर एकूण ९२ दिवस :-**

**ब (१)** ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरसफुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चिम बाजू पर्यन्त (पूर्व-पश्चिम) | १५०'x१०' | १५००.०० |
| ०२ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण -उत्तर) | ५०'x१५' | ७५०.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'x४०' | १८००.०० |
| ०४ | व्हि. आय. पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ६५'x८' | ५२०.०० |
| ०५ | गेट नं. ०३ समोर | ४५'x२०' | ९००.०० |
| ०६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशव्दारा समोर | ३०'x७०'<br>२५'x२०' | २१००.००<br>५००.०० |
| ०७ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | ११५'x३५' | ४०२५.०० |
| ०८ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'x६०'<br>१५'x२०' | ९००.००<br>३००.०० |
| ०९ | लाडू विक्री काउंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| १० | नगरमनमाड रस्ता पूर्व बाजू फुटपाथवर | ४३०'x८' | ३४४०.०० |
| ११ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजु फुटपाथवर | ४००'x७' | २८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२१३३५.००** |
| | **अंदाजे रु.०.१९ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (१)** | | **३,७२,९३६/-** |

**ब (०२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरसफुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६१'x६१' | ३७२१.०० |
| ०२ | उदी वाटप काऊंटर समोर | ४५'x३०' | १३५०.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **५०७१.००** |
| | **अंदाजे रु.०.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (२)** | | **रु.१,१६,६३३/-** |

| | |
|---|---|
| सन २०१४ पावसाळ्याचे कालावधीत करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (ब) | रु.४,८९,५६९/- |
| श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१४ व पावसाळ्यासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ + ब ) | रु.९,३९,२३४/- |

वरिल तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१४ व पावसाळ्याचे कालावधीत श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.९,३९,२३४/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्तप्रमाणे 'अ' नुसार श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१४ निमित्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,४९,६६५/- मात्र व 'ब' नुसार पावसाळ्याचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,८९,५६९/- मात्र असे एकूण रु.९,३९,२३४/- मात्रचे खर्चास तसेच उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे सोयीसुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगिक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या 'अ' नुसार श्री गुरुपौर्णीमा उत्सव-२०१४ निमित्ताने व 'ब' नुसार पावसाळयाचे कालावधीत मंडप उभारणीसह इतर अनुषंगिक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,३९,२३४/- मात्र येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ श्रीद्वारकामाई मंदिराचे पवित्र धुनीवरिल चिमणीचे नुतणीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम- २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करणे", अशी तरतुद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबांनी प्रज्वलीत केलेली पवित्र धुनी श्री द्वारकामाई मंदिरात अहोरात्र सुरु आहे. सदर धुनीतुन निघणारा धूर बाहेर जाणेसाठी द्वारकामाई मंदिराचे छतावर धुनीपासून वर एम एस स्ट्रक्चरमध्ये चिमणी तयार केलेली आहे. सदर चिमणीकरिता आय सेक्शनचे फ्रेमवर्क करुन चिमणीचे आतील बाजूस एम एस शीट बसवून त्यावर बाहेरील बाजूस बायसन पॅनल बसविलेले आहे. सदरचे काम मंदिर पूर्नविकास प्रकल्पाचे दरम्यान सन १९९८ -१९९९ साली पूर्ण केलेले आहे. सदरचे काम पूर्ण होऊन १५ वर्ष झालेले असून चिमणीचे आतील एम एस शीट गंजलेले असून त्याचे पापुद्रे निघत आहे. करिता सदरहू चिमणीचे नुतणीकरण करणे आवश्यक आहे.

**प्रस्तावः-** श्रीद्वारकामाई धुनी चिमणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. याकामासाठी जुने क्लॅडींग काढून नवीन एम.एस.शीट, ग्लास वुल, बायसन पॅनल इ. बसविणे, रंगकाम करणे इत्यादी कामासाठी अंदाजे रु.१,७०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. साईभक्त सुनिता देवी (आक्का) यांनी सदर काम देणगी दाखल करुन देणेबाबत दि.१९/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये इच्छा व्यक्त केली आहे. त्यास मान्यता मिळणेबाबत मंदिर विभाग प्रमुख यांनी दि.२३/०५/२०१४ रोजीची टिपणी सादर केली आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** श्रीद्वारकामाई मंदिरातील धुनीवरील चिमणीचे नुतणीकरण करणेचे काम देणगीदार साईभक्त सुनिता देवी (आक्का) यांचेकडून बांधकाम विभागाचे देखरेखीने करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीद्वारकामाई मंदिरातील धुनीवरील चिमणीच्या नुतणीकरणाचे काम कोणत्याही साईभक्ताकडून करुन घेऊ नये, ते काम संस्थानमार्फत करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे शिर्डी शहर विकास कामांकरीता अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ०४ दि. ०४/०६/२०११ अन्वये अध्यादेश क्र. १४ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम २१ ची खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली. समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

"(१ क) पोटकलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पुर्व मंजुरीने, आणी राज्यशासनाकडुन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करणेत येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या आधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

त्यातील पोटकलम (दोन) अन्वये

स्थानिक नागरी सेवा व सुविधांमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे."

**प्रस्तावना:-** संदर्भ क्रं.१ अन्वये बांधकाम विभागाकडुन पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संदर्भ क्र.२ व ३ अन्वये शिर्डी शहरातील विविध कामांसाठी अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदरचे पत्रातील अं.नं. ४,५ व ७ मध्ये नमुद केलेले प्रस्ताव पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत असल्याने याबाबतची कार्यवाही पाणी पुरवठा विभागाकडुन होणेबाबत कळविले आहे.

उपरोक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे पत्रात त्यांनी सन २०१८ या वर्षी शिर्डी शहरात श्री साईबाबा समाधी शताब्धी महोत्सव साजरा होणार असल्याने शिर्डी शहरात लाखोंच्या संख्येने भाविकांची गर्दी होणार आहे. त्या अनुषंगाने शिर्डी शहरात दयावयाच्या नागरी सेवा व्यतिरिक्त अत्यावश्यक सेवा पुरविणे आवश्यक असल्याने व शिर्डी नगरपंचायतीस क वर्ग असून शिर्डी नगरपंचायतीचे उत्पन्नाची साधने मर्यादित आहे. त्यामुळे नागरी सुविधा देणे नगरपंचायतीस शक्य होत नाही. नगरपंचायतीस शासनाचे अनुदान प्राप्त होत असते तथापि सदर अनुदानातून शिर्डी शहरातील सर्व कामे करणेसाठी सदरचे अनुदान कमी पडते.

याकरीता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर कामांसाठी साईभक्त व नागरीकांच्या मुलभुत सोयीसाठी प्रस्तावातील अनुदान मंजुर करुन कामे करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

अनुदान मागणी प्रस्तावांचा तपशिल खालीलप्रमाणे**:-**

**अ) शिर्डी नगरपंचायतीच्या नविन साठवण तलावात कागद टाकणेबाबत (G.O. Membarance Sheet)-** शिर्डी नगरपंचायतीची वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत सन २०१० मध्ये पुर्ण झालेली आहे. नगरपंचायतीच्या साठवण तलावाची क्षमता ५८० द.ल.ली. इतकी आहे. साठवण तलाव भरल्यानंतर पाणी ४ ते ५ महिने पुरणे आवश्यक आहे. तथापि साठवण तलावास मोठया प्रमाणात पाझर असल्याने जवळपास ६६% पाणी वाया जात आहे. त्यामुळे साठवण तलावातील पाणी फक्त १ ते १.५ महिना पुरते त्यामुळे रोटेशन न आल्यास साठवण तलावातील पाणी संपते. सन २०१३ च्या उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी संपल्याने मोठया पाणी टंचाईस तोंड दयावे लागले आहे. तरी साठवण तलावात कागद टाकल्यास गळती बंद होवून पाणी ४ ते ५ महिने पुरेल व पाणी टंचाई भासणार नाही. तरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन केलेल्या अंदाजपत्राकानुसार अंदाजित ४.० कोटी खर्च भासणार आहे. तरी त्यासाठी ४.० कोटी निधी मिळावा. सदर कार्यवाही झाल्यावर बचत होणार पाणी श्री साईबाबा संस्थानला पुरविण्यात येईल. आणि त्यापोटी देय होणाऱ्या पाणीपट्टीच्या रकमेमधून सदरची रक्कम परतफेड करणेत येईल.

**ब) शिर्डी नगरपंचायतीच्या साठवण तलावापर्यंत कॅनाल इनटेक पाण्याची रॉ वॉटर पाईपलाईन टाकणेबाबत-** शिर्डी नगरपंचायतीची वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत सन २०१० मध्ये पुर्ण झालेली आहे. नगरपंचायतीच्या साठवण तलावाची क्षमता ५८० द.ल.ली.इतकी आहे. साठवण तलाव पुर्ण क्षमतेने भरण्यासाठी अहोरात्र १२ ते १४ दिवसांचा कालावधी लागतो. तथापि पाणी टंचाईमुळे रोटेशन कालावधी कमी झाल्याने तसेच खालच्या (टेल) भागापर्यंत पाणी पोहचेपर्यंत पाणी दिले जात नाही. त्यामुळे साठवण तलाव भरणेसाठी कमी दिवस उपलब्ध होतात. तरी याचा विचार करुन साठवण तलाव साधारण ४ ते ८ दिवसात भरणे आवश्यक आहे. यासाठी अस्तित्वातील ९०० मि.मि.व्यासाच्या पाईपलाईनला समांतर अशी आणखी एक १२०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजित ३.२५ कोटी इतका खर्च येणार आहे. सदर कामांसाठी नगरपंचायतीकडे रक्कम उपलब्ध नसल्याने सदर कामांसाठी ३.२५ कोटी निधी मिळावा.

**क) शिर्डी नगरपंचायतीच्या जुना साठवण तलाव दुरुस्तीसाठी निधी मिळणेबाबत-** शिर्डी नगरपंचायतच्या साठवण तलावाचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत १९८३ ला पुर्ण झालेले आहे. जुन्या साठवण तलावाची क्षमता २२ द.ल.ली.इतकी असून शुध्दीकरण केंद्राची उभारणी केलेली

आहे. सदर योजनेस ३० वर्षाचा कालावधी झालेला असल्याने सदर ठिकाणी मोठया प्रमाणात दुरुस्ती करणे आहे. साठवण तलावास काँक्रिटीकरण अथवा कागद टाकणे आवश्यक आहे. तसेच फिल्टर प्लँटची नविन करणे आवश्यक आहे. तुरटी व टी.सी.एल पावडर गोडावून करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी अंदाजित २.० कोटी निधी आवश्यकता आहे. सदर निधी नगरपंचायतकडे उपलब्ध नसल्याने सदर निधी उपलब्ध करुन मिळावा.

तरी वरीलप्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी वरील काम करणेसाठी अंदाजित एकुण रु. ९.२५ कोटी निधी संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना मिळावा अशी विनंती केलेली होती. सदर विषयाबाबत पाणी पुरवठा विभाग दि. १३/०८/२०१३ अन्वये टिपणी सादर करण्यात आलेली होती. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करणेसाठी उपरोक्त कामांसाठीचे अंदाजपत्रकाची प्रत इकडील कार्यालयास पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते.

शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडून जा.क्रं.न.पं./टे.क्रं.-०७/५५९/२०१४, दि. २०/०२/२०१४ अन्वये सदर कामांची तांत्रिक अंदाजपत्रके तसेच कामांशी आधारीत नकाशे प्राप्त झालेले आहेत.

वरील विषयांपैकी, शिर्डी नगरपंचायत नविन साठवण तलावातील पाण्याची गळती रोखण्यासाठी तलावात कागद टाकणेसाठी त्याबाबतचा खर्च श्री साईबाबा संस्थानकडुन मिळणे व त्याबदल्यात शिल्लक राहणारे पाणी श्री साईबाबा संस्थानला देणे व सदर रक्कम पाणीपट्टी स्वरुपात समायोजन करुन घेणे याबाबतच्या विषयाचा फॅक्स इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. यावर तपासून सादर करणेबाबत मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्रायः-** तरी वरीलप्रमाणे मागणी केलेली रक्कम ही मोठया स्वरुपाची असल्याने ती शिर्डी नगरपंचायतीस देणे ठरल्यास रक्कम देणेपुर्वी मा.महाराष्ट्र शासनाची संस्थान अधिनियमास अनुसरुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे सिव्हिल ॲप्लिकेशन नं.पी.आय. एल.नं.१८/ २०११ मधील सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२ वर मे.कोर्टाने दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.४५० मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** मा.त्रिसदस्य समितीच्या दिनांक ०८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०५ (१) अन्वये रु.२५,००१/- ते रु.१०,००,०००/- रकमेपर्यंतची आलेली कोटेशन्स उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेण्यासाठी मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व ज्या विभागांचा विषय असेल त्या विभागाचे प्रभारी प्रशासकीय अधिकारी या सर्वांची मिळून एक उपसमिती नेमण्यात येऊन या उपसमितीस प्रदान करणेत आले होते. तसेच हॉस्पिटलसंबंधीत विषय असतील तर वैद्यकिय संचालक, रुग्णालये या उपसमितीमध्ये राहतील व या उपसमितीने घेतलेल्या निर्णयांचा अहवाल मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणेत यावा, असे ठरले होते.

आता, प्रभारी प्रशासकीय अधिकारी हे पद अस्तित्वात नसल्यामुळे उपरोक्त उपसमितीमधून ते वगळण्यात आले व मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपकार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकीय अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तसेच वैद्यकिय संचालक यांची उपसमिती गठित करणेत आली तसेच या उपसमितीला रु.२५,००१/- ते रु.१०,००,०००/- रकमेपर्यंतचे प्रशासकीय मान्यतेचे आणि कोटेशन उघडून निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करणेत आले. या उपसमितीने घेतलेल्या निर्णयांचा अहवाल मा.त्रिसदस्य समिती सभेत सादर करणेत यावा.

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ सर्व प्रशासकीय अधिकारी)

**(२)** या सभेमध्ये चर्चा झालेल्या विषयांमधील कंत्राटी पध्दतीने मानधनावर द्यावयाच्या नेमणूकांबाबतचे व रु.१० लाख मात्र पेक्षा जास्त खर्चाचे विषय तसेच मा.खंडपीठाच्या परवानगीसाठीचे इतर विषय विभागवार करावेत व त्यांचा एकत्रित अर्ज मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या मान्यतेसाठी पाठविणेत यावा. (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.३३८ ते ४५० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०२.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (अजय मोरे) | (अनिल कवडे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी